म. ग्रं. सं. ठाणें
विषय जैनेंद्र
सं. क्र. ९१८

REFBK-0007765

ह. मं. ठाणं
अलिप्त
९७८


मराठी साहित्याची रूपरेषा

१९५२ - पूर्वार्ध

प्राचीन मराठी साहित्य

डॉ. वि. पां. दांडेकर,
एम.ए पीएच्.डी.


किं. ३ रु.



मराठी साहित्याची रूपरेषा

पूर्वार्ध


प्राचीन मराठी साहित्य



लेखक :

डॉ. वि. पां. दांडेकर,

एम्.ए.पीएच्.डी.



किंमत

तीन रुपये

प्रकाशक :
डॉ. वि. पां. दांडेकर,
हाथीपोळ जवळ, बडोदें.

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

मुद्रक :
कृष्णाजी वामन मराठे,
श्रीरामविजय प्रिंटिंग प्रेस, बडोदें.

प्रस्तावना

मराठी साहित्याची रूपरेषा या माझ्या ग्रंथाची मुद्दाम तयार केलेली ही 'विद्यार्थी-आवृत्ति' होय. मूळ ग्रंथाचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग वेगळे करून, विद्यार्थ्यांना विकत घ्यायला सुलभ जावेत, असे केले आहेत. ग्रंथाच्या शेवटीं सूचि देण्याऐवजीं या आवृत्तींत विस्तृत अनुक्रमणिका दिली आहे. पूर्वार्धांत शिलालेखांच्या काळापासून ते इ. स. १८७४ पर्यंतच्या काळांतील साहित्याचें विवेचन आलें असून, उत्तरार्धांत विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेपासून ते इ. स. १९५० पर्यंतच्या काळांतील साहित्याचें समालोचन केलें आहे. हें समालोचन करीत असतांना इतर शेंकडो ग्रंथांचा आणि ग्रंथकारांचा उपयोग करण्यांत आला असला तरी, महाराष्ट्र सारस्वतकार वि. ल. भावे, इतिहासाचार्य राजवाडे, डॉ. भांडारकर, महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, पांगारकर, प्रा. कृ. पां. कुलकर्णी, प्रा. रा. श्री. जोग, सरवटे, सरदार, डॉ.वि. मि. कोलते, बाळकृष्ण महानुभाव शास्त्री, डॉ. शं. दा. पेंडसे, प्रो. शं. वा. दांडेकर, प्रो. न. र. फाटक, शंकर श्रीकृष्ण देव इत्यादि ग्रंथकारांचा प्रामुख्यानें आधार घेण्यांत आला आहे. शिलालेखांच्या काळापासून ते इ. स. १९५० पर्यंतच्या काळांतील साहित्याचा एकत्र परामर्श घेणारा हा पहिलाच ग्रंथ होय. सामाजिक-राजकीय-भौगोलिक परिस्थितीचा परिणाम साहित्यावर होतो. प्रस्तुत [illegible]त कोणत्या सामाजिक-राजकीय परिस्थितींत विशिष्ट ग्रंथकारांनीं विशिष्ट प्रकारचेच ग्रंथ निर्माण केले, त्याचे सुरूवातीपासून ते अगदीं अलीकडच्या काळापर्यंत विवेचन केलें आहे. ग्रंथकारांच्या चरित्रांसंबंधीं भाबडेपणानें किंवा भाविकपणानें पाल्हाळ करीत न बसतां, चरित्रवजा माहिती अगदीं थोडक्यांत व तळटीपांत दिली आहे. ग्रंथकाराचें कार्य व ग्रंथांतील मर्म हीं विशद करून सांगण्यावरच मुख्य भर देण्यांत आली आहे. अर्थात्च विनमहत्त्वाच्या लेखकांचा व पुस्तकांचा प्रस्तुतच्या

'साहित्याच्या रूपरेषेंत' उल्लेख टाळण्यांत आला आहे. बी.ए. व एम्. ए. करितां मराठी विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मराठी साहित्याच्या सर्वांगीण व साधार अभ्यासाकरितां आतांपर्यंत अनेक ग्रंथ अभ्यासावे लागत. प्रस्तुत ग्रंथानें ही त्यांची दगदग वाचेल असें वाटतें. मराठी साहित्यासंबंधीं व ते सजविणाऱ्या शैलकडो लेखकांसंबंधीं माझे कांहीं विचार आज इतक्या वर्षांच्या अनुभवानें व अभ्यासानें तयार झाले आहेत. ते विचार मराठी साहित्यरसिकांच्या व सेवकांच्या समोर मांडण्याचें कार्य या ग्रंथांनें मीं करीत आहें. माझा हा अल्पसा प्रयत्न वाचकांना आवडल्यास मला धन्यता वाटेल.

वडोदें,
ता. २३–६–५२

वि. पां. दांडेकर

अनुक्रमणिका

१. प्रास्ताविक पृ. १–१७

महाराष्ट्राचा पूर्वेतिहास...महाराष्ट्र शब्दाची व्युत्पत्ति (१-३) महाराष्ट्राची व्याप्ति (४-५) महाराष्ट्रांत आर्यांची वसति (६) राजकीय स्थित्यंतरें-मौर्य -शुंग - शातवाहन-शक-राष्ट्रकूट-चालुक्य-यादव-मोंगल-मराठे-इंग्रज (८-१५) मराठी भाषेची उत्पत्ति (१५-१७)

२. मराठी साहित्याची गंगोत्री पृ. १८-२५

महाराष्ट्रींतील साहित्य (१८) शिलालेख (१९-२३) मुकुंदराज (२३-२५) श्रीपति-हेमाद्रि-गोरक्षनाथ (२५)

३. महानुभाव साहित्य व तत्त्वज्ञान पृ. २६-५६

चक्रधर-गोविंदप्रभु-नागदेवाचार्य- (२६-२७) महाराष्ट्राची स्थिति (२८) पंथाचा प्रसार (२९-३०) सांकेतिक लिपी (३१) लीला चरित्र-ऋद्धिपुर चरित्र-सूत्रपाठ (३२-३६) महानुभाव साहित्यसंशोधक (३७) महानुभाव आचार व तत्त्वज्ञान (३७-४६) सातीग्रंथ (४७-५२) इतर वाङ्मय (५३-५४) महदाइसा (५५-५६)

४. ज्ञानेश्वर पृ. ५७–७५

चरित्र व तत्कालीन स्थिति (५७-६०) ज्ञानेश्वरी-अमृतानुभव-स्फुट रचना (६१-६२) ज्ञानेश्वर एक कीं दोन (६३) ज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान (६३-६६) ज्ञानेश्वर काव्य (६७-७०) ज्ञानेश्वरीची भाषा (७१-७२) नाथ-पंथाचें साहित्य (७३-७५)

५. नामदेव पृ. ७६–८६

नामदेवांचें कार्य (७६) प्रेममय भक्तीचा प्रसार (७७-७८) पंढरपूरचें प्रेम (७९) नामस्मरण (८०) सत्संगति (८०) नामदेवांचें अभंग (८१-८२) नामदेव एक कीं अनेक (८२) गोरोबा, परिसाभागवत, विसोबा खेचर, जनाबाई, कान्होपात्रा, चांगदेव, चोखोबा, सांवतामाळी, नरहरि सोनार, बहिरापिसा, नामा पाठक, कान्हो पाठक (८३-८५) संतांचें कार्य (८६)

६. एकनाथ पृ. ८७–१००
चरित्र व तत्कालीन स्थिति (८७-८९) मराठी भाषाप्रेम (८९) ग्रंथरचना (९०-९४) नाथ पंचायतन-दासोपंत (९५-९६) इतर कवि (९६-९७) गुरुचरित्र (९८) संस्कृति व भाषा (९८-१००)

७. मुक्तेश्वर पृ. १०१-१०६
चरित्र व कार्य (१०१-१०२) ग्रंथ रचना (१०३-१०६)

८. तुका म्हणे पृ. १०७–११९
चरित्र व कार्य (१०७-१०८) लोकप्रियतेचीं कारणें (१०८-१०९) आध्यात्मिक प्रगतीचें अभंगांतील चित्र (१०९-१११) सामाजिक स्थिति (१११-११२) शुद्ध चारित्र्य (११२) तुकोबांचे अभंग (११३-११४) तुकाराम व रामदास (११५-११६) वारकरी संप्रदायाचें कार्य (११७) बोधलेबुवा-निंबराज दैठणकर-मोरया गोसावी-गणेशनाथ-सेना न्हावी-शेख महंमद-रेणुका तेलीण-बहिणाबाई-कान्होबा-निळोबा (११८-११९)

९. रामदास पृ. १२०-१३३
चरित्र व कार्य (१२०-१२१) ग्रंथरचना-देवताख्यानपर-आध्यात्मिक-स्फुट, दासबोध-सामाजिक व राजकीय स्थिति (१२२-१२८) रामदासी काव्य (१२८-१३१) समर्थ संप्रदायांतील कवी-जयरामस्वामी-जयराम-रंगनाथस्वामी-आनंदमूर्ति-वेणाबाई-गंगाधरपंत ऊर्फ श्रेष्ठ-दिनकर गोसावी-देवदास-अवचित सुत काशि-शिवराम (१३२)

१०. वामन पंडित पृ. १३४-१४२
वामनाचें कार्य (१३४) ग्रंथरचना (१३५) यथार्थ दीपिका (१३६ १३७) स्फुट आध्यात्मिक प्रकरणें (१३७-१३८) आख्यानपर कविता (१३८-१३९) इतर रचना (१४०-१४१) नागेश व विठ्ठल (१४१-१४२)

११. दक्षिण हिंदुस्थानांतील कवि पृ. १४३–१४६
भीमस्वामी (१४३) मेरुस्वामी-रामसोहळा (१४४) माधव (१४४) रंगनाथ-दासानुदास-भगवंत (१४४) पौराणिक नाटकें (१४४) अनंतकवि-आनंदतनय-रघुनाथ पंडित (१४५-१४६)

१२. शाहू महाराजांच्या वेळचे कांहीं कवी पृ. १४७-१५०
निरंजन माधव (१४७) सामराज (१४८) कृष्णदयार्णव (१४८-१४९) श्रीधर (१४९-१५०) गिरिधर-नरहरि मोरेश्वर (१५०)
१३. स्वतंत्र काव्याची सुरुवात पृ. १५१-१५३
जगन्नाथाचें शशिसेना (१५१) जीवनाची अनुभवलहरी (१५२) शिवराम-विष्टल-त्र्यंबक-मध्वमुनि-अमृतराय (१५२-१५३)
१४ संत चरित्रकार पृ. १५४–१५६
सच्चिदानंदबाबा-नामदेव–निरंजन माधव-नाभाजी-उद्धवचिद्धन–दासो दिगंबर-महिपतिबोवा ताहराबादकर-भीमस्वामी-राजाराम प्रासादी-उद्धवसुत-आत्माराम महाराज-नरहरि धुंडिराज (१५४–१५६)
१५ मोरोपंत पृ. १५७–१६७
चरित्र व कार्य (१५७–१५९) पंतांचे चाहते व टीकाकार (१५९–१६०) पंतांचीं रूपांतरें (१६०–१६२) पंतांची भाषा (१६३) पंतांची आर्या (१६५) मोरो पंतकालीन कवी (१६७)
१६ मराठी काव्याची पहांट पृ. १६८–१८१
शाहिरी पोवाडे व लावण्या-शाळीग्राम-ऑक्वर्थ-केळकर-गुप्ते (१६८-१७०) अज्ञानदास-तुलसीदास इत्यादि (१७१) लावण्यांतील समाजस्थिति (१७३–१७४) रामजोशी (१७५) अनंतफंदी (१७६) प्रभाकर (१७६) होनाजीबाळा-परशुराम (१७७) पष्टे बापुराव (१७८) पेशवाई अखेरील कवी (१७९–१८१)
१७ महानुभावेतर गद्यसाहित्य व बखरी पृ. १८२–१८८
१८ अव्वल इंग्रजींतील साहित्य पृ. १८९–२१६
नवें मराठी साहित्य-मिशनऱ्यांचे प्रयत्न डॉ. विलियम कॅरी-अमेरिकन मिशन-स्कॉट्टिश मिशन (१८९) सरकारी प्रयत्न माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन-टौनशेंड-बापू छत्रे-जॉर्ज जर्व्हिस–महाराष्ट्र भाषेचा कोश-मोल्सवर्थ कोश–लॉर्ड मेकॉले-हॅलिफॅक्स (१९२) स्वतंत्र विचारांचें साहित्य–बापू छत्रे-हरि

केशवजी-चाळशास्त्री जांभेकर दादोबा पांडुरंग-परशुरामपंत तात्या-भाऊ महाजन-ज्ञानचंद्रोदय-सर्वसंग्रह (१९५) संस्कृत नाटकांचीं रूपांतरें परशुरामपंत तात्या-कृष्णशास्त्री राजवाडे-गणेशशास्त्री लेले (१९७) स्वतंत्र नाटकें (१९९) कथात्मक वाङ्मय (२००) इतिहास (२०२) निबंध (२०३) लोकहितवादी-माडगांवकर-कृष्णशास्त्री चिपळूणकर-विष्णुबुवा ब्रह्मचारी-ज्योतिराव फुले-विष्णुशास्त्री पंडित (२०४–२०९) काव्य (२१०) साहित्याचें मूल्यमापन (२१३-२१६)

डॉ. वि. पां. दांडेकर यांचीं पुस्तकें

कादंबऱ्या

१ चारित्र्यसुधा
२ प्रतारणा
३ कुचंबणा
४ तिशीचा तरूण

लघुनिबंधसंग्रह

५ फेरफटका
६ टेकडीवरून
७ एक पाऊल पुढें
८ काळ खेळतो आहे
९ पंचवीस वर्षांनंतर

प्रबंध

१० केळकरांचीं सहा नाटकें
११ मराठी नाट्यसृष्टि–पौराणिक नाटकें
१२ मराठी नाट्यसृष्टि–सामाजिक नाटकें
१३ महाराष्ट्र

चरित्र

१४ श्रीमंत सयाजीराव महाराज
१५ अर्जुन

भाषांतरित

१६ भारतीय समाजस्थिति
१७ निवृत्तिविनोद

७७८१

मराठी साहित्याची रूपरेषा

पूर्वार्ध

प्राचीन मराठी साहित्य

१

प्रास्ताविक

महाराष्ट्राचा पूर्वेतिहास

मराठी साहित्याची रूपरेषा नीट लक्षांत येण्याच्या दृष्टीनें महाराष्ट्राचा पूर्वेतिहास, महाराष्ट्रांतील राजकीय स्थित्यंतरें, मराठी भाषेची उत्पत्ति इत्यादि जाणणें उपयुक्त ठरेल.

महाराष्ट्र शब्दाच्या व्युत्पत्तिसंबंधानें निरनिराळीं मतें आहेत. डॉ. विल्सन[1] यांच्या मतें, "महरट्ट हें महाराष्ट्र या संस्कृत शब्दाचें पाली रूप आहे. हें रूप मल्लराष्ट्र या शब्दाबरोबर विष्णुपुराण वगैरे पुराण ग्रंथांत आढळतें. संस्कृत पंडित महाराष्ट्र शब्दाची व्युत्पत्ति महा+राष्ट्र=मोठें राष्ट्र अशी करतात...परंतु त्या व्युत्पत्तीस पुरेसा ऐतिहासिक अगर भौगोलिक पुरावा आढळत नाहीं."—असें असून ते महारांचें राष्ट्र तें महाराष्ट्र अशी दुसरी व्युत्पत्ति सुचवितात. गांव तेथें महारवाडा, ही म्हणहि स्वमतपुष्ट्यर्थ ते पुढें करितात. ह्या व्युत्पत्तिविरुद्ध एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे कीं, एहोळी येथील जैन रवीकीर्तिच्या शिलालेखांत (इ. स.

---

१ मोल्सवर्थ कोशाची प्रस्तावना.

६३४) महाराष्ट्र हें एक राष्ट्र नसून तीन महाराष्ट्रांचा समुदाय आहे असें स्पष्ट म्हटलें आहे. डॉ. ओप्पर्ट[1] यांनीं दि ओरिजिनल इनहॅबिटंट्स ऑफ भारतवर्ष (भारतवर्षाचे आदिवासी) या आपल्या ग्रंथांत "मल्लराष्ट्र म्हणजे महाराष्ट्र होय, मार. म्हणजेच मल्ल व मार लोकांनाच म्हार असें म्हणत, म्हाराचे हळुहळू महार झाले, महार लोकांच्या भाग्याला उतरती कळा जसजशी लागत चालली तसतसा त्यांच्या महाराष्ट्र व मल्लराष्ट्र या नांवाशीं असलेल्या संबंधाचा विसर पडून महा+राष्ट्र असा अर्थ करण्यांत येऊ लागला."—असें मत सुचविलें आहे. महाराष्ट्रांतील फार मोठ्या वर्गाचें कुलदैवत खंडोबा यानें मणि व मल्ल या दैत्यांचा वध केल्यावरून त्यास मल्लारि असें म्हणतात. या गोष्टीवरून तसेंच मलठण, मळगांव, मळखेडें, मळवाण, मळवली इत्यादि गांवांच्या नांवावरून महाराष्ट्रांत पूर्वी मल्ल-जातीचे लोक राहात असावेत असें कै. राजवाडे यांचें जें मत आहे त्यावरून ही व्युत्पत्ति अगदींच अग्राह्य अशी वाटत नाहीं. डॉ. भांडारकर[2] या बाबतींत असें म्हणतात, "कुडा व बडेसा येथील शिलालेखांत महाभोज असा उल्लेख आहे. ज्याप्रमाणें भोज हे स्वतःला महाभोज म्हणवीत त्याप्रमाणें राष्टिक, रट्ठि, रथि, रट्ठ स्वतःला महारट्ठ किंवा महारट्ठ म्हणवीत. त्यांच्या देशाला महारट्ठ व त्याचेंच संस्कृत रूप महाराष्ट्र होय." अशोकाच्या शिलालेखांत 'राष्टिकां'चा उल्लेख आहे. त्यावरून ह्या राष्ट्रिकांचें किंवा रट्ठांचें जें राष्ट्र तें महारट्ठ किंवा महाराष्ट्र होय हें उघडच दिसतें. कै. वि. का. राजवाडे यांनीं आपल्या 'महाराष्ट्राचा वसाहतकाल' या निबंधांत डॉ. भांडारकर यांच्या व्युत्पत्तीला पोषक असेंच मत दिलें आहे. राजारामशास्त्री भागवत यांच्या मतें महारथींचा जो देश तोच महाराष्ट्र होय. महामहोपाध्याय पां. वा. काणे यांच्या मतें मोठें राष्ट्र तें महाराष्ट्र होय. महाराष्ट्रांत पूर्वी मोठें अरण्य होतें. त्याच्या जागीं आर्यांनीं वसाहती

---

१ पृ. २२, १८९३.

२ अर्ली हिस्टरी ऑफ दि डेक्कन (दक्षिण देशाचा प्राचीन इतिहास).

नों. नं. १४८२ ३
२।३५३

स्थापून मोठें राष्ट्र निर्माण केलें, म्हणून त्यास महाराष्ट्र म्हणू लागले. ह्या व्युत्पत्तीला पोषक असा उतारा महानुभावीय ग्रंथांत (आचार महाभाष्य) आढळतो. 'महाराष्ट्र म्हणजे महंतराष्ट्र। म्हणून महाराष्ट्र। महत म्हणजे थोर। असें त्यांत एके ठिकाणीं म्हटलें आहे. वरील सर्व व्युत्पत्तींत रट्टांचा किंवा महारट्टांचा जो देश तो महारट्ट म्हणजे महाराष्ट्र ही व्युत्पत्ति आणि मोठें राष्ट्र तें महाराष्ट्र ही व्युत्पत्ति ह्या दोन आमच्या मतें अधिक ग्राह्य आहेत. कारण या दोन्हीं व्युत्पत्तींना शिलालेखांचा आधार[1] आहे.

आतां ह्या महाराष्ट्राची व्याप्ति व मर्यादा या कोठपर्यंत आहेत तें पाहूं या. स्थूल मानानें पाहतां ज्या भागांत मराठी भाषा चालते, बहुसंख्य लोकांकडून बोलली जाते तो महाराष्ट्र होय. या प्रदेशाची व्याप्ति निरनिराळ्या काळीं कमी अधिक असण्याचा संभव आहे. तथापि सामान्यतः या देशाच्या मर्यादा पुढें दिल्याप्रमाणें सांगतां येतील.[2] "मुख्य मराठी भाषा भरतखंडाच्या पश्चिम किनाऱ्यावर पोर्तुगीज अमलाखालीं असलेल्या गोव्याच्या हद्दीपासून सुरू होऊन समुद्र किनाऱ्यानें वर उत्तरेकडे दमण जवळील दमणगंगा या नदीपर्यंत जाते. ही नदी सह्याद्रीच्या पश्चिमेकडील सखल प्रदेशापुरती मराठी भाषेची उत्तरेकडील सीमा होय. घाटमाथ्यावर मात्र ही सीमा पाणलोटाच्या बाजूबाजूनें कोळी, भिल्ल वगैरे वन्य समाजांतून वर नर्मदेपर्यंत जाते. नर्मदा नदी गुजराती व नेमाडी या भाषांपासून मराठीला विभिन्न करणारी रेषा होय. हीच सीमारेषा पुढें नर्मदेला पूर्वेस व पश्चिमेस स्पर्श करून असलेल्या सातपुडा पर्वताच्या कडेनें गेली आहे. गाविलगडाच्या आसपास ज्या ठिकाणीं सातपुड्याच्या एका दुसऱ्या फाट्यांस सुरवात होते तेथें ही सीमारेषा पूर्वेकडे बैतुल व शिवणीकडे प्रारंभ करून नागपूर व शिवणी यामधील घाटांत संपते. व तेथून नागपूर मध्य करून कांहींशा अर्धवर्तुलाकार रेषेंत ही सीमारेषा थोडी दक्षिणेकडे

---

१ अशोकाचे शिलालेख; ऐहोळी येथील शिलालेख; नाणेघाटांतील शिलालेख.

२ महाराष्ट्र शब्दकोश, खंड तिसरा.

व थोडी पूर्वेकडे आणि नंतर पश्चिमेकडे वळून लांजी व वैरागढ यांना स्पर्श करून जाते. तेथें तिची गोंडी व तेलगू भाषांशीं गांठ पडते. तेथून नंतर ही सीमारेषा चांद्याच्या नजीक जाऊन तेथून पश्चिमेकडे जाण्यास सुरुवात करून पैनगंगेच्या बाजूनें माहूरपर्यंत जाते. ही रेषा मराठी व तेलगू यांमधील विभाजक रेषा होय. माहुरापासून गोदावरीपर्यंत जाऊन नागमोडी मार्गानें ती नैऋत्य दिशेकडे देगलूर, नलदुर्ग, सोलापूर, विजापूर, यांना स्पर्श करून जाते. तेथून ही रेषा कृष्णेपर्यंत जाऊन जवळ जवळ कोल्हापूर पर्यंत जेथें कृष्णा उत्तरेकडे वळसा घेते तेथपर्यंत जाते. कृष्णा ही मराठी व कानडी यांमधील विभाजक रेषा आहे. नंतर ही रेषा नैऋत्य दिशेकडे वळून कोल्हापूर संस्थानचा मुलूख व गोव्याच्या घाटांवरील मुलूख पोटांत घेऊन तेरेखोलच्या खाडीपाशी समुद्रास मिळते."

वर ज्या मर्यादा दिल्या आहेत त्यांत आज परिचित नांवांनीं पाहावयाचें म्हणजे मुख्यतः पुढील प्रदेश येतात. गोकर्ण, गोवें प्रांत, कोंकण, देश, खानदेश, वऱ्हाड, मराठी मध्यप्रांत, व निजामच्या राज्यांतील मराठवाडा या मुख्य भागांत पुढील जिल्हे सामान्यतः मोजले जातात. कारवारचा कांहीं भाग, गोवा, बेळगांवचा कांहीं भाग, रत्नागिरी, कुलाबा, ठाणें, सातारा, सोलापूर, पुणें, अहमदनगर, पूर्व व पश्चिम खानदेश, हे मुंबई इलाख्यांतील जिल्हे; वऱ्हाडांतील बुलढाणा, अकोला, यवतमाळ, अमरावती हे चार जिल्हे; तसेंच मध्यप्रांतांतील वर्धा, नागपूर, चांदा व भांडारा हे जिल्हे आणि बालाघाट व छिंदवाडा या जिल्ह्यांचा भाग व छत्तिसगढ, बस्तर, रायपूर, द्रुग वगैरेंचा कांहीं भाग दक्षिणेंतील पूर्वींचीं संस्थानें, आणि निजामशाहींतील औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी हे जिल्हे, उस्मानाबाद व बेदर यांचा कांहीं भाग, या सर्व प्रदेशास आज आपण महाराष्ट्र या नांवानें संबोधितों. परंतु यास महाराष्ट्र हें नांव फार प्राचीन काळापासून दिलेलें आढळत नाहीं. प्राचीनकाळीं या प्रदेशाच्या निरनिराळ्या भागांस निरनिराळीं नांवें असलेलीं आढळतात. वऱ्हाड ह्या प्रदेशास पूर्वी विदर्भ

म्हणत. खानदेश, अजंठ्याचा पहाड वगैरे भाग अश्मक या नांवानें प्रसिद्ध होता. नाशिकच्या आसपासच्या भागास दण्डकारण्य या नांवानें संबोधिलें जाई. ह्या दक्षिणारण्याच्या दक्षिणेकडील कृष्णेजवळच्या भागास कुंतल व कोंकणास अपरांत असें नांव आढळतें.

बृहदारण्यकोपनिषद्, महावंसो, बौधायनस्मृति, महाभारत, रामायण इत्यादि प्राचीन ग्रंथांत व अशोकाचीं शासनें आणि भाजे, बडेसा, कार्ले, नाणेघाट, नाशिक इत्यादि शिलालेखांत विदर्भ, वनवास, महारट्ठ, दक्षिणापथ, अपरान्त, नाशिक्य, कुंतल, सूपारग (सोपारा), कलियण (कल्याण), पतिठाण (पैठण) इत्यादि महाराष्ट्रांत अन्तर्भुत होणाऱ्या स्थलांचा निर्देश असला तरी महाराष्ट्र या नांवाचा उल्लेख वराहमिहिराच्या काळापर्यंत (इ. स. ४९०) आढळत नाहीं. वराहमिहिराच्या बृहत्संहितेंत विदर्भदेश भारतवर्षाच्या मध्यभागाच्या आग्नेय दिशेला आहे असें सांगितलें आहे. (बृहत्संहिता अ. १४'८) याच ग्रंथाच्या दहाव्या अध्यायांत महाराष्ट्राचें नांव आलेलें आहे. 'भाग्ये रसविक्रयिणः पण्यस्त्रीकन्यका महाराष्ट्राः।' (बृ. सं. १०'८) ऐहोळीचा जैन रविकीर्ति यानें लिहिलेला शिलालेख अत्यंत महत्वाचा आहे. हा इ. स. ६३४ मध्यें सत्याश्रय पुलकेशीच्या कारकीर्दीत लिहिण्यांत आला असून, त्यांत रविकीर्तीनें असें म्हटलें आहे कीं, महाराष्ट्राचे तीन भाग असून त्यांत ९९००० गांवें आहेत. (अगमदधिपतित्वं यो महाराष्ट्रकाणां। नवनवति सहस्रग्रामभाजां त्रयाणाम्) रविकीर्तीच्या वेळीं बदामी शहर महाराष्ट्रांत मोडत होतें. ऐहोळी शिलालेखाच्या वेळीं हिंदुस्थानांत आलेला चिनी प्रवासी ह्युएनत्संग ह्यानें आपल्या प्रवासवृत्तांत महाराष्ट्राबद्दल खालील सीमादर्शक उल्लेख केला आहे. द्रविड-देशाहून उत्तरेस तो एकाकी एक लहान गांवास गेला. तेथून २००० ली (२५०–३०० मैल) प्रवास केल्यावर तो कोंकणपुर (Kung-kiu-na-puls) ह्या देशाला गेला. हा देश ५००० ली आहे व त्याच्या राजधानीचा विस्तार ३० ली आहे. कोंकणपुर देश सोडून वायव्येस (इशान्येस?) प्रवास

केल्यावर एक मोठें अरण्य लागलें. त्यांत वन्यपशु व पुष्कळ क्रूर लुटारू होते. कोंकणपुरापासून २४०० ली (३५०—४०० मैल) वाट चालल्यावर तो महाराष्ट्र (Mo-ha-la-cho) देशांत आला. ह्या देशाचा विस्तार ६००० ली होता व त्याची राजधानी ३० ली होती.

ह्या महाराष्ट्रांत आर्यांनीं केव्हां वसति केली, या मुद्याकडे आतां आपण वळूं या. दंडकारण्य किंवा महाकान्तार म्हणजे प्रचंड अरण्य असलेल्या या भागांत केव्हांपासून लोक येऊन राहू लागले हा मुद्दा खरोखरच महत्त्वाचा आहे. पाणिनीच्या काळीं (शकपूर्व ९०० वर्षें) दंडकारण्याची किंवा विंध्य-पर्वताच्या दक्षिणेकडील माहिती आर्यांना नसावी हें उघड आहे. कारण पाणिनीसारख्या अत्यंत चौकस वैयाकरणानें इतर देशांचा आपल्या सूत्रांत उल्लेख केला, तसा दंडकारण्याचा केलेला नाहीं. कात्यायनानें मात्र आपल्या वार्तिकांत महिष्मत् या देशाचा उल्लेख कुमुद्वत्, नदवत् वेतस्वत् या देशांबरोबर केला आहे. महिष्मत् हा देश महाराष्ट्रांत मोजला जात असून त्याची राजधानि नर्मदाकांठीं असलेलें महिष्मति किंवा महेश्वर हें शहर होतें. कात्यायनाचा काळ शकपूर्व सहाशे वर्षें मानतात. कात्यायनानें नासिक्य उर्फ नाशिक शहराचाहि उल्लेख केला आहे. पतंजलीच्या काळीं तर सरसहा सर्वांच्या परिचयाचा दक्षिणापथ हा देश झाला होता. महिष्मती, वैदर्भ कांचिपूर, केरल इत्यादि शहरांचा उल्लेख पतंजलीच्या ग्रंथांत आहे. अर्थात् शकपूर्व सातव्या शतकापासून आर्यांची वसति दंडकारण्यांत हळुहळू होऊ लागून, शकपूर्व तिसऱ्या शतकांत तर रट्टांचीं किंवा राष्ट्रकूटांचीं छोटीं छोटीं राज्यें महाराष्ट्रांत सिद्ध झालीं होतीं. अशोकाच्या शासनांवरून तसेंच नाणेघाटांतल्या शिलालेखांवरून ही गोष्ट सुस्पष्ट आहे. आर्यांपैकींच्च मानव्य, हैहय, भोज, यादव, नळ, कदंब, मौर्य, सेंद्रक, चालुक्य इत्यादि शेंकडो गोत्रांचे रट्ट दंडकारण्यांत शिरले. त्यांनीं येथें ग्रामकूटपणा म्हणजे पाटिलकी व राष्ट्रकूटपणा म्हणजे देशमुखी व महाराष्ट्रकूटपणा म्हणजे सरदेशमुखी इत्यादि अधिकारांचा स्वीकार करून आपलें वर्चस्व स्थापन

केलें. ह्या शेंकडो गोत्रांच्या रट्टांना शहाण्णव कुळींचें मराठे म्हणण्याची चाल आहे. आजच्या माने, शिंदे, जाधव, कदम इत्यादि आडनावांत पूर्वीच्या मानव्य, सेंद्रक, यादव, कदंब इत्यादि गोत्रांचा ठसा स्पष्ट दिसतो. आर्य दंडकारण्यांत येण्यापूर्वी येथें मूतिब, पुलिंद, शबर, भिल्ल, कातकरी, ठाकूर, गोंड, खोंड, कोळी व नाग इत्यादि अनार्य लोक राहत असावेत असें वाटतें. कदाचित् हे लोक, अमेरिकेंत नीग्रो युरोपियनांच्या मागाहून आले तसे, आर्यांच्या मागाहून किंवा बरोबरीनें आले असावेत असेंहि एकमत आहे[1]. मराठींत व तत्पूर्वीच्या महाराष्ट्रींत अगदीं देशी, ज्यांचा संस्कृतशीं कांहींहि संबंध नाहीं असे डोळा, पोट, हाड, आई, बाप इत्यादि अनेक शब्द आहेत त्यांवरून तसेंच आर्यांच्या संस्कृत भाषेला महाराष्ट्रीसारख्या अपभ्रंश भाषेचें जें स्वरूप दंडकारण्यांत आलें त्यावरून, या प्रदेशांत अनार्यांची पुष्कळ वसति असावी हें उघड होतें. सांप्रत महाराष्ट्रांत वंश-शास्त्राच्या दृष्टीनें पाहतां पश्चिमेकडील भागांत सिदियन व द्रविडियन अशा मिश्रवंशाचे लोक मुख्यतः राहतात, व पूर्वेकडील भागांत मोंगल-द्रविडियन वंशाचे लोक वसति करून आहेत. पश्चिमेकडील भागांत ब्राह्मण, प्रभु, पाठारे प्रभु, मराठा, कुणबी, महार, धनगर, भिल्ल, लिंगायत या जाती मुख्य असून पूर्वेकडील भागांत ब्राह्मण, चांभार, भिल्ल, गोंड, कुणबी, कोळी या ज़ाती प्रमुख आहेत. या शिवाय वाणी, माळी, मांग, कुंभार, सुतार, आगरी, सोनार, न्हावी, बेरड, भांडारी, वारळी, शिंपी, तेली, लोहार, वणजारी, अहिर याहि जाती महाराष्ट्रांत आढळतात. मुसलमानांची लोकसंख्याहि महाराष्ट्रांत आहे. पण तिचें प्रमाण फार थोडें आहे. सर्वांत जास्त लोकसंख्या मराठा यांची असून कुणबी यांची लोकसंख्या त्यांच्या खालोखाल आहे.

प्राचीनकाळीं अगस्ति ऋषीनें ज्या मार्गानें विंध्य पर्वत ओलांडून आर्यांच्या वसाहतीची मुहूर्तमेढ दंडकारण्यांत रोविली, त्याच मार्गानें दाशरथी

१ के वि. का. राजवाडे, महाराष्ट्राचा वसाहतकाल.

रामानें जाऊन हें वसाहतकर्म पुढें चालविलें. पूर्वसूरींच्या याच मार्गाचा अवलंब करून शकपूर्व सातव्या–आठव्या शतकांत आर्यांनीं दंडकारण्यांत घुसण्याचा जोराचा प्रयत्न केला. ह्या रट्ट आर्यांनीं इतकें यशस्वी वसाहतकार्य केलें कीं त्यांच्याच दंडकारण्याला पुढें महाराष्ट्र किंवा महारट्ठ म्हणू लागले.

महाराष्ट्रांतील राजकीय स्थित्यंतरें

सम्राट अशोकाच्या शिलाशासनांवरून महाराष्ट्रावर राज्य करणाऱ्या राजघराण्यांत मौर्य घराण्याचा प्रथम उल्लेख केला पाहिजे. हें घराणें खि. पूर्व ३२० ते खि. पूर्व. १८३ पर्यंत राजसत्ता उपभोगीत होतें. महाराष्ट्राच्या सर्व भागावर या घराण्याची सत्ता नसावी. कारण अशोकाच्या शिलालेखांत आपल्या राज्याच्या दक्षिणेकडे राष्टिक (राष्ट्रिक) व पेटेणिक (पैठणक) यांचीं राज्यें असल्याचा उल्लेख आहे. तरी पण विदर्भ व शूर्पारक (सोपारा) या भागांत मौर्यांची सत्ता होती ही गोष्ट निर्विवाद आहे. मौर्य घराण्यांतील शेवटचा राजा बृहद्रथ यांस त्याचा सेनापति शुंगवंशीय पुष्यमित्र किंवा पुष्पमित्र यानें ठार करून शुंगवंशाची स्थापना केली. या वंशानें खि. पू. १८३ पासून खि. पू. ७३ वर्षापर्यंत महाराष्ट्रावर राज्य केलें. या नंतर खि. पू. शके ७३ पासुन ते इ. स. २१८ पर्यंत शातवाहन (शालिवाहन) किंवा आंध्रभृत्य घराण्याकडे राजसत्ता आली. या आंध्रभृत्य घराण्यांतील सिमुक (सिंधुक), कृष्ण, शातकर्णी, गौतमीपुत्र, पुलुमायी, यज्ञश्री व मढरिपुत्र इत्यादि राजांचा नाशिक व कान्हेरी येथील शिलालेखांत उल्लेख आहे. गोतमीपुत्र शातकर्णी व वासिष्ठीपुत्र पुलुमायी ह्या पितापुत्रांनीं एकाच वेळीं अनुक्रमें धनकटक (गन्तुर जिल्हा) व पैठण या भागांत राज्य करून शक-यवन-पल्हवांचा नाश केला; व आपल्या राज्याचा विस्तार उत्तरेस मुराष्ट्रापासून दक्षिणेस धर्निकोट पर्यंत केला. हे पितापुत्र अत्यंत पराक्रमी उदार व दानशूर होते असें नाशिक येथील शिलालेखांवरून स्पष्ट होतें. आंध्रभृत्यांच्या अमदानींत सुमारें पन्नास वर्षें शकांचें

आक्रमण यशस्वी ठरून, महाराष्ट्राच्या कांहीं भागांत त्यांचें राज्य होतें. क्षहरात नहपान व त्याचा जांवई उशवदात ह्या शक राजांचा उल्लेख नाशिक व जुन्नर येथील शिलालेखांत आहे. बुद्ध भिक्षुंकरितां उशवदातानें विहार बांधविल्याचा उल्लेख नाशिक येथील लेण्यांत आहे. वायुपुराण, विष्णु-पुराण, मत्स्यपुराण इत्यादि पुराणांत आंध्रभृत्य राजांची जी वंशावळ दिली आहे ती व शिलालेखांत शातवाहनांची जी यादि आढळते ती हीं दोन्हीं एकच होत. आंध्रभृत्यांच्या नंतरच्या तीन शतकांचा इतिहास बराचसा अज्ञात आहे. आंध्रभृत्यांच्या पडत्या काळांत महाराष्ट्रांतील मूळचीं रट्ठांची किंवा स्त्रकुटांचीं घराणीं पुनः वर डोकीं करूं लागलीं असतील. खानदेशाच्या भागांत आभीरांचें व त्याच्याखालीं स्त्रकुट किंवा राष्ट्रकुटांचें राज्य ह्या काळांत असावें. यांपैकींच इंद्र राष्ट्रकूटाचा जयसिंह चालुक्यानें पराभव करून, चालुक्य राजवंशाची स्थापना महाराष्ट्रांत केली. जयसिंह चालुक्यानंतर रणराग व त्यानंतर त्याचा पुत्र पुलकेशी पहिला हा गादीवर आला. हा मोठा पराक्रमी राजा होऊन गेला. यानें बदामी (वातापीपूर) येथें राजधानी स्थापन केली व अश्वमेध यज्ञ केला. मंगलीश चालुक्यानें त्रिपु-रीच्या चेदीवंशीय कलचुरीचा पराभव केला. बदामी येथील लेण्यांत मंगली-शानें विष्णुपूजा सुरू केल्याचा निर्देश आहे. दुसरा पुलकेशी हा तर मोठाच पराक्रमी होता. यानें मौर्य, लाट, मालव, गुर्जर इत्यादिकांचा पराभव केला. त्याचें पूर्ण नांव सत्याश्रय श्री पृथ्वीवल्लभ पुलकेशी महाराज असें होतें. अजिंठा येथील एका चित्रांत इराणी वकील याच पुलकेशीला खलिते देत आहे असें चित्र आहे. याच्याच राज्यांत इ. स. ६३९ च्या सुमारास चिनी यात्रिक हयुएन्त्संग हा चीनहून फिरत फिरत महाराष्ट्रांत आला होता. चालुक्य घराणें इ. स. ५१३ पासून ७५३ पर्यंत चालूं होतें. चालुक्य वंशांतील शेवटचा राजा दुसरा कीर्तिवर्मा याचा पराजय दन्तिदुर्ग या राष्ट्र-कूटानें करून, पुनश्च राष्ट्रकूट घराण्याची राजसता प्रस्थापित केली. हें घराणें इ. स. ७५३ पासून इ. स. ९७२ पर्यंत सत्ता उपभोगीत होतें.

राष्ट्रकूट घराण्यांतील प्रथमचे कांहीं राजे अत्यंत पराक्रमी झाले. दन्तिदुर्गानें चालुक्यांचा पराभव केल्यानंतर त्यांचा पूर्ण निःपात कृष्णराज राष्ट्रकूटानें केला. ह्याच कृष्णराजानें वेरूळ येथें आजहि दृष्टीस पडणारें प्रचंड कैलास लेणें तयार करविलें. तिसऱ्या गोविंद राष्ट्रकूटानें आपल्या राज्याचा विस्तार माळव्यापासून कांचीपूरपर्यंत केला. ह्या राष्ट्रकूटांच्या कारकीर्दीतच बुद्धविहार मागें पडून शिव व विष्णु यांच्याकरितां भव्य देऊळें जागोजागीं उभारलीं गेलीं. बुद्धधर्माचा या काळांत शेवट झाला तरी जैनधर्मानें आपला टिकाव धरला. विद्या व कला ह्यांना उदार आश्रय याच काळांत मिळाला. राष्ट्रकूटांची राजधानि मान्यखेट किंवा मालखेड येथें होती. राष्टकूट घराण्यांतील शेवटचा राजा कक्काल यांस चालुक्य वंशीय तैलपानें इ. स. ९७२ च्या सुमारास जिंकून पुनः चालुक्यांचें साम्राज्य स्थापन केलें. हे उत्तर चालुक्य व पूर्वीचे चालुक्य एक नव्हेत असें कै. डॉ. भांडारकर यांचें मत आहे. तैलपानंतर सत्याश्रय विक्रमादित्य (पहिला), जयसिंह, सोमेश्वर (पहिला), सोमेश्वर (दुसरा), विक्रमादित्य (दुसरा) सोमेश्वर (तिसरा), सोमेश्वर (चौथा), इत्यादि अकरा राजे इ. स. ११८९ पर्यंतच्या काळांत झाले. या राजांत दुसऱ्या विक्रमादित्याची कारकीर्द बरीच गाजली. त्यानें इ. स. १०७६ ते इ. स. ११२६ पर्यंत पन्नास वर्षें दणदणीत राज्य केलें. चालुक्यांची राजधानि वेदरजवळील कल्याण किंवा कल्याणी ही होती. शेवटचे चालुक्य राजे दुर्बळ बनल्यामुळें त्यांच्या मांडलिक राजांनीं त्यांच्याविरुद्ध बंड पुकारण्यास सुरुवात केली. अशा मांडलिकांपैकींच कलचुरी वंशाचे राजे होते. अखेरीस यादववंशीय पांचव्या भिल्लमानें इ. स. ११८९ च्या सुमारास यादवांचें साम्राज्य स्थापिलें. यादववंश हा मूळचा उत्तरेंत मथुरेस राज्य करीत होता. तो कृष्णाच्या काळीं द्वारकेचा राजवंश झाला. याच वंशांतील दृढप्रहार यानें प्रथम दक्षिणेंत चंद्रादित्यपूर किंवा चांदवड येथें आपलें राज्य इ. स. ७५४ च्या सुमारास स्थापिलें. पुढें या वंशांतील बलाढ्य राजा भिल्लम यानें चालुक्यांचा बीमोड करून

देवगिरी (आधुनिक दौलताबाद) येथें राजधानि नेली. भिल्लमानंतर त्याचा मुलगा जैत्रपाल हा गादीवर बसला व त्याच्यानंतर त्याचा मुलगा सिंघण यानें सर्व दक्षिणभर यादवांची सत्ता स्थापून गुजरातहि आपल्या अंमलाखालीं आणला. याच सिंघणाचा सुप्रसिद्ध ज्योतिषी भास्कराचार्यांचा नातू चांगदेव हा ज्योतिषी होता. यानेंच कोल्हापूरच्या शिलाहार राजा दुसरा भोज याचा पराभव करून (शके १०८९).त्याचें राज्य देवगिरीस जोडलें. सिंघणानंतर त्याचे नातू कृष्ण व महादेव यांनीं अनुक्रमें इ. स. १२४७ ते १२६० व १२६० ते १२७१ राज्य केलें. महादेवानंतर त्याचा पुतण्या रामचंद्र किंवा रामदेव हा इ. स. १२७१ मध्यें गादीवर बसला. याच्च महादेव व रामदेव राजांचा प्रधान हेमाद्रि किंवा हेमाडपंत नांवाचा विद्वान ब्राह्मण होऊन गेला. यानेंच मराठींत मोडी लिपी अस्तित्वांत आणिली. यानें चतुर्वर्ग-चिंतामणि नांवाचा चारहि पुरुषार्थांचें विवेचन करणारा ग्रंथ लिहिला. रामदेव राजाच्याच कारकीर्दीत श्रीज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरी नामक ग्रंथ रचिला. सुरुवातीच्या महानुभावीय वाङ्मयाची रचना याच काळांत झाली.

महाराष्ट्रांतील यादव राजांच्या साम्राज्याचा शेवट अल्लाउद्दीन खिलजीचा एक सरदार मलिक-इ-काफूर यानें केला. ज्ञानेश्वरींत ज्या रामदेवराव यादवाचा गौरवपूर्वक उल्लेख करण्यांत आला आहे, त्याच्यावर अलाउद्दिन खिलजीनें स्वारी करून त्याला आपलें मांडलिकत्व कबूल करायला लाविलें होतें. रामदेवरावानें कांहीं दिवस मांडलिकत्व मान्य करून पुढें दिल्लीस खंडणी देण्याचें बंद केलें. तेव्हां मलिक-इ-काफूरनें त्याच्यावर चढाई करून त्यांस पुनः दिल्लीच्या बादशहाचें वर्चस्व कबूल करायला लाविलें. हें त्यानें आमरण कबूल केलें. पुढें रामदेवराव वारल्यावर त्याचा मुलगा शंकरदेव यादव हा गादीवर बसला. त्यानें दिल्लीचें वर्चस्व नाकारल्यानें मलिक-इ-काफूरनें पुनः देवगिरीवर स्वारी करून या खेपेस (इ. स. १३१२), शंकरदेव यादवाला ठार मारलें. अशा तऱ्हेनें मराठ्यांची राजधानि देवगिरी ही मुसलमानांच्या ताब्यांत गेली.

इ. स. १३१२ पासून पुढें तीनशें सव्वातीनशें वर्षेंपर्यंत महाराष्ट्रांत मुसलमानांचेंच राज्य चालूं होतें. खिलजी घराण्यानंतर दिल्लीच्या गादीवर तघलख घराणें आलें. महंमद तघलखानें साम्राज्यविस्तार बराच केला. पण त्याला तो सांभाळता आला नाहीं. त्यामुळें मुलतान-बंगाल-बरंगळ वेदर-देवगिरी-गुजरात अशी जिकडे तिकडे बंडें उत्पन्न झालीं. अशा बंडांतूनच हसन गंगू ब्राह्मणी (कोणी यांस झफिरखान ऊर्फ अलाउद्दिन हुसेन कांगो म्हणतात.) यानें महाराष्ट्रांत इ. स. १३४७ मध्यें ब्राम्हणी ऊर्फ बहामनी राज्याची स्थापना केली. हसन हा मुळचा गंगू नामक एका ब्राम्हणाच्या पदरीं गुलाम होता. पुढें त्या ब्राम्हणानें त्यांस मुक्त केलें. तेव्हां हसननें आंपल्या मालकाच्या उदारपणाची आठवण म्हणून त्याचें नांव आपल्या नांवास जोडलें असें म्हणतात. भीमानदीजवळचें कलबुर्गा शहर ही हसनची राजधानि होती. त्याच्यापश्चात् कलबुर्ग्याच्या गादीवर एक लहान मुलगा आल्यानें, राज्यकारभार महंमद गवान नांवाच्या इराणी सरदाराकडे आला. महंमद गवानचा राज्यकारभार बराचसा शिस्तीचा व शांततेचा झाला. तरी देखील त्याला शत्रु उत्पन्न होऊन इ. स. १४८१ मध्यें त्याचा खून झाला. यापुढें बहामनी राज्यांत फूट पडून त्याचें बऱ्हाड, विजापूर, अहमदनगर, गोवळकोंडा व बेदर असे पांच तुकडे झाले.

मुसलमानांची सत्ता महाराष्ट्रांत तीनशें वर्षें टिकल्यानंतर तिला हळुहळू उतरती कळा लागून, तिच्या जागीं मराठ्यांची सत्ता हळुहळू पण निश्चितपणें आपलें आसन जमवूं लागली. शिवाजी महाराजांचे वडिल शहाजीराजे भोंसले हे प्रथम अहमदनगर व मागाहून विजापूर अशा दोन मुसलमान संस्थानांत मातब्बर सरदार म्हणून गाजले. त्यांच्याकडे पुणें व सुपें या दोन प्रांताची जहागीर होती. या जहागिरीवर देखरेख ठेवण्याची कामगिरी त्यांनीं दादाजी कोंडदेव मळठणकर ह्या कर्तबगार ब्राह्मणाकडे सोंपविली होती. शिवाजीनें राजकारणाचे पहिले धडे दादाजी कोंडदेव यांजकडून घेतले. आपल्या जहागिरीच्या आसपासच्या हळुहळू निष्प्रभ होणाऱ्या यावनी सत्तेकडे

पाहून शिवाजीच्या मनांत राज्यस्थापनेची कल्पना येऊन, त्यानें आपल्या मावळ्यांच्या मदतीनें इ. स. १६४५ ते १६४८ या तीन वर्षांत राजगड, तोरणा, पुरंदर, लोहगड, राजमाची हे विजापूरच्या ताब्यांतील किल्ले हस्तगत केले. विजापूरकरांनीं शहाजीला कैद करून शिवाजीला भीति दाखविण्याचा व्यर्थ प्रयत्न केला. शिवाजीनें दिल्लीच्या बादशहाशीं सूत जमवून व विजापूरकरांना त्यांचा कोंडाणा परत देऊन शहाजीची सुटका करवून घेतली. या पुढच्या काळांत शिवाजीनें जावळी प्रांत, कोल्हापूर प्रांत, मुधोळ, सावंतवाडी इत्यादि सह्याद्रि-लगतचा भाग जिंकून व विजापूरकरांनीं पाठविलेल्या अफझुलखान, सिद्दी जोहार इत्यादि बलाढ्य सरदारांना नामोहरम करून विजापूर दरबारकडून आपल्या राज्याला मान्यता मिळविली. ह्या वेळीं कल्याणपासून गोंव्यापर्यंतची कोंकणपट्टी आणि मीमेपासून वारणेपर्यंतचा घाटमाथा असा १५० मैल लांबीचा आणि १०० मैल रुंदीचा मुलुख शिवाजीच्या ताब्यांत होता. इ. स. १६६४ मध्यें शिवाजीनें सुरतेवर स्वारी करून त्या शहराची खंडणी वसूल केली, व याच वर्षीं शहाजीराजे वारल्यानें 'राजे' हें पद स्वतःकडे घेतले, व आपल्या नांवाचें नाणें पाडलें. इ. स. १६७४ मध्यें काशीचे ब्राह्मण बोलावून रायगडावर हिंदुधर्मपद्धतिप्रमाणें शिवाजीनें आपणावर राज्याभिषेक करवून घेतला व याच प्रसंगीं 'छत्रपति' असा नवा किताब धारण करून नवा शक त्यानें सुरू केला.

इ. स. १६८० मध्यें शिवाजी महाराज कालवश झाल्यावर इ. स. १८१८ पर्यंत महाराष्ट्रांत मराठ्यांचीच सत्ता होती. शिवाजीच्या नंतर त्याचा वडील मुलगा संभाजी हा गादीवर आला. त्याचा औरंगजेबानें १६८९ मध्यें क्रूरपणें वध केल्यानंतर, त्याचा भाऊ राजाराम यानें अत्यंत कठिण परिस्थितींत मराठ्यांचें राज्य आपल्या मृत्यूपर्यंत (इ. स. १७००) टिकविलें, राजारामानंतर त्याचा पुत्र शिवाजी हा साताऱ्याच्या गादीवर राज्य करूं लागला. इतक्यांत इ. स. १७०७ मध्यें संभाजीचा मुलगा शाहू व त्याची आई येसूबाई मोंगलाच्या कैदेंतून सुटून आल्यावर मराठी राज्यांत

दुही उत्पन्न होऊन त्यापायीं कोल्हापूर व सातारा अशीं दोन राज्यें झालीं. त्यांपैकीं कोल्हापूर येथें राजारामाचा मुलगा शिवाजी याचें राज्य व सातारा येथें संभाजीचा मुलगा शाहू याचें राज्य सुरू झालें. शाहूच्या पक्षाकडे प्रथमपासून बरेंच मराठे सरदार होते. शाहूला बाळाजी विश्वनाथ भट नांवाच्या कर्तबगार ब्राह्मण सरदाराची जोड मिळाल्यानें, छत्रपति म्हणून पुढच्या काळांत त्याचेंच नांव सर्वतोमुखीं झालें. इ. स. १७१५ च्या सुमारास शाहूनें बाळाजी विश्वनाथ यांस मुख्य पेशवा करून राज्यकारभार त्याच्याकडे सोपविला. ह्या पेशव्यांच्या कारकीर्दीत मराठी राज्य हें नुसतें राज्य न राहतां त्याचें रूपांतर साम्राज्यांत झालें. बाळाजी विश्वनाथ, बाजीराव बाळाजी, नानासाहेब, थोरले माधवराव इत्यादि रणझुंजार पेशव्यांच्या काळांत मराठ्यांची सत्ता थेट अटकेपर्यंत जाऊन पोंचली. शिंदे, होळकर, भोंसले, गायकवाड इत्यादि छत्रपतींच्या सरदारांनीं मराठ्यांचा भगवा झेंडा उत्तर हिंदुस्थानांतहि, पडकविण्याच्या कामीं पेशव्यांना बरीच मदत केली. पुढें पेशव्यांच्या घराण्यांत गृहकलह माजल्यानें, तसेंच मराठे सरदारांत आपापसांत दुही सुरू झाल्यानें, वाढत्या इंग्रजी सत्तेचा आश्रय त्यांनीं घ्यायला सुरुवात केली आणि त्यापायीं इ. स. १८१८ मध्यें दुसऱ्या बाजीरावानें स्वराज्याचें उदक इंग्रजांच्या हातावर सोडून तो ब्रह्मावर्तास चालता झाला.

या नंतरच्या इ. स. १९४७ पर्यंतच्या काळांत महाराष्ट्रांत इतर हिंदुस्थानांतल्या प्रमाणेंच इंग्रजांचें राज्य सुरू होतें. पूर्वीच्या मराठी राज्याच्या सरदारांपैकीं शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले, घोरपडे, पटवर्धन पंतप्रतिनिधि इत्यादिकांनीं इंग्रजांशीं तह केल्यानें त्यांचीं राज्यें इंग्रजांच्या सार्वभौमत्वाखालीं टिकाव धरून राहिलीं होतीं. तीं सर्व भारत स्वतंत्र होतांच इ. स. १९४८ पासून हळुहळू निरनिराळ्या प्रांतांत जोडलीं गेलीं.

इ. स. १८१८ पासून हिंदुस्थानांत सर्वत्र इंग्रजांचें सार्वभौमत्व सुरू होतांच त्याला पहिला प्रतिकार इ. स. १८५७ सालच्या स्वातंत्र्यसमरानें

झाला. या स्वातंत्र्यसमराचें नेतृत्व नानासाहेब पेशवे, तात्या टोपे व राणी लक्ष्मीबाई यांच्याकडे होतें. त्यानंतर हिंदुस्थानचे पहिले क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांनीं इंग्रजांची सत्ता खिळखिळी करण्याचा प्रयत्न इ. स. १८७९ सालीं केला. पुढें इ. स. १८८५ मध्यें राष्ट्रीयसभा ऊर्फ कॉंग्रेसची स्थापना होऊन सनदशीर मार्गांनीं स्वराज्यप्राप्तीचे प्रयत्न सुरू झाले. एकीकडे लोकमान्य टिळक, महात्मा गांधी इत्यादिकांच्या पुढारीपणाखालीं स्वराज्याची प्रचंड चळवळ सुरू असतांना, दुसरीकडे भारतीय क्रांतिकारकांनीं परकीय राज्यकर्त्यांना दहशत वाटेल अशी चळवळ चालूच ठेविली. दुसरें महायुद्ध सुरू होतांच नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद फौजेनें सैन्यांत देशभक्तिचे वारें भरून दिलें. या सर्वांचा एकत्रित परिणाम होऊन इंग्लंडमध्यें मजूर मंत्रिमंडळ असतांना ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं पूर्वीच्या हिंदुस्थानचें हिंदुस्थान व पाकिस्तान असे दोन भाग होऊन दोघांनाहि ब्रिटिश राष्ट्रकुलांतर्गत स्वातंत्र्य प्राप्त झालें. त्यानंतर हिंदुस्थानची राज्यघटना तयार होऊन तिनें ता. २६ जानेवारी १९५० रोजीं भारतांत सार्वभौम लोकसत्तात्मक राज्याची स्थापना केली.

मराठी भाषेची उत्पत्ति

महाराष्ट्रांत रूढ असलेल्या मराठी भाषेच्या उत्पत्तिसंबंधीं विद्वानांमध्यें बराच मतभेद आहे. कांहीं लोक संस्कृत भाषेला मराठीची जननी मानतात, तर कांहीं पालीभाषेला हा मान देतात. कांहींकांच्या मतें महाराष्ट्री नांवाची प्राकृत भाषा ही मराठीची जननी होय तर उलट कांहींकांना वेदाच्याहि पूर्वीं लोकांत चालू असलेल्या प्राचीन प्राकृत भाषेपासून मराठी निघाली असें वाटतें. अशा तऱ्हेनें मराठी भाषा ही निश्चित्पणें अमुक एका भाषेपासून निघाली असें सांगतां येत नाहीं. गुजराती, बंगाली, हिंदी ह्या भाषांचें मूळ निश्चित् रीतीनें सांगतां येतें. परंतु मराठी भाषेची तशी स्थिति नाहीं. ह्याचें कारण मराठी भाषेच्या व्याकरणाच्या निरनिराळ्या बाबतींत संस्कृत, पाली,

पैशाची, महाराष्ट्री, अपभ्रंश इत्यादि भाषांचे अवशेष व त्यांचीं कांहीं चिन्हें आढळून येतात हें होय. मराठी भाषेंत जे शेंकडो तत्सम संस्कृत शब्द आहेत, त्यांच्यावरून संस्कृतला मराठीची जननी ठरवायला जावें तों तिण, पाऊस, छकडा, गूळ, अस्वल, रूख इत्यादि अनेक पाली शब्द जे मराठींत ठाण देऊन बसले आहेत ते आपणाला तसें करण्यापासून परावृत्त करतात. पैशाची भाषेप्रमाणें 'ण' व 'न' ह्यासंबंधींचे बदल मराठींत आढळतात. ऊन, तहान, कान, रानं, जानवें इत्यादि शब्द पैशाची भाषेची लकब दर्शवितात. मागधी प्राकृतांत 'र'कार व 'स'कार या दोहोबद्दल 'ल'कार व 'श'कार हे वर्ण अनुक्रमें येतात; तसेंच संस्कृत 'स्थ' अगर 'र्थ' ह्या बद्दल मागधींत 'स्त' होतो. मराठींतहि हा प्रकार आढळतो. उदाहरणार्थ मिसळ (मिश्र), घोळतो (घूर्णते), जोशी (जोइसी), केशर (केसर). अशाच रीतीनें अर्धमागधीच्याहि कांहीं लकबा (दीर्घस्वर ऱ्हस्व करणें इत्यादि) मराठीनें स्वीकारल्या आहेत. पण ह्या सर्व भाषांपेक्षां महाराष्ट्री व अपभ्रंश या दोन भाषांचें ऋण मराठीवर सर्वांत अधिक आहे. आकारान्त नपुंसकलिंगी नामें जशीं महाराष्ट्रींत लिंग बदलत नाहींत, तशींच मराठींतहि बदलत नाहींत. मराठींतील द्वितीयेचा 'स' प्रत्यय महाराष्ट्रींतील षष्ठी व चतुर्थीच्या 'स्स' प्रत्ययापासून आला आहे. (उदा० हत्तींस < हत्तिस; आगीस < अग्निस्स < अग्नेः) नामाला लागणारे विभक्तींचे प्रत्यय मराठीनें अपभ्रंश भाषेपासून घेतले आहेत. मराठी कवितेंत सामान्यतः आढळणारे अन्त्य यमक अपभ्रंश भाषेपासून आलें आहे. संस्कृत किंवा पालीमध्यें तें नाहीं. जुन्या मराठींत जें उकार-प्राचुर्य (उदा० जीवु, निष्कामु, दमनकु) आहे तें अपभ्रंश भाषेच्या परिणामामुळें होय.

ह्या सर्व पुराव्यावरून असें दिसतें कीं 'मराठी' ही कोणत्या तरी एका प्राकृतापासून—महाराष्ट्री किंवा अपभ्रंश—ह्यापासून निघाली असें म्हणवत नाहीं. महाराष्ट्री व अपभ्रंश ह्या दोन्हीं भाषांचीं चिन्हें—इतर भाषांपेक्षां—बरोबरीनें व बरींच मराठींत ज्याअर्थी आढळतात, त्याअर्थी

ती ह्या दोन्ही भाषांच्या मिश्रणानें तयार झाली असें ठरतें. महाराष्ट्रीपासून मराठीनें आख्यात विभक्तींचा भाग म्हणजे काळ, अर्थ वगैरे क्रियापदास लागणारे प्रत्यय उचलले, व अपभ्रंशापासून कारकविभक्तींचा किंवा नामाच्या प्रत्ययांचा भाग उचलला. अशा रीतीनें मराठीच्या उत्पत्तींत ह्या दोन्ही भाषांचा सारखाच वाटा आहे. मराठी ही महाराष्ट्री व अपभ्रंश ह्या दोन भाषांपासून उत्पन्न झाली. सातव्या शतकांतील शिलालेखांत मराठी शब्द आढळतात. त्यावरून मराठी भाषा ही इसवी सनाच्या सातव्या शतकांत जन्म पावली असें म्हणावयास हरकत नाहीं.

२

मराठी साहित्याची गंगोत्री

प्रस्तुत प्रकरणांत मराठी साहित्याच्या प्राथमिक अवस्थेच्या थोडक्यांत विचार करण्याचें ठरविलें आहे. हा विचार करीत असतांना प्रथमच्च आपणाला मराठीची स्थूलमानानें साक्षात् जननी अशी जी महाराष्ट्री भाषा, तिच्यांतील साहित्याच्या निर्देश करणें प्राप्त आहे. शकपूर्व सातव्या शतकापासून ते शकोत्तर सहाव्या शतकापर्यंत म्हणजे सुमारे हजार-बाराशे वर्षेंपर्यंत महाराष्ट्रांत महाराष्ट्री भाषा सरसहा वापरली जात होती. इतकेंच नाहीं तर या भाषेनें अखिल भारतीय कीर्ति त्या काळांत मिळविली होती. कात्यायन व वररुचि या दोघा प्राचीन ग्रंथकारांनीं आपल्या व्याकरण-विषयक ग्रंथांत महाराष्ट्री ही तत्कालीन इतर प्राकृतांहून श्रेष्ठ प्रकारची भाषा होय, असें स्वच्छ म्हटलें आहे. महाराष्ट्री भाषा ही केवळ मराठीचीच जननी नसून अर्वाचीन हिंदी व गुजराती या भाषांचीहि जननी[1] आहे. गाथासु महाराष्ट्री म्हणजे गाथांची भाषा महाराष्ट्री असें आलंकारिक म्हणतात. यावरून गाण्याची भाषा प्राचीन काळीं महाराष्ट्रीच होती असें म्हणावें लागतें. असें असलें तरी महाराष्ट्र ही भाषा पाली किंवा अर्धमागधी प्रमाणें कोणत्याहि पंथाच्या धर्मग्रंथांची भाषा नसल्यामुळें केवळ महाराष्ट्री भाषेंत असें वाङ्मय फारसें आढळत नाहीं. सेतुबंध, सप्तशती व कर्पूरमंजरी हेच महाराष्ट्रीमधील उपलब्ध असलेले प्रमुख ग्रंथ होत. सेतुबंध ग्रंथाचा कर्ता प्रवरसेन होता. सप्तशतींत प्राकृत सुभाषितांचा संग्रह करण्यांत आला असून, त्याचें कर्तृत्व शातवाहन राजा हाल यांजकडे जाते. हा ग्रंथ शकारंभीं किंवा शकपूर्व पहिल्या शतकांत लिहिला गेला. सप्तशती ग्रंथांत हल्लीच्या मराठींत

---

१. राजारामशास्त्री भागवत–मराठ्यांसंबंधीं चार उद्गार.

सांपडणारें भण्डण (भांडण), त्रोलिस्सम् (त्रोलेन), त्राहल्लअं (त्राहुलें), वेल्लहळ (वेल्हाळ), वइ (वई), संत्राडि (सांगाडि, सांगड) इत्यादि अनेक शब्द बहुतेक जसेच्या तसेच सांपडतात. कर्पूरमंजरीचा कर्ता राजशेखर (इसवी शतक आठवें) याला त्या ग्रंथाच्या हस्तलिखित प्रतींत अनेक ठिकाणीं महाराष्ट्रचूडामणि असें म्हटलेलें आहे. कर्पूरमंजरींतील श्लोक महाराष्ट्रींत आहेत. ह्या ग्रंथांत पक्खाउज्ज (पखवाज) ढिल्ल (ढिला) इत्यादि बरेच शब्द हल्लीच्या मराठींत आढळतात तसे आहेत.


इसवी सनाच्या सातव्या शतकापासून महाराष्ट्रीची कन्या मराठी भाषा ही महाराष्ट्रांत बोलली जाऊ लागली. जरी ही बोलभाषा होती तरी तिच्यांत जोरदार अशी ग्रंथरचना बाराव्या शतकापर्यंत झालेली दिसत नाहीं. याचें एक कारण संस्कृत भाषेचा पगडा. त्या काळांत शिक्षण घेणारे फार थोडे लोक होते, व जे होते त्यांचा ओढा संस्कृताकडे होता. भवभूतिसारखा नाटककार, राजशेखरासारखा कवि व भास्कराचार्यांसारखा ज्योतिषी व गणिती हे सर्व महाराष्ट्रीय होते. परंतु यांनीं ग्रंथरचना संस्कृत मध्यें केल्यानें साहजिकच या पांचशे वर्षांत शिलालेखांतील—सामान्य जनसमूहाला कळण्याकरितां म्हणून योजलेल्या कांहीं वाक्यांखेरीज मराठी साहित्याचा संसार अन्यत्र आढळत नाहीं. अगदीं प्राचीन शिलालेख म्हैसूर संस्थानांतील श्रवणबेळ गोळा येथील असून, त्याचा लेखनकाल इ. स. ९८३ आहे. ह्याला गोमतेश्वराचा शिलालेख म्हणतात. शिलेवर लिहिलेलें पहिलें मराठींतील वाक्य या लेखांत जें आढळतें तें असे— " श्री चावुण्ड राजे करवियलें ॥ गंगराजे सुत्ताले करवियले. "

(२) या शिलालेखानंतर सुमारे दीडशे वर्षांनीं चालुक्य वंशांतील सोमेश्वर राजानें रचिलेला 'अभिलषितार्थ चिंतामणि' (शके १०५१) नांवाचा ग्रंथ आहे. या ग्रंथांत मराठी रूपें व मराठी शब्द अनेक ठिकाणीं आले आहेत. शिवाय ग्रंथाच्या एका भागांत कांहीं पद्यें आलीं आहेत. त्यांपैकीं एक पद्य त्याच्या अर्थासुद्धां पुढें दिलें आहे:—जेणें रसातळ उणु

मत्स्यरूपें वेद आणियले मनुशिवक वाणियेले तो संसारसायरतारण मोह (हं) ता रावो नारायणू ॥४३॥ (अर्थ :—ज्याणें रसातलाहून मत्स्यरूप धारण करून वेद आणिले, मनु आंणि शिव वर्णिले, तो संसारसागरांतून तारून नेणारा व मोह नाहींसा करणारा राजा नारायण आहे.) सोमेश्वरानें महाराष्ट्रांतील गायका कांडतांना ओव्या म्हणतात असें लिहिलें आहे, त्यावरून ओवी छंद याहि वेळीं चांगला प्रचलित होता असें दिसतें.

(३) या नंतरचा शिलालेख आंबे गांवांतील जोगाईंचा सभामंडप या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या एका लेण्यांत डॉ. शं. गो. तुळपुळे यांना अलीकडेच प्राप्त झाला.[1] प्रस्तुत लेखांतील लिपी दक्षिणी वळणाची बाराव्या शतकांतील नागरी आहे. लेखांत पृष्ठमात्रेचा उपयोग बहुतेक ठिकाणीं केल्याचें दिसतें. तीन चार ठिकाणीं शिरोमात्रा देखील आहेत. शिलालेख "संवतु (शक) १०६६ रक्ताक्षीसंवत्सरांतर्गत अश्विन शुद्ध १ गुरुदिने"चा असून कालगणनेप्रमाणें तो बरोबर आहे. हा काल इंग्रजी पद्धतीप्रमाणें ३१ ऑगस्ट ११४४ इ. स. असा येतो. प्रस्तुत शिलालेखांत आठशे वर्षांमागील मराठी भाषेंत सुमारे सहा ओळींचा व पांच पंचवीस शब्दांचा मजकूर अभंग व अखंड मिळतो हें त्याचें एक वैशिष्ट्य होय. शके १०६६ अश्विन शुद्ध प्रतिपदेस गुरुवारीं आंबदेशाचा अधिष्ठाता महामंडलेश्वर उदयादित्यदेव यानें नाथाच्या म्हणजे शिवाच्या देवळाच्या योगक्षेमासाठीं जें वृत्तिपत्र केलें, त्याचें शासन हा प्रस्तुत शिलालेखाचा विषय आहे. या उदयादित्यदेवानें भूचरनाथाच्या योगक्षेमासाठीं म्हणून परमभक्तीनें सेलू नांवाच्या गांवांतून वीस गद्याण, काम नांवाच्या जमिनीपैकीं बारा गद्याण, राडी नांवाच्या गांवांतील भातशेतापैकीं काठीच्या मापानें मोजलेली तीन निवर्तनें व सिंधणदेवाच्या जवळगांवांतील जमीन इतकें दान दिलें आहे. तसेंच पूजाऱ्यासहि त्यानें बारा गद्याण, कुंभेफळ गांवांतील पांच गद्याणाची जमीन, तळ गांवांतून चांगल्यापैकीं पसतीस बैल, गांवांतील प्रत्येक घाण्या-

१ साहित्यपत्रिका, वर्ष २४ अं. ९९, (एप्रिल-सप्टेंबर १९५१).



मागें तेलाचें एक पात्र, दर हाटामागें एक कवडा, फुलांची एक माळ व एक मळा याप्रमाणें वृत्ति करून दिली आहे. हें शासन जो कोणी लुप्त करील त्यावर योगिनीचा वज्रदंड पडेल ही शपथ व एतत्सम शासन-लेखांच्या शेवटीं नेहमीं येणारे दोन श्लोक खोदून हे शिलालिखित पूर्ण केलें आहे. शिलालेखांतील महत्त्वाचा भाग पुढील प्रमाणें आहे :—

ॐ ॥ स्वस्ति संवतु १०६६ रक्ताक्षी संवत्सरांतर्गत अश्विन
शुद्ध १ गुरुदिने अद्येह श्रीभूचरनाथपंकजभ्रम
र श्रीरत्नदेवः गुरुश्चरणाराधनतत्परः अंबासमाधिष्ठि
त महामंडलेश्वर उदउदयादितदेवेनपरमभक्त्या ना
था कामतु सेलुग्रामीं ग २० तथा कामाख्ये भूमि ग १२
राडिए सालिवण़ दांडेआची निवर्त्तनें सिंधणदेवां
जवलग्रामीं भुमि दत्त नाथपूजितेआ पुजारेआ ग १२
कुंभैपलीं भूमि ग ५ तलिं मान्य बैल ३५ घाणआप्रति
तेला डो १ हाटंप्रति कवडा १ फूलासरी १ मला १ जो फेडी
लोपी तेआ योगिनीचा वज्रदंडु पडे ॥

(४) यानंतरचा शिलालेख शके १०७१–७९ मधील दौंडाजवळील पळसदेव येथील देवळावर आहे. त्याच्या प्रारंभीचें वाक्य असें आहे:— श्री चंगदेव दंडनाकें विष्णुगृह केलें.....ईश्वर संवछरीं नीफनलें प्रासादी ...तेहाचे पुत्र भाइया...।

(५) या पुढील शिलालेख शके ११०२ मधील असून तो मुंबई येथील परळ विभागांत सांपडलेला आहे. त्यांत कोंकणच्या अपरादित्य नांवाच्या एका राजानें तीर्थांत स्नान करून श्री वैद्यनाथ देवास पंचोपचार पूजेसाठीं पट्टष्टि म्हणजे हल्लींची साष्टी यांतील माहुलीजवळील एका जमिनीचे उत्पन्नापैकीं २४ द्राम उत्पन्न दिल्याचें वर्णन आहे. शिला-लेखांतील देणगीच्या २१॥ ओळी संस्कृतांत असून बहुजनसमाजास कळावें म्हणून शपथेच्या दोन ओळी मराठींत आहेत त्या अशा:—अथ तु जो

कोणुहु वि ए शासन लोपी तेया श्रींवैद्यनाथ देवाची भाल सकुटुंबी आपडे ॥ तेहाची म्राय गाढवे × विजे ।

(६) यानंतरचा खानदेशांतील पाटण येथील देवीच्या देवळाबाहेरील भिंतींत असलेला शिलालेख. हा लेख ज्ञानेश्वरीच्यापूर्वी सुमारें ८४ वर्षें म्हणजे शके ११२८ चा आहे. लीलावती नांवाच्या ग्रंथाचा कर्ता जो सुप्रसिद्ध भास्कराचार्य त्याच्या नातवाच्या म्हणजे चांगदेवाच्या नांवानें हा लेख खोदविला आहे. लेखाच्या २६ ओळी असून त्यांपैकीं २१ संस्कृतांत व उरलेल्या ओळी सामान्य लोकांना कळाव्यात म्हणून मराठींत आहेत त्या अशा :—इयां पाटणीं जें केणें उघटे तेहाचा असि आउं जो राउला होता ग्राहकापासी तो मढा दीन्हला । ब्राह्मणां जें विकतेयासीं ब्रम्होत्तर तें ब्राह्मणीं दीन्हलें ॥ ग्राहकापासीं दामाचा वीसोवा आसूपाठी नगरें दीन्हला । तुलदाइयां बैलां सिद्धुवै ॥ बाहीरिला आसूपाठी गिधवें ग्राहकापासीं । पांच पोफली ग्राहकापासीं ॥ पहिले आघाणे आदाणाची लोटि मढा दीन्हली ॥ जेती घाणे वांहति तेतीयां प्रति पली पली तेला ॥ एथ जे मविजे ते मढीचेन मापें मवावें मापाउ मढा अर्द्ध ॥ अर्द्ध मापहारी । रूपाचें सूंक । तथा भूमिः ॥ चतुराघाट विशुद्ध ॐ डुग्रामु पघड ंचालेआ कामतामध्यें चहवंटा ॥ एकल वंटा ॥ पंडितांचा कामतु ॥ श्रीतेग्रामी चाउरा ॥ घामोजाचीअ सोंढिआं ॥

(७) ह्या शिलालेखानंतरचा शिलालेख शके ११५० मधील आंबेजोगाई येथील होय. त्याला खोलेश्वराचा शिलालेख म्हणतात. यांतील ४-५ ओळी मराठी आहेत.

(८) यानंतरचा शके ११६१ मधील नेवासें येथील शिलालेख होय. त्याची भाषा संस्कृत मराठी मिश्र आहे. "हे भूमि देवें पुरुषेंण जीवणा दिधली" हें वाक्य लेखाच्या शेवटीं आहे.

(९) यानंतरचा शके ११९५ मधील पंढरपूरच्या देवळांतील चौऱ्यांशी शिळेवरील लेख होय. या शिळेवर देणग्या देणाऱ्यांचीं नांवें आहेत. या

लेखांत प्रशस्ति श्लोकानंतर असें वाक्य आहे :—स्वस्ती श्री सकु ११९५ श्रीमुख संवत्सरे फागनिपूर श्रीविष्ठलदेवरायासि तिसासिति फुलें दांडे आचंद्रार्क चालावेआ नानाभक्त मार्लीआं दत्त पैकाचा विवरू ॥ यांत अनेकांचीं नांवें आहेत. यादवांचा कारभारी हेमाडपंत यानें सकु ११९८ धाता संवत्सरे माग वदि तृतीयेस वर्गणी दिल्याचा उल्लेख यांत आहे. पुढें श्रीरामदेवरावाच्या देणगीचा उल्लेख आदरपूर्वक केला आहे तो असा :—श्रीसकु ११९९ ईस्वर संवछरे मार्गासिर सुदि १५ सुक्रे । श्रीविष्ठल देवरायासि पांडरी-फड-मुख्य समंताद्भाग आचंद्रार्क श्री जादव नारायण प्रौढ प्रताप चक्रवर्ति श्रीरामचंद्रदेव राएं द ॥ अदमासें शके १२०० पर्यंत हा लेख कोरण्याचें काम चालू होतें असें मानिलें तर या सुप्रसिद्ध व सुमंगल लेखानंतर चाराच वर्षांनीं पांडुरंगभक्त ज्ञानेश्वरांनीं आपल्या ज्ञानेश्वरीची शके १२१२ मध्यें पूर्तता केली असें म्हणावयास हरकत नाहीं. महाराष्ट्रसारस्वतकार वि. ल. भावे म्हणतात त्याप्रमाणें "शिलालेखांच्या लहानसहान रचनेंतून आपण मराठी भाषेंतील अवाढव्य ग्रंथरचनेच्या कालांत येऊन पोंचतों." विवेकसिंधुकर्ते मुकुंदराज, कांहीं महानुभावीय कवी व ज्ञानेश्वरादिकांची रचना याच सुमारास झाली.

यांपैकीं मुकुंदराजांदिकांचा उल्लेख येथेंच करून महानुभाव व ज्ञानेश्वर यांचा पुढील प्रकरणांत करणें इष्ट होईल. प्राचीन काळापासून मुकुंदराज हे मराठीचे आदिकवि म्हणून ओळखले गेले आहेत. जोंपर्यंत ऐतिहासिक पुराव्यानें दुसरा कवि त्यांचें हें स्थान हिरावून घ्यायला पुढें येत नाहीं, तोंपर्यंत त्यांच्याकडे आद्यकवित्व चालूं ठेवायला हरकत नाहीं. मुकुंदराजांची गुरुपरंपरा पुढील प्रमाणें आहे. :—हरिनाथ—रघुनाथ—मुकुंदराज. हरिनाथांची समाधि मध्यप्रातांत अंभोर येथें असून रघुनाथांची छिंदवाडा येथें आहे. मुकुंदराजांची समाधि बैतुल जवळील खेडलें या गांवीं आहे. अशा रीतीनें मराठीचा आद्यकवि हा मराठीच्या माहेरघरचाच ठरतो हें योग्यच आहे. मुकुंदराजाचा सुप्रसिद्ध ग्रंथ विवेकसिंधु हा होय. हा ग्रंथ त्यानें "शके

अकरादाहोत्तरु । साधारण संवत्सरु । राजा शारंगधरु । राज्य करी " अशा वेळीं रचिला. साधारण संवत्सर शके १११२ ला येतो. म्हणजे विवेकसिंधु हा ग्रंथ ज्ञानेश्वरीपूर्वी शंभर वर्षें रचिला गेला असें दिसतें. मुकुंदराजाकडे आद्यकवित्व देणारी एक आख्यायिका आहे ती अशी. ज्ञानेश्वरी ग्रंथाची रचना झाल्यावर निवृत्तिनाथ ज्ञानेश्वरास म्हणाले कीं, ' तूं भाष्यानुसार गीतेवर टीका लिहिलीस, पण धन्य मुकुंदराज कीं ज्यांनीं विवेकसिंधुसारखा ग्रंथ स्वमतीनें लिहिला." विवेकसिंधूंत यावनी शब्द मुळींच नाहींत. त्यावरूनहि मुकुंदराज यावनी सत्तेपूर्वी होऊन गेला हें नक्की ठरतें. विवेकसिंधूच्या आजच्या स्वरूपाकडे सामान्यतः वरवर पाहिलें तर तो ग्रंथ ज्ञानेश्वरीपूर्वीचा वाटत नाहीं. परंतु हें त्याचें स्वरूप नकलकारांच्या आधुनिकीकरणाच्या वृत्तिमुळें त्याला आलें असावें. असें असलें तरी त्यांत मातु, हुडे, आरोगूं, त्रोनी, पौळी, विढार, कडसणी, ऐणी, रोळू, दळवाडें, रेटमकहाणी, वाशिपे; उपलवण इत्यादिं जे शब्द आले आहेत, त्यांच्यावरून त्याचें प्राचीनत्व निर्विवाद आहे. विवेकसिंधूच्या यवतमाळ येथील शारदाश्रमाच्या जुन्या पोथींत नामार्चीं ओकारान्त रूपें राजवाडे ज्ञानेश्वरीप्रमाणेंच पुढीलप्रमाणें आहेत–यैसा शीक्षाचा संदेहो । आइकोनि ऊठिला स्नेहो. विवेकसिंधूंतील विषयप्रतिपादन अध्यात्मपर असूनहि फार सुबोध झालें आहे. त्यांत मूळ शंकराचार्यांच्या मायावादावर विवेचनं करण्यांत आलें असल्याचें श्रीमुकुंदमुनीच सांगतात—"शंकरोक्तिवरी । मी बोलिलों मराठी वैखरी । " पण हें मराठी विवेचन कोठेंहि दुर्बोध झालेलें नाहीं. उलट गुरूशिष्यांचे जे मधून मधून काल्पनिक संवाद दिले आहेत त्यानें ग्रंथाच्या गोडींत भरच पडली आहे. ग्रंथाचा विषय जागोजागीं घरगुती दृष्टांत देऊन सोपा केला आहे. उदा० सोंग संपादितां तोषलेपणें । नटासी दीजे अलंकार भूषणें । सोंग भिथ्या परि पावणें । नटासीची ॥ तैसें कीर मायिक अवतरण ॥ तेथें कीजे जें भजन । तें होय समर्पण । जगदीश्वरीं ॥ मुकुंदराजांनी विवेकसिंधूंत राजयोगाची तरफदारी केली आहे. ते म्हणतात, " न लगे वेदशास्त्राचा

पांग । अभ्यासावा न लगे अष्टांग । जरी पाविजे राजयोग । श्रीगुरुप्रसादें।" प्रपंचांत राहूनहि अध्यात्मयोगाचा अनुभव घेणें याचें नांव राजयोग होय असें ग्रंथकारानें सांगितलें आहे. सामान्य लोकांकरितां सगुणोपासनेचें महत्त्व-हि मुकुंदराजांनीं सांगितलें आहे. " चित्त अवलंबनेविण । जरी न राहे स्थिरपण ॥ तरी देवाचें सगुण- । स्वरूप चिंतावें । विवेकसिंधूची संस्कृत आवृत्तिहि आढळते. हें संस्कृत भाषांतर गोपाळ मुद्गल यानें केलें. मुकुंदराजांनीं परमामृत, पवनविजय, पंचीकरण, मूलस्तंभ इत्यादि दुसरेहि अध्यात्मपर ग्रंथ रचीले आहेत. त्यांपैकीं परमामृत हा ग्रंथ सुमारे तीनशे ओव्यांचा असून, विशेष लोकप्रिय आहे.

याच काळांतील दुसरा ग्रंथ म्हणजे श्रीपतिकृत (शके ९६१) रत्न-माला हा होय. श्रीपतीनें रत्नमाला व जातकपद्धति असे दोन ज्योतिषविष-यक ग्रंथ प्रथम संस्कृतांत लिहून, नंतर त्यांपैकीं पहिल्याचें मराठींत भाषांतर केलें. खाण्यांत बाजरी, राहण्यांत विनचुन्याच्या इमारती व लिहिण्यांत मोडी लिपी यांचा महाराष्ट्रांत प्रथम प्रचार करणाऱ्या हेमाद्रि ऊर्फ हेमाडपंताच्या नांवावर कांहीं ग्रंथ प्रसिद्ध आहेत. महादेवराव व रामदेवराव जाधवांच्या दरबारांत ' श्रीकरणाधिप ' या हुद्यानें तो राज्यकारभाराचें काम पाहात असे. धर्म, अर्थ, काम, मोक्ष अशा चार पुरुषार्थांचें तसेंच शेंकडो व्रतवैकल्यांचें विवेचन करणारा ' चतुर्वर्गचिंतामणि ' नांवाचा ग्रंथ यानें संस्कृतांत लिहिला असून याशिवाय हेमाद्रिकृत कालनिर्णय, कैवल्यदीपिका (श्रीबोपदेवाच्या मुक्ताफल ग्रंथावरील टीका) आयुर्वेदरसायण (अष्टांगहृदयावरील टीका) दानवाक्यावलि, लक्षणसमुच्चय, नीतिबोध, लेखनकल्पतरु, मेरुतंत्र इत्यादि प्रकरणेंहि याच्या नांवावर प्रसिद्ध आहेत. नाथपंथांतील गोरक्षनाथांचीं ' गोरक्षअमरसंवाद ' ' गोरक्षगीता ' व कांहीं पदें प्रकाशित झालीं आहेत. अद्वैतवेदांत व योगाभ्यासाची माहिती या प्रकरणांत आली असून यांतील कित्येक ओव्या आणि ज्ञानेश्वरींतील ओव्या यांच्यांत विलक्षण साम्य आहे. ज्ञानेश्वर हे नाथपंथी असल्यानें असें होणें साहजिक आहे.

३

महानुभाव साहित्य व तत्त्वज्ञान

मराठी साहित्याची गंगा सुरुवातीलाच पवित्र, भव्य आणि सुंदर बनविण्याचें श्रेय जर कोणाला द्यावयाचें असेल तर तें महानुभाव पंथालाच दिलें पाहिजे. या पंथाच्या अनुयायांनीं मराठी भाषेचा पाया अगदीं भक्कम बसवून, वर उभारल्या जाणाऱ्या उत्तुंग इमारतीची चांगली कल्पना आणून दिली. 'महान् अनुभावस्तेजो बलं वा यस्य स महानुभावः' ह्या व्युत्पत्तिप्रमाणें मोठ्या तेजानें युक्त असलेल्या लोकांचा जो मार्ग त्याला महानुभाव पंथ असें म्हणतात.[1] या पंथाची स्थापना श्रीचक्रधर यांनीं बाराव्या शतकांत केली. चक्रधर यांचें मूळचें नांव हरपाळ. भडोच येथें सुमारे आठशे वर्षां-पूर्वी होऊन गेलेल्या विशालदेव नांवाच्या राजाचे ते पुत्र होते. त्यांचा जन्म शके ११९६ मध्यें झाला. यादवराज सिंघणानें श. ११३८ मध्यें भडोचवर केलेल्या स्वारीच्या प्रसंगीं तसेंच त्यानें अनहिलवाडवर शके ११४१ मध्यें केलेल्या स्वारीच्या प्रसंगीं राजपुत्र हरपाळ त्याच्याशीं लढला होता. पुढें शके ११४३ वृषभ संवत्सर भाद्रपद शुक्ल द्वितीया या दिवशीं हरपालदेवाचें निधन झालें. त्याचें प्रेत स्मशानांत नेलें असतां श्रीचांगदेव ऊर्फ श्रीचक्रपाणी (महानुभाव पंथाचे पूज्य तिसरे अवतार) यांनीं द्वारकेंत कामाख्या नामक हठयोगिनीच्या दुराग्रहामुळें देहत्याग करून हरपालदेवाच्या मृतकायेंत प्रवेश केला. राजपुत्र हरपाळ यांस द्यूतक्रीडेचा नाद लागून त्यापायीं त्याचें स्वतःजवळचें सर्व द्रव्य, त्याची पत्नी कमलादेवी हिच्या-जवळचे सर्व द्रव्य नाहींसें होऊन, शिवाय पतिपत्नींत बेबनाव निर्माण झाला. यानें उपरति येऊन हरपाळ यात्रेनिमित्तानें रामटेकला गेला. तेथें

---

१. महानुभाव पंथ, ले. बाळकृष्ण महानुभाव शास्त्री, १९४७, पृ. २९९.

वाटेंत ऋद्धिपूर येथें श्रीगोविंदप्रभु नांवाच्या सत्पुरुषाची व त्याची गांठ पडली. गोविंदप्रभूनें त्यास मंत्रोपदेश देऊन त्याचें नांव चक्रधर असें ठेविलें. यापुढें औरंगल शहरीं कमळ नाईक नांवाच्या सामवेदी ब्राह्मणाच्या हंसांबा नामक रूपवती विदुषी कन्येशीं त्यानें लग्न केलें. पण वैराग्याच्या भरांत त्यानें हें गांव व पत्नी यांचा त्याग करून देशपर्यटन सुरूं केलें. ह्या पर्यटनांत अचळपूर (एलिचपूर) येथील रामदेवराव दरणा या संस्थानिकाच्या उमादेवी नांवाच्या मुलीशीं त्यानें लग्न लाविलें. लग्न लावूनहि हरपाळाचें मन वैराग्यांतच रमत असे. तशांत उमादेवीचा मृत्यु झाल्यावर हरपाळाचें गृहत्याग करून विदेही अवस्थेंत भटकायला सुरुवात केली. अशा स्थितींत एकेवेळीं प्रत्यस्थानीं भोगावतीचे कांठीं त्यास श्रीदत्तात्रेयाचें दर्शन घडलें. आणि त्यानें शके ११८५ कार्तिक महिन्यांत गुरु सिंह राशीस असतां संन्यासदीक्षा धारण केली. यानंतर तो शिष्य संप्रदाय वाढवून उपदेश करीत हिंडू लागला. श्रीचक्रधर हे गुजरातेंतील व गुजराती सामवेदी ब्राह्मण असूनहि त्यांनीं आपल्या पंथाचा प्रसार केला तो महाराष्ट्रांत. याचें कारण इतर देशांपेक्षां ईश्वरोपासना करण्याच्या दृष्टीनें महाराष्ट्र अधिक सात्विक आहे अशी त्यांची समजूत होती. (कानडदेसा तैलंगदेसा न वचावेंः ते वीपए वहुल देसः तेथ अवधुत मान्यः महाराष्ट्रीं असावेंः ॥२४॥ आचार प्रकरण, सूत्रपाठ.) चक्रधरांचे सुमारे पांचशे शिष्य होते. या शिष्यांपैकीं नागदेवाचार्य, महिंद्रभट्ट, जनार्दन, दामोदर, भांडारेकर इत्यादि प्रमुख होते. त्यांत पंथप्रचाराचें कार्य मुख्यतः नागदेवाचार्य यानेंच केलें. आपलें कार्य उरकून समाधि घेण्याच्या उद्देशानें श्रीचक्रधर बदरीकाश्रमाच्या बाजूला गेले त्यावेळीं हाच त्यांच्या बरोबर होता. शेवटीं यालाहि मागें ठेवून श्रीचक्रधर एकटेच पुढें गेले. त्यांचें पुढें काय झालें याची कोणालाच माहिती नाहीं. परंतु यांचा प्रयाणकाल शके ११९४ हा महानुभाव पंथांत मानला जातो. नागदेवाचार्य यांनीं शके १२२४ मध्यें समाधि घेतली. नागदेवाच्या शिष्यांच्या प्रमुख तेरा शाखा किंवा आम्नाय झाले. हे आम्नाय

आजहि चालू आहेत. यांत कवीश्वर, उपाध्याय, तळेगांवकर आणि पारमांडल्य यांचा विशेष प्रसार आहे. श्रीचक्रधरांनीं सांगितलेल्या सिद्धांतांचा या आम्नायांनीं आपापल्या मगदुराप्रमाणें अर्थ लाविला आहे. तथापि उपाध्याय आम्नायांतील लेखकांनीं लिहून ठेविलेलें तत्त्वज्ञान म्हणजेच महानुभावांचें खरेखुरें तत्त्वज्ञान सामान्यपणें मानलें जातें.

श्रीचक्रधरांच्या काळीं महाराष्ट्रांत देवगिरीच्या यादव राजांची कारकीर्द सुरू होती. हा काळ अत्यंत भरभराटीचा व ऐश्वर्याचा होता. अर्थात्च चैनबाजीकडे आणि दिखाऊपणाकडें लोकांचें विशेष लक्ष असणें स्वाभाविक आहे. यज्ञयाग आणि अनेक देवतांच्या उपासनेला या काळांत अगदीं बहर आला होता. सुप्रसिद्ध पंडित हेमाद्रि यांच्या चतुर्वर्गचिंतामणि या ग्रंथावरून त्याकाळीं शेंकडों प्रकारच्या व्रतवैकल्यांत लोकांच्या शक्तीचा अपव्यय कसा होत होता हें समजतें. शंकराचार्यांचें अद्वैत तत्त्वज्ञान उत्तम असलें आणि त्याचा प्रसार होऊन तीन चारशें वर्षें झालीं असलीं तरी सामान्य लोकांना तें फारसें पटलेलें दिसत नव्हतें. याच उद्देशानें मध्वाचार्यांनीं भक्तिप्रधान अशा द्वैतमार्गाचा प्रसार केला. ईश्वर आणि जीव हे भिन्न असून, मोक्षावस्थेंत देखील भिन्नच राहतात असें मध्वाचार्यांचें सांगणें होतें. मध्वाचार्य हे चक्रधरांचे समकालीन होते. शंकराचार्यांची ज्ञाननिष्ठा व रामानुजाचार्य मध्वाचार्य यांची भक्तिनिष्ठा यांचा समन्वय करून चक्रधरांनीं आपल्या द्वैती तत्त्वज्ञानाचा प्रसार महाराष्ट्रांत केला. क्षुद्र देवतांच्या भक्तीचें बंड त्याकाळीं महाराष्ट्रांत खूप माजलें होतें. तें मोडून सर्वसाधारण जनतेला खऱ्या परमेश्वरी मार्गाकडे लावण्याच्या उद्देशानें चक्रधरांनीं देवतांची अवहेलना न करतां, त्यांना कमी महत्त्वाच्या ठरविल्या. देवतांची उपासना करणारे देवतांना पावतात आणि ईश्वराची उपासना करणारे ईश्वराला पावतात, असें सामान्य माणसाला समजणारें तत्त्वज्ञान त्यांनीं सांगितलें. क्षुद्र देवतांचें जसें प्रस्थ त्यांनीं कमी केलें, त्याचप्रमाणें जातींची मिरासदरीहि त्यांनीं नाहींशी केली. आपल्या पंथांत त्यांनीं स्त्री,

शूद्र, ब्राह्मण, क्षत्रिय अशी सर्वांनाच संन्यास घेण्याची सोय ठेवून, शिवाय संन्याशानें कोणाकडेहि भिक्षा घ्यावी असें सांगितलें. मात्र एका गोष्टीवर त्यांनीं फारच भर दिला. ती म्हणजे संपूर्ण अहिंसा व कडकडीत वैराग्य. हीं ज्यांना मान्य असतील, ते कोणत्याहि जातीचे असले, तरी त्यांना मग महानुभाव पंथांत मुक्तद्वार असे. धर्म सोपा पण परिणामकारक करण्याच्या दृष्टीनें श्रीचक्रधरांनीं द्वैतमताचा प्रसार करून देवतापूजनाचा निषेध केला असला, तरी आजमितीला बहुजन हिंदु समाज मनानें अद्वैती म्हणजे सर्वत्र एक ईश्वरच आहे असें मानणारा परंतु पूजनाच्या बाबतींत अनेकांत एकत्व पाहून आपापल्या इच्छेप्रमाणें त्या त्या देवतेची पूजा करणारा असा आढळतो. आणि याच कारणानें श्री चक्रधर यांचा धर्म आणि तत्त्वज्ञान हीं सोपीं व श्रेष्ठ असूनहि, आणि आज आठशे वर्षें तीं तावून सुलाखून निघालीं असूनहि, त्यांचे अनुयायी कांहीं फारसे आढळत नाहींत.

श्री चक्रधरांनीं स्थापन केलेल्या महानुभाव पंथांत अनुयायी फारसे जमले तरी त्याचा प्रसार व विस्तार दूरदूर पर्यंत झाला. अगदीं सुरुवातीलाच त्याला राजाश्रय मिळाला. देवगिरीच्या यादव राजांनीं आपला संबंध यदुवंशीय श्रीकृष्णाशीं जोडला असल्यानें श्रीकृष्ण उपास्यदैवत असलेल्या महानुभाव पंथाकडे त्यांचे साहजिकच लक्ष वेधलें गेलें. रामदेवराव यादवाच्या दरबारांत महानुभाव पंथांच्या ग्रंथकारांचे श्रीकृष्णाच्या लीला वर्णन करणारे अनेक ग्रंथ वाचले जाऊ लागले. पंधराव्या शतकांत या पंथाचा प्रवेश पंजाब सारख्या यवनप्रधान व भक्ष्याभक्ष्याकडे फारसें लक्ष न देणाऱ्या प्रांतांत झाला. सारंगकोट येथील कृष्णराज नांवाच्या क्षत्रिय गृहस्थांचा दक्षिणेंत मालाची नेआण करण्याचा व्यापार होता. व्यापारा-निमित्त वऱ्हाडांत फिरत असतांना त्यांची कवीश्वर आम्नायांतील माधेराज-बुवांची गांठ पडली. त्यांचा उपदेश ऐकून कृष्णराजांना उपरति झाली व त्यांनीं ताबडतोब महानुभाव धर्माची दीक्षा घेतली. सारंगकोट येथें परत गेल्यावर त्यांच्यांत पडलेल्या बदलानें आकर्षित होऊन त्यांच्या शाक्तपंथी

धाकट्या भावानें त्यांच्याकडून या अहिंसा व वैराग्यप्रधान धर्माची दीक्षा घेतली. अशा तऱ्हेनें या पंथाचा प्रसार प्रथम पंजाबांत लाहोर, अमृतसर वगैरे ठिकाणीं होऊन, पुढें तो काश्मीर, पेशावर, काबूल, कंदाहार पर्यंत झाला. या पंथाला तिकडे त्याच्या कृष्णोपासनेमुळें जयकृष्णी पंथ म्हणतात. या पंथाचीं त्या भागांत कृष्णमंदिरें असून, त्यांत महानुभावीय मराठी ग्रंथ मोठ्या पूज्यभावनेनें पठन केले जातात. स्तोत्रें, आरत्या, सूत्रपाठ वगैरे मराठींतूनच म्हणण्याची तिकडे चाल आहे. मंदिरनिवासी महंत व संन्यासी यांना तर मराठी लिहितां व अस्खलित बोलतां येते. काबूलांत महानुभाव धर्माचा प्रवेश अमीर दोस्त महंमद यांच्या कारकीर्दीत झाला. दोस्त महंमदाचा दिवाण चरणदास याच्या कुटुंबांतील मंडळींनीं प्रथम महानुभाव पंथाची दीक्षा घेतली व नंतर तेथें या पंथाचा प्रसार झाला. याच कुटुंबाच्या प्रेरणेनें काबूल येथें श्रीकृष्ण मंदीर स्थापन झालें व तेथील पहिले महंत म्हणून नागेंद्रमुनि विजापूरकर नांवाच्या महाराष्ट्रीय गृहस्थाची नेमणूक झाली. अशा रीतीनें या वितरागी, निरुपद्रवी, स्वार्थत्यागी, अल्प संतुष्ट, ज्ञानमार्गीयांचा संघ जरी संख्येनें फार मोठा नसला तरी त्यानें आपला क्षेत्रविस्तार खूपच केला, आणि मराठी भाषा व महाराष्ट्र देश यांची कीर्ति दूरवर पसरविली.

श्री चक्रधरांनीं पंथप्रसाराकरितां प्रथम ज्याप्रमाणें महाराष्ट्र देशाची पसंति केली, त्याचप्रमाणें मराठी भाषेची देखील पसंति केली. त्याकाळीं पंडित मंडळी संस्कृतांत ग्रंथरचना करीत. तरीपण सामान्य लोकांना आपलीं धर्ममतें कळावींत म्हणून चक्रधरांनीं तसेंच त्यांचे पट्टशिष्य नागदेवाचार्य यांनीं महानुभाव पंथीयांना मराठींतच ग्रंथरचना मुद्दाम करावयास सांगितली. केशवराजसूरी याच्या मनांतून संस्कृतांत ग्रंथरचना करावयाचे येऊन त्यानें त्यासंबंधांत नागदेवाचार्यांची आज्ञा मागितली असतां ते म्हणाले, "नको गाः केशवदेयाः येणें माझिये स्वामीचा सामान्यु परिवारु नागवैल कीं: परमेश्वरें तरी जीवाचेया संकोचिता आण अनेक व्यसना अयोग्यता जाणौनी: आन

कांठिण्यता चुकवोनी सकळांसी अल्पायासें ब्रह्मविद्याचिये ठायें गिवसितां येवौनि परमेश्वर लाभुद्यमा वाबु होआवाः म्हणौनिची महाराष्ट्रीये निरोपिलें कीं गाः एरव्हीं सर्वज्ञा काईं देववाणि निरोपू न लाहे कीं गाः भणौनि केशवा संस्कृत सूत्रबद्ध प्रकरण न करी तूं कींः नागदेवाचार्यचरित्र, परशराम-कृत, कथा ४७ वी."

" सामन्यु परिवारु " नागवू नये म्हणून सुरुवातीला तरी मराठींत व देवनागरी लिपीत ग्रंथरचना झाली, तरी चक्रधरांच्या मागून ६०–७० वर्षांनीं पंथेतरांना आपलीं धर्मपुस्तकें अगम्य व्हावींत या हेतूनें तीं सांकेतिक लिपींत लिहावयाला सुरुवात झाली. प्रथम राघव ऊर्फ रवळ व्यास यानें सकळ लिपी नांवाची एक सांकेतिक लिपी शके १२७५ च्या सुमारास तयार केली. नतर सुंदर (श. १२८५) पारमांडल्य (श. १२९०) अंक, शून्य, सुभद्रा, श्री इत्यादि दुसऱ्या सांकेतिक लिप्या तयार होऊन त्यांत महानुभावीय ग्रंथ लिहिले जाऊ लागले. सांकेतिक लिप्यांचीं कुलुपें महानुभावीय म्हाळ्यायाला लागतांच त्यांची शुद्धता जरी राखली गेली, तरी त्यांचा प्रसार कमी होऊन, लोकांत गैरसमज मात्र झपाट्यानें वाढीस लागले. सांकेतिक लिपीचा एक नमुना म्हणून पुढें देवनागरी व सुंदरी अशा दोन लिप्यांत एकच मजकूर दिला आहे.

देवनागरी लिपी

श्री. चक्रधराये नमः ॥ श्री पंचकृष्णाये नमः ॥ ज्ञानभक्ति वैराग्य अेकु मोचकु अेकु अमोचकु अैसा त्रिविध बोधुः ते अन्य व्यावृत्तिः भागजे ॥१॥

सुंदर लिपी

श्रीझन्यभयारे भवाः ॥ श्रीकंझनुल्यारे भवाः ॥ क्षात्रधन्सि मैयाज्ञ अेनु वोझनु अेनु अवोझनु अैता ॥स्यिमिभ शोभुः से अज्ञ म्रामुस्सिः ॥१॥

श्रीचक्रश्वरांनीं आपल्या शिष्यांना वेळोवेळीं प्रसंगानुरूप उपदेश पुष्कळ

केला. परंतु स्वतः ग्रंथरचना कांहीं केली नाहीं. त्यामुळें त्यांच्या या मौखिक उपदेशांवर टीका प्रतिटीकात्मक पुष्कळच ग्रंथ तयार झाले. चक्रधरांची दिनचर्या व चरित्र ज्यांत आलें आहे असें गद्य लीलाचरित्र त्यांचे शिष्य महिंद्रभट्ट ऊर्फ महीमभट्ट व्यास यांनीं तयार केलें.

महानुभावीय वाङ्मयाच्याच नव्हे तर मराठी गद्यवाङ्मयाच्या अग्रभागीं पताकेप्रमाणें शोभणारे दोन ग्रंथ म्हणजे 'लीलाचरित्र' व 'सूत्रपाठ हे होत. श्रीचक्रधरांनीं बदरिकाश्रमाकडे शके ११९४ मध्यें प्रयाण[1] केल्यानंतर लागलीच पुढील पांच दहा वर्षांत हे दोन्ही ग्रंथ तयार झाले असें स्पष्ट दिसतें. दोन्ही ग्रंथांत रचनाकाल किंवा कोणत्याहि घटनेचा शक दिलेला नसला, तरी ग्रंथांच्या स्वरूपावरून व उद्देशावरून चक्रधरांच्या प्रयाणानंतर लगोलग ते तयार करण्यांत आले हें निश्चित्. मराठी गद्यवाङ्मयाचा श्रीगणेशा पंचतंत्र किंवा बखरी किंवा ऐतिहासिक पत्रव्यवहारापासून होतो असें कांहीं काळापूर्वी मानण्यांत येत होतें. महानुभावीय वाङ्मय उपलब्ध होऊं लागल्यापासून मराठी गद्याची परंपरा थेट बाराव्या शतकापर्यंत मागे नेऊन पोंचवितां येते. आधुनिक भारतीय भाषांचा विचार केला असतां मराठी गद्याइतकें प्राचीन व समृद्ध गद्य क्वचित्च एखाद्या आर्योद्भव भाषेंत असेल. या दृष्टीनें पाहतां मराठी भाषाभिमान्यांचें हृदय आनंदानें आणि अभिमानानें तुडुंब भरून जावें, अशा योग्यतेचे हे दोन्ही ग्रंथ निःसंशय आहेत.

"लीलाचरित्रकार" महीभट्ट यांना चक्रधरांच्या सान्निध्याचा लाभ झाल्यामुळें प्रस्तुत चरित्रास प्रत्यक्ष प्रमाणाचें साहजिकच महत्त्व लाभलें आहे. याशिवाय चक्रधरांचे प्रमुख शिष्य नागदेवाचार्य याच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं लीलाचरित्र तयार झालें असल्यानें त्याच्या विश्वसनीयतेविषयीं शंका घेण्याचेंहि कारण नाहीं. इंग्रजी वाङ्मयांत बॉसवेलकृत डॉ. जॉनसनच्या चरित्राचें जें महत्त्व आहे तेंच मराठी वाङ्मयांत प्रस्तुत चरित्राचें आहे

---

१. भास्करभट्ट बोरीकर, ले. प्रा. वि भि. कोलते, प्र. ४, पृ. ७७

असें म्हटल्यास फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं. बॉसवेलनें ज्या आस्थेनें, आदरानें, साक्षेपानें व व्यवस्थितपणें डॉ. जॉनसनच्या चरित्राचीं साधनें जुळविलीं, तशाच पद्धतीनें महीभट्टानें आपल्या गुरूच्या लीला वर्णन केल्या आहेत. लीलाचरित्रांत एकंदर १५०९ लीला किंवा कथा आल्या असून, त्यांवरून श्रीचक्रधरांसंबंधीं सर्व प्रकारची माहिती तर मिळतेच पण त्याशिवाय पांचपन्नास महत्त्वाच्या स्थळांची, व्यक्तींची माहितीहि मिळते. यादवांच्या उत्तरकालांतील महाराष्ट्राची परिस्थिति कशाप्रकारची होती, भावी विनाशाचीं बीजें तींत कशाप्रकारें पेरलीं गेलीं होतीं, याचाहि अंदाज या चरित्रांत लागतो. सर्व लीला एक प्रकारच्या प्रेमळपणानें सांगण्यांत आल्या असून साधेपणा हा त्यांचा प्राण आहे. भाषाविलासाकडे लक्ष न देतां त्या सांगितल्या आहेत. वाक्यें लहान लहान असून, त्यांत दीर्घ ईकारांचें प्राचुर्य आहे. लीलाचरित्राचीं सुरुवातीचींच कांहीं वाक्यें आहेत तीं अशीं :—श्री परेशाय नमः ॥०॥ प.लेठाणीं कऱ्हाडेया ब्राह्मणाचां घरीं अवतारू स्वीकरीलाः मगः केतुले एक दीस राज्य केलेंः एक दिनीं श्राध जालेंः तें गोसावीयां भार्या रतीचीया चाडा विनविलेंः आणिः गोसावीयासि तेव्हळिं ब्रह्मचर्याची प्रवृतिः मगः तें निमीत्य करूनिः मातापुरा बीजें केलेंः तेथ देवगीरीवरि बीजें करीतांः श्री दत्तात्रए प्रभुः व्याघ्राचा वेखु धरूनि जाळितळूनि बीजें केलेंः हाक दीधलीः श्रीमुगुटीं चवडा ठेविलाः लोकू भीयालाः तो पर्ता केलाः तेथ शक्ति स्वीकरिली ॥ अवतारू स्वीकरीलाः

लीलाचरित्रकारांनींच श्री चक्रधरांचे गुरु श्री गुंडम राऊळ ऊर्फ श्री गोविंद प्रभू यांचें गद्य चरित्र (ऋद्धिपुरचरित्र) गोविंदप्रभूंच्या मृत्युनंतर सहा महिन्यांच्या आंत म्हणजे साधारणपणें शके १२१० च्या पूर्वार्धांत तयार केलें. (श्री गोविंदप्रभु चरित्र. संपादक प्रो. वि. भि. कोलते पृ. १०) बाजारांत मिळणाऱ्या छापील प्रतिचा मूळ पाठ शके १२७४ ते शके १३१४ च्या दरम्यान तयार झाला असावा, असें प्रो. कोलते यांचे म्हणणें आहे. म्हाइंभट्टांनीं लिहून घेतलेल्या गोविंदप्रभुविषयक आख्यायिका म्हणजे हें

चरित्र होय. याच कारणानें तें तत्कालीन वऱ्हाडी बोलींत व सुबोधपणें लिहिल्यासारखें दिसतें. सांप्रतच्या चरित्रग्रंथांतील व्यवस्थितपणा यांत अर्थात्च नाहीं. तत्कालीन सामाजिक चालीरीतींचा बोध या चरित्रावरून चांगलाच होतो. शिवाय लीलाचरित्राप्रमाणें यांतहि वऱ्हाडांतील अनेक गावांचा जो उल्लेख आला आहे तो भौगोलिक व ऐतिहासिक असा दुहेरी महत्वाचा आहे.

सूत्रपाठ हा ग्रंथ कन्हरदेवराय जाधव यांचे कोषाधिकारी अनंतभट्ट यांचा नातू केशव व्यास यांनीं रचिला. हाहि ग्रंथ लीलाचरित्राप्रमाणें नागदेवाचार्यांच्या देखरेखीखालीं तयार झाला. महीभट्टांनीं तयार केलेल्या लीलाचरित्रांत श्रीचक्रधरांच्या तोंडचीं जीं १८६२ सूत्रें आलीं आहेत, तीं एकत्र करून व क्रमवार लावून प्रस्तुत पाठ तयार करण्यांत आला आहे. लीलाचरित्राप्रमाणें याहि ग्रंथाचें पठन महानुभाव मंडळी अत्यंत आदरानें करतात. महानुभावीय तत्त्वज्ञान म्हणून जें कांहीं आहे तें या ग्रंथाधारेंच तयार झालें आहे. सूत्रपाठाची भाषा तत्कालीन जुनी मराठी असून, तींत तद्भव शब्दांचा खूप भरणा आहे. वाक्यें लहानं लहान व साधीं आहेत. प्रस्तुत सूत्रपाठाचा आधार घेऊन त्यावर पुढें विपुल ग्रंथरचना महानुभावीय पंडितांनीं केली. खुद्द केशव व्यासांनीं ज्या ज्या सूत्रांच्या स्पष्टीकरणार्थ श्रीचक्रधरांनीं दृष्टांत दिले, तसलीं सूत्रें त्यांवरील दृष्टांतांसहित एकत्र करून दृष्टांत सूत्रपाठ तयार केला. चक्रधरकालीन समाजाचें यथार्थ दर्शन घडविणाऱ्या या दृष्टांतपाठांत एकशेचौदा दृष्टांत घेतले असून, त्या दृष्टांतांवरून केशव व्यासांनीं सिद्धांत काढले आहेत. या सिद्धांतांनाच दार्ष्टान्तिक म्हणतात. सूत्रें व दृष्टांत हे चक्रधरोक्त असल्यानें त्यांची भाषा व सिद्धांत किंवा दार्ष्टान्तिक यांच्या भाषेंत थोडा फरक आहे. केशव व्यास हे चांगले व्युत्पन्न असल्यानें त्यांच्या दार्ष्टान्तिकांची भाषा ही अधिक प्रौढ, तत्सम शब्दांनीं मंडित व पंडिती थाटाची आहे. केशव व्यासांच्या दृष्टांतपाठाची कल्पना यावी म्हणून खालीं एक दृष्टांत दिला आहे.

सूत्र—जो जें होऔनि असे तो तेंचि बोले ॥१॥ अनंतशक्ति परमेश्वर सकळासिही विषय व्यवस्था करीति ॥२॥

दृष्टांत—गांवा हस्ति आलाः तेथ जात्यंध हस्ती पाहों गेलेः एकें पावो देखीलाः एकें सोंड देखीलीः एके कानु देखीलाः एकें पाठि देखिलीः एकें पोट देखीलेंः एकें पूंस देखीलें। मग एकमेका संवादतिः आरे तुवां हस्ती देखीलाः पावो देखीला तो म्हणे हस्ती खांबासरीखाः सोंड देखीली तो म्हणे हस्ती मूसळासारीखाः.....ऐसें एकमेकां उरोधीति। तयांमध्यें डोळसु असे तो म्हणे हा हस्तीचा एकुएकु अवएवु होएः परि हस्ति नव्हेः ऐसा अवएवीं युक्त तो हस्ति ॥

दार्ष्टान्तिक (सिद्धांत)—तैसें जयासि जे शक्ति प्रकाशली असे तो तीए शक्तीतें परमेश्वरू म्हणेः ज्ञानिया असे तो म्हणे हे ईश्वराची एकिएकि शक्ति होए। परि परमेश्वरू नव्हे। ऐसा शक्तियुक्त तो परमेश्वरू।

—दृष्टांतपाठ, सं. नेने-भवाळकर, पृ. २१

सूत्रपाठ व दृष्टांतपाठावर पुढें अनेक ग्रंथ तयार झाले ते पुढील प्रमाणें होतः—रामेश्वर पंडितांनीं सूत्रपाठाचे विषयानुक्रमानें अकरा भाग तयार केले. गोपाळ पंडितांनीं सूत्रांची अन्वय व्यवस्था लाविली. परशुरामानें 'प्रकरणवश' नांवाचा ग्रंथ लिहून सूत्रें कोणत्या वेळीं सांगितलीं त्याची माहिती दिली. न्याय व्यास यांनीं 'हेतुस्थल' लिहून कोणत्या हेतूनें चक्रधरांनीं सूत्रें सांगितलीं तें जाहीर केलें. पुढें याच्यावर भाष्यें, महाभाष्यें, विधायकें, लापिका, व्याख्या, परीक्षा, प्रकरणवश, वचनसंबंध इत्यादि सुमारे ४०-४५ ग्रंथ तयार झाले. हे सर्व ग्रंथ नक्की केव्हां तयार झाले हें सांगतां न आलि तरी ते चौदाव्या व पंधराव्या शतकांत रचण्यांत आले असें म्हणावयास हरकत नाहीं. सूत्रपाठावरील हे सर्व ग्रंथ असल्यानें तेराव्या शतकापासून ते पंधराव्या शतकापर्यंतच्या मराठी गद्याचें स्वरूपहि बऱ्याच अंशीं त्यांवरून समजूणें सोपें झालें आहे. हे सर्व ग्रंथ सांकेतिक लिप्यांतून लिहिले गेले

असल्यानें साहजिकच बरेच शुद्ध राहिले आहेत. या विवरणात्मक ग्रंथांचें स्वरूप कळण्याकरितां पुढें एक छोटासा उतारा दिला आहे:—

(१) **सूत्र**—चित्रीची स्त्री न पाहावी।

(२) **लापिका**—तरि पुरुषें काइ करावें पांः जे स्त्रियेचेनि नावें चित्रीचीही न पाहावीः

(३) **आचार**—चीत्रीचि एथ भींतींसी लीहीलेंः जडरूपडें तेंहीं न पाहावेंः

(४) **प्रकरणवश**—म्हणौनि चित्रीची स्त्री न पाहावीः स्त्रीचेन नावें ठकारहि न पाहावाः

(५) **वचनसंबंध**—हो कांः स्त्री दर्शनमात्रे माजवीः मा तरिः सुंपुर्ण दर्शनेंः संभाषणेंः स्पर्शेंः माजवी ते सांघावेंचि न लगेः ऐसें म्हणीतलेंः तरि तयासि काइ उपाएः असेः कींवा नसे पाः नाः उपाए न पवीजे ऐसें कांही असेः म्हणीतलेया दृष्टादृष्टीं गुणदोषीं सकळासिही उपाय असतः तरि तेचि उपाय कवण पाः नाः दर्शनादी तीन्ही चुकवावेः हे काइ पाः परि स्त्रीचेनि नावें जडाचेंहीं दर्शन न ध्यावेंः तेंचि केविः नाः सर्वज्ञें म्हणीतलेंः चीत्रीची स्त्रीहीं न पाहावीः आणिः द्वापरीचा देवीं म्हणीतलेंः काष्टाची पुतळी पायेंहीं न स्पर्शावीः एणे करूनिः स्त्रीची मुख्य आणि सप्तधातु आदिकरूनि जेतुकीं नव जाती स्त्रीचीं लेपेंः तेतुकेंहीं न पाहावेंः माः चेतन काइ पाहों येईलः ऐसें नीरूपीलेंः हा एक संबंधः आतां दुसरा संबंधः तरि तोचि कैसाः नाः स्त्री दर्शनमात्रें माजवीः तरिः काइ चेतनचि माजवीः आणिः एराचेनि माज नुपजेः आणिः काइः नाः चीत्रीचीही स्त्री न पाहावीः म्हणीतलेयाः चेतनाचेनि उपजे हें काइ म्हणावें असेः परि जडाचेनिं उपजेः एणें करूनि दोषाचा शेवट सांगीतलाः

(६) **आचार स्थळ**—चीत्र तें मनुष्यापसि बरवेंः अवयेव शुद्धिः वस्त्रें अळंकारः भाव तारुण्य ऐसें जरि मनुष्य तरि काइ म्हणावें असेः चीत्रीची स्त्रीः भीतरील मनोधर्म वासुः तैसेंचि येकासन द्रव्यांतु स्त्री असे.

३१३१५३

महानुभावीय तत्त्वज्ञानात्मक तसेंच कथात्मक वाङ्मय पुष्कल वाढूनहि, बाहेरच्या जगाला त्याची मध्यंतरीच्या काळांत मुळींच वार्ता नव्हती. गेल्या सुमारे पन्नास वर्षांपासून महानुभाव पंथ व त्याचें साहित्य या गोष्टींकडे पंथेतरांचें लक्ष जाऊं लागलें आहे. ता. २१ नोव्हेंबर १८९९ च्या केसरींत लोकमान्य टिळकांनीं एक विस्तृत लेख लिहून या पंथासंबंधानें पंथेतरांना प्रथमच कल्पना आणून दिली. त्यानंतर डॉ. भांडारकर, इतिहासाचार्य राजवाडे, गोविंद काशिनाथ चांदोरकर, विनायक लक्ष्मण भावे, केशव आप्पा पाध्ये, हरिभाऊ नेने, नी. ब. भवाळकर, डॉ. यशवंत खुशाल देशपांडे, वा. ना. देशपांडे आणि प्रो. वि. भि. कोलते इत्यादि विद्वानांनीं निरलसपणें व परिश्रमपूर्वक माहिती जमा करून महानुभाव पंथ, त्याचें तत्त्वज्ञान व साहित्य यांसंबंधीं सविस्तर माहिती मराठी जाणणाऱ्यांना करून दिली आहे. या त्यांच्या कामगिरींत माहूरच्या सुप्रसिद्ध महंत दत्तलक्षराज कवीश्वर महानुभाव, मुरारी यक्षदेव महंत, बाळकृष्ण महानुभाव शास्त्री, श्रीगौरव व्यास महानुभाव, श्रीगोपीराज, श्रीकृष्णराज दादा लासूरकर व श्री. मुरलीधरशास्त्री यांची मदत झाल्यानेंच सांकेतिक लिप्यांचीं कुलुपें उघडलीं जाऊन, महानुभावीय साहित्याचा खजीना त्यांना उपलब्ध झाला. महानुभावीय वाङ्मय व तत्त्वज्ञानासंबंधीं आपणाला आज जी माहिती उपलब्ध झाली आहे तिचें सर्वश्रेय या सर्व विद्वानांना आहे यांत शंका नाहीं.

महानुभावांचे वेद म्हणा, गृह्यसूत्रें म्हणा, उपनिषदें म्हणा 'सूत्रपाठ 'हा ग्रंथ होय. पुढें देण्यांत आलेली माहिती या सूत्रपाठावरच मुख्यतः आधारलेली आहे. महानुभाव तत्त्वज्ञानांत चार वस्तु नित्य मानलेल्या आहेत. जीव, देवता, प्रपंच व परमेश्वर ह्या त्या चार वस्तु होत. ह्या स्वतंत्र, नित्य, अनादि व अनंत आहेत. ह्यांचा थोडक्यांत परिचय करून ह्यावयाचा तर तो नित्यबद्ध देवता, बद्धमुक्त जीव, नित्यमुक्त परमेश्वर व प्रपंच अनित्य- या सूत्रानें करून देतां येइल. त्यांत प्रपंच अनित्य असें जें म्हटलें आहे तें कार्यरूप प्रपंचाला उद्देशून होय. कारणरूप प्रपंच हा नित्य व स्वतंत्रच

आहे. इतर धर्मपंथांच्या तुलनेनें महानुभावीय तत्त्वज्ञानांत देवतांना स्वतंत्र पदार्थ कल्पिल्या आहेत हें त्याचें एक वैशिष्ट्य आहे. जैनांच्या तत्त्वज्ञानांत देवता ह्या जीवांची एक सुखसंपन्न अवस्था समजली जाते. विशिष्टाद्वैत प्रतिपादन करणारे रामानुजाचार्य देवता ही जीवयोनीच मानतात. द्वैती मध्वाचार्यांनीं देवतांना जीवयोनींतच स्थान दिलें आहे. सर्वं खल्विदं ब्रह्म मानणाऱ्या अद्वैती शंकराचार्यांच्या दृष्टीनें देवतांना स्वतंत्र स्थान असणें शक्यच नाहीं. महानुभावीय तत्त्वज्ञान हें पूर्ण द्वैताचें तत्त्वज्ञान असल्यानें जीव, देवता, प्रपंच व परमेश्वर ह्यांपैकीं कोणाचेंहि दुसऱ्याशीं किंवा सर्वांशी मिळून असें ऐक्य होत नाहीं.

जीव हे अनंत आहेत. 'आनंतें ब्रह्मांडें: आनंत जीवः आनंत देवताः आनंत परमेश्वर (परमेश्वरावतार)' (विचार २१२). सूत्रपाठांत जीवाचें लक्षण 'नित्यः केवलः आनादिः अविद्यायुक्ताः वस्तु एकु आतिः ते जीव सन्दे जाणिजे' (महावाक्य २), असें दिलें आहे. जीवाला जडलेली अविद्या परमेश्वर सेवेनें नाहींशी झाल्यावर तो मुक्त होतो. परंतु मुक्तावस्थेंत देखील तो स्वतंत्र असतो. जीवाला ज्ञानमार्गानें ब्रह्मस्वरूप प्राप्त झालें किंवा भक्ति मार्गानें ईश्वरस्वरूप प्राप्त झालें तरी तो आपलें स्वतंत्र अस्तित्व कांहीं टाकीत नाहीं. एखाद्या विस्तीर्ण तलावांतील पाण्यांत तेलाचा थेंब पडला म्हणजे तो जसा आपला स्वतंत्रपणा कायम ठेवून त्यांत हरपून जातो, त्याप्रमाणें जीव ब्रह्मस्वरूप किंवा ईश्वरस्वरूप प्राप्त करून घेतल्यावर जीवाचें होतें.[1] (यथा तळयात तेलाचा थेंब घातला : तो हारपौनि गेला : उदकाचेनि बाहुल्ये : लक्षणस्थळ उद्धरण. ६४) जीव हा मुळांत निष्क्रिय असतो. शुभाशुभ कर्में करण्याची इच्छा तोच करतो. परंतु जडभरतासारखा तो पडून राहिलेला असतो. त्याला प्रेरणा संलग्नाकडून मिळते. हा संलग्न म्हणजे मायास्वरूपाचा अंश असून तो परमेश्वरी इच्छेनें जीवाला दिला जातो. जीवाच्या इच्छेप्रमाणें निरनिराळीं कर्में करण्याची प्रेरणा त्याला

---

१ महानुभाव तत्त्वज्ञान, प्रो. वि. भि. कोलते, पृ. ४९७

संलग्नाकडून मिळते. जीव भोगतो तींच सुखदुःखें संलग्नाला भोगावीं लागतात व जीवाच्या मोक्षावस्थेबरोबर संलग्नहि मुक्ति मिळवितो. हा संलग्न जीवाला लागतां क्षणीं त्या जीवाला वस्त्राची वासना होतो. या वासनेमुळें संलग्नाला पाहतांच मायेच्या प्रेरणेनें जीव 'चैतन्यमहं' म्हणजे 'मी माया आहे' असें म्हणतो. त्याचेंच अनुकरण करून संलग्नहि म्हणतो 'चैतन्यमहं.' याप्रमाणें जीव व संलग्न या उभयतांसहि आपण म्हणजे मायास्वरूप आहों असें मिथ्या ज्ञान झालें. हें होतांच चैतन्याचा ऊर्फ मायेचा किंवा चैतन्य मायेचा 'मल' जीवाला व संलग्नाला लागतो. याला आद्यमल म्हणतात. मल याचा अर्थ सूक्ष्म शरीर. यानंतर संलग्नाच्या प्रेरणेनें जीव 'मी विश्व आहे,' 'मी प्रकृति आहे' असें म्हणतो. त्याबरोबरच त्याला विश्व, प्रकृति वगैरे देवतांचा मल जडतो. म्हणजे विश्व, प्रकृति वगैरे देवतांच्या सूक्ष्म शरीरांची प्राप्ति होते. महानुभाव तत्त्वज्ञानांत देवतांची संख्या ८१०१२५०१० येवढी आहे. अर्थात् जीवाला जडणाऱ्या मलांची किंवा सूक्ष्म शरीरांची संख्या ८१०१२५०१० ही झाली. जीव हा मुळांत अव्यक्त असल्यानें व जीवाला त्याच्या शुभाशुभ कर्मानुरूप फल देणें हें देवतांचें मुख्य कर्तव्य असल्यानें देवता जीवाला आपापले सूक्ष्मरूप देऊन त्याला व्यक्त करतात. इतक्या देवतांचे 'मल' जडूनहि जीवाची वस्त्राची वासना तशीच राहते. शेवटीं त्याला मनुष्य देहाची प्राप्ति होऊन ही वासना पूर्ण होते. यानंतर त्याला कर्माकर्माप्रमाणें पुढील जन्मांची प्राप्ति होते व दर खेपेस पहिल्यासारखी देवतांचे मल जडवून घेण्याची कसरत त्याला करावी लागते. ज्ञान प्राप्त होऊन मोक्ष मिळेपर्यंत जन्म आणि पुनर्जन्माच्या फेऱ्यांत जीवाला राहावें लागतें. मोक्ष मिळाल्यावर जीव ब्रह्मस्वरूप किंवा ईश्वरस्वरूप प्राप्त करतो आणि संलग्न मूळ मायेंत किंवा चैतन्यांत सामील होतो.

देवतांची संख्या वर सांगितलीच आहे. ह्या देवतांचे कर्मभूमीच्या देवता, अष्ट देवयोनि देवता, स्वर्गीच्या देवता, अष्ट भैरव इत्यादि नऊ प्रकार असून त्यांचें स्वरूप लक्षावधि योजनांचे आहे. ह्या देवता मुळांत

अव्यक्त असतात. परंतु परमेश्वराच्या आज्ञेनें साकार व परिमित बनतात. या साकार देवतांना 'ब्रह्मांडस्थ देवता' म्हणतात. मनुष्याला स्वर्गनरक देणाऱ्या याच देवता होत. मनुष्याच्या शरीरांत मेदमांस रूपानें सूक्ष्म शरीर धारण करून राहणाऱ्या देवतांना पिंडस्थ देवता म्हणतात. या देवतांत उच्च देवता नीच देवता असाहि भेद असून तो कायम स्वरूपाचा आहे. उच्च देवता उच्च राहतात व नीच देवता, नीच राहतात. याच कारणानें देवतांना 'नित्यबद्ध' मानले जाते. अविद्येनें जीव बद्ध व अविद्यानाशानें मुक्त होत असल्यानें जीवाला 'बद्धमुक्त' म्हटलें जातें.

प्रपंच म्हणजे जगत् किंवा सृष्टि. हा दोन प्रकारचा आहे. कारणरूप प्रपंच व कार्यरूप प्रपंच. "कारणरूप प्रपंच अनादि सिद्ध असून अष्ट भैरव-स्थित आहे. प्रत्येक भैरवस्वरूपापासून आठ आठ भूतांचा समूह उत्पन्न होतो. या आठ भूतांत पृथ्वी, आप तेज, वायु व आकाश या पंच महाभुतांचा आणि सत्व, रज व तम या तीन गुणांचा समावेश होतो. या आठ भूतांमध्यें एक कारणभूत व सात समलभूतें असतात. अष्टभैरवांपासून प्रत्येकीं आठ आठ अशीं एकंदर ६४ भूतें निर्माण होतात. या ६४ भूतांत सर्व मिळून ८ कारणभूतें व ५६ समलभूतें असतात. हीं कारणभूतें आधार असून त्यांचीं समलभूतें हीं आधेय होत. प्रत्येक भैरवापासून निघणाऱ्या आठ भूतांच्या गटांत एक कारणभूत जरी नसलें, तरी त्याच्याशिवाय बाकीचीं सात समल-भूतें निरूपयोगी होतात. वरील ६४ भूतांमधल्या ८ कारणभूतांचा मिळून विश्वरूपदेवतेचा मल ऊर्फ सूक्ष्म शरीर बनतें. जीवालां ८ कारणभूतांचा झालेला विश्वरूप देवतेचा मल जडल्यावर तो कार्यरूप प्रपंच उत्पन्न करतो. कार्यरूप प्रपंच संहारानंतर कारणरूप होऊन राहतो.[1] "

परमेश्वराला सूत्रपाठांत त्र्यंश म्हटलें आहे. 'सत् सव्दें ब्रह्म जाणिजेः चित् सव्दें माया जाणिजेः आनंद सव्दें ईश्वर जाणिजेः ब्रह्मः मायाः ईश्वर

---

१ विचार समीक्षा, ले. श्री. वा. ना. देशपांडे, पृ. ४५-४६

ऐसा त्र्यंश परमेश्वर एकु आतिः' (महावाक्य ५) परमेश्वराच्या ठिकाणीं नित्यत्व, व्यापकत्व, सर्व आत्मकत्व, सर्व आतीतत्व, सर्वकर्तृत्व व सर्व-साक्षीत्व, (महावाक्य ९) आहे. निराकार व अव्यक्त परमेश्वराला जीवाचें कल्याण अकल्याण कांहींच करतां येत नसून जीवाला ज्ञान देण्यासाठीं त्याला मनुष्य देहच धारण करावा लागतो. महानुभावांत चार युगाचे चार अवतार मानतात. कृतयुगांत हंसावतार, त्रेतायुगांत दत्तावतार, द्वापरयुगांत कृष्णावतार व कलियुगांत चक्रधरावतार. महानुभावांचा दत्तावतार भागवताच्या चतुर्थ स्कंदाप्रमाणें एकमुखी व चतुर्बाहूच आहे. साकार परमेश्वराच्या सन्निधानानें देहधारी जीव आत्मकल्याण करून घेतात. अवतार विद्यमान असतांना त्याच्या प्रत्यक्ष दर्शनानें व सेवेनें जीवांना आत्मकल्याण करतां येतें व तो विद्यमान नसतांना त्याच्या स्मरणानें (आनुस्मरण) व संबंधानें म्हणजे त्याच्याशीं स्पर्श झालेल्या माणसांचा किंवा वस्तूंचा सहवास घडवून आणल्यानेंहि आत्मकल्याण होतें.

मोक्षाचीं साधनें दोन मानलीं आहेत. एक ज्ञानमार्ग व एक भक्ति-मार्ग. त्यांतहि 'ज्ञानापसि प्रेम उत्तम' असें म्हणून भक्तिमार्गाचें श्रेष्ठत्व प्रतिपादन केलें आहे. ज्ञानियाला परमेश्वर आपल्या पाठिशीं घालतो व भक्ताला आपल्या पोटाशीं धरतो. देवतांचें देणें हें चिरकाल टिकणारें नसतें. ईश्वर अवंचकत्वानें, संपूर्णतेनें आनंद देतो. देवतांची उपासना न करतां, ईश्वराची उपासना करावयाची ती याचकरितां. ज्ञान आणि भक्ति यांपैकीं कोणत्याहि मार्गानें साधक गेला तरी त्याला उरलेल्या मार्गाची प्राप्ति होतेच. ज्ञानानें भक्ति प्राप्त होते. तसेंच भक्तीनें ज्ञान प्राप्त होतें. या दोन्ही गोष्टी ईश्वराच्या प्रसादानें मिळत असल्यानें व दोन्हींची आवश्यकता असल्यानें साधकाला त्या क्रमाक्रमानें मिळतात. या बाबतींत एका सूत्रांत असें म्हटलें आहे कीं, वेधूनि बोधीतिः कां बोधूनि वेधीतिः (विचार १११) याचा अर्थ असा कीं ईश्वरानें आधीं 'वेधलें' म्हणजे भक्ति दिली तर मागाहून तो बोधतो म्हणजे ज्ञान देतो आणि आधीं बोध दिला तर मागाहून तो वेधतो

म्हणजे भक्ति देतो. अशा रीतीनें भक्ति व ज्ञान यांचा चक्रधरानें समन्वय केला आहे.

महानुभाव पंथ हा मुख्यतः साधकांचा, मुमुक्षुंचा असल्यानें पंथाच्या अनुयायांचे नियम कडक आहेत. पंथांत संन्यासी व गृहस्थ असे दोन वर्ग आहेत. संन्याशानें नित्याटन, भिक्षाभोजन, एकांतवास व परमेश्वर नामस्मरण करीत आपलें जीवन घालविलें पाहिजे. यांत चालढकल कोणत्याहि प्रकारची करतां कामा नये. सर्व प्रकारच्या वासनांचा, इच्छांचा, आवडींचा त्याग करून जीवंतपणीं मेल्यासारखे वागलें पाहिजे. (जीतेनि मृताचा धर्मा वर्तावें. आचार ७४) दुसरा वर्ग हा गृहस्थाश्रमी असल्यामुळें त्याला सांसारिक कर्में यथोचित पार पाडणें आवश्यक आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्था ही परमेश्वरानेंच निर्माण केली असल्यानें त्याच्या आज्ञेनुसार ती गृहस्थाश्रमीयानें अंमलांत आणून आपला लोकव्यवहार चालविला पाहिजे. गृहस्थांत तीन भेद आहेत. परंपरागत गृहस्थ, संन्यासच्युत गृहस्थ (म्हणजे आधीं संन्यास घेऊन पुनः संसारांत पडलेले) व भोपी गृहस्थ (म्हणजे देवस्थानाची सेवा करणारे). संपूर्ण अहिंसेचें पालन व द्युत, मद्य, मांस, वेश्या, शिकार, चोरी व परद्वारसेवा या सात दुर्व्यसनांचा सर्वथा परित्याग करण्याची व देवीदेवतांना शरण न जातां एका परमेश्वराचीच अनन्यभक्ति करण्याची दृढ प्रतिज्ञा गुरुच्यासमोर परमेश्वरापुढें प्रत्येक महानुभावाला घ्यावी लागते. या बाबतींत त्यांचे बरेचसें साम्य वारकरी पंथाशीं आहे. महानुभाव हे मूर्तिपूजक निःसंशय आहेत. परंतु त्यांच्यांत मूर्तींचा बुजबुजाट नाहीं. मूर्तींची ते अवहेलना करीत नाहींत. तर श्रीकृष्ण, श्री दत्तात्रेय यांच्याखेरीज इतर मूर्तींना उचलून ते एकाद्या देवी-देवतांच्या देवळांत नेऊन ठेवतात. ईश्वर किंवा ईश्वरावताराखेरीज इतरांची पूजा महानुभाव करीत नसल्यानें ईश्वराच्या किंवा ईश्वरावतारांच्या (उदा० श्रीकृष्ण, श्रीदत्तात्रेय इत्यादि) मूर्तींचीच पूजा ते करतात. याहि मूर्ती ते श्रीकृष्ण श्रीदत्तात्रेय, श्रीचांगदेवराऊळ, श्रीगोविंदप्रभु व श्रीचक्रधर या पांच परमेश्वरांपैकीं (यांनाच पंचकृष्ण असें

म्हणतात.) कोणत्याहि परमेश्वरावताराच्या चरणस्पर्शानें पवित्र झालेल्या संबंधी पाषाणाची बनवितात. परमेश्वरचरणांकित पवित्र पाषाणाची किंवा त्यापासून बनविलेल्या मूर्तीची म्हणजे विशेषांची (याला विशेष म्हणण्याचें कारण असें कीं यांतील पावित्र्य, कृपा, माया इत्यादि शक्ति सृष्टीचा संहार होईपर्यंत नष्ट होत नाहींत हें याचें वैशिष्ट्य आहे.) स्थापना देव्हाऱ्यांत केल्यानंतर दररोज सकाळीं, दुपारीं व संध्याकाळीं त्याची पूजा अवश्य करावी लागते. ती केल्याशिवाय अन्नपाणी कधींच ग्रहण करतां येत नाहीं. पूजेंत ईश्वराच्या लीलांचें स्मरण, प्रार्थना व नमस्कार यांचा अंतर्भाव होतो. प्रार्थनेंत आपल्याकडे सर्व प्रकारचा कमीपणा घेऊन ईश्वराची आळवणी केली जाते. महानुभावांत ज्याप्रमाणें देवतांचा सुळसुळाट नाहीं, त्याचप्रमाणें गुरुबाजी देखील नाहीं. गुरूला परमेश्वर समजून त्याच्या ठिकाणीं परम प्रीति करावी. पण त्याला परमेश्वर समजूं नये असें चक्रधरानें सांगितलें आहे. गुरूच्या समाधीची पूजाहि अर्थात्च वर्ज्य आहे. कारण समाधीची पूजा म्हणजे प्रेतपूजा होय व प्रेतपूजा करणारे नरकास जातात असें गीतेंत (अ. १४. १८.) सांगितलें आहे. महानुभाव ईश्वराखेरीज इतरांची उपासना करीत नसल्यानें राधा, रुक्मिणी इत्यादि देवींची किंवा मारुती, गजानन, विष्णू इत्यादि देवांची पूजा किंवा एकादशी वगैरे सारखी देवताव्रतें ते करीत नाहींत. महानुभाव जातिभेद किंवा स्पर्शास्पर्श मानतात किंवा नाहींत, या बाबतींत असें सांगतां येईल कीं, महानुभाव संन्यासी जातिभेद मानीत नाहींत. ते सर्वांकडची भीक्षा ग्रहण करितात. लीलाचरित्रांत एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, जोगेश्वरी येथें एक मातंग श्रीचक्रधरस्वामींचें दर्शन घेत असतां त्यानें एक लाडू त्यांच्या हातावर ठेवला. तो त्यांनीं आपल्या सर्व भक्तांना वाटून दिला. अर्थात् महानुभावीय संन्यासी अस्पृश्यता मानीत नाहींत. जे महानुभाव गृहस्थ आहेत, त्यांच्यांत जातिभेद, अस्पृश्यता मानणें इत्यादि गोष्टी आहेतच. " महानुभाव पंथांतील अनुगृहीत आणि संन्यस्त या दोन वर्गांपैकीं पहिल्या

अनुगृहीत वर्गांत इतर लोकांप्रमाणें रोटीव्यवहार व वेटीव्यवहार या संबंधानें सर्वच प्रतिबंध पाळले जातात."[१] संन्यासदीक्षा महानुभाव पंथांत स्त्री-पुरुष, ब्राह्मण-शूद्र वगैरे सर्वांना घेण्याचा अधिकार आहे, हें त्याचें एक वैशिष्ट्य आहे. आद्य शंकराचार्यांनीं ब्राह्मणांखेरीज इतरांना संन्यासदीक्षेचा अधिकार ठेवलेला नाहीं.

महानुभाव पंथ हा सनातन वैदिक धर्माचीच एक शाखा होय. प्रत्यक्ष वेदपठण जरी महानुभाव करीत नसले, तरी त्यांना वेद पूज्य वाटतात. गीता व भागवत हे ग्रंथ ते आवडीनें व आदरानें वाचतात. सर्व हिंदूंना प्रिय असलेल्या श्रीकृष्णाची उपासना ते करतात. श्रीकृष्णाबरोबर श्रीदत्तात्रे-याचीहि पूजा ते करतात. महानुभाव संन्यासी चातुर्वर्ण्य मानीत नसले, तरी महानुभाव गृहस्थ ते मानतात. आत्मा व पुनर्जन्म याहि गोष्टींवर त्यांचा पूर्ण विश्वास आहे. संपूर्ण अहिंसा व संपूर्ण शाकाहार यांमुळें वागणु-कीनें देखील ते सात्विक आहेत. असें असून त्यांच्याविषयीं नामदेव-एक-नाथांच्या कालापासून तें अगदीं आजतागायत अकारणच गैरसमज पसरले आहेत. हे गैरसमज म्हणींत देखील समाविष्ट झाले आहेत, त्यांवरून त्यांची तीव्रता कळेल. करणी कसाबाची व बोलणी मानभावाची, या म्हणीवरून बहुजन समाजाच्या मनांत या थोर पंथाबद्दल किती अनुदारपणाची भावना वसत होती किंवा आहे हें दिसतें. महानुभाव हे वेदविरोधी आहेत, वर्णा-श्रमसंस्था त्यांना मान्य नाहीं, ते सनातनी हिंदु नाहींत, त्यांनीं यवन राजां-कडून मोठ्या कुशलतेनें जिझिया कराची माफी मिळविली, गोसावी इत्यादि हिंदु साधु लोकांवर जो गहजब यवनांनीं उडविला त्यापासून अलिप्त राहतां यावें म्हणून महानुभावांनीं काषाय वस्त्रें टाकून देऊन काळीं वस्त्रें धारण केलीं, आपण मूर्तिपूजक नाहीं असें भासवून त्यांनीं मुसलमान बादशहांची मर्जी संपादन केली इत्यादि आक्षेप त्यांच्यावर अनेक विद्वानांनीं आणले होते.[२]

---

१ महानुभाव पंथ, ले. बाळकृष्ण महानुभावशास्त्री, १९४७, पृ. ३६५

२ विष्णुबोवा जोग, गोविंद काशीनाथ चांदोरकर, इतिहासाचार्य राजवाडे. विनायक लक्ष्मण भावे, के. आ. पांध्ये, डॉ. शं. दा. पेंडसे, कृष्णशास्त्री घुले, शं. गो. चट्टे, संतोष भारती हे ते गृहस्थ होत. इंपीरियल गॅझेटियरच्या जुन्या आवृत्तींत अशींच चुकीची माहिती देण्यांत आली होती.

हे आक्षेप अज्ञान व गैरसमजांवर आधारलेले असल्यानें मागाहून त्यांपैकीं कांहींकांनीं ते मागेंहि घेतले. आतां तर नागपूर हायकोर्टानें आपल्या तारीख २१-८-१९४४ च्या निकालानें असें जाहीर केलें आहे कीं, महानुभाव हे सनातन हिंदूंहून कोणत्याहि प्रकारें भिन्न नाहींत. जिझिया करापासून महानुभावांनीं माफी मिळविली या म्हणण्यांतहि पुरेसें सत्यकथन नाहीं. कारण औरंगजेब बादशहानें ता. २८-३-१६८४ ई. ला. जी सनद गोविंद राघो वगैरे महानुभाव महात्म्यांना करून दिली तींत 'हिंदू फकीरांना जिझिया कराची माफी द्यावी' असें म्हटलेलें आहे. केवळ महानुभाव पंथीयांना ती माफी द्यावी असें कोठेंहि म्हटलेलें नाहीं.[1] आपल्या राज्याच्या उत्कर्षासाठीं हे फकीर ईश्वराची प्रार्थना करतील या उद्देशानें औरंगजेब बादशहानें ही सनद दिली हें उघउ आहे. काळीं वस्त्रें किंवा शहापोश याचा या सनदेंत कोठेंच उल्लेख नाहीं.

महानुभाव पंथाचे अनुयायी हे सनातनी वैदिक हिंदु असूनहि त्यांचा द्वेष इतर हिंदूंनीं करण्याचें एक कारण म्हणजे हें कीं, अशा प्रकारचा आपल्यांतीलच इतर पंथीयांचा द्वेष करण्याची प्रथा आपल्याकडे पूर्वीपासून आहे. शैवांनीं वैष्णवास पाखंडी म्हणणें किंवा उलट वैष्णवांनीं शैवास पाखंडी समजणें हें आपल्या इकडे पूर्वीपासून चालत आलें आहे. महानुभावांना याच पद्धतीनें इतर हिंदु पाखंडी म्हणत असावेत. दुसरें व मुख्य कारण म्हणजे महानुभावांनीं केलेला देवताभक्तीचा निषेध. अनेक देवतांची भक्ति, त्या सर्व देवता एकाच परमेश्वराच्या निरनिराळ्या आकृति अशा समजुतीनें करणें, हें बहुजन हिंदुसमाजाला अधिक रूचते. नद्यांचें पाणी जसें समुद्राला मिळतें, तसें सर्व देवांना केलेले नमस्कार केशवालाच पोंचतात, अशी सामान्यपणें सर्व हिंदुंची समजूत आजपर्यंत चालत आलेली आहे. आणि म्हणून आपापल्या आवडीप्रमाणें राम, कृष्ण, विठ्ठल, गजानन, मारुति, अंबाबाई, दुर्गादेवी, खंडोबा इत्यादि अनेक देवतांची पूजा आपले लोक करीत असतात. नेमक्या याच

१ महानुभाव पंथ, ले. बाळकृष्ण महानुभाव शास्त्री, १९४७, पृ. ३८०-८१

म्हणजे अनेक देवतापूजनाच्या विरुद्ध महानुभाव असल्यानें त्यांच्याविषयीं इतरांच्या मनांत अप्रीति निर्माण होणें साहजिकच होतें. एका ईश्वराची पूजा करावी, देवतांची करूं नये, याविषयीं महानुभाव ग्रंथांत उत्तम प्रमाणें दिलीं आहेत. हीं प्रमाणें जर इतर हिंदुंना कळलीं असतीं तर महानुभावांविषयीं पुढें जे गैरसमज निर्माण झाले ते झाले नसते. परंतु चक्रधरांच्या नंतर आपली ब्रह्मविद्या गुप्त ठेवण्याच्या हेतूनें रवळोव्यास यांनीं सकळलिपी नांवाची सांकेतिक लिपी तयार करून, तिचीं कुलुपें सर्व ग्रंथांना टोकून दिलीं. यामुळें इतरांना महानुभाव अमुक पद्धतीनें कां वागतात हें कळेनासें झालें. आणि मग जसजसा काळ गेला तसतसा गैरसमज अधिकाधिक वाढत गेला. या बाबतींत महानुभाव अधिकारी श्री. बाळकृष्ण महानुभाव शास्त्री म्हणतात, "कोणत्याहि पंथांचें खरें अंतःस्वरूप त्या त्या पंथांतील व्यक्तींच्या आचरणावरून नव्हे, तर धार्मिक ग्रंथांतील तात्त्विक सिद्धांतावरूनच ओळखलें जात असतें. पण महानुभाव पंथाचे धार्मिक ग्रंथ पंथीयांनीं सांकेतिक लिपींत लिहून ठेविल्यानें महानुभाव पंथाचें खरें अंतःस्वरूप इतर पंथीयांस कळेनासें झालें. शिवाय महानुभाव पंथीयांनीं स्वतःला सनातनधर्मी तर म्हणावयाचें, पण सनातनधर्मीयांच्या हाडीमासीं खिळलेल्या देवताभक्तीचा निषेधहि करावयाचा व देवतांच्या देवळांतहि जावयाचें नाहीं; संन्यस्त तर म्हणावयाचें, पण संन्याशांचीं भगवीं वस्त्रें न नेसतां काळींच वस्त्रें नेसावयाचीं इत्यादिक श्रीचक्रधरस्वामींच्या नंतरच्या महानुभावांचे बाह्याचार इतर पंथीयास बोंचूं लागले. तेव्हां वाटेल तशा कंड्या पिकविण्याची संधि त्यांना अनायासेंच प्राप्त झाली व त्यांच्या हृदयांत भलत्याच गैरसमजुती घर करून बसल्या.....जेंव्हांपासून महानुभाव पंथाचें वाङ्मय उजेडांत येऊन वाचावयास मिळूं लागलें, तेव्हांपासून महाराष्ट्रीय विद्वानांच्या मतांत किती परिवर्तन घडून आलें, याचा प्रत्यक्ष अनुभव सर्वांस आलेलाच आहे.[१]"

महानुभाव पंथाच्या स्थापनेपासून शंभर वर्षांत झालेले व चक्रधराच्या

---

१ महानुभाव पंथ, ले. बाळकृष्ण महानुभाव शास्त्री, १९४७, पृ. ३८५-३८६.

सहवास ज्यांच्या लेखकांना घडला आहे, अशा ग्रंथांत 'साती ग्रंथं' पवित्र मानले जातात. हे सर्व ओंवीवृत्तांत रचिले आहेत. बहुधा हीं सातीं काव्यें एकाच पोथींत लिहिलेलीं आढळतात. हे "साती ग्रंथ" पुढीलप्रमाणें होत :—

वच्छहरण :—हें काव्य दामोदर पंडितानें शके १२०० च्या सुमारास रचिलें. दामोदर पंडित व त्यांची पत्नी हिरंबा या दोघांनींहि महानुभाव पंथाची संन्यास दीक्षा नागदेवाचार्यांकडून घेतली होती. वच्छहरण ऊर्फ वत्सहरण या काव्यांत श्रीकृष्णानें बालपणीं केलेला अघासुरवध आणि कृष्णावतार हा खरा आहे किंवा नाहीं हें पाहण्याच्या उद्देशानें ब्रह्मदेवानें गोपाळांचें व त्यांच्या वत्सांचें केलेलें हरण असे दोन प्रसंग वर्णिले आहेत. मराठींत वत्सहरणाच्या प्रसंगावर कोणींहि काव्य रचलेलें नाहीं. त्यावरून पाहतां 'वच्छहरण' हें काव्य प्राचीन, प्रथमचें व स्वतंत्र असें सहजच ठरतें. काव्याच्या ओंव्या पाचशे तीन असून त्यांत 'भणे मुनी केशवराजु' असा उल्लेख पांच वेळां आला आहे. या उल्लेखांवरून वच्छहरण हें काव्य केशवराजानें केलें असें वाटण्याचा संभव आहे. परंतु वस्तुतः तसें नाहीं. केशवराज हा दामोदर पंडिताचा परत मित्र होता. मित्रगौरवार्थ त्यानें आपल्या काव्यांत त्याचें नांव अनेक वेळां गोंविलें आहे. याच्या उलट 'रत्नमाला स्तोत्र' या शके १२०७ मध्यें लिहिलेल्या आपल्या ग्रंथांत दामोदर पंडिताचें नांव केशवराजानें ग्रंथसमाप्तींत घातलें आहे. प्रस्तुत काव्याची भाषा ज्ञानेश्वरीसारखी जुनी मराठी असून तींत प्राकृत किंवा तद्भव शब्दांचा भरणा पुष्कळ आहे. श्रीकृष्णाच्या संवगड्यांनीं केलेल्या क्रीडा यांत सुंदर रीतीनें वर्णिल्या आहेत. मुनिमंडित सरोवराचीं, यमुना-तटाकाचीं आणि श्रीकृष्णाचीं यांत आलेलीं वर्णनें काव्यपूर्ण आहेत. निसर्गाचें वर्णन करतांना मात्र वास्तवतेकडे दुर्लक्ष करून वृंदावनांत नारळी, पोकळी, फणस, खर्जुरी, नारिंग इत्यादि वेगवेगळ्या हवामानांत होणारे वृक्ष एकत्र आणले आहेत. ब्रह्मदेवानें गोपाळांचें हरण केल्यावर श्रीकृष्ण स्वतः गोपाळ व वत्स बनला याचें वर्णन असें केलें आहे "गोकुळां जाती जाली

वेऊः तंवं आपणची जालें वच्छें गोपाळः एऱ्हवीं गाईं स्त्रियांचें मन व्याकुळः निऱ्हां होतें." १४९ ते १५१ या ओव्यांवरून दामोदर पंडीताला हठयोगाची माहिती असावी असें दिसतें. याशिवाय उपमाउत्प्रेक्षादि अलंकारांनीं हें काव्य अगदीं हिरेजडित बनविलें गेलें आहे. त्यांतील "जैसी कुलस्त्रिएची गुण संपत्तीः भोगावी एकें चि पतीं ॥ तैसी हरिकथारसीं रतीः भक्ता वांचौनि नाहीं ॥२०॥ कालिंदीजल निर्मलः श्रीकृष्णकांती श्यामल ॥ प्रतिबिंबैली भणऔनि सु नीलः होऔंनि ठेलीं ॥१६८॥ एकांगुष्ट तपिएवकः नासाग्रीं दृष्टी घालिंती ढोंक ॥ यज्ञदीक्षीत तैसें चक्रवाकः प्रिया तें सांडितीना ॥१८१॥ दीपे अग्वाळिजें दिणकरूः क्षीराब्धां दुधाचां पाहोंनेरूं ॥ तैसा तुज पुढां मतीचा विस्तारूः आइके सर्वज्ञनाथा ॥४०८॥ या ओव्या कोणालाहि आवडतील अशा आहेत.

रुक्मिणीस्वयंवर—हें काव्य नरेंद्रानें शके १२१४ मध्यें लिहिलें. श्री. कृष्णराजदादा पारमांडल्य यांच्याजवळ असलेल्या पोथींत या काव्याच्या २९३४ ओंव्या असल्या, तरीपण बाकीच्या सर्व महानुभावांच्या साती-ग्रंथांत या काव्याच्या ८७९ इतक्याच ओव्या आहेत. हें काव्य प्रा. वि. भि. कोलते यांनीं इ. स. १९४० मध्यें संपादून प्रसिद्ध केलें. काव्याची रचना भागवताच्या दशमस्कंधाच्या व एका विशिष्ट पद्मपुराणाच्या आधारें करण्यांत आली आहे.[1] भीमकाच्या सभेंत कल्याणकीर्ति नांवाचा एक भाट येतो. त्याच्या बरोबर असलेल्या किन्नरानें निरनिराळ्या देशांतील राजांचे गुणानुवाद केले तरी पण रुक्मिणीला आनंद झाला नाहीं. परंतु श्रीकृष्णाचें वर्णन ऐकतांच ती उल्हसित झाली. एकनाथ व विठ्ठल यांच्या रुक्मिणी-स्वयंवरांत कीर्तिनामा ब्राह्मण किंवा कीर्तिनामा नटश्रेष्ठाचा उल्लेख असला, तरी नरेंद्रानें जीं निरनिराळ्या दिशांच्या राजांचीं वर्णनें केलीं आहेत तीं त्यांत नाहींत. नरेंद्राच्या रुक्मिणीस्वयंवराचा हा एक उल्लेखनीय विशेष असून त्यावरून त्याचें रचनाचातुर्य चांगलें प्रत्ययास येतें. संगीतकला

१ नरेंद्रकृत रुक्मिणीस्वयंवर सं. प्रा. वि. भि. कोलते, पृ. १७

व वास्तुकला यांच्यासंबंधीं नरेंद्राला उत्तम ज्ञान होतें असें प्रस्तुत काव्यावरून दिसतें. रुक्मिणीस्वयंवरांत जागोजागीं आलेलीं निसर्गाचीं वर्णनें बहुविध व बहारीचीं आहेत. प्रतिपदेपासून तों पौर्णिमेपर्यंत वाढणाऱ्या चांदण्यावर, कणीस तयार होऊन त्यापासून पुढें खळ्यांत धान्याची रास पडेपर्यंतच्या अवस्थांची जी कल्पना केली आहे ती सुंदर नाहीं असें कोण म्हणेल? (ओ. ४८९-९१) याहिपेक्षां 'कीं चंद्र नव्हे तें स्वेतदीपः माझारि सांवळें तें श्रीकृष्णाचें रूपः वरि टाकौनि पाहों आले स्वरूपः श्रीचक्रधराचें (५००) कीं गोपिनाथु जोडावेया नोवराः स्वर्गिंचिया मिनलिया ताराः गगनगंगे मोतियाचा वालुसराः पुजिला निळोत्पळीं (५०२)' 'हें वर्णन सरस आहे. उपमा, उत्प्रेक्षा, दृष्टांत, रूपक व अपन्हुति या अलंकारांची योजना विपुल असून रसिकांना मोहविणारी आहे. रुक्मिणीच्या विरहावस्थेचें वर्णन तसेंच तिनें लिहिलेली प्रणयपत्रिका यांत भावनांचा परिपोष अगदीं उत्तम झाला आहे. विरहोपचारांत आलेला कल्पनाविलास व इतरत्र आलेली रसोत्कटता या दोन्ही दृष्टींनीं रुक्मिणीस्वयंवर हृद्य बनलें आहे. रामदेवराव जाधवांच्या दरबारांत नरेंद्रानें हा ग्रंथ वाचला असतां त्यांना तो इतका आवडला कीं त्यांनीं ग्रंथाची मागणी करून त्यांत शेवटीं आपलें नांव घालण्यास सांगितलें! या प्रकारानें नरेंद्राच्या ठायीं इतकें वैराग्य बाणलें कीं त्यानें गृहस्थाश्रम सोडला व नागदेवाचार्यांकडे येऊन संन्यासदीक्षा घेतली.

शिशुपालवध व एकादशस्कंध :—सुप्रसिद्ध साती ग्रंथांत भास्करभट्ट बोरीकर ऊर्फ कवीश्वर भास्कर याच्या शिशुपालवध व एकादशस्कंध अथवा उद्धवगीता यांचा समावेश होतो. याचें कारण या ग्रंथांत असलेले काव्यगुण आणि भास्करभट्टाचें महानुभाव पंथांतील तृतीय आचार्यत्व. शिशुपालवध व उद्धवगीता हीं काव्यें अनुक्रमें शके ११९५ व ११९६ सालीं लिहिलीं गेलीं असल्यानें तीं ज्ञानेश्वर पूर्वकालीन होत अशी समजूत बरेच दिवस होती. परंतु महानुभावीय वाङ्मयाचे चिकित्सक संशोधक प्रा. वि. भि.

कोलते यांनीं ही समजूत सर्वस्वी चुकीची असल्याचें आतां सिद्ध केलें आहे.[1] त्यांच्या मतें हीं काव्यें शके १२२८ ते १२३१ च्या आंत लिहिलीं गेलीं असावींत. शिशुपालवध हें मराठींतील पहिलें ललित काव्य आतां न ठरतांना, हा मान नरेंद्र कवीच्या रुक्मिणी स्वयंवराकडे जातो. तें कसेंहि असलें तरी काव्यदृष्ट्या कवीश्वर भास्कराचे दोन्ही ग्रंथ पहिल्या श्रेणीचे आहेत यांत शंका नाहीं. शिशुपालवधाची कथा भारतांत, हरिवंशांत व भागवतांत आली आहे. तिच्याच आधारानें भास्करभट्टानें आपलें काव्य रचिलें असलें, तत्रापि त्याला काव्यरचनेला खरी स्फूर्ति सुप्रसिद्ध माघ कवीच्या शिशुपालवधावरून उघडच झालेली दिसते. नारदागमन, द्वारकावर्णन, ऋतुवर्णन, जलक्रीडावर्णन, युद्धवर्णन इत्यादि प्रसंगीं माघाच्या काव्याची सतत आठवण होण्याजोगें साम्य दोन्ही काव्यांत आहे. असें असलें तरी हे सर्व प्रसंग भास्करानें आपल्या स्वतंत्र व सुंदर उपमा उत्प्रेक्षादि अलंकारांनीं सजविले आहेत. बलराम, श्रीकृष्ण, उद्धव यांचीं स्वभावचित्रें माघापेक्षां कितीतरी पटीनें भास्करानें चांगलीं रंगविलीं आहेत. याशिवाय नारद व उद्धवांचा विनोद, श्रीकृष्णरुक्मिणीचा प्रेमकलह, विरहिणी गोपींचीं वर्णनें हा सर्व भाग भास्करकवीच्या स्वतंत्र प्रतिभेचा विलास म्हणून दाखवितां येईल. शिशुपालवधांत हास्य व वीर हे रस आले आहेत. परंतु त्यांत खरी बहार रसराज शृंगाराचीच होय. भास्करानें या रसाचा परिपाक अगदीं तन्मयतेनें केला आहे. जलक्रीडा संपल्यानंतर बाहेर येऊन देवांगनांनीं आपापले मोकळे केस बांधले. त्यावेळीं केसांतील पाण्याचे थेंब त्यांच्या नितंबांवर पडू लागले. त्यावर भास्करानें "नितंब आलिंगना सुखावलेंः बांधतां आसुवें गाळो लागलें। तेवि केशकळाप मीरवलेः उदक-. बिंदुस्तव (७२१)" अशी रमणीय उत्प्रेक्षा केली आहे.

शिशुपालवध काव्यानंतर भास्करानें उद्धवगीता ऊर्फ एकादशस्कंध हें काव्य रचिलें. या बाबतींत सांप्रदायिक माहिती आहे ती अशा प्रकारची.

---

१ भास्करभट्ट बोरीकर पृ. २६

शिशुपालवध काव्य रचून झाल्यावर कवीनें तें महानुभाव पंथाचे द्वितीयाचार्य बाइदेवबास (भावेदेवव्यास) यांस वाचून दाखविलें. त्यावेळीं ते म्हणाले, "भटो हा ग्रंथु निका जालाः परी नीवृत्ताजोगा नव्हेचिः प्रवृत्ताजोगा जालाः" त्यावर मग कवीनें एकादशस्कंधाची रचना करून ती आचार्यांस दाखविली. तो परीसूनि बाइदेवबासी म्हणितलेंः आतां होए कवीस्वर होः हा आतां निवृत्ताजोगा जालाः ऐसें म्हणोनि थोर तोखलेः ॥ वृद्धाचार ९ ॥ व्यासांनीं रचिलेल्या श्रीमद्भागवताच्या अकराव्या स्कंधाच्या आधारें भास्करकवीनें उद्धवगीतेची रचना केलेली आहे. 'एकादशीं सरिसींः भाजुनी साहित्य देशीः मियां आवारूं केलें जगासिः ज्ञान अमृताचें (८२६)' असें खुद्द कवीच सांगत असला, तरी मूळग्रंथांत त्यानें खूपच संक्षेप व विस्तार केला आहे. पहिली १ ते १० प्रकरणें, ६४ ते ८० व १०३ ते १०५ हीं प्रकरणें मुळांत नाहींत. ऋष्यशृंगाचें कथानक व उद्धवाचा शोक हीं प्रकरणें विस्ताराचें सुंदर नमुनें म्हणून दाखविण्याजोगीं आहेत. उद्धवगीतेंत आलेलें तत्त्वज्ञान हें महानुभावीय सिद्धांत-सूत्रपाठाला धरून असेंच आहे. केशवव्यास यांच्या शके १२०६ मध्यें रचिलेल्या 'मूर्तिप्रकाश' नामक तत्त्वज्ञानप्रधान काव्याचा प्रस्तुत काव्यावर विशेष परिणाम झालेला स्पष्ट दिसतो. दोन्हीं काव्यांत साम्यस्थळें पुष्कळ आहेत.[1] हें कांव्य तयार करीत असतांना कवीला आत्मविश्वास किती दांडगा वाटत होता तो पुढील ओव्यांवरून दिसतो. "पिळिलेयां चंद्रबिंबः सुटति अमृतधारांचे कदंबः तैसे फुटति तुंबः नवरसांचे ॥ ३० ॥ ऐसिये कवितालतेः ब्रह्मविद्येचीं फुलें दिसति फांकतेंः तरि पसरतेनि हातेंः कवण न तोडी ? ॥३१॥ ब्रह्मविद्येचेनि कसेंः कामतत्त्वा भाजनी दिसेः तरि कवणाचे मन आपैसेंः अभिळाषु न करी ? ॥३४॥ तैसें साहित्याचां राहाणीः शांतिरसा अवतरण आणीः तरि माझी पवित्र वाणिः कवण नाईके ? ॥३५॥" उद्धवाचा शोक ५८ ते १५३ ओंव्यांत आला असून तो हृदयाला चटका

१ भास्करभट्ट बोरीकर, प्र. ६, पृ. १८०-१८६.

लावणारा आहे. उद्धव म्हणतो, "कां आझुईं हृदय न फुटेः प्राणतंतु न तुटे ? : चोळाखा न फुटेः या कळेवराचा ॥१४७॥ तो मृत्यु काई जाला? : कां मातें वीसरला ? : किं हाथिएरू मोडलाः अंतकाचा ? ॥१५०॥" ऋष्य-शृंगकथानकाच्या रूपानें पुनः एकदां याहि काव्यांत भास्करकवीनें त्याला आवडणाऱ्या शृंगाररसाची मेजवानी वाचकांना घातली आहे. मुळांत एक श्लोक असूनहि भास्करानें त्यावर सुमारे पन्नास ओव्यांचें शृंगारिक कथानक तयार केलें आहे.

ज्ञानप्रबोध :—पंडित विश्वनाथ बाळापूरकर यानें हा ग्रंथ शके १२५३ मध्यें रचिला. भगवद्गीतेच्या तेराव्या अध्यायांत अमानित्वादि जीं ज्ञानाचीं लक्षणें सांगितलीं आहेत, त्यांच्या स्पष्टीकरणार्थ एकशे पंचवीस ओंव्याचें हें लहानसें पण स्वतंत्र काव्य करण्यांत आलें आहे.

सह्याद्रिवर्णन :—(शके १२५४) हा ग्रंथ रवळो व्यास ऊर्फ राघवो-पाध्ये यांनीं लिहिला असून त्यांत श्रीदत्तात्रेयाचें लीलाचरित्र आलें आहे.

श्रीऋद्धिपूर वर्णन :—हें काव्य पंडीत नारायण व्यास बहाळिये यांनीं शके १२८५ मध्यें रचिलें. महानुभावांनीं पवित्र मानलेल्या ऋद्धिपूर क्षेत्राचें व तत्रस्थ देवतांचें वर्णन यांत आलें आहे. महाराष्ट्रांतील वारकऱ्यांना पंढरपूर क्षेत्राविषयीं जें प्रेम वाटतें, तें प्रेम महानुभावांना ऋद्धिपुराविषयीं वाटतें. प्रस्तुत काव्य हें मुख्यतः स्थलवर्णनात्मक असूनहि कवीनें तें भावपूर्ण व रसाळ बनविलें आहे. ज्ञानेश्वरींत जशी उत्प्रेक्षांची मालिका लागलेली असते, तशी याहि काव्यांत पाहावयास सांपडते, विशेषतः 'आपुलेनि प्रसन्न-पणेंः दृष्टीसि मांडीति धरणेः अमृता आणीति उणेंः गोडिया आंगीचियाः ॥९४॥' असल्या ओंव्या ज्ञानेश्वरीची आठवण करून दिल्याखेरीज रहात नाहींत. काव्याची रचना ओंवीवृत्तांत असून, ओंवीसंख्या सहाशेपंचेचाळीस आहे. सुरुवातीला परावाचा, नागांबिका, नागदेवाचार्य यांना कवीनें वंदन करून नंतर ऋद्धिपूर—क्षेत्राच्या वर्णनाला आरंभ केला आहे. त्यांत 'सासुर-

सं. सं. .....

वासें शीणलीः तिये भेटे जेवि माउलीः असा हे तैसी परि जोलीः श्रीऋद्धिपुर देखिलेआं ॥ ४८ ॥ ' अशा प्रकारचें सुरुवातीलाच भावपूर्ण वर्णन आहे. यांत आलेलीं निसर्गाचीं वर्णनें अत्यंत बहारीचीं असून श्रीगोविंदप्रभूच्या मूर्तीचें वर्णन अत्यंत सूक्ष्म व सरस आहे.

महानुभावीय वाङ्मय विपुल आहे. या वाङ्मयाचें स्वरूप य. खु. देशपांडे यांच्या ' महानुभावीय मराठी वाङ्मय ' या पुस्तकावरून बऱ्याच अंशांनीं लक्षांत येऊं शकतें. हें वाङ्मय अद्यापि सर्व छापलें गेलेलें नाहीं. श्रीचक्रधरांच्या हयातींत व नंतर सुमारे पन्नास वर्षेंपर्यंत ललित वाङ्मय बरेच तयार झालें. त्यानंतरच्या काळांत टीपात्मक, विवरणात्मक, तत्त्वज्ञानपर साहित्यच अधिक तयार झालें. महत्त्वाच्या ग्रंथांचा व ग्रंथकारांचा उल्लेख यापूर्वी वर करण्यांत आलाच आहे. येथें त्यांपैकींच उरलेल्या थोड्यांचा निर्देश करतों.

दृष्टांतपाठकर्ते केशवव्यास यांचा मूर्तिप्रकाश (शके १२०६) नांवाचा ओंवीवृत्तांत रचलेला ग्रंथ असून त्यांत श्रीचक्रधरांचें वर्णन आहे. केशव व्यासांनीं रत्नमाला नांवाचें स्तोत्र संस्कृतांत लिहिलें असून त्यांतहि चक्रधरांच्याच लीला वर्णिल्या आहेत. केशव व्यासांचे बंधू गोपाळ पंडीत ऊर्फ आनेराज व्यास (मृत्यु शके १२६२) यांनींहि सूत्रपाठ तयार केला असून तोहि महानुभावीय लोक आदरानें वाचतात. यांचे दृष्टांतलक्षण व दृष्टांत व्याख्या हे दोन मराठी गद्यग्रंथ आणि लक्षणरत्नाकर व द्वात्रिंशल्लक्षण नांवाचे दोन संस्कृत ग्रंथ आहेत. याचा समकालीन असा भावे देवव्यास नांवाचा ग्रंथकार होऊन गेला. यानें पूजा अवसर, पांचापुराचें मूर्तिज्ञान, नामाचे दस ठाय व साठ प्रश्न असे चार गद्यग्रंथ लिहिले आहेत. नागदेवाचार्योंची नात नागंबा हिनें सूत्रमालिका, शय्यापालन दृष्टांतव्याख्या, दुर्भगा प्रमेय, व उद्धरणपट असे चार गद्यग्रंथ लिहिले आहेत. गोपाळ पंडीत यांचे शिष्य हयग्रीव व्यास (मृ. श. १२४६) यांनीं श्रीमद्भागवता-

च्या दशमस्कंदावर २८० श्लोकांची मराठी टीका केली असून तिचें नांव 'गद्यराज' आहे. पंडीत भीष्माचार्य यांनीं लक्षण रत्नाकर भाष्य, मार्ग-मंजरी नांवाची मराठी पुस्तकें व दिनकर प्रबंधादि संस्कृत ग्रंथ रचिले आहेत. व्याकरणावर नामविभक्ति आणि भाषाशास्त्रावर पंचवार्तिक असे आणखी दोन ग्रंथ यांनीं केले आहेत. दुर्बोध शब्दांचे अर्थ सांगणारा 'टीप' नांवाचाहि ग्रंथ यांचाच आहे. गुर्जर शिवव्यास आणि सिद्धांते हरिव्यास या उभयतांनीं श्रीचक्रधरांच्या मुखांतून निघालेल्या सूत्ररूप वाक्यांना आधारास घेऊन त्यावर आचार, विचार व लक्षण यावरील तिन्ही स्थळांची बांधणी शके १३२५ च्या सुमारास केली.[1] गीतेवर अनेक महानुभावीय पंडीतांनीं मराठी व संस्कृत टीकापर ग्रंथ लिहिले आहेत. अशा टीकांत लक्ष्मिंद्री गीताटीका, गीतार्थबोधिनी ऊर्फ भिंगारकरी, गोपाळदासी, गोपी भास्करकृत भास्करी टीका, पंडित शार्ङ्गधर पुसदेकरकृत कैवल्यदीपिका या विशेष प्रसिद्ध आहेत. भगवद्गीतेप्रमाणें 'रुक्मिणीस्वयंवर' हा महानुभावीय कवींचा आवडता विषय असून त्यावर सुप्रसिद्ध नरेंद्र कवीखेरीज इतरहि कवींनीं रचना केली आहे. अशांत संतोषमुनि कृष्णदास (१५ वें शतक) यांचें ओवीबद्ध २८ अध्यायी रुक्मिणीस्वयंवर विशेष प्रसिद्ध आहे. यानें आपल्या काव्यांत मराठी भाषेची खूप प्रशंसा केली आहे.

महानुभावीय ग्रंथकार आपल्या वाङ्मयाची विभागणी श्रुति (श्रीचक्र-धराचे समकालीन अथवा प्रत्यक्ष त्याच्या मुखांतून निघालेले शब्द), स्मृति (नागदेवाचार्यासंबंधीं अथवा तत्कालीन ग्रंथ), वृद्धाचार ('परशुरामाचार्य इत्यादिकांचे संबंधीं अथवा तत्कालीन आचारविचारासंबंधीं ग्रंथसमूह), मार्गरूढि (गुर्जर शिवव्यासांच्या काळांतील ग्रंथ) आणि वर्तमान (१६ व्या शतकानंतरचे ग्रंथ) अशी करितात.

जिच्या उल्लेखावांचून महानुभावी साहित्याला पूर्तता येणें अशक्य

---

१ महानुभाव मराठी वाङ्मय, य. खु. देशपांडे, पृ. ५२.

अशा महदाइसेचा विचार करून हें प्रकरण संपवूं या. आद्य मराठी कवयित्री म्हणून महदाइसा ओळखिली जाते. रूपाई व महदंबा अशीं हिचींच आणखी दोन नांवें आहेत. महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर यांचा मुख्य शिष्य नागदेवाचार्य याची ही चुलत बहीण. चक्रधरांच्या शिष्यमालिकेंत हिचीहि गणना होते. हिनें रचलेल्या धवळयांबद्दल हिची मुख्यतः प्रसिद्धी आहे. धवळयांचा अर्थ (धव+ल) लग्नांत गावयाचीं वरविषयक गीतें असा होतो. श्रीचक्रधरांचे गुरु श्रीगोविंदप्रभु यांच्या सांगण्यावरून महदाइसेनें धवळयांचा पूर्वार्ध रचिंला, आणि म्हाइंभट व लक्ष्मींद्रभट यांच्या सांगण्या-वरून व साहाय्यानें धवळयांचा उत्तरार्ध रचिला. धवळयांचा पूर्वार्ध शके १२०८ पूर्वी म्हणजे ज्ञानेश्वरी-रचनेपूर्वी चार वर्षें तयार झाला. उत्तरार्ध शके १२३४ पूर्वी केव्हां तरी रचिला गेला. धवळयांत रुक्मिणीस्वयंवराची कथा गाण्यांत आली आहे. साधेपणा व सरळपणा हे या काव्याचे विशेष होत. अलंकाररहित काव्यहि कसें चित्तवेधक बनूं शकतें, त्याचें प्रस्तुत धवळे हें उत्तम उदाहरण होय. कृष्णदर्शनानें बेभान बनून महालावरून उडी टाकावयास निघणाऱ्या तसेंच रुखवतासाठीं कृष्णाला आवडणारे खाद्यपदार्थ स्वतः करणाऱ्या रुक्मिणीचें आणि तिच्या सख्यांचें यांत आलेलें वर्णन बहारीचें आहे. हे धवळे सयमक असून त्यांत दर कडव्यांत चार चरण आहेत. त्यांना गणमात्रांचाच नव्हे तर अक्षरसंख्येचाहि निर्बंध नाहीं. वृत्तशैथिल्य, विस्कळित रचना, पुनरुक्ति व ढिलाईचीं यमकें हे प्रस्तुत काव्यांतील ठळक दोष होत. भाषा अर्थात् जुनी मराठी म्हणजे तेराव्या शतकांतील ज्ञानेश्वरी इत्यादि ग्रंथांतील भाषेसारखी आहे. मातृकी रुक्मिणी-स्वयंवर हें महदाइसेनें रचिलेलें दुसरें काव्य असून तें ओवीवृत्तांत आहे. यांतील ओव्यांची सुरुवात अ पासून ह पर्यंतच्या वर्णांनीं किंवा मातृकांनीं साधली असल्यानें याला मातृकीरुक्मिणीस्वयंवर असें नांव देण्यांत आलें आहे. धवळयांप्रमाणेंच यांतील विषय रुक्मिणी स्वयंवर हा असला तरी धवळयांपेक्षां हें काव्य निःसंशय अधिक सरस आहे. अगदीं थोड्या शब्दांत

वाचकाच्या मनावर कायमचा ठसा उमटवितील अशीं 'उधातु क्षीरोदक कांसें वेढियेलाः परीवंटी शोभलाः रुक्मिणीचां ॥९२॥ उदीत कांचोळी लेइली रुक्मिणीः ठीकलग लेणीः प्रभा फांके ॥९३॥ डोळे अश्रुजळीं देह न संभाळीः झेंप तीये वेळींः घालूं पाहे ॥३८॥'—यासारखीं सुंदर शाब्दचित्रें यांत आहेत.

४

ज्ञानेश्वर[1]

ज्ञानेश्वरांच्या ग्रंथकर्तृत्वाचें मूळ त्यांच्या असामान्य जीवनांत आणि त्यांच्या काळच्या विलक्षण लोकस्थितींत आहे. त्यांना आणि त्यांच्या कुटुंबांतील सर्वांना लोकांकडून खूपच त्रास झाला. त्यांचे वडील विठ्ठलपंत उद्वेग, वैराग्य आणि ईश्वरप्रेमाच्या भरांत पत्नीची अर्धवट संमति मिळवून काशीला गेले व तेथें रामानंद (श्रीपाद) स्वामींकडून त्यांनीं संन्यास घेतला. रामानंदांच्याच आज्ञेवरून अशास्त्रीय संन्यासाचें परिमार्जन करण्याच्या हेतूनें त्यांनीं परत गृहस्थाश्रम स्वीकारला. या कारणानें प्रथम आळंदीकर ब्राह्मणांनीं आणि नंतर आपेगांवकर ब्राह्मणांनीं त्यांना वाळींत टाकलें. वाळींत टाकणें या गोष्टीचा अर्थ आज आपल्या लक्षांत येणें शक्य नाहीं. ज्ञानेश्वरांच्या काळीं एखाद्याला वाळींत टाकणें म्हणजे सर्व बाबतींत त्याच्यावर संपूर्ण बहिष्कार टाकणें असें समजलें जाई. रोगजंतूंपासून दूर राहण्याची जी आज आपली वृत्ति आहे, ती त्यावेळीं वाळींत टाकलेल्या व्यक्तीच्या बाबतींत अंमलांत येई. वाळींत टाकलेल्या व्यक्तींना नुसते दूरच ठेवीत असत असें नाहीं तर कुजकें बोलून त्यांना मारहाणहि करण्यांत येई. विठ्ठलपंत सर्व प्रकारचा छळ मुकाट्यानें सहन करून, धर्मग्रंथांच्या वाचनांत आणि ईश्वरभजनांत वेळ घालवीत असत. अशाच स्थितींत त्यांना चार अपत्यें झालीं. तींच अनुक्रमें निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई हीं सुप्रसिद्ध भावंडें होत. यांच्यावरहि बहिष्कार पुकारण्यांत येऊन निवृत्ति, ज्ञानदेव आणि सोपान यांची मुंज करण्याचीं वयें होऊनहि त्यांची मुंज

---

१ जन्म शके ११९७ श्रावण वद्य ८, समाधि शके १२१८ कार्तिक वद्य त्रयोदशी आळंदी येथें.

यथाविधि होईना. तेव्हां विठ्ठलपंतांनीं त्र्यंबकेश्वरीं जाऊन गैनीनाथांकडून सर्व कुटुंबाला नाथपंथाची दीक्षा देवविली. आळंदीला परत आल्यावर त्यांनीं पुनः एकदां तेथील ब्राह्मणांना आपल्यावरील बहिष्कार काढून घेण्याची व कांहीं प्रायश्चित्त असेल तर तें सांगण्याची विनंति केली. धर्माचा फक्त शब्दार्थच जाणणाऱ्या ब्राह्मणांनीं त्यांना देहांत प्रायश्चित्त सुचविलें. आपल्या अपत्यांच्या कल्याणार्थ विठ्ठलपंत व रुक्मिणीबाई यांनीं या प्रायश्चित्ताचा स्वीकार करून व प्रयागक्षेत्रीं जाऊन गंगेला आपले देह अर्पण केले. या भयंकर घटनेमुळें निवृत्तिज्ञानदेवादि बालकांच्या कोंवळया अन्तःकरणावर किती जबरदस्त परिणाम झाला असेल याची कल्पनाच केलेली बरी. आलेल्या बिकट परिस्थितीला मन घट्ट करून त्यांनीं तोंड दिलें आणि वडिलांनीं दिलेल्या ज्ञानांत आपल्या अध्ययनानें भर घातली. फिरून एकदां त्यांनीं ब्राह्मणांना आपणाला पावन करून घेण्याची विनंति केली. यावेळीं या ब्राह्मणांनीं प्रतिकाशी समजल्या जाणाऱ्या पैठणक्षेत्रीं जाऊन तेथील ब्राह्मणांकडून शुद्धिपत्र घेऊन येण्यास त्यांना सांगितलें. हें शुद्धिपत्र अर्थातच सहजासहजीं मिळालें नाहीं. त्याकरितां रेड्याच्या तोंडून वेद वदविण्यासारखे कांहीं चमत्कार ज्ञानदेवांना करावे लागले. आणि मग या चमत्कारामुळें कर्मठ ब्राह्मणांनीं त्यांना नमस्कार घालून शुद्धिपत्र लिहून दिले. यानें या भावंडांवरील बहिष्कार उठला तरी त्यांच्या काळजांतील जखमा तशाच राहिल्या. धर्माची लोकांकडून होत असलेली विटंबना पाहून तीं अंतर्मुख बनलीं. धर्माचा भावार्थ न समजतां केवळ तांत्रिक कर्में करणाऱ्या लोकांची त्यांना किळस आली. असलीं धर्मकृत्यें करण्यानें मनुष्य माणुसकीला विसरतों, शुष्क व खंक बनतो आणि खऱ्या ईश्वरी प्रेमाला आंचवतो. चमत्कारांमुळें आणि सात्विक वर्तनामुळें आपल्या भोंवतीं जमा होणाऱ्या लोकांना खरा धर्म म्हणजे कोणता तो कळावा म्हणून ज्ञानेश्वरांनीं आपल्या ग्रंथांची रचना केली.

ज्ञानेश्वरकालीन विलक्षण लोकस्थिति संबंधानें इतिहासाचार्य विश्वनाथ

काशिनाथ राजवाडे म्हणतात[१] "यादवांच्या अमदानींत म्हणजे इसवीच्या तेराव्या शतकाच्या उत्तरार्धांत मराठ्यांचें सर्व लक्ष परमार्थाच्या नांवावर ऐहिक उपभोग घेण्याकडे लागलें होतें. तेराव्या शतकांतील अत्यंत मोठा असा मानिलेला ग्रंथ म्हटला म्हणजे हेमाद्रीचा[२] चतुर्वर्गचिंतामणि हा होय. ह्या ग्रंथांत दर दिवसाला व दर तिथीला दहा दहा पांच पांच व्रतें सांगितलीं आहेत व त्या त्या व्रताला कोणत्या देवाची कोणतें पक्वान्न करून व किती ब्राह्मण घालून प्रीति संपादन करावी ह्याचा श्रुति स्मृति व पुराणें ह्यांतून उतारे देऊन, गंभीरपणें निर्णय केला आहे. हेमाद्रीच्या व्रतखंडावरून पाहतां वर्षाच्या ३६५ दिवसांचीं एकंदर २००० व्रतें व्हावीं असा अंदाज होतो. लोकांचीं व्रतें करण्याकडे, ब्राह्मणभोजनें घालण्याकडे, पक्वान्नें खाण्याकडे व तद्द्वारां मोक्ष मिळतो अशा मतांकडे अतोनात प्रवृत्ति असल्याविना हेमाद्रीनें हीं व्रतें केवळ पांडित्य दाखविण्याकरितां सांगितलीं असतील हें संभवत नाहीं...एवढीं दोन हजार व्रतें ज्या ग्रंथांत सांगितलीं आहेत असा पृथ्वीवरील दुसऱ्या कोणत्याहि भाषेंत कोणत्याहि काळीं एकहि ग्रंथ अद्यापपर्यंत निर्माण झाला नाहीं!...सिंघणादि वीरांच्या विजयानें लोक अत्यंत धनसंपन्न होऊन व्रतें, उद्यापनें करण्याच्या मिषानें सुखैकपरायण व विलासनिमग्न झाले...परमार्थाच्या नांवाखालीं ही जी सुखैकपरायणता नांदत होती तिचा फायदा घेऊन मुसलमानांनीं मराठ्यांचा पराभव केला."

याशिवाय जैन, लिंगायत व महानुभाव ह्यांच्याकडून वैदिक धर्म पोखरण्याचें काम याच सुमारास चालू होतें. जैनांनीं अहिंसा तत्त्वाचा अतिरेक करून लोकांना दुर्बल बनविले. लिंगायतांनीं वर्णाश्रम धर्म अमान्य ठरवून वेदप्रामाण्य धुडकावून दिलें आणि महानुभावांनीं संन्यस्तवृत्तीवर

---

१ वि. का. राजवाडेकृत मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड ८ वा. (१९०३) पृ. ४६-४८.

२ हा सुप्रसिद्ध पंडित कृष्ण, महादेव व रामचंद्र या यादवराजांच्य पदरीं करणाधिप या मोठ्या हुद्यावर होता.

भर देऊन आणि द्वैत प्रतिपादून लोकांना सामाजिक कर्तव्यें करण्यांत उत्तेजन दिलें नाहीं. अहिंसा, वैराग्य, द्वैतवाद, रूढिभंजन व रूढिपालन किंवा कर्मठपणा यांचा एकांतिकपणा धर्माच्याच नांवावर होत असलेला पाहून ज्ञानेश्वरांना वाईट वाटलें. स्वतःच्या दुःखानें आधींच मृदु बनलेल्या त्यांच्या अन्तःकरणांत लोकांची होत असलेली अवनति पाहून करुणा उत्पन्न झाली आणि बहुजन समाजाला सन्मार्ग दाखवायला ते उद्युक्त झाले. लोकांना धार्मिक क्रिया अवगत होत्या, पण त्या क्रियांतील भावार्थ कळत नव्हता. लोक गीता वाचीत होते, पण तिच्यांतील रहस्य किंवा भावार्थ समजल्या-वांचून. लोकांची वेदांवरील निष्ठा अढळ रहावी, त्यांनीं स्वतःचा संसार नेटकेपणानें करावा, सामाजिक कर्तव्यें उल्हसितवृत्तीनें करावींत, उच्चनीचपणाच्या कल्पना सोडून सर्वत्र परमेश्वर आहे ही भावना अंगीं बाणून व्यावी म्हणून श्रीमद्भगवद्गीतेचा भावार्थ स्पष्ट व सुबोधकरून सांगणारी भावार्थदीपिका नांवाची टीका ज्ञानेश्वरांनीं मराठींत लिहिली. हीच ती सुप्रसिद्ध ज्ञानेश्वरी होय.

ज्ञानेश्वरी हें कांहीं श्रीमद्भगवद्गीतेचें मराठींत केलेलें सुबोध भाषांतर नव्हे. तसें असतें तर गीतेच्या सातशे श्लोकांकरितां ज्ञानेश्वरांनीं फार तर एक हजार ओव्या रचिल्या असत्या. ज्ञानेश्वरींत नऊ हजारांवर ओव्या आहेत. आणि असें असून ज्ञानेश्वर या विस्ताराला भावार्थच म्हणतात. याचा अर्थच असा कीं, गीतेचा जो भाग किंवा जे श्लोक भावार्थरूप त्यांना वाटले, त्या भागाचें किंवा श्लोकांचें निमित्त करून ज्ञानेश्वरांनीं स्वतःचीं ठाम बनलेलीं मतें लोकांना समजतील, पटतील, रुचतील अशा शैलींत सांगितलीं. गीतेंत ज्ञान, कर्म, भक्ति आणि योग यांच्यावर विवेचन आलें असलें तरी ज्ञानेश्वरांनीं त्यांपैकीं ज्ञान, कर्म आणि योग यांच्यावर विशेष भर दिलेला आढळतो. आंधळ्या भक्तिपेक्षां डोळसभक्ति त्यांना अधिक प्रिय होती. ते स्वतः योगी असल्यानें सहाव्या अध्यायांत मूळ गीतेंत थोडेसें निमित्त सांपडतांच त्यांनीं स्वतःच्या अनुभवांतील हठयोगाची सर्व प्रक्रिया मोठ्या बहारीनें वर्णन केली आहे. हीच तऱ्हा कर्मयोगाची

सभोंवतालच्या कर्तव्यपराङ्मुख बनलेला समाज पाहून आणि त्याचें निमित्त करून स्वधर्म आणि निजवृत्ति या नांवाखालीं त्यांनीं प्राप्त आणि विहित कर्तव्यें करण्यावर भार दिला आहे. ज्ञानेश्वरांच्या काळीं महाराष्ट्रांत प्रत्यक्ष नसलें तरी बाकीच्या हिंदुस्थानांत धर्म आणि देवता यांच्यावर मोठें संकट मुसलमानांनीं आणिलें होतें. हें संकट महाराष्ट्रावरहि चालून येईल अशी साधार भीति ज्ञानेश्वरांना वाटत होती. क्षुद्र देवता आणि व्रतें यांच्या नादीं लागलेला समाज विस्कळित बनला होता. हा समाज सुसंघटित व्हावा, एकरूप व्हावा म्हणून ज्ञानेश्वरांनीं कर्मयोगावर सहजच भार दिला. या बाबतींत सुप्रसिद्ध व चिकित्सक विद्वान प्रो. न. र. फाटक म्हणतात,[1] "ज्ञानदेवांनीं गीतेवर टीका लिहितांना कर्मयोगाचें निरूपण इतकें ठासून केलें आहे कीं, ते निवृत्तिमार्गी होते कीं प्रवृत्तिमार्गी हा वादच खरोखरी उपस्थित होऊं नये...कर्म टळत नाहीं, तें करावेंच लागतें तर तें कसें करावें हा प्रश्न ज्ञानेश्वरांनीं स्वधर्म या एका शब्दानें सोडविला आहे. तिसऱ्या अध्यायामध्यें या शब्दाचा त्यांनीं पुनःपुनः उच्चार केला आहे. देखे अनुक्रमाधारें । स्वधर्म जो आचरे । तो मोक्ष तेणें व्यापारें । निश्चित पावे ॥८०॥ कुळ, जाति, देश, अधिकार, परंपरा, वगैरे गोष्टींचा अंतर्भाव अनुक्रम शब्दाच्या अर्थांत करावा लागतो. अशा अनुक्रमाच्या आधाराचा जो स्वधर्म त्याचें आचरण केल्यानें माणसाला निश्चित मोक्ष मिळतो असें ज्ञानेश्वरांचें येथें प्रतिज्ञावाक्य आहे. तुम्हां वर्ण विशेषवशें । आम्हीं हा स्वधर्म विहिला असे ॥ (३-८८)" याशिवाय अजातवाद आणि मायावाद यांचा स्वतंत्रपणें पुरस्कार ज्ञानेश्वरांनीं दुसऱ्या अध्यायांत केला आहे. यावरून हें स्पष्ट होईल कीं, ज्ञानेश्वरांनीं अद्वैतवाद, अजातवाद, मायावाद, कर्मयोग, ज्ञानयोग व हठयोग यांसंबंधीं आपलीं स्वतंत्र व ठाम मतें ज्ञानेश्वरींत प्रतिपादन केलीं आहेत.

शालिवाहन शके १२१२ मध्यें ज्ञानेश्वरीची रचना केल्यानंतर

---

१ ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वरी, १९४७, पृ. २५-२६

ज्ञानेश्वरांनीं अमृतानुभव किंवा अनुभवामृत नांवाचा स्वतंत्र ग्रंथ लिहिला. ज्ञानेश्वरी लिहितांना गीतेचें बंधन थोडे फार होतेंच. परंतु स्वतःची पूर्णाद्वैत-विषयक मतें निःसंदेहपणें मांडायला ज्ञानेश्वरांना भरपूर वाव या ग्रंथांत मिळाला. अनुभवामृत हें नांव योगवासिष्ठांतील अनारतगलद्रूपं नित्यं च अनुभवामृतं । अहं निःशेषचक्राणि चिद्ब्रह्माहमलेपकम् ॥ यो. वा ६-१०-७१ यावरून सुचलें असावें. सुमारे आठशे ओव्यांच्या या ग्रंथांत ज्ञान्याचा परब्रह्मविषयींचा अनुभव सांगितला आहे. ज्ञानी पुरुषाला सर्वच चिद-द्वैताचा अनुभव येतो. त्याच्या दृष्टीनें माया, अज्ञान व तन्मूलक विश्वाभास हीं अस्तित्वांतच नसतात. परमात्मा, शिव, शक्ति आणि जीव यांचें ऐक्य, गुरु आणि शिष्य यांचें ऐक्य, ज्ञान अज्ञान यांतील भेद, सत् चित् व आनंद यांचें ऐक्य, अज्ञानखंडन, ज्ञानखंडन इत्यादि विषय यांत उत्कृष्ट-पणें चर्चिले आहेत. अन्वय आणि व्यतिरेक अशा दुहेरी पद्धतीनें मुख्यतः अद्वैताचेच प्रतिपादन करण्यांत आलें आहे. परतत्त्वाचें अंतिम व निरपेक्ष स्वरूप 'निकराचा आत्मभावो' (प्र. ७-१९२) या शब्दांत ज्ञानेश्वरांनीं वर्णिलें आहे. एक श्वास संपला आहे, दुसरा घेतलेला नाहीं किंवा सर्वें-द्रियांनीं सर्व विषय घेतल्यानंतरचा जो क्षण आहे, अशा संधिकाळांत जी निरपेक्ष निर्विशेष अशी अवस्था असते तिला 'निकराचा आत्मभाव', परतत्त्वाचें अंतिम स्वरूप म्हणतां येईल.

ज्ञानेश्वरांच्या स्फुटरचनेंत हरिपाठ (ओव्या २७), चांगदेवपासष्टि (ओव्या ६५), नमन (ओव्या १०८) व अभंग (संख्या ९७२) यांची गणना होते. वारकरीमंडळांत हरिपाठाला संध्येची योग्यता आहे. चांगदेव-पासष्टींत योगी चांगदेव यांना ज्ञानेश्वरांनीं जो उपदेश केला तो देण्यांत आला आहे. दोन्ही ग्रंथांत भक्ति आणि पूर्णाद्वैत यांवर सुबोध विवेचन आलें आहे. ज्ञानेश्वरांनी अभंग मधून मधून परंतु आयुष्याच्या शेवटीं मुख्यतः रचिले, असें समजलें जातें. याखेरीज योगवासिष्ठ, उत्तरगीता, प्राकृतगीता, पंचीकरण, गायत्रिटीका, शुकाष्टक, स्वात्मानुभव आणि समास

हेहि ग्रंथ ज्ञानेश्वरांच्या नांवावर खपतात. परंतु ते ज्ञानेश्वरांचे नाहीत असे अधिकारी पुरुषांचे म्हणणें आहे.[1]

ज्ञानदेव एक होते कीं दोन होते, असा वाद मधून मधून निघत असतो. डॉ. भांडारकर प्रभृति कांहीं पंडितांच्या मतें अभंग व हरिपाठ ज्ञानेश्वरीकर्त्या ज्ञानदेवाचे नसून त्यांचा कर्ता कोणी दुसरा ज्ञानदेव असावा. ज्ञानदेव दोन होऊन गेले, असा पूर्वपक्ष सुधारक पत्रांतून इ. सन १८९८ मध्यें भारद्वाज हें टोपण नांव धारण करून कै. भारदे यांनीं सविस्तर केला होता.[2] ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टि व हरिपाठ हे ग्रंथ एकाच ग्रंथकाराचे निःसंशय दिसतात. यांत आलेल्या विवेचनांत एकसूत्रीपणा आढळतो. स्फुट अभंगांचें तसें नाहीं. त्यांतील कांहीं ज्ञानेश्वरीकर्त्या ज्ञानदेवांचे आहेत व दुसरे कांहीं त्यांचे नसावेत असें वाटतें. दुसऱ्या ज्ञानेश्वराचे हे अभंग असावेत व मागाहून कोणीतरी ते सुप्रसिद्ध ज्ञानेश्वरांच्या अभंगांत घुसडून दिले असावेत.

ज्ञानेश्वर हे महान् आत्मानुभवी संत व प्रखर तत्त्वज्ञानी होते. योग-वासिष्ठ, उपनिषदें व शंकराचार्यांचे ग्रंथ यांचा त्यांनीं गाढ अभ्यास केला होता. ज्ञानेश्वरींतील तत्त्वज्ञानाची बरीच घडण 'भाष्यकाराते वाट पुसतु' (१८-१७२२) म्हणजे आद्य[3] शंकराचार्यांच्या ग्रंथाधारें करण्यांत आली आहे. असें असूनहि ज्या नाथपंथीय गुरुपरंपरेंत ज्ञानेश्वरांचे पणजे, आजे आणि गुरु व बंधू असे निवृत्तिनाथ वाढले त्या परंपरेचा त्यांच्या तत्त्व-ज्ञानावर विशेष परिणाम होणें साहजिकच आहे. ज्ञानेश्वरांचे पणजोबा त्र्यंबकपंत यांना गोरक्षनाथांकडून दीक्षा मिळाली होती व त्यांचे आजोबा गोविंदपंत व वडीलबंधु निवृत्तिनाथ यांना गैनीनाथाकडून दीक्षा प्राप्त

---

१ श्रीज्ञानदेव, ले. प्रो. शं. वा. दांडेकर, प्रकरण ४ थें

२ श्रीज्ञानदेव, ,, ,,

३ श्रीज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान, ले. डॉ. शं, दा. पेंडसे, १९४१, प्रकरण तिसरें

झाली होती. स्वतः ज्ञानेश्वरांना नाथपंथाची दीक्षा निवृत्तिनाथांनीं दिली होती. हा नाथ पंथ पूर्ण अद्वैती असून गैनीनाथांच्या शाखेंत कृष्णोपासना चालू असे. गुरुपरंपरेंत प्राप्त झालेली अद्वयानंदाची अनुभूति हेंच ज्ञानेश्वरांच्या अद्वैतमताचें मुख्य कारण होय. "एक आत्माच सर्व रूपांनीं नटलेला आहे, शिवापासून तृणापर्यंत अथवा ब्रह्मदेवापासून मुंगीपर्यंत एक आत्माच स्फुरत आहे, किंबहुना विश्व व त्यांत भरलेला आत्मा एवढें देखील द्वैत संभवत नाहीं, तर अवघा एक आत्माच आहे असें ज्ञानदेवांच्या पूर्णाद्वैताचें स्वरूप सांगतां येईल."[1] उदाहरणार्थ :—

तया आत्मयाच्या भाखा । न पडेचि दुसरी रेखा ।
जरी विश्वा अशेखा । भरलें आहे ॥ अमृ. प्र. ७।१४६

तेवीं शिवौनिं पृथ्वीवरी । भासती पदार्थांचिया परी ।
प्रकाशे तें एकसरी । संवित्ति हे ॥ चांगदेवपासष्टि, ओ. १२

जालेंनि जगें मी झांकें । तरी जगत्वें कोंण फांके ।
कि़ळेवरी माणिकें । लोपिजे काई ॥ ज्ञाने. अ. १४. १२४

अळंकारातें आलें । तरी सोनेपण काइ गेलें ।
कीं कमळ फांकलें । कमळत्वा मुकें ॥ ज्ञाने. अ. १४-१२५

म्हणोनि जग परौतें । सारूनि पाहिजे मातें ।
तैसा नोहें उखितें । आघवें मीचि ॥ ज्ञाने. अ. १४-१२७

ब्रह्म खरें आहे व जग हें मिथ्या आहे, हा जो शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानाचा मुख्य सिद्धांत आहे, तो ज्ञानेश्वरांना मनांतून मान्य नाहीं. ब्रह्म आणि जग असा वेगळेपणा ते मानीतच नाहींत. सर्वत्र एक आत्माच आहे असें ते मानतात. "जगताचा निरास करावयाचा व ब्रह्म पाहावयाचें म्हणजे ज्ञानदेवांचाच दृष्टांत द्यावयाचा तर चंद्राच्या कला सोलून काढून

१ श्रीज्ञानदेव, ले. शं. वा. दांडेकर, १९३२, प्र. सहावें.

चंद्रबिंब पाहण्यासारखें आहे, अथवा ज्ञानेश्वरभक्त कै. गु. विष्णुबोवा जोग यांचा दृष्टांत द्यावयाचा तर पेढा सोलण्यासारखें आहे." [१]

" आणखी एका मुद्याचा विचार करणें अवश्य आहे. ज्ञानदेव हे जगतास भ्रम म्हणावयास तयार नाहींत याचा अर्थ ते जगत् सत्य मानतात, असा कदाचित् समजला जाण्याचा संभव आहे. परन्तु तशी वस्तुस्थिति नाहीं. जडवादी चार्वाक ज्याप्रमाणें जगतास सत्य मानतो, त्याप्रमाणें ज्ञानदेव कांहीं मानीत नाहींत. तथापि ते जगतास मायाकार्य म्हणावयास तयार नाहींत. सर्व विश्व हा आत्माच आहे असा त्यांचा सिद्धांत आहे. विश्व एक वेगळें झालें असें जर ते मानीत असते तर विश्व उर्फ जगत् सत्य अथवा मिथ्या हा प्रश्न उद्भवला असता. परन्तु विश्व आत्म्याहून कांहीं वेगळें झालें असे ज्ञानदेव मानीतच नाहींत. या विषयीं त्यांचें मत गौडपादाचार्यांच्या ' न निरोधो नचोत्पत्तिः (मांडूक्यकारिका प्र. २ । ३२) या मताशीं अतिशय जुळतें आहे. " [२]

ज्ञानेश्वरींतील अध्यात्माविषयीं डॉ. शं. दा. पेंडसे ह्यांनीं "ज्ञानेशांनीं परमात्मतत्त्व हें सर्व शून्याचा निष्कर्ष आहे असें वर्णन केलें आहे[३] " असें जें म्हटलें आहे तें योग्य व साधार आहे. शंकराचार्यांनीं असें वर्णन केलेलें नाहीं. ज्ञानेश्वरांनीं स्वतंत्र रीतीनें हें वर्णन केलें आहे. ज्ञानेश्वरांचें हें एक चांगलें वैशिष्ट्य त्यांनीं दाखविलें आहे. प्रो. शं. वा. दांडेकर यांचीं ज्ञानेश्वरांच्या तत्वज्ञानाविषयींचीं मतें डॉ. पेंडसे यांनीं आपल्या ग्रंथांत खोडून काढलीं आहेत.[४] परंतु यांत त्यांना फारसें यश आलें आहे असें आम्हांला वाटत नाहीं. शांकर आणि ज्ञानेशांचें अद्वैत वरवर दिसायला एक असलें तरी त्यांत ज्ञानोबांची मेख म्हणून वेगळी आहेच. विविध योग्यतेच्या

---

१ श्री ज्ञानदेव ले. प्रो. शं. वा. दांडेकर, प्र. सहावें.
२ ,, ,, ,,
३ श्री. ज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान, १९४१, प्र. चौथें
४ ,, ,, ,,
५

श्रोत्यांना आपला अद्वैतवाद पूर्णपणें समजावा म्हणून माया, अज्ञान इत्यादि शब्दांचा उपयोग शंकराचार्योंप्रमाणेंच ज्ञानेश्वरांनी केला आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु त्यांचें निश्चित् मत म्हणजे सर्वत्र एक आत्माच होय हें होय. सोन्यांत सोनेपण असतें, तसेंच तें सोन्याच्या अलंकारांतहि असतें. येथें अद्वैत आलें. परंतु ज्यांना सोनें दिसत नाहीं आणि फक्त अलंकार किंवा आकार दिसतो त्यांना तो अज्ञानामुळें किंवा मायेमुळें दिसतो असें म्हणणें भागच आहे. या दोन्हीं विधानांत कांहींच विरोध नाहीं. ईश्वरच जगदाकार घेत असल्यानें ईश्वर आणि जगत् यांत पूर्णाद्वैत आहे. परंतु ज्या जडवाद्यांना फक्त जगत् दिसतें, त्यांतील किंवा त्यामागील ईश्वर दिसत नाहीं, तो अज्ञानानें मायेमुळें होय हें म्हणणें क्रमप्राप्तच आहे. अभिनयसम्राट सुप्रसिद्ध बालगंधर्व यांचें उदाहरण आपण घेऊं. रुक्मिणी, द्रौपदी, मेनका, सिंधु, देवयानी, रेवती अशा विविध भूमिका ते घेत असत. या सर्व भूमिका ते घेत असल्यानें त्यांच्यांत आणि त्या त्या भूमिकांत पूर्णाद्वैत होतें. रुक्मिणी म्हटली तरी बालगंधर्वच आणि सिंधु म्हटली तरी ते बालगंधर्वच. किंबहुना बालगंधर्वांच्यामुळेंच रुक्मिणी, सिंधु या भूमिका आपणाला खऱ्याखुऱ्या वाटत. ज्यांना बालगंधर्व आणि या भूमिका यांच्यांत अभेदप्रतीति होत असे त्यांना पूर्णाद्वैताचें सुख सहजच अनुभवितां येत असे. परंतु ज्यांना रुक्मिणी आणि सिंधु याच खऱ्या वाटत (आणि त्यांच्या मागील बालगंधर्व दिसत नसे) त्यांना हें सुख मिळणें शक्य नाहीं. रुक्मिणी आणि सिंधु यांचें खरें रूप त्यांना दिसत नसें तें अज्ञानामुळें किंवा मायेमुळेंच होय. नुसतें जग खरें वाटतें तें मायेमुळें, येरवीं किंवा वस्तुतः जग आणि ईश्वर हीं भिन्न नाहींत असें जें ज्ञानेश्वर म्हणतात तें याचमुळें होय.

योगी, तत्त्वज्ञानी, पंडित या नात्यांनीं ज्ञानेश्वरांची योग्यता जशी उच्च कोटींतील होती, तशींच ती कवि या नात्यानेंहि होती. केवळ काव्य किंवा केवळ साहित्यनिर्मितीच्या दृष्टीनें जरी त्यांनीं आपल्या ग्रंथांची रचना

केली नसली, तरी त्यांच्या ग्रंथांना उत्तम काव्याचें स्वरूप सहजच प्राप्त झालें आहे. अन्तःकरणांतील प्रबल भावनांचा सहज उद्रेक म्हणजे काव्य होय, अशी काव्याची व्याख्या सुप्रसिद्ध इंग्रज कवि वर्डस्वर्थ यानें केली आहे. जीव, जगत् आणि ईश्वर यांच्या संबंधींच्या किंवा व्यक्ति, समाज आणि ईश्वर यांच्यासंबंधींच्या विशिष्ट भावनांनीं आणि विचारांनीं ज्ञानेश्वरांचें हृदय कांठोकांठ भरलें होतें. एका उच्च समानतेच्या आणि अद्वैताच्या पातळीवरून ते जगाकडे बघत होते. जगांत काय आहे किंवा जग कसें आहे ह्याचा स्वानुभव त्यांना चांगलाच होता. जग कसें असावें याचीं मनोहर चित्रें त्यांनीं आपल्या अन्तःकरणांत तयार केलीं होतीं. ज्ञानेश्वर ऐन तारुण्याच्या वसंतकाळांत होते. अद्वयानंदाचा अनुभव ते अहर्निश घेत होते. न्यायानें पृथ्वीचें पालन करणाऱ्या श्रीरामचंद्रराव यादवांच्या स्वराज्यांत ते राहात होते. वैयक्तिक किंवा कौटुंबिक दुःखाचीं 'कंटकशल्यें' त्यांची केव्हांच 'बोथटलीं' असल्यानें एक प्रकारच्या अपूर्व प्रसन्नतेनें ते आपल्या भोंवतालच्या समाजाकडे पाहात होते. वसंत-ग्रीष्मांच्या संधिकालांत भोंवताली उन्हाच्या ज्वाळा निघत असतांना कोकिळानें आम्रमंजरीकडे पाहात कुहूकुहू असा खोल नि शांत ध्वनि काढून सृष्टिजाताला निववावें त्याप्रमाणें ज्ञानेश्वरांनीं तापत्रयांनीं तापलेल्या मानवजातीला आपल्या ग्रंथांतील शांतरसांनीं भरलेल्या ओव्या ऐकवून अक्षरशः निवविलें आहे. विविध जातीच्या आणि विविध धंदे करणाऱ्या श्रोत्यांना गीतेंतील अद्वैत आणि समत्व, कर्मयोग आणि भक्तियोग, हीं कळलीं पाहिजेत, सहज कळलीं पाहिजेत, म्हणून दृष्टांतामागून दृष्टांत देऊन आणि उपमा उत्प्रेक्षांचा पाऊस पाडून ज्ञानेश्वरांनीं ग्रंथरचना केली आहे. एक प्रकारच्या प्रसन्नतेंत, आधुनिक शब्द वापरायचा तर एक प्रकारच्या दिव्य मस्तींत त्यांनीं हें कार्य केलें आहे. उपमा कालिदासस्य असें आपण परंपरेनें म्हणत आलों असलों तरी उपमा ज्ञानदेवस्य असेंच यापुढें आपण म्हणावें इतक्या सरस उपमा ज्ञानेश्वरांनीं दिल्या आहेत. प्रसाद, माधुर्य, ध्वनि आणि रस या ज्या काव्याला अत्यंत आव-

ह्यक अशा गोष्टी आहेत त्यांचा नुसता सुकाळ ज्ञानेश्वरांच्या ग्रंथांत आणि विशेषतः ज्ञानेश्वरींत झाला आहे. कवित्व, रसिकत्व आणि परतत्त्वस्पर्श असा त्रिवेणीसंगम ज्ञानेश्वरींत पाहावयास सांपडतो. ज्ञानेश्वरांच्या आधीं होऊन गेलेल्या मुकुंदराजासारख्या कवींत किंवा त्यांच्या समकालीन अशा महानुभाव कवींत किंवा त्यांच्या उत्तरकालीन आजपर्यंतच्या मराठी कवींत, त्यांच्या तोडीचा कवि झालाच नाहीं असें निःसंदिग्धपणें म्हणावेसें वाटतें. मुकुंदराजांत परतत्त्वस्पर्श आहे पण रसिकत्व नाहीं. महानुभाव कवींत कवित्व व रसिकत्व भरपूर असलें तरी वैचारिक उदात्तता नाहीं. आधुनिक कांहीं श्रेष्ठ कवींत कवित्व, रसिकत्व व विचारांची बैठकहि असली, तरी ज्ञानेश्वरांच्या तुलनेनें ते फिके वाटतात. ज्ञानेश्वरांची वाणी दिव्य आणि दिलखुलास वाटते. प्रस्तुत ग्रंथांत स्थलाभावामुळें आम्हांला उतारे देऊन आमचें म्हणणें सिद्ध करतां येत नाहीं. तरी पण ज्ञानेश्वरीच्या शेवटीं आलेल्या प्रसाददानांत केवढें औदार्य आणि उदात्तता भरली आहे ती बघा :—

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्‌यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥
जे खळांची व्यंकटि सांडो । तया सत्कर्मीं रती वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचे ॥
दुरितांचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥
वर्षत सकळ मंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूतळीं । भेटो तयां भूतां ॥
चलां कल्पतरूंचे अरव । चेतनाचिंतामणीचे गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥

मो. नं. 9822 371 अ५ 13

किंबहुना सर्व सुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदि पुरुखीं । अखंडित ॥

साहित्याच्या दृष्टीनें वाचकांचें लक्ष वेधून घेणारी आणखी एक गोष्ट म्हणजे ज्ञानेश्वरांचें कथनकौशल्य. सद्गुरु निवृत्तिनाथ आपल्यासमोर बसले असून, अठरा पगड जातीचे रसिक श्रोते दोन बाजूला बसले आहेत, अशा कल्पनेनें ज्ञानेश्वरी ग्रंथ ज्ञानेश्वरांनीं रचिला आहे. भारतीय युद्धप्रसंगीं अर्जुनाला पडलेला व्यामोह श्रीकृष्णानें तत्त्वज्ञान सांगून दूर केला, हा कथा-प्रसंग संजयानें धृतराष्ट्राला सांगितला. या कारणानें तत्त्वज्ञानासारखा रुक्ष विषय सुबोधपणानें सांगत असतांना ज्ञानेश्वरांना त्यांत गोष्टीची गोडी निर्माण करतां आली आहे. निवृत्तिनाथ-ज्ञानेश्वर, ज्ञानेश्वर-श्रोते, कृष्ण-अर्जुन, संजय-धृतराष्ट्र अशा जोड्या ज्ञानेश्वरींत योजून त्यांच्या भावभावना संवादाच्या रूपानें अत्यंत मनोरम पद्धतीनें वर्णिल्या आहेत. या सर्व ठिकाणीं रसोत्कटता आहे. प्रेम, आदर, सख्य या भावना अगदीं दुथडी वाहत आहेत. आपल्याकडे सर्व प्रकारें कमीपणा घेऊन गुरु आणि श्रोते यांचा अपूर्व गौरव ज्ञानेश्वरांनीं केला आहे. वक्ता हा वक्ताचि नोहे श्रोतेनविण, असें म्हणून श्रोत्यांचीं अन्तःकरणें ज्ञानेश्वरांनीं अगदीं काबीज केलीं आहेत. धृतराष्ट्राचा कौरवांविषयींचा पक्षपात आणि त्याचें अज्ञान यामुळें कृष्णार्जुनसंवादाची गोडी त्याला चाखतां येईना म्हणून त्याची जी थट्टा संजयानें केली आहे ती सर्वथैव स्वतंत्र व बहारीची आहे. येथें विनोदहि चांगला आहे. याहि-पेक्षां अकराव्या अध्यायांत विश्वरूपदर्शनाची इच्छा करून अर्जुनानें स्वतःची जी घाबरगुंडी करून घेतली आणि श्रीकृष्णाला सौम्य स्वरूपांत दर्शन देण्याची जी विनंति केली तो प्रसंग तर उपरोधपूर्ण विनोद आणि प्रेम यानें ओतप्रोत भरला आहे. या व अशासारख्या दुसऱ्या युक्त्यांमुळें ज्ञानेश्वरी हा ग्रंथ अत्यंत सजीव वाटतो. निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, श्रीकृष्ण, अर्जुन, संजय, धृतराष्ट्र आणि ज्ञानेश्वरांचे तुम्ही आम्ही श्रोते किंवा वाचक

या सर्व सजीव व्यक्ति वाटतात व त्या सर्वांचा मधुर मेळावा किंवा हृद्य हृदयसंवाद म्हणजेच ज्ञानेश्वरी होय असें म्हणावेसें वाटतें.

ज्ञानेश्वरीचें सौंदर्य तींत जागोजागीं आलेल्या रूपकांनीं वाढलें आहे. या बाबतींत संतप्रेमी ह. भ. प. पांगारकर म्हणतात[1]–"ज्ञानेश्वरींत रूपकें फार बहारीचीं आहेत. मूळ गीतेनेंच क्षेत्रक्षेत्रज्ञाचें व अश्वत्थाचें अशीं दोन सुन्दर रूपकें दिलीं आहेत, तथापि त्या रूपकाचेंहि विस्तृत, मनोवेधक व विशद स्पष्टीकरण ज्ञानेश्वरांसारखें कोणीहि केलेलें नाहीं. या शिवाय त्यांची स्वतंत्र लहानमोठीं अशीं कितीतरी रूपकें ज्ञानेश्वरीभर विखुरलीं आहेत. यांपैकीं चार ठळक स्थळें येथें दाखवितों. पहिल्या व सतराव्या अध्यायांच्या मंगलाचरणांचीं गणेशाचीं रूपकें, तिसऱ्या अध्यायांतील काम एष कोध एष या श्लोकावरील रूपक, सातव्या अध्यायांतील मायानदीचें व तेराव्यांतील प्रकृति पुरुषांचें रुपक, पंधराव्याच्या प्रारंभीच्या गुरुपूजेच्या ओव्या, अठराव्यांतील गुरुरूप चित्सूर्याचें रूपक अशी कांहीं रूपकें मूळांतूनच पाहिलीं पाहिजेत. हीं सर्व रूपकें इतकीं सर्वांगपरिपूर्ण आहेत कीं तीं पाहतांना ज्ञानेश्वरांच्या स्फूर्तीची, कल्पनाचातुर्याची व भाषाप्रभुत्वाची धन्यता वाटते. "याच अर्थानें तात्यासाहेब केळकरांनीं आपल्या 'ज्ञानेश्वरी सर्वस्व' या ग्रंथांत " उपमा व दृष्टांत यांत श्री ज्ञानेश्वरांचा हात धरणारा कवि मराठींत झालाच नाहीं " असें म्हटलें आहे.

ज्ञानेश्वरी ज्या काळांत लिहिली गेली त्या काळाच्या दृष्टीनें पाहतां तिची मराठी भाषेंतील रचना हीहि एक अत्यंत महत्वाची गोष्ट होय. मुकुंदराज आणि महानुभावीय कवि यांनीं अनुक्रमें बाराव्या तेराव्या शतकांत मराठी भाषेंत कांहीं ग्रंथ लिहिले असले तरी सर्वसामान्यपणें महाराष्ट्रीय पंडित मराठीकडे नाक मुरडूनच पाहात असत. मराठीला भाषा न समजतां बोली समजण्याचा प्रघात या पंडितांचा होता. भाषा हें

---

१ मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला, १९३२, पृ. ६६२

नामाभिधान व ऐश्वर्य फक्त संस्कृतलाच त्या काळांत असे. त्यामुळें महाराष्ट्रीय पंडित काव्य, अध्यात्म, ज्योतिष, संगीत, धर्म इत्यादि विषयांवर संस्कृतमध्यें रचना करीत. भवभूति, राजशेखर, शार्ङ्गदेव, बोपदेव, हेमाद्रि आणि भास्कराचार्य हे सर्व महाराष्ट्रीयच कवि व पंडित होते. हेमाद्रि व बोपदेव हे तर ज्ञानेश्वरांचे समकालीन पंडित असून दोघांनींहि संस्कृतमध्यें ग्रंथरचना केली आहे. हेमाद्रीला ज्या ग्रंथानें अखिल भारतीय कीर्ति मिळवून दिली तो 'चतुर्वर्गचिंतामणि' हा ग्रंथ संस्कृतांत आहे. बोपदेवांचा मुक्ताफल हा ग्रंथहि संस्कृतांत आहे. पंडितांनीं व कवींनीं ग्रंथरचना करावयाची म्हणजे संस्कृत भाषेंतच अशी त्या काळीं समजूत होती. याला इग्लंड देशाचाहि दृष्टांत देतां येईल. सोळाव्या शतकापर्यंत तेथील विद्वान इंग्रजी भाषेंत ग्रंथरचना करणें कमीपणाचें समजत असत. याच कारणानें युरोपीय कीर्ति मिळालेले युटोपिया (इ. स. १५१६) व इन्स्टॉरेशियो मॅग्ना (इ. स. १६२०) हे ग्रंथ अनुक्रमें सर टॉमस मूर व बेकन ह्या दोन आंग्ल पंडितांनीं लॅटिन भाषेंत रचिले. या दृष्टीनें पाहतां ज्ञानेश्वरांसारख्या प्रज्ञा व प्रतिभा यांचा वरदहस्त असलेल्या पंडितानें आपली गीताटीका मराठींत करावी ही अपूर्व गोष्ट आहे. असें करण्यांत दोन प्रमुख कारणें होतीं. व्रतवैकल्यें आणि अनेक देवतापूजनाच्या मागें लागलेला बहुजनसमाज हा संस्कृत भाषा जाणत नव्हता. इतकेंच नव्हे तर या समाजाला आपल्याकडे ओढून घेण्याची कामगिरी महानुभावीय ग्रंथकारांनीं मराठींत ग्रंथरचना करून आरंभिली होती. अशावेळीं खऱ्या वैदिक धर्माचें आणि तत्त्वज्ञानाचें ज्ञान बहुजनसमाजाला समजेल अशा मराठी भाषेंत देण्याची अत्यंत आवश्यकता होती. पांडित्यानें मनुष्य किती अनुदार बनतो याचें उदाहरण ज्ञानेश्वरांनीं आपेगांव, आळंदी, पैठण या गांवांतील भूदेवानीं त्यांच्यावर जो बहिष्कार पुकारला होता त्यावरून जाणलें होतें. बहुजनसमाजाला काय ? तो या शुष्क पंडितांचेंच अनुकरण करणार. कारण त्याला संस्कृताचें कांहीं ज्ञान नव्हतें. ही स्थिति पालटण्याच्या हेतूनें

ज्ञानेश्वरांनीं आपले ग्रंथ मराठींत लिहिले. दुसरे कारण म्हणजे मराठी भाषेवरील त्यांचें अपरंपार असें प्रेम. या प्रेमाचें प्रत्यंतर ज्ञानेश्वरींत एक दोन नाहीं तर तेरा ठिकाणीं त्यांनीं दाखविलें आहे. मराठी भाषेची थोरवी वर्णन करून त्यांनीं तिचें समर्थन अगदीं प्रासादिक वाणीनें केलें आहे. हें समर्थन मूळांतूनच बघितलें पाहिजे. प्रस्तुत ग्रंथाच्या स्वरूपाकडे पाहून आम्ही वानगीदाखल त्यांपैकीं लहानसा उतारा देतों.

माझा मऱ्हाटाचि बोल कौतुकें । परि अमृतातेंहि पैजा जिंके ।
ऐसी अक्षरें रसिकें मेळवीन ।
जिये कोंवळिकेचेनि पाडें । दिसती नादींचे रंग थोडे ।
वेधें परिमळाचें बीक मोडे । जयाचेनि ॥ अ. ६ ओ. १४-१५

तीरें संस्कृताचीं गहनें । तोडोनि मऱ्हाठिया शब्द-सोपानें ।
रचिलीं धर्मविधानें । श्रीनिवृत्तिदेवें ॥
म्हणोनि भलतेणें एथ सद्भावें नहावें । प्रयाग माधव विश्वरूप पाहावें ।
येतुलेनी संसारासी द्यावें । तिळोदक ॥ अ. ११ ओ. ९-१०.

ज्ञानेश्वरांच्या ग्रंथरचनेला आज आतां साडेसाहाशे वर्षें होऊन गेलीं असल्यानें, त्यांच्या ग्रंथांत योजिलेली मराठी भाषा आपणाला आजच्या मराठीसारखी वाटणें अशक्य आहे. तरीदेखील ज्ञानेश्वरांनीं आपला ग्रंथ संस्कृतच्या तोडीचा करण्याच्या हेतूनें तत्सम किंवा संस्कृत शब्दांचा चांगलाच भरणा ज्ञानेश्वरींत केला आहे. ज्ञानेश्वरीच्या भाषेची आजच्या दृष्टीनें कांहीं वैशिष्ट्यें सांगण्यासारखीं आहेत. हल्लींच्या मराठींत प्रथमाविभक्तीचे प्रत्यय नाहींत. ज्ञानेश्वरांनीं प्रथमेचा 'उ' प्रत्यय सर्वत्र व क्वचित् 'ओ' प्रत्यय वापरला आहे. (तेया विषयो ना स्वर्गु मिळे १६·४५२). पंचमीचा औनि प्रत्यय हे ज्ञानेश्वरीचें खास वैशिष्ट्य आहे (तैसे मनौनि धन वेन्ही १६·८७). हल्लीं आपले पंचमीचे प्रत्यय ऊन, हून हे आहेत. द्वितीया विभक्तीचे सांप्रतचे लोकप्रिय प्रत्यय ला आणि ना हे आहेत. ज्ञानेश्वरींत हे प्रत्यय ते, एया, आ,

सि असे आहेत. याशिवाय क्ष व ष्ट या बद्दल ख, (तोख, दोख, विख, खीर), ख, घ, थ, ध व भ यांच्या जागी ह (मेहुण, बहिरा, बहीण, कहाणी) असेहि वर्ण आले आहेत. यामुळें ज्ञानेश्वरी वाचायला प्रथम कठिणच वाटते. परंतु दुसरें तिसरें वाचन होतांच भाषेची लकब लक्षांत येऊन ज्ञानेश्वरीचें गंगे-प्रमाणें निर्मल असलेलें अन्तःकरण तेव्हांच दिसूं लागतें.

आपल्या ग्रंथांत प्रतीत होणारे ज्ञानेश्वर विद्याविनयसंपन्न, प्रज्ञाप्रतिभा-मंडित, जीवन्मुक्तावस्था आणि अद्वयानंद यांचा अनुभव घेत असलेले योगी, आणि जगाकडे अत्यंत सहानुभूतीनें व प्रसन्नतेनें बघणारे तरुण वाट-तात. नामदेवांच्या आणि आपल्या भावंडांच्या बरोबर तीर्थयात्रा करून झाल्यावर त्यांनीं आळंदी येथें वयाच्या अवघ्या एकवीसाव्या वर्षीं शके १२१८ मध्यें समाधि घेतली. त्यानंतर एका वर्षाच्या आंत अनुक्रमें सोपान-देव, मुक्ताबाई व निवृत्तिनाथ या तिघाहि भावंडांना निरनिराळ्या ठिकाणीं हिंडत असतां मृत्यु आला. साडेसहाशे वर्षें होऊन गेलीं असूनहि ह्या अलौकिक चार भावंडांचा कीर्तिपरिमल आजहि उभ्या महाराष्ट्रांत दरवळत आहे.

ज्ञानेश्वरांची मूल परंपरा पुढीलप्रमाणें आढळतेः-आदिनाथ–मच्छेंद्रनाथ –गोरखनाथ–गैनीनाथ–निवृत्तिनाथ–ज्ञाननाथ ऊर्फ ज्ञानेश्वर. ह्या नाथपरं-परेंतील पुरुषांनीं अध्यात्मविद्येचा प्रसार तेराव्या शतकापासून ते एकोणी-साव्या शतकापर्यंत अव्याहत चालू ठेवला. ज्ञानेश्वरांचे शिष्य विसोबा खेचर, विसोबांचे शिष्य नामदेव व नामदेवांचे शिष्य चोखामेळा अशी एक परंपरा आहे. निवृत्तिनाथांची बहीण मुक्ताबाई व मुक्ताबाईचे शिष्य चांगदेव अशी दुसरी एक परंपरा आहे. मुक्ताबाईचे अभंग, पदें, कल्याणपत्रिका व हरिपाठ अशी रचना प्रसिद्ध आहे. त्यांतहि "मजवरी दया करा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा" या ओळीनें सुरु होणारे ताटीचे अभंग फारच प्रेमळ व प्रासादिक आहेत. चांगदेव यांचा 'तत्वसार' नांवाचा वेदांतविषयक ग्रंथ चांगला आहे. याहिपेक्षां दीर्घकाळ चाललेली तिसरी एक परंपरा आहे. ज्ञाननाथ–

सत्यामलनाथ–गैबीनाथ–गुप्तनाथ--उन्दोधनाथ–केसरीनाथ–(एक शाखा मल्हारीनाथ राशीन येथील व दुसरी पैठण येथील) शिवदिननाथ ऊर्फ शिवदिन केसरी--नरहरिनाथ--महिपति अशी ती परंपरा होय. सत्यामलनाथांनीं सिद्धांतरहस्य ऊर्फ ललितप्रबंध नांवाचा स्वतंत्र वेदांतविषयक ग्रंथ रचिला असून, त्यांत बारा हजारांवर अभंग असून एकंदर दहा प्रकरणें आहेत. सत्यामलनाथांना ज्ञानेश्वरांचा अनुग्रह स्वप्नांत झाला होता. सत्यामलनाथांचा शिष्य गैबीनाथ (शके १५२०–१५८०) यांनीं पंचीकृतविवेक नांवाचा ग्रंथ, कांहीं अभंग व पदें लिहिलीं आहेत. गैबीनाथांची शिष्या गुप्तनाथ. हिचें मूळचें नांव गंगाबाई. गुप्तनाथांचा शिष्य उद्बोधनाथ. यांनीं कांहीं योगमार्गाचीं पदें लिहिलीं आहेत. यांनीं शके १६०९ वैशाख वद्य ९ मीस राशीन येथें समाधि घेतली. उद्बोधनाथांचे शिष्य केसरीनाथ (समाधि शके १६४६ मार्गशीर्ष शु. २ आळंदी येथें) यांनीं सिद्धांतसार (शके १६३८) नांवाचा अध्यात्मपर ग्रंथ लिहिला. केसरीनाथांचे दोन शिष्य होते. एक उद्बोधनाथांचे चिरंजीव मल्हारीनाथ व दुसरे शिवदिननाथ ऊर्फ शिवदिन केसरी (जन्म शके १६२० व समाधि शके १६९६ माघ वद्य १३). यांनीं विवेकदर्पण (१६९२) ज्ञानप्रदीप, भक्तिरहस्य इत्यादि ग्रंथ व कांहीं श्लोक व अष्टकें लिहिलीं आहेत. पैठण येथें गंगेच्या कांठावर शिवदिननाथांचा भव्य मठ अजूनहि आहे. शिवदिननाथांनीं मराठेशाहीचे बरे दिवस जसे बघितले, तसेच्च पानपत येथें बसलेला जबर धक्काहि पाहिला होता. एका पदांत याविषयीं ते म्हणतात :—सोळा शतें चौऱ्याशित झाली धुलधानी । द्वैतराज्य दुष्टबुद्धी नासिले प्रधानीं ॥धृ०॥ ब्यांशीत्र्यांशी गेले भाऊ नाना दोनी । तैसी कोणि कोणाची मानीना निदानी । सारा दाणा जप्ती पट्टी द्रव्य गृहखाणी । पंचाशित लुटालुट मांडिली तापत्रय दुःखांनीं देशग्रामवस्ती ओस पाडिल्या पेंढाऱ्यांनीं ।...तीर्थें क्षेत्रें गाईब्राह्मण फार कष्टलीं क्लेशांनीं । भक्त विरक्त साधु संत त्राही ब्रोलति वाणी । शिवदिनकेसरी भगवंता तूं यासी

पाव निर्वाणी ॥ सोळा० ॥ शिवदिननाथांचा शिष्य त्यांचा पुत्र नरहरिनाथ. यांचीं कांहीं पदें आहेत. त्यांचे दोन शिष्य. एक त्यांचा विलासी पुत्र लक्ष्मण व दुसरा महिपति. याची प्रसिद्धि उत्तर हिंदुस्थानांत फार आहे. ग्वाल्हेर येथें याचा मठ व शिष्यपरंपरा आहे. यानें कडाका छंदांत पुष्कळ पद्यरचना केली आहे. यांनीं शके १७४४ पौष शु. १३ स समाधि घेतली. योगमार्गांत असणाऱ्यांना येणाऱ्या रंग, ध्वनि इत्यादि अनुभवांचीं वर्णनें यांच्या पदांत आहेत. 'शिमगा' नांवाच्या पदांतील कांहीं भाग पुढीलप्रमाणें आहेः—सावध व्हा गडे हो नीट उमगा। शिमगा निघून जाईल कीं।...त्रिगुण मोळी बांधुन होळी ऐठ पिठावर न्यावी कीं। सत्रावीचा लोट घोटुन लक्ष सुनीळा लावी कीं। फटफटित चांदणें ज्योतिज्वाळा त्यांत भासा येईल कीं। नवरंगाचा येकच गोळा बहुबायाळा भासेल कीं। चंद्र-सूर्य देखणें गेलें. पाहतां पाहणें नासेल कीं। लपेल दुवळें दिसेल पिवळें यांत कांहीं बाही असेल कीं'। त्यांत मिळावें तन्मय व्हावें साधनिं मन हें भावेल कीं। गुरुची सेवा घडेल जेव्हां समाधि लागुन जाईल कीं ॥

योगविद्या, वैराग्य व अद्वयानंद हीं नाथपरंपरेचीं प्रधानलक्षणें असून, या परंपरेचा शिवसंप्रदाय होता हें निर्विवाद आहे. बाराव्या शतकांत या पंथानें महाराष्ट्रांत धर्मजागृति केली. ज्ञानेश्वरांनीं नाथपरंपरेनें आलेला योग व अद्वैतसिद्धांत हे दोन्ही घेतले आणि त्यांत भक्ति-प्रेमानंदाची भर घालून अद्वैतभक्तिचा म्हणजे भागवत धर्माचा पंथ महाराष्ट्रांत निर्माण केला. या पंथाची एक शाखा वारकरी संप्रदायांत परिणतावस्था पावली व तिच्यांत नामदेव, एकनाथ, तुकारामांसारखे भगवद्भक्त झळकले. दुसरी शाखा सत्यामलनाथ-केसरीनाथ-शिवदिनकेसरी सारख्या योग्यांकडून परिपुष्ट झाली.

५

नामदेव

कर्मठपणाच्या नादीं लागून रुक्ष, जड, हृदयशून्य, वादरत बनलेल्या यादवकालीन महाराष्ट्रीय समाजाला खऱ्या ज्ञानाची, कर्तव्यबुद्धिची जाणीव, ज्याप्रमाणें ज्ञानेश्वरांनीं करून दिली, त्याचप्रमाणें त्यांच्या समकालीन परंतु त्यांच्यामागें पुष्कळ वर्षें जगलेल्या नामदेवांनीं[1] ईश्वरप्राप्तीचा भक्तियुक्त नामस्मरणरूपी सुलभ मार्ग सर्वांना दाखवून दिला. नामदेवांच्या काळांत यादवांचें स्वराज्य नाहींसें होऊन, त्याची जागा यावनी राज्यानें घेतली होती. मुसलमानांच्या टोळधाडी महाराष्ट्रभर पडून, लोकांना नको-नकोसें झालें होतें. सुखांत नांदत असलेला महाराष्ट्र दुःखाच्या वणव्यांत सांपडल्यासारखा झाला होता. बेचैन, अस्वस्थ, उद्विग्न, संत्रस्थ, वैतागलेल्या अशा बहुजनसमाजाला समाधानाचा आणि शांतीचा मार्ग दाखवून कार्योन्मुख करण्याच्या दृष्टीनें नामदेवांनीं नामभक्तीचा सोपा मार्ग दाखवून पंढरपुरांत एकत्र केलें. शैववैष्णवांचे झगडे महाराष्ट्राच्या दक्षिणेकडे जोरांत चालू होते व त्यांचा थोडाबहुत परिणाम महाराष्ट्रा-वरहि झाला होता. परचक्रांत आणि परदास्यांत सांपडलेल्या समाजाचें धर्माच्या

---

१ जन्मकाल शके ११८५ प्रभवसंवत्सर कार्तिक शुद्ध एकादशी रवीवार. समाधिकाल शके १२७२ आषाढ वद्य त्रयोदशी. परभणी जिल्ह्यांतील नरसीबामणी येथें राहात असत. पंढरपुरास वारीच्या निमित्तानें जात. समाधि नरसी येथेंच आहे. अस्थीं पंढरपुरांत महाद्वाराजवळ. वडिल दामाशेट. आई गोणाई. ज्ञानेश्वरांबरोबर व पुढेंहि अनेक यात्रा. पंजाबांतहि नामभक्तीचा प्रसार त्यांनीं केला. गुरुदासपूर जिल्ह्यां-तील घोमान गांवीं नामदेवांचें स्मारक आहे. सुमारे चाळीस हजार 'नामावंसी' नामदेवसंप्रदायी तिकडे आहेत. पाहा 'पंजाबांतील नामदेव' ले. शंकर पुरुषोत्तम जोशी.

नांवावर अधिक तुकडे होऊं नयेत म्हणून हरिहरांची उपासना म्हणजेच पांडुरंगाची उपासना होय हें तत्त्व ज्या संतांनीं महाराष्ट्रांत रुजविलें त्यांत नामदेव हें अग्रेसर होते.

प्रेममय भक्तिचा, एक प्रकारच्या राजस अद्भुत ढंगदार भक्तिचा, जिला इंग्रजींत 'रोमँटिक डिव्होशन' म्हणतां येईल तिचा प्रवेश मराठी साहित्यांत (किंवा अधिक खऱ्या अर्थानें मराठी भक्ति साहित्यांत) जर कोणी मोठ्या प्रमाणावर प्रथम केला असेल तर तो नामदेवांनीं. बालकवि ठोमरे हे ज्याप्रमाणें बालपणापासून निसर्गाचे भक्त व कवि होते, त्याप्रमाणें नामदेव हे लहानपणापासून ईश्वराचे भक्त व कवि होते. वयाच्या पांचव्या वर्षापासून त्यांनीं देवाला प्रसन्न करून घेतलें होतें. नरसीब्रामणी येथील केशवराजाच्या मूर्तीला त्यांनीं पांचव्या वर्षीं प्रेमाचा हट्ट धरून दूध प्यायला लाविलें होतें. नरसीब्रामणीचा केशवराज व पंढरपूरचा विठोबा यांच्याशीं त्यांचें बोलणें चालणें, त्यांच्या गुजगोष्टी, ते वयांत येतांच सुरू झाल्या होत्या. नामदेवांनीं रुसावें आणि पांडुरंगानें त्यांची समजूत घालावी, नामदेवांनीं उद्विग्न व्हावें आणि पांडुरंगानें त्यांना विसोबा खेचरांचा[1] गुरूपदेश ध्यायला सांगावें, ज्ञानदेवांबरोबर यात्रेला नामदेव निघाले असतांना विठोबानें त्यांचा निरोप घ्यावा, यात्रेहून परत आल्यावर रुक्मिणीपांडुरंगांनीं नामदेवांच्या वतीनें ब्राह्मणभोजन घालून यात्रेची सांगता करावी, नामदेवांच्या विनंतीवरून पांडुरंगांनें बेदर येथील मेलेली गाय व मेलेलीं माणसें जीवंत करावींत, आई आणि बायको रागावली असतांना पांडुरंगानें नामदेवांची विनवणी करून त्यांना घरीं लावावेत-अशा एक कीं दोन अनेक प्रकारें त्यांचें व देवाचें हितगुज चाले. दोन मित्रांत, मायलेकरांत, मित्रमैत्रिणींत ज्या प्रकारचे रुसवेफुगवे प्रेमालाप, विनवण्यासुनावण्या अडवणूक

---

१ पैठणाजवळील भुंगी येथील राहणारे. पेशा व्यापाऱ्याचा. यांचें हरिश्चंद्राख्यान, कांहीं अभंग व पदें उपलब्ध आहेत. शके १२३१ श्रावण शु. ११ स काशीं येथें हे समाधिस्थ झाले.

सोडवणूक हीं चालतात, त्याप्रकारचे रुसवेफुगवे वगैरे नामदेव व ईश्वर यांत चालत.

नामदेवांच्या अभंगात असलीं स्थळें पुष्कळ आहेत. अभंगांतील पुढील भाग या दृष्टीनें चिंत्य आहे. (१) पतितपावन नाम ऐकुनी आलों मी द्वारा । पतितपावन न होसि म्हणुनी जातों माघारा ॥ धृ ॥ सोडीं देवा व्रीद आतां न होसि अभिमानी । पतितपावन नाम तुजला ठेवियलें कोणी ? ॥ १ ॥ घेसी तेव्हां देसी ऐसा अससी उदार । काय देवा रोधूं तुमचें कृपणाचें द्वार (२) मुक्ताफळ नथ नाकीं । चरणें ल्याली वाळे वांकी । पीतांबरें अंग झांकी । कृष्णम्मा माझी ॥ (३) विठ्ठल माऊली कृपेची कोंवळी । आठविंतां घाली प्रेमपान्हा ॥ तूं माझी माऊली मी वो तुझा वत्स । परतों परतों वाट पाहें तुझी । (४) डोळुले शिणले पाहतां वाटुली । अवस्था दाटली हृदयामाझी । तूं माझी जननी सरसीये सांगातिणी, विठ्ठले धांवोनी देईं क्षेम ॥ तूं माझी पक्षिणी मी तुझें अंडज । क्षुधें पीडलों मज विसरलीसी ॥ तूं माझी कुरंगी मी तुझें पाडस । गुंता भवपाश तोडीं माझा ॥ (५) जननिये जिवलगे ये वो पांडुरंगे । शिणलों भेटी दे गे एक वेळां ॥ नामा म्हणे आई धांवे लवलाहीं । बुडतों चिंताडोहीं काढी मज ॥ (६) आम्ही शरणागतीं केलासि सरता । येरव्हीं अनंता कोण जाणे ॥ वेदशास्त्री पुराणीं उबगोनि सांडिलांसी । तो आम्ही धरिलासी हृदय-कमळीं ॥ (७) नेत्र माझे रोडले आटवे माहेर । कैं भेटेन निरंतर बाईयांनो ॥ चतुर्भुज विठ्ठल कैं देखेन डोळां । भक्तांचा जिव्हाळा जीव माझा ॥ (८) रात्र काळी घागर काळी । यमुनाजळें हीं काळीं वो माय ॥ बुंथ काळी चिलवर काळी । गळां मोतीं एकावळी काळी वो माय ॥ मी काळी कांचोळी काळी । कांस कांसली ते काळी वो माय ॥ एकली पाणीया नव जाय साजणी । सवें पाठवा मूर्ति सांवळी वो माय ॥ विष्णुदास नाम्याची स्वामिणी काळी । कृष्णमूर्ति बहुकाळी वो माय ॥

रागवावयाचें असल्यास देवावर रागवावें, प्रेम करावयाचें असल्यास

देवावर प्रेम करावें, सख्य करावयाचें असल्यास देवाशीं सख्य करावें असा जो भागवतांत[1] ईश्वरभक्तीचा प्रकार सांगितला आहे, आणि ज्याचें एकरूप सुफी पंथियांत पहावयास सापडतें तो नामदेवांच्या प्रस्तुत अभंगांत उत्तम प्रकारें आढळतो.[2] या अभंगांतील प्रेमळपणा, लडिवाळपणा, जिव्हाळा इतका अप्रतिम आहे कीं, नामदेव हे ईश्वराचे लाडके भक्त कां होते याचा उलगडा आपणास सहज होतो.

नामदेवांना पांडुरंगाच्या खालोखाल पंढरपूरचें वेड होतें. पंढरपुरास जावें, सर्वांनीं पंढरपुरांत जमावें, ऐक्यभावना वाढवावी, परस्परांची सेवा करावी, पांडुरंगाचा जयघोष करावा, आणि अशा रीतीनें पंढरपुरास स्फूर्तिस्थान-शांतिस्थान बनवावें असें त्यांना वाटे. ते म्हणतात :—पंढरीचें प्रेम आहे ज्यांचे जीवीं । त्यांची नित्यनवी करिन आशा ॥ ते माझे सोइरे सुखाचे सद्गुरु । भवसिंधूचा पार उतरिती ॥ पंढरीच्या सुखा अंत पार नाहीं लेखा । शेषा सहस्त्रमुखा न वर्णवेचि । पंढरीच्या सुखा तोचि अधिकारी ॥ जन्मोजन्मीं वारी घडली जया ॥ नामा म्हणे धन्य धन्य ते संसारीं । चालविती वारी पंढरीची ॥ संपदा सोहळा नावडे मनाला । छंद लागला पंढरीचा ॥ नित्य हे दिवाळी असे पंढरपुरीं । ओंवाळिती नारी विठ्ठ "सी ॥ अवघी हे पंढरी सुखाची मांदुस । माझा स्वप्रकाश रत्न हरी ॥ धन्य संतजन तेथींचे पारखी । ज्या झाली ओळखी विठ्ठलनामीं ॥ पंढरीची वारी जयाचिये कुळीं । त्याची पायधुळी लागो मज ॥ देव मज सांगे पंढरीसी यारे । प्रेमें चित्तीं ध्यारे नाम माझें ॥ कायावाचा मन दृढ धरा जीवीं । सर्व मी चालवीं भार त्याचा ॥ भवसिंधु

---

१. कामं क्रोधं भयं ऐक्यं स्नेहं सौहादमेवच ।
एवं विदधतो नित्यं, यांति तन्मयतामहि ते । भागवत, स्कं. ७.

२ यावेळीं सुफीपंथी साधु महाराष्टांत संचार करीत होते. तसेंच नामदेव उत्तरेकडील यात्रा करीत असतांना तेथील सुफी साधुंच्या सहवासांत ते आले असतील. सुफी पंथाचा कांहीं परिणाम नामदेवांवर होणें अपरिहार्य आहे.

तारीन घ्यारे माझी भाक। साक्ष पुंडलीक करुनी बोले। लटकें जरी असे नामयासी पुसा। आहे त्या भरंवसा नामीं माझा."

नामस्मरण हेंच सर्वसुखाचें सार होय, त्यानेंच ईश्वरप्राप्ति व शांति हीं प्राप्त होतात, असा पूर्णविश्वास नामदेव महाराजांचा होता. या विषयीं ते म्हणतात, " न पढावे वेद नको शास्त्रबोध। नामाचे प्रबंध पाठ करा ॥ नव्हे ब्रह्मज्ञान न होय वैराग्य। साधा भक्तिभाग्य संतसंगें ॥ हरि हरि भजन जनीं जनार्दन। सर्वत्रीं समान भूतदया ॥ भावेंचि भजावें हरितें पुजावें। नित्य हें सेवावें रामनाम ॥ न करीं कायाक्लेश इंद्रियां विरोध। माझा आहे बोध वेगळाचि ॥ नामा म्हणे नाम गाइन निर्विकल्प येसी आपोआप गिंवसीत ॥ भवसिंधुचा पार तरावयालागीं। साधन कलियुगीं आणिक नाहीं ॥ अहर्निशीं नाम जपा श्रीरामाचें। जें सकळ धर्माचें मुगुटमणी ॥ "

जीवोद्धाराकरितां नामस्मरणाबरोबरच सत्संगतीचें महत्त्वहि नामदेवांनीं प्रतिपांदन केलें आहे. ते म्हणतात, " संतांच्या चरणा द्यावें आलिंगन। जीवें निंबलोण उतरावें ॥ संत चरणरज सेवितां सहज। वासनेचें बीज जळुनी जाय। मग रामनामीं उपजे आवडी। सुख घडोघडी वाढो लागे ॥." बरें, हे संत तरी कोणते ? त्या बाबतींत ते सांगतात, " सर्वांभूतीं पाहे एक वासुदेव। पुसोनियां ठाव अहंतेचा ॥ तोचि संतसाधु ओळखावा निका। येर ते आइका मायाबद्ध ॥ "

नामदेव हे लहानपणापासून ईश्वराची उपासना करीत असत हें आपण वर पाहिलेंच. तत्कालीन रीतरिवाजाप्रमाणें त्यांचें वडील दामाशेट यांनीं त्यांचें लग्न राजाई नांवाच्या मुलीशीं लहानपणींच करून दिलें होते. त्यांना जगराहाठीप्रमाणें कांहीं मुलेंहि झालीं होतीं. पुढें हा संसार वाढून त्यांना सुना आल्या व नातवंडेंहि झालीं. इतकें असलें तरी मनांतून ते संसाराला कंटाळले होते, त्रिविध तापांनीं पोळलेले होते, आणि म्हणूनच

सतत विठ्ठलाच्या नामस्मरणांत ते वेळ घालवीत असत. ईश्वराला आळविताना त्यांची आर्तता किती वाढत असे ती बघा :—" त्रितापें तापलो दुःखें आहाळलों। कासावीस झालों दयासिंधु ॥ तुजवीण आतां कोणाते मी सांगूं। तोडीं हा उद्वेगु नारायणा ॥ नामा म्हणे आतां नको पाहूं अंत। उद्धरीं त्वरित पांडुरंगा ॥ तुझा विष्णुदास म्हणताती जगीं। नाहीं माझे अंगीं प्रेमभावो ॥ जननिये जिवलगे ये वो पांडुरंगे। शिणलों भेटी दे गे एक वेळां। त्राहें त्राहें त्राहें कृपा दृष्टी पाहें। येउनियां राहें हृदयामाजी ॥ नामा म्हणे आई धांवें लवलाहीं। बुडतों चिंताडोहीं काढी मज ॥"

आतांपर्यंत आपण जे अभंग पाहिले त्यावरून नामदेवांच्या कवितेचें स्वरूप किती साधें, जिव्हाळ्यानें भरलेलें, भावपूर्ण व प्रेमळ आहे याची खात्री पटेल. वाल्मिकीनें शतकोटी ग्रंथ केला त्या धर्तीवर शतकोटी अभंग करण्याची प्रतिज्ञा नामदेवांनीं घेतली होती. परंतु सांप्रदायिक माहिती खरी मानली तरी त्यांच्या हातून ही प्रतिज्ञा पूर्ण झाली नाहीं असें ठरतें. सुमारे १६ कोटी अभंग नामदेवांच्या सर्व कुटुंबानें मिळून तयार केले व उरलेले चार कोटी पुढें तुकोबांनीं केले असें मानतात. वस्तुस्थिति अशी आहे कीं, आज नामदेवांचे सुमारे अडीच हजारच अभंग उपलब्ध आहेत. त्यांच्या ऐंशी वर्षांच्या दीर्घ आयुष्याकडे पाहतांना अडीच हजार अभंग थोडे वाटतात. कांहीं अभंग नाहींसे झाले असावेत. माझा असा तर्क आहे कीं, नामदेवांनीं पुष्कळ परिभ्रमण करून जागोजाग उपदेश केला असावा. मुसलमानांचा अंमल उत्तरेकडे व दक्षिणेकडे फैलावत चालला होता. अशा वेळीं लोकांना स्वधर्मांत राहून, स्वोन्नति करण्याचा उपदेश त्यांनीं जरूर केला असावा. समाज बलिष्ठ करायला सांगणारे, समाजैक्य घडवून आणायला सांगणारे अभंग, त्यांच्या कवितेंत अवश्य असायला हवे होते. हे अभंग त्यांच्या राजकीय स्वरूपामुळें नाहींसे झाले कीं काय ? शीखांसारख्या बलोपासक समाजाच्या पूज्य धर्मग्रंथांत ज्या नामदेवांचीं ६१ पद्यें आहेत, त्यांची कविता केवळ नामस्मरण करायला सांगण्यांत धन्यता मानीत असेल

असें वाटत नाहीं. तुकोबांपेक्षां जवळ जवळ दुप्पट व ज्ञानेश्वरांपेक्षां सुमारे चौपट आयुष्य लाभलेल्या ह्या लोकप्रिय संताच्या हातून, आपणाला आज उपलब्ध असलेल्या कवितेहून अधिक कविता तयार झाली असावी असें वाटतें. या कवितेचें काय झालें हें एक कोडेंच आहे. नामदेवांची जी आहे ती कविता मात्र साधी आहे. तुकोबांच्या अभंगांतील काव्यात्मकता व तत्त्वज्ञान या दोन्ही गोष्टींचा जवळ जवळ अभावंच तिच्यांत आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. तरीपण तिच्यांतील प्रेमळपणामुळें ती वाचणाऱ्याला निरंतर रमवील यांत शंका नाहीं. "युगें अठ्ठावीस विटेवरी उभा" ही नामदेवांनीं तयार केलेली आरती आज सहाशे वर्षें झालीं महाराष्ट्रीय लोक म्हणत आले आहेत. या एका गोष्टीवरूनहि जनमनावरील त्यांची पकड सिद्ध होते. त्यांच्या अभंगांची भाषा ज्ञानेश्वरीसारखी जुनी वाटत नाहीं याचें कारण आज इतकीं शतकें ते लोकांच्या जिव्हाग्रीं वसत आल्यानें त्यांचे आधुनिकीकरण आपोआपच होत आलें आहे. तरी देखील दारवंठा, पढियंते, साबडें, आरुष इत्यादि शब्द त्यांचा जुनेपणा सिद्ध करतातच.

'नामदेव' या नांवाचे साधु आणि कवि महाराष्ट्रांत एकंदर पांच होऊन गेले असें श्रीनामदेवचरित्रकार ज. र. आजगांवकर यांचें म्हणणें आहे. एक सुप्रसिद्ध संत व ज्ञानदेव-निवृत्तिनाथांचे समकालीन असे नामदेव. याच नामदेवांचे अभंग लोकप्रिय आहेत. यांच्या कांहीं अभंगांत 'नामा', कांहींत 'नामया स्वामी,' कांहींत 'केशवाचा नामा' व कांहींत विष्णुदास नामा, अशीं नांवें येतात. नाभाजीनें आपल्या 'भक्तमाला' ग्रंथांत व नरसीमेहता यांनीं आपल्या 'हारमाळा' काव्यांत यांचा उल्लेख केला आहे. यांचे गुरु विसोबा खेचर हे होत. (२) दुसरे नामदेव विष्णुदास नामा या नांवानें ओळखले जातात. यांचे ओवीबद्ध महाभारत प्रसिद्ध आहे. एकादशी माहात्म्य, तुलसीमाहात्म्य, उपमन्यूची कथा इत्यादि कांहीं स्फुट कविताहि यांची आहे. महानुभावांच्या ग्रंथांत ज्या नामदेवाचा उल्लेख आहे तो यांचाच असावा असें वाटतें. (३) तिसरे नामदेव नामा

पाठक हें होत. हें ज्ञानदेवसमकालीन कान्हा पाठक यांचे चिरंजीव. यांनीं जैमिनीअश्वमेधावर प्राकृत ओवीबद्ध रचना केली आहे. (४) चवथे नामदेव महानुभाव पंथी नामदेव होत. 'महिकावतीची बखर' ह्या जुन्या ग्रंथांत यांचा उल्लेख आढळतो. (५) पांचवे नामदेव नामा शिंपी या नांवानें ओळखले जात. हे तुकोबांच्या पश्चात् झालेले एक सामान्य लेखक असून त्यांनीं अनेक संतांचीं चरित्रें अभंगवृत्तांत वर्णिलीं आहेत. 'नामा,' 'शिंपीनामा,' ब 'नामदेव' अशीं आपलीं तीन नांवें यांनीं आपल्या कवितेंत घातलीं आहेत.

नामदेवांचा काळ म्हणजे एक प्रकारें संताचा काळ किंवा संतांचा वसंतकाळच म्हटला पाहिजे. वसंतऋतूंत जसे सर्व पक्षी बोलू किंवा गाऊ लागतात, तसे या काळांतील सर्व भगवद्भक्तांचे दिसते. ते सर्वच अभंग करतात. अठरापगड जातीचे हे संत होते. त्यांत चोखोबा व बंकासारखे महार होते, गोरोबा व राकासारखे कुंभार होते, सांवतासारखे माळी होते, नरहरीसारखे सोनार होते, जोगा परमानंदासारखे तेली होते, नामदेवासारखे शिंपी होते, कान्होपात्रा जनाबाईसारख्या स्त्रिया होत्या, तर ज्ञानदेव सोपानदेवांसारखे ब्राह्मणहि त्यांत होते. यांपैकीं कांहींकांचा उल्लेख पूर्वी आला आहे. कांहींकांचा येथें केला पाहिजे. गोरोबा हे सर्वांत वयानें मोठे होते. नामदेव हें कच्चें मडकें आहे, असें त्यांनींच जाहीर केलें होतें. माती तुडवीत असतांना यांनीं आपल्या लहानशा मुलाला पायाखालीं तुडविलें. पण विठ्ठलाच्या भजनांत त्यांना त्याची दादहि नव्हती ! यांनीं कांहीं अभंग लिहिले आहेत. परिसा भागवत हे लोकांना 'परिसा भागवत' म्हणत म्हणून त्यांना हें नांव मिळालें. कोणी म्हणतात रुक्मिणीनें प्रसन्न होऊन यांना एक परीस दिला होता म्हणून हें नांव त्यांना प्राप्त झाले. हे प्रथम नामदेवांची निंदा करीत. पुढें त्यांचे ते चाहते बनले. सकलसंत-गाथ्यांत यांचे कांहीं अभंग असून ते फार प्रेमळ आहेत. 'अणूमाजी राम, रेणूमाजी राम । तृणकाष्ठीं राम वर्ततसे' हा त्यांचा अभंग सरस आहे.

विसोबा खेचर (समाधि शके १२३१ श्रावण शु. ११) हे नामदेवांचे गुरु. सर्वत्र ईश्वर आहे, अशा अर्थाचे त्यांचे थोडेसे अभंग आहेत. नामदेवांची बहीण म्हणा, दासी म्हणा, जनाबाई हिचे अभंग फारच प्रेमळ व बहारीचे आहेत. गाथ्यांत सुमारे तीनशे अभंग जनाबाईचे दिले असून, त्यांपैकीं बहुतेक सरस आहेत. येग येग विठाबाई । माझे पंढरीचे आई ॥ गंगा गेली सिंधुपाशीं । त्यानें अव्हेरीलें तिसी ॥ नोवरीयासंगें वऱ्हाडियां सोहळा ॥ इत्यादि तिचे अभंग काबुली द्राक्षांप्रमाणें अंतर्बाह्य गोड आहेत. मंगळवेढ्याच्या श्यामा नायकिणीची मुलगी कान्होपात्रा हिचा पांडुरंगाचे ठिकाणीं दृढभाव होता. तिचेहि अभंग चांगले आहेत. चांगदेव हे योगी होते. तत्त्वसार नांवाचा त्यांचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यांचे सुमारे पाउणशे अभंग गाथ्यांत आहेत. त्यांतील भाषा योगसंप्रदायांतील असल्यानें, अर्थाला जरा दुर्बोध वाटते, चोखोबांचा (मृ. शके १२६० वैशाख वद्य ५) धांव घाली विठो आतां चालूं नको मंद हा अभंग प्रसिद्ध आहे. त्यांचे अभंग बरेच असून सुंदर आहेत. ऊस डोंगा परि रस नोहे डोंगा । कांरे भुललासी वरिलिया सोंगा ॥ नदी डोंगी परी नीर नोहे डोंगें । कांरे भुललासी वरिलिया सोंगें ॥ चोखा डोंगा परी भाव नाहीं डोगा ॥" हा त्यांचा अभंगहि फार लोकप्रिय आहे. त्यांची पत्नी सोयराबाई हीहि अभंग-रचना करी. देहासी विटाळ म्हणती सकळ । आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध-हा तिचा अभंग सुरेख आहे. चोखोबांची धाकटी बहीण निर्मळा हिचेहि कांहीं अभंग असून ते सोपे व रसाळ आहेत. सांवतामाळी (मृ. शके १२१७ आषाढ कृ. १४) याचे थोडे अभंग गाथ्यांत आहेत. "कांदा मुळाभाजी । अवघी विठाबाई माझी ॥ लसूण मिरच्या कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी"—हा त्याचा अभंग त्याचें व्यक्तिमत्व दर्शविणारा नाहीं असें कोण म्हणेल? नरहरी सोनार (मृ. शके १२३५ माघ कृ. १) हे पंढरपुरांत राहात असूनहि शिवभक्त असल्यानें पांडुरंगाचें दर्शन घेत नसत. पुढें एका गिऱ्हाईकानें पांडुरंगाचा करगोटा

करायला सांगितला व खुद्द देवाचें माप घेण्याची विनंति केली. तेव्हां डोळे झांकून नरहरीनें माप घेतलें ! त्यावेळीं शंकराच्या मूर्तीला आपण हात लावतो आहोंत असें त्यांना वाटलें. त्यांनीं डोळे. उघडले तर तो पांडुरंग. पुनः त्यांनीं डोळे मिटले. तों शंकराच्या खाणाखुणा ! तेव्हां त्यांची खात्री पटली कीं, हरि व हर हे एकच आहेत. त्यांनींहि कांहीं अभंग लिहिले आहेत. साळ्या-रसाळ, वत्सरा, कूर्मदास, कान्हो पाठक, भानुदास इत्यादि दुसरेहि सामान्य कवि व भक्त या काळांत झाले. नामदेवानंतरच्या परंतु एकनाथ पूर्वकालीन कवींचा येथेंच उल्लेख करणें सोयीचें होईल. पैठणच्या बहिरभट किंवा बहिरा पिसा ऊर्फ जातवेद यानें श्रीभागवताच्या दशमस्कंधावर पाउणलाख मराठी ओवी टीका लिहिली असून, त्याच्याजवळ वर्णनात्मक प्रतिभा चांगली आढळते. यशोदेला इतर गोपिकांनीं जो बाळंतविडा केला त्याचें वर्णन सरस आलें आहे. नामा पाठक या कवीचे नामरत्नमाला, भरतभेट व अश्वमेध हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. ग्रंथाचे ९५ प्रसंग असून भाषा व रचना अगदीं साधारण प्रतीची आहे. नामा पाठकाचा आजा कान्हो पाठक हा ज्ञानेश्वरांचा समकालीन असून, त्याचे कांहीं अभंग व 'गीतासार' नामक एक लहानसें प्रकरण उपलब्ध आहे. चोंभा कवीचें 'उखाहरण' ओंवीवृत्तांत असून, त्याची ओंवी थोडी विचित्र आहे. त्याच्या ओंवीच्या चरणांपैकीं पहिल्या, दुसऱ्या व चौथ्या चरणाच्या शेवटीं यमक असतें व मधलाच तिसरा चरण निर्यमक असतो. उदा० "गीताचेन नादें। चरों विसरलीं स्वापदें। हरणीं नोडविलें कर्ण। तीयें राहिलीं नादबोधें॥". मैराळ सतीदासु नांवाचा आणखी याच काळांतील कवि असून त्याचें द्रोणपर्व उपलब्ध आहे. कान्हो त्रिमलदास, भास्कर व नवरस नारायण हेहि एकनाथापूर्वींच होऊन गेले.

या सर्व संतांनीं समानतेचा व भगवद्भक्तीचा संदेश महाराष्ट्राला दिला. 'देव भावाचा भुकेला। याति कुळ नाहीं त्याला' अशी यांची दृढ श्रद्धा होती. यांची कविता भक्तिभावानें ओथंबली असून, तिची भाषा

साधी व गोड अशी आहे. ही साधु मंडळी प्रेमळपणाचा पाऊस त्यावेळीं महाराष्ट्रावर पाडीत होती. यावनी अंमल सुरू झाल्यानें वेदील बनलेल्या बहुजनसमाजाला यांची अभंगवाणी अमृतासारखी खचित् वाटली असेल. यांची नम्रवृत्ति, समाधान, समभावना व साधुता हीं पाहून त्याकाळच्या लोकांना चिंतामणीचें आगर प्राप्त झाल्यासारखें वाटलें असेल. याच मंडळींनीं सर्वत्र फिरून भागवतधर्माचा प्रसार केला, लोकांना पंढरपूरच्या अध्यात्मपीठांत एकत्र आणिले, आणि भावी स्वराज्याला ज्या ऐक्याची जरूरी होती त्या ऐक्याचा पाया भरभक्कम तयार केला. संतांना निव्वळ टाळकुटे म्हणणाऱ्यांनीं या त्यांच्या कामगिरीकडे दुर्लक्ष केलेलें दिसतें.

६

एकनाथ

आचार आणि विचार, वाणि आणि वर्तन यांत मेळ साधणाऱ्या ज्या कांहीं व्यक्ति आहेत, त्यांत संत एकनाथांचा[1] क्रमांक बराच वर लागेल. संसारांत राहून त्यांनीं संत पदवी मिळविली. तुकाराम महाराजांसारखे ते संसाराला कंटाळलेले नव्हते. संसार उत्तम प्रकारें करून त्यांनीं आत्मकल्याण व लोककल्याण साधलें. ज्या भागवतधर्माचा प्रसार त्यांनीं केला, त्यांत सर्व गोष्टी ईश्वराला आपण अर्पण केल्या आहेत, अशा बुद्धीनें जगांत व्यवहार करावयास सांगितलें आहे. स्वतः नाथांचें जीवन आणि संसार हीं दोन्हीं परोपकारार्थ होतीं. अतिथी-अभ्यागताला ते सदैव आसरा देत. ब्राह्मण-महार हा भेद त्यांना कधीं शिवला नाहीं. ब्राह्मणांकरितां शिजविलेले अन्न त्यांनीं त्यांच्या महार पाहुण्यांना वाढलें, एका महारासमवेत ते एकाच बिछान्यावर झोपले, काशीहून रामेश्वराला गंगेची कावड ते घेऊन जात असतांना त्यांतील गंगोदक पाजून एका गाढवाचें प्राण त्यांनीं वाचविले, गंगास्नान करून ते परत येत असतांना एक यवन त्यांच्या अंगावर वारंवार थुंकला तरी त्यांची शांति ढळली नाहीं, या व अशा त्यांच्या चरित्रांतील कांहीं हकिगतींवरून 'सर्वत्र समभाव' हें जें भागवतधर्माचें मुख्य लक्षण तें

---

१ एकनाथांचा जन्म शके १४७० व मृत्यु शके १५२१. हे पैठणचे राहणारे. यांचे पणजे सुप्रसिद्ध संत भानुदास (शके १३७०) हे होत. जनार्दनस्वामींजवळ यांनीं शके १४८० मध्यें उपदेश घेतला. दत्तपरंपरा व भागवतपरंपरा अशा दोन परंपरा एकनाथांत एकवटल्या आहेत. दत्तपरंपरेप्रमाणें यांनीं हिंदुमुसलमानांत ऐक्याचे प्रयत्न केले व भागवत परंपरेप्रमाणें भक्तिमार्गाचा प्रसार केला. दत्तपरंपरेंत शिव व विष्णु ह्या उपासना एकरूप आहेत. नाथांनीं ज्ञानेश्वरीच्या अनेक प्रती मिळवून शके १५०६ मध्यें एक शुद्ध प्रत तयार केली.

त्यांनीं किती आत्मसात् केलें होतें हें दिसतें. ज्ञानेश्वरी, रामायण व भागवत या ग्रंथावर ते प्रवचनें करीत. आपापलीं कर्तव्यें करूनहि, संसारांत उत्तम नागरिक या नात्यानें राहूनहि, मनुष्याला आत्मोन्नति कशी करतां येतें हें त्यांनीं उत्तम प्रकारें दाखवून दिलें.

ज्या क्षेत्रांत एकनाथ राहात तें पैठण क्षेत्र विद्वत्तेचें आणि कर्मठपणाचें माहेरघर होतें. शालिवाहन व आंध्र राजांच्या ह्या एका काळच्या राजधानींत विद्वत्तेचा व कर्मकांडाचा खूपच बडेजाव होता. पैठणाला त्याकाळीं दक्षिण-काशी म्हणत. अशा क्षेत्रांत राहून त्यांनीं अत्यंत सोप्या अशा भागवत-धर्माचा किंवा भक्तिप्रधान धर्माचा प्रसार केला हें विशेष होय. "वेदांत सिद्धांत पाहतां खटपट । वाउगा बोभाट नामाविण । नामें होय मुक्ति नामें होय मुक्ति । नामें वैकुंठ प्राप्ति सर्व जीवा," "नाम पाठ सोपा भोळ्या भाविकांसी । मतवादीयांसी न रुचे नाम" असा त्यांचा ठाम सिद्धांत होता. आद्य शंकराचार्यांनीं "सारूनि कर्मठतेचा विचारू" ज्ञान मार्ग पसरविला, असें नाथ म्हणतात. त्यांतच थोडा बदल करून आपणाला असें म्हणतां येईल कीं, "सारूनि कर्मठतेचा विचारू" एकनाथांनीं भक्ति-मार्गाचा किंवा भागवतधर्माचा प्रसार केला.

नाथांच्या काळीं महाराष्ट्रांत मुसलमान राज्यकर्त्यांचा अंमल होता. उत्तरेकडील मोंगल राजांचा कडवेपणा व क्रूरपणा जरी दक्षिणेंतील बहामनी राजांत नसला, तरी मुसलमानी धर्माचा प्रसार करण्याचा त्यांचा प्रयत्न चालूच होता. अशा काळांत हिंदुमुसलमानांत ऐक्य निर्माण करण्याचा एकनाथांनीं प्रयत्न केला हें त्यांस भूषणावह होय. सर्वत्र समताबुद्धीनें बघणाऱ्या नाथांना हिंदुधर्म व मुसलमानी धर्म यांत समता न आढळली तरच नवल. हिंदु-तुर्क-संवाद, हापसी, फकीर, दरवेश इत्यादि त्यांच्या भारूडांत ही समता स्पष्टपणें आढळते. आपापल्या धर्माचा मोठेपणा अहं-कार बुद्धीनें गाणाऱ्या एका हिंदु व एका तुर्क अशा दोन माणसांचा संवाद

काव्यमय भाषेंत वर्णन करून, शेवटीं दोघांची मैत्री झाल्याचें हिंदुतुर्कसंवादांत आहे. हापसी भारुडांत पुढील ओळी आढळतात :—" ख्याल कीया मच्छलीवाले वल्ले। दर्याव धुंडे गोविंद महंमद। खेळ खिलाने आया महंमद ॥१॥...नंदका घरका कान्हा वल्ले। खेले जमुना तीर महंमद। कंस मामाकु मारिये वल्ले। राज्य हिया उग्रसेन महंमद ॥" फकीराच्या भारूडांत रामरहीमांचें ऐक्य पुढील शब्दांत वर्णिलें आहे, " हजरत मौला मौला। सब दुनया पालनवाला १ सब घटमो सांईं बिराजे। करत हय बोलबाला २ जीन रूपसे है जगत पसारा। वोही सल्लाल अल्ला ॥५॥ एका जनार्दनीं निज वद अल्ला। आसल वोही विटपर अल्ला ॥६॥ "

मराठींत ग्रंथरचना करावयाची ज्ञानेश्वरांपासून चालत आलेली परंपरा एकनाथांनीं जोमानें चालू ठेविली. त्यांचा भक्तिमार्ग बहुजनसमाजाकरितां होता. त्या समाजाला संस्कृत भाषेचें ज्ञान नव्हतें. तेव्हां जरी एकनाथ पैठणसारख्या संस्कृत पंडितांच्या नगरींत राहात असले आणि स्वतः चांगले व्युत्पन्न पंडित असले, तरी त्यांनीं आपले ग्रंथ 'भाळ्याभोळ्या' लोकांना समजतील अशा सुबोध मराठींत लिहिले. मराठीविषयीं त्यांना किती जाज्ज्वल्य अभिमान वाटत होता तो भागवतांतील पुढील ओंव्यावरून दिसून येईल. "संस्कृत ग्रंथकर्ते ते महाकवी। मा प्राकृतीं काय उणीवी। नवीं जुनीं म्हणावीं। कैसेनि केवीं सुवर्णसुमनें॥ कपिलेचें म्हणावें क्षीर। मा इतरांचें तें काय नीर। वर्णस्वादें एकचि मधुर। दिसे साचार सारिखें॥ जें पाविजें संस्कृत अर्थें। तेंचि लाभे प्राकृतें। तरी न मनावया येथें। विषमचि तें कायी॥ संस्कृतवाणी देवें केली। तरी प्राकृत काय चोरापासोनि झाली। असोतु या अभिमान भुली। वृथा बोलीं काय काज॥" हंसगीताच्या प्रारंभीं एकनाथ म्हणतात, " ऐका माझी हे मन्हाटी। जनार्दनकृपापरिपाठीं। निःशब्दाच्या सांगे गोठी। चिन्मात्रीं भिठी घालूनी॥" निःशब्दाच्या गोष्टी सांगणाऱ्या मराठीच्या सामर्थ्याविषयीं नाथांना किती विश्वास वाटत होता तो या उताऱ्यावरून दिसतो.

एकनाथांनीं ग्रंथरचना बरीच केली. त्यांपैकीं चतुःश्लोकी भागवत, हस्तामलक, शुकाष्टक, स्वात्मसुख, आनंदलहरी, भागवताच्या एकादश-स्कंधावरील टीका, रुक्मिणीस्वयंवर, पौराणिक आख्यानें, भावार्थरामायण, संतांचीं चरित्रें, अभंग व भारूडें हीं मुख्य होत. चतुःश्लोकी भागवत हें मूळ भागवताच्या दुसऱ्या स्कंधाच्या नवव्या अध्यायांत असून त्याचे ४५ श्लोक आहेत. नाथांनीं त्यांच्या स्पष्टीकरणार्थ १०३६ ओंव्या रचिल्या. नाथांचे गुरु जनार्दनस्वामी यांच्याबरोबर हिंडत असतांना चंद्रावती नगरींत गुर्वाज्ञेवरून त्यांनीं ही सुरुवातीची रचना केली. हा छोटा ग्रंथ अध्यात्मपर असून तो जनार्दनस्वामींना इतका आवडला कीं, त्यांनीं त्याची तारीफ करून एकनाथांना एकादशस्कंधावर मोठा ग्रंथ रचावयास सांगितलें. हस्तामलक हें आद्य शंकराचार्यविरचित १४ श्लोकांचें अध्यात्मपर स्तोत्र असून त्यावर नाथांनीं ६७४ ओव्यांचें विस्तृत भाष्य केलें आहे. "जग भासें जें सकळ। तो जगदात्माचि निखळ।" अशा प्रकारचा सिद्धांत यांत मांडिला आहे. शुकाष्टक नांवाच्या लहान अध्यात्मपर अष्टकावर एकनाथांनीं ४४७ ओंव्या रचिल्या आहेत. हीं छोटीं प्रकरणें आपापल्या परीनें मधुर असलीं तरी नाथांची कीर्ति अजरामर व्हायला त्यांचें भागवतच कारणीभूत झालें आहे. भागवताच्या एकादशस्कंधांत ३१ अध्याय असून १५०० श्लोक आहेत. नाथांनीं भागवतधर्मांचें भाष्य करण्याच्या हेतूनें त्यावर वीस हजार ओव्यांचा प्रासादिक ग्रंथ तयार केला. या ग्रंथाचा आरंभ पैठणांत झाला असला तरी ग्रंथाचा चार पंचमांश भाग काशींत तयार झाला. ग्रंथाचा समाप्तिकाल विक्रम शके १६३० कार्तिक शुद्ध पौर्णिमा किंवा शालिवाहन शक १४९५ असा आहे. उपसंहाराच्या शेवटल्या भागांत नाथ म्हणतात, "जनार्दनें नवल केलें। मूर्खाहातीं ज्ञान बोलविलें। ग्रंथीं परमार्थरूप आणिलें। वाखाणविलें एकादशा॥ ...ग्रंथ देशभाषा व्युत्पत्ती। म्हणोनि नुपेक्षावा पंडितीं। अर्थ पहावा यथार्थी। परमात्मस्थितीं निजनिष्ठा॥ ...ग्रंथारंभ प्रतिष्ठानीं। तेथ पंचाध्यायी संपादूनी। इतर

ग्रंथाची करणी । आनंदवनीं विस्तारिली ॥ ...भाळे भोळे विषयीजन । याचें करितां श्रवण पठन । हरिभक्त होती जाण । सन्मार्गीं पूर्ण बहुत होती ॥ हे टीका तरी मराठी । परी ज्ञानदानें होईल लाठी । ऐसें निजमुखें बोलोनि गोठी । कृपादृष्टि पाहिलें ॥ ...जनीं जनार्दन एक । जाणे तो सुटला निःशेख । हेंचि नेणोनियां लोक । गुंतले अनेक भवचक्रीं ॥" यांत आपलें गुरुप्रेम, स्वभाषाप्रेम जसें त्यांनीं व्यक्त केलें आहे, तसेंच 'जनीं जनार्दन' पाहण्याचें ग्रंथाचें सारहि सांगितलें आहे.

भागवतधर्माची सुलभता व सर्वसंग्राहकता विशद करून सांगत असतांना नाथ म्हणतात, "भागवतधर्माची ख्याती । सप्रेम आदरितां प्रीती । तेणें तुष्टोनिया श्रीपती । दे सेवकाहातीं आपणियां ॥ इंद्रियें कोंडितां न कोंडती । विषय सांडितां न सांडती । पुढत पुढती बाधों येती । या लागीं हरिभक्ती द्योतिली वेदें ॥ दारा सुत गृह प्राण । करावे भगवंतासी अर्पण । हे भागवतधर्म पूर्ण । मुख्यत्वें भजन या नांव ॥ न करितां नाना व्युत्पत्ति । सुगमोपायें ब्रह्मप्राप्ती । अबळें तारावया निश्चिती । भगवंतें निजभक्ति प्रगट केली ॥ स्त्रीशूद्रादि आघवे । घालूनियां ये नावे । येकेचि खेपे स्वयें न्यावे । भजन भावें परतीरा ॥ भागवत-धर्माचिये स्थिती । बाळीं भोळीं भवाब्धि तरती । सुखोपायें ब्रह्मप्राप्ती । होय निश्चिती सकळिकां ॥ अध्याय दुसरा ॥. महाराष्ट्रांतील अशिक्षित बहुजन समाजाची काळजी नाथांना वाटत होती. त्यामुळें त्यांच्या पारमार्थिक कल्याणाकरितां भक्तीचा सुलभ उपाय त्यांनीं आपल्या भागवतांत निवेदन केला आहे. सर्वाभूतीं भगवद्भाव हा भागवतधर्माचा आत्मा आहे, आणि तो अनन्य भावानें ईश्वराची भक्ति केली असतांना प्राप्त होतो असा नाथांचा निश्चय आहे.

नाथांचा सर्वांत मोठा ग्रंथ भावार्थ रामायण हा होय. याची ओवी संख्या चाळीस हजार असून, त्यांपैकीं २५ हजार ओव्या नाथांच्या व

पंधराहजार ओव्या त्यांचा शिष्य गावचा याच्या आहेत. युद्धकांडाचे ४४ अध्याय झाल्यावर नाथांचें प्रयाण झालें व नंतर उरलेला भाग त्यांच्या शिष्यवरानें पुरा केला. हिंदुस्थानांत रामप्रेमाला या काळांत जणूं भरती आली होती. कारण ज्या वेळीं नाथ भावार्थ रामायणाची रचना करीत होते, त्याच सुमारास संत तुलसीदास आपल्या रामायणाची रचना करीत होते. कृष्णदास मुद्गल याचें युद्धकांड याच काळांत लिहिलें गेलें. हा योगायोग विलक्षणच म्हटला पाहिजे. नाथांच्या रामायणांतील वर्णनें सरस व रमणीय असून जागोजागीं अध्यात्मविचाराचीं सुंदर उपवनें आहेत. मराठींत पौराणिक आख्यानें नाथांच्या पूर्वी महानुभाव कवींनीं गाइलीं असलीं, तथापि तीं लोकप्रिय करण्याचें श्रेय नाथांनाच दिलें पाहिजे. नाथ कांहींहि लिहीत असलें तरी त्यांची दृष्टि अध्यात्मावर असे, हें त्यांचें वैशिष्ट्य होय. याचमुळें 'आत्मप्रबोध तो लक्ष्मण । भावार्थ तो भरत बाण । निजनिर्धार तो शत्रुघ्न । आनंदविग्रही पूर्ण श्रीराम' असें ते म्हणतात. विवेक आणि विचार तसे विश्वामित्र व वसिष्ठ, त्यांपाशीं राम शस्त्र व शास्त्र शिकला. अशा पद्धतीनें नाथांनीं आपल्या रामायणाची अध्यात्मपर रचना केली आहे.

नाथांचें रुक्मिणीस्वयंवर शके १४९३ मध्यें तयार झालें. त्याचे अठरा अध्याय असून, ओवी संख्या सुमारे दोन हजार आहे. "ये ग्रंथींचें निरोपण । जिवाशिवा होतसे लग्न । अर्थ पाहतां सावधान समाधान सात्विकां ॥" असें याहि ग्रंथांचें आध्यात्मिक स्वरूप त्यांनीं सांगितलें आहे. श्रीकृष्णस्वरूप, रुक्मीकृत कृष्णनिंदा, रुक्मिणीची कृष्णप्रीति, सुदेवप्रेषण, द्वारकावर्णन, रुक्मिणीपत्रिका, विवाह समारंभ इत्यादि प्रसंग यांत आले असून ते बहारीचे आहेत. याच कारणानें हें आख्यान अत्यंत लोकप्रिय असून, त्याचीं पारायणें अनेकांकडून होत असतात. एकनाथांच्या पूर्वी नरेंद्र कवि (शके १२१४), नृसिंह कवि (शके १३२५), संतोष्णमुनि कृष्णदास (शके १४७५), कवि कृष्णडिंभ विराट, लक्षधीर कवि व कवि मंडळीक एल्हन अशा सहा महानुभावीय कवींचीं रुक्मिणीस्वयंवरविषयक

काव्यें असूनहि, महाराष्ट्राचें प्रेम नाथांच्या रुक्मिणीस्वयंवरावर स्थिरावलें यांचें कारण त्याचा साधेपणा. लोकांना पटतील अशा पद्धतीनें नाथांनीं विविध प्रसंग यांत वर्णन करून, शिवाय त्यांना आध्यात्मिक बैठक मिळवून दिली आहे. नाथांचीं ध्रुव, प्रल्हाद, उपमन्यु व सुदामा हीं छोटीं आख्यानेंहि भाविकांच्या नित्यपाठांत आहेत. आख्यानक कवितेच्या जनकत्वाचा मान महानुभाव कवींकडे जात असला तरी तीं लोकभोग्य व लोकप्रिय बनविण्याचें श्रेय नाथांनाच दिलें पाहिजे.

नाथांच्या भारुडांत (बहुरूढ) तत्कालीन महाराष्ट्राची परिस्थिति उत्तम प्रकारें दिसते. पंधराव्या शतकांतील महाराष्ट्र किती बहुविध प्रकारचा होता याचें ज्ञान या भारुडांवरून होते. हीं भारुडें सुमारें तीनशे असून, त्यांत सव्वाशेच्या वर विषय आले आहेत. यांत विनोद, चमत्कृति, अद्भुतपणा, अध्यात्मवाद, सामाजिक चालीरीतींवर टीका, उपदेश यांचें मिश्रण आहे. यांतील भाषेचें स्वरूपहि मिश्र आहे. एकनाथी भागवतांत उर्दु शब्द क्वचित्च येतात. परंतु अर्जदास्त, जाबचिट्ठी, ताकीदपत्र, हापसी सारख्या भारुडांत तत्कालीन प्रचलित असे शेंकडो उर्दु शब्द आले आहेत. डौर, नानक, जोगी, फकीर, दरवेश, हापसी, जोगवा, वेसकर, महारीण, चोपदार, गोपाळ, वासुदेव, जोशी, जंगम, माळी, वाघ्या, पोपट, विंचू, टिटवी, पिंगळा, चौघडा इत्यादि जे वेगवेगळे विषय या भारुडांत आले आहेत, त्यांवरून त्यांचा व्यापकपणा स्पष्ट होईल. किती विविध प्रकृतीच्या लोकांशीं नाथ समरस होऊ शकत असत हेंहि या भारुडांवरून दिसते. नाथांना सर्व लोकांत सर्वात्मभावानें नांदणारा महापुरुष दिसतो. कोणाचा तिरस्कार नाहीं, कोणाचा द्वेष नाहीं, अशा सहानुभूतीच्या भावानें नाथांनीं हीं भारुडें गाइलीं असून "वैकुंठीचा दारवंटा" सर्वांना उघडा केल्याचें जाहीर केलें आहे. नाथांच्या ठिकाणीं विनोदबुद्धि भरपूर असल्यानेंच ते सर्वांशीं समरस झाले, याचाहि प्रत्यय या भारुडांत जागोजागीं जीं विनोदी वर्णनें आहेत त्यांवरून येतो. हीं भारुडें वाघेमुरळ्या, गोंधळी,

भराडी, वासुदेव वगैरे मंडळी अजूनहि अनेक ठिकाणीं म्हणतांना आढळतात. या गोष्टीवरून तीं किती लोकप्रिय आहेत तें कळतें. या सर्व भारुडांत 'दार उघड बया दार उघड' या शब्दांनीं सुरूं होणारें आदिमायेवरील भारूड अत्यंत ओजस्वी आहे. कांहीं भारुडांत आध्यात्मिक कोडीं आलीं आहेत. त्यांमुळें तीं कळायला अवघड वाटतात. सत्वर पाव ग मला, भवानी आई रोडगा वाहीन तुला; कान्होबा नवल सांगतो गोष्टी । एक वृक्ष दृष्टीं देखिला तयावरी सृष्टी—सारखीं भारुडें या सदराखालीं येतात. नाथांनीं कांहीं अभंग व पदेंहि रचिलीं आहेत. मन रामीं रंगलें, असा कसा देवाचा देव बाई ठकडा, तें मन निष्ठुर कां केलें इत्यादि पदें व 'नाम वदतां हे वैखरी, चित्त धावे विषयावरी', 'नाम मुखीं गातां विषयाची वार्ता, नोहेचि सर्वथा गातयासी' इत्यादि अभंग वारकरी मंडळींत रूढ आहेत. नाथांच्या कवितेंत ज्ञानदेवांचा प्रतिभाविलास नसला, तरी तींत प्रसाद, शुचिता, प्रेमळपणा व अर्थाची पौढी हीं भरपूर आहेत.

एकनाथ पंचायतनांत एका जनार्दन, रामा जनार्दन, जनी जनार्दन, विठा रेणुकानंदन व दासोपंत यांचा अंतर्भाव होतो. त्यांपैकीं एकनाथांचा विचार वर आपण केलाच आहे. रामा जनार्दन यांची रचना कांहीं फारशी प्रसिद्ध नाहीं. 'आरती ज्ञानराजा महाकैवल्य तेजा' ही त्यांची आरती मात्र वारकरी संप्रदायांत सर्वतोमुखीं झालेली आहे. जनीजनार्दनाचा (शके १५२३) निर्विकल्प ग्रंथ उर्फ उद्धवबोध हा सुमारें सातशे ओव्यांचा ग्रंथ असून त्यांत कृष्ण व उद्धव यांच्या संवादांच्या रूपानें माया, ब्रह्म, जीव-शिव, सगुणनिर्गुण इत्यादि विषयांची चर्चा आली आहे. विठा रेणुकानंदनाची कविता कोठें ऐकिवांत नाहीं. या पंचायतनांत एकनाथांच्या खालोखाल जर कोणता मोठा कवि झाला असेल तर तो दासोपंत (शके १४७३ ते १५३७) हाच होय. हा नाथांपेक्षां वयानें लहान असून जोगाईच्या आंब्यास राहात असे. यानें दोन तीन लाखांवर कविता लिहिली आहे असें म्हणतात. गीतार्णव, पदार्णव, गीतार्णवबोध, अवधूतराज, ग्रंथराज,

ए. सं. नं. वि-२८

पंचीकरण इत्यादि सुमारे पन्नास लहान मोठे ग्रथ [illegible] शंकरराव देव यांनीं प्रसिद्ध केलें आहे. गीतार्णवाच्या सव्वालक्ष ओळी असून, त्यांत गीतेचें तत्त्वज्ञान अगदीं सोपें करून सांगण्यांत आलें आहे. गीतार्णवांत दिगंबरानुचरु, दिगंबरु किंवा दास असें लेखकाचें नांव आढळतें. दासाचें लोकांनीं दासोपंत बनविलें. गीतार्णवांत सर्वत्र लेखकाचा आत्मप्रत्यय व स्वतंत्र निस्वार्थ बाणा दिसतो. "न पाहे श्रोतयांचें वदन। न करी भाष्याधारें विवरण। स्वस्वानुभवें हें मनन। म्हणोनि संपादीं॥ आइकेल तेणें आइकावें। मानैल तेणें ध्यावें। नावडे तेणें नेघावें। दोहीं श्रवणीं॥ स्वसांप्रदायिक जे योगी। यया मननाचे विभागीं। टीका हे तयांचि जोगी। तेहीं आइकावी॥ स्वानुभवचि येथिंचें प्रमाण। स्वानुभव हेंचि साधन। अन्यत्र शास्त्रश्रवण। तैसें नव्हे॥ प्राकृत म्हणौनि दूषिती। तेचि यया ज्ञाना वंचिती। भाषाचि केवळ भजती। ते मूर्ख-कीं ना"— अशा प्रतिज्ञोत्तरानें आपल्या गीतार्णवाची रचना दासोपंतांनीं केली आहे. दासोपंतांचा ग्रंथराज हा ग्रंथ रामदासांच्या दासबोधाचा पूर्वावतार म्हणतां येईल. याची आठ प्रकरणें असून ओवीसंख्या बाराशे आहे. गुरुलक्षणें, असच्छिष्य, अध्यात्माची महती इत्यादि यांतील प्रकरणें दासबोधांतील असल्या प्रकरणांसारखींच आहेत. समर्थांना ग्रंथराजापासून दासबोध रचण्याची स्फूर्ति मिळाली असण्याचा संभव आहे. दासोपंतांचीं पदें सहस्रावधि असून तीं भावपूर्ण व रमणीय आहेत. या पंचायतनाचें दत्तोपासना हें जें वैशिष्ट्य आहे, त्याला अनुरूप अशींच पदें दासोपंतांचीं आहेत. वाटु पाहतां वेळ जाहला वो बाईये। श्रीदत्तु गुंतला कोठें अजुनि कां नये॥धृ०॥ बहु दिवस क्रमले सखये, मी काये करूं। भेटी नये अवधूतु याचे पाय धरूं॥धृ०॥ इत्यादि पदांतील आर्तता व प्रेमळपणा पाहिला कीं नामदेवाची आठवण झाल्याखेरीज राहात नाहीं.

एकनाथ पंचायतनांतील कोणत्याहि कवींत उत्कट प्रकारचा प्रतिभा-विलास आढळत नाहीं हें खरें आहे. काव्याकडे ते कलाविलासाच्या दृष्टीनें

न पाहतां उपदेशाचें एक साधन म्हणून पाहत असलेलें स्पष्ट दिसतात. महाराष्ट्रांतील सर्व जातींच्या लोकांना ईश्वरप्राप्तीचा भक्ति हा सुलभ उपाय त्यांनीं दाखविला आणि महाराष्ट्रांतील मुसलमानांच्या राजवटींत जितकें धर्मैक्य त्यांना करतां आलें तेवढें त्यांनीं केलें. "करावा बुद्धीचा प्रकाशू। अवघा देव हा उपदेशू। परंतु वर्णावर्णांचा नाशू। करों नये॥ ज्या ज्या कर्मासीं यावें। तैसें आचारें विचारें वर्तावें। तेणें मुक्त व्हावें। सर्वकाळ॥" या जनी जनार्दनाच्या उपदेशांत नाथपंचायतनाच्या उपदेशाचें सारच्च जणूं काय सामावलें आहे.

एकनाथाच्या काळांतील इतर कांहीं कवींचा नामोल्लेख येथेंच करणें इष्ट होईल. 'बालबोध' कर्ते त्र्यंबकराज हे योगमार्गीयांत विशेष प्रसिद्ध होते. बालबोध अथवा बालावबोध (शके १५०० त चैत्र शु. १ ला पूर्ण झाला) हा ग्रंथ विशेषतः योगावर असून त्यांत ४५ कथनें व ५२४० ओव्या आहेत. प्रणवोपासना, योगमार्ग, पंचीकरण, अष्टांगयोग इत्यादि विषय या ग्रंथांत आले असून, त्र्यंबकराजानें यांत स्वानुभवाच्या गोष्टी सांगितल्या आहेत. शिवकल्याण (शके १५५७) याची ज्ञानेश्वराच्या अमृतानुभवावरील नित्यानंदैक्यदीपिका नांवाची टीका उत्कृष्ट आहे. भागवताच्या दशमस्कंदावर सुमारे एक लाख ओव्यांचा यानें एक प्रचंड ग्रंथ लिहून कृष्णलीलांचा परमार्थपर अर्थ लाविला आहे. रास पंचाध्यायी, ब्रह्मस्तुति, वेदस्तुति, इत्यादि त्याचीं इतर प्रकरणें ओवीवृत्तांत असून रसाळ आहेत. रमावल्लभदास (मूळचें नांव तुकोपंत) यांची गीतेवरील चमत्कारी टीका (शके १५५८) दशकनिर्धार (शके १५५५) प्रबोधचंद्रिका, वाक्यवृत्ति इत्यादि रचना असून ती सुबोध आहे. यांची परंपरा हल्ली गोमंतकाकडे आहे. पैठणच्या विष्णुदासनामा यानें वीस हजार ओव्यांचें संपूर्ण महाभारत रचलें आहे. मराठी भाषेंत अठरा पर्वें महाभारत लिहिणारा हा पहिलाच ग्रंथकार दिसतो. यानें 'बुधभावनी' व 'कपोत आख्यान' अशीं आणखी दोन प्रकरणें लिहिलीं आहेत. यानें उत्तरायुष्यांत

महानुभाव पंथ स्वीकारल्याची आख्यायिका आहे. पैठणच्या कृष्णदास मुद्गल यानें रामायणांतील युद्धकांडावर दहा हजार ओव्यांचें महाकाव्य तयार केलें असून, एका काळीं किल्ल्याकिल्ल्यांवर त्याचीं पारायणें होत असत. या ग्रंथाच्या पारायणानें अंगीं युद्धसामर्थ्य येऊन यश येतें अशी समजूत होती. कृष्णदास मुद्गलाच्या भाषेंत ओजस्विता व कवित्व भरपूर असून त्याचें शब्द-भांडारहि मोठें आहे. नाशिक क्षेत्रींच्या रंगनाथ मोगरेकरानें गीतेवर चित्सदानंदलहरी नांवाची अकरा हजार ओव्यांची टीका लिहिली असून, ती बरीचशी ज्ञानेश्वरीला धरून आहे. शंकराचार्यांच्या सोपानपंचकावरहि यानें दोन हजार ओव्यांची टीका मराठींत केली आहे. रंगनाथ निगडीकरानें योगवासिष्ठसार (शके १५८४) नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. नाशिक जिल्ह्यांतील कृष्ण याज्ञवल्की (सुमारे शके १५००) व मधुकर कवि या दोघांनीं मिळून कथाकल्पतरु (शके १५४५) नांवाचा सुमारे चाळीस हजार ओव्यांचा ग्रंथ लिहिला आहे. यांत भारत, भागवत व इतर पुराणें यांतील कथा मनसोक्तपणें सांगितल्या आहेत. यांतील पूर्वार्ध कृष्ण याज्ञवल्कीचा असून उत्तरार्ध मधुकर कवीचा आहे. जुन्नरच्या लोलिंबराजानें (शके १५०० ते १५७०) वैद्यजीवन व रत्नकलाचरित्र हीं काव्यें रचिलीं आहेत. खानदेशांतील महालिंगदास (शके १४४७ ते १४८६) यानें अश्वचिकित्सा किंवा शालिहोत्र नांवाचा अश्वपरीक्षेवर ग्रंथ लिहिला असून त्याशिवाय सिंहासनबत्तिशी (१४८७), वेताळ पंचविशी (१४८६), पंचोपाख्यान इत्यादि पद्यमय कथाग्रंथ रचिले आहेत. याचाच चाणक्यनीति नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. प्रेमदास या कवीनें कालगणना या विषयावर 'मूळस्तंभ' नामक ग्रंथ लिहिला असून, नरसिंह कवीनें 'सामुद्रिक' शास्त्रावर ग्रंथ-रचना केली आहे. एकनाथाच्या काळीं धर्मेतरहि कांहीं ग्रंथ तयार होत होते त्याचा हा पुरावा म्हणतां येईल.

आणखी एका ग्रंथाचा उल्लेख केल्यावांचून एकनाथाच्या काळाचें स्वरूप पूर्णपणें लक्षांत येणार नाहीं. हा ग्रंथ सुप्रसिद्ध गुरुचरित्र (शके

१४८० सुमारे) होय. याच्या लेखकाचें नांव सरस्वति गंगाधर साखरे (जन्म सुमारे शक १४५०) हें होय. या ग्रंथांत श्रीपाद वल्लभ व नृसिंह सरस्वति (शके १३८० सुमारे) यांच्या लीला व इतर तात्त्विक विवेचन आलें आहे. याची ओवीसंख्या सात हजार असून अध्यायसंख्या त्रेपन्न आहे. गेलीं चारशे वर्षें झालीं या ग्रंथावरील महाराष्ट्रीयांचें प्रेम व आदर यांना सारखी भरतीच येते आहे. एकनाथांच्या भारुडांवरून जशी तत्कालीन हिंदुमुसलमान मिश्र संस्कृतीची व अठरा पगड जातीची कल्पना येते, तशीच प्रस्तुत ग्रंथावरूनहि येते. यवन, शवर, रजक, मांग, वैश्य, ब्राह्मण, वेश्या इत्यादिकांच्या ज्या कथा गुरुचरित्रांत आल्या आहेत, त्यांवरून हिंदुमुसलमानांना व हिंदूंतील सर्व जातींना समत्वाच्या एका धाग्यानें बांधण्याचा प्रयत्न कसा करण्यांत आला आहे तो दिसतो. दत्तसंप्रदायांतील लोकांना हा ग्रंथ केवळ कल्पतरुप्रमाणें वाटतो.

याच काळांत मराठीभाषेचें व लिपीचें रूप बरेंच पालटलें. बारावें शतकापर्यंत महाराष्ट्रांत पृष्ठ मात्रेचा प्रचार पुष्कळ होता. या काळांत मात्रा अक्षराच्या मागें न देतां, डोक्यावर देण्याचा प्रघात सुरू झाला. पळसदेवाच्या शिलालेखांतील तीन शून्यांची ई, त्रिकोणी ए, तीन उभ्या रेघांचा ण हीं अक्षरें आतां अगदींच मागें पडलीं. जेया, तेया, यांचेंबद्दल जया, तया हीं रूपें आलीं. म्हणौनि, वाचौनि, करौनि हीं धातुसाधित अव्ययेंहि मागें पडलीं. आथिचिना, होंति नेदखे, पूजिजति वगैरे क्रियापदें नाहींशीं होऊं लागलीं. चौदाव्या शतकांतील कुप्रसिद्ध दुर्गादेवीच्या दुष्काळामुळें महाराष्ट्रांतील बरेच लोक उत्तरेकडे व दक्षिणेकडे गेले. दुष्काळ संपल्यावर ते जेव्हां परत आले, त्या वेळीं त्यांनीं आपल्याबरोबर कांहीं खेळांचे प्रकार व तदनुषंगानें कानडी, तेलगु, व्रज वगैरे भाषांतील अनेक शब्दहि आणिले. "औडक चौडक दामाडू। दामाडूचे पंचाडू," "आटकमाटक चन्ने चाटक," "अडगुल मडगुलं सोन्याचं कडगुलं," वकट–लेंड–मुंड–नार इत्यादि खेळांत व खेळांच्या परिभाषांत कानडी–तेलगु वगैरे

भाषांचें रूप मराठींत प्रतिबिंबित झालेलें आढळतें. याच कालखंडांत फारसी भाषेचाहि पुष्कळच परिणाम मराठी भाषेवर झाला. देवगिरीचें राज्य नाहींसें होतांच मुसलमानांची सत्ता इकडे प्रबळ होऊन, तिचा भाषेवर खूपच परिणाम झाला. राजसत्ता मुसलमानी असल्यामुळें सरकार दरबारांत फारशी भाषा सुरू झाली व हळुहळू सरकारी कामासंबंधीचे सर्व कागदपत्र फारशींत राहू लागले. 'महाराष्ट्र सारस्वतकार' म्हणतात त्याप्रमाणें अर्जदारांच्या फिर्यादी काजीपुढें जाऊन त्यांचा फैसला किंवा इनसाफ होऊ लागला. गडकऱ्यांचे नाईक, पायीक, पाटील हे जाऊन त्यांच्या ऐवजीं किल्लेदार व हवालदार आपल्या शिलेदार जमादारांसह फौजेचा अमल करू लागले. जे सुखवस्तु लोक होते व ज्यांचा राजकीय बाबींशीं संबंध नव्हता त्यांचे येथें देखील मेजवान्यांच्या वेळीं आतषबाजी होऊं लागली व मेवामिठाई व गुलाबी अत्तर हीं त्यांना लागूं लागलीं. पूर्वी संबळ, पांवा, टिमकी हीं वाद्यें पुरत. त्यांची जागा ताऊस, ढोल, ताशे व मर्फे यांनीं घेतली व साखरभाता-सारख्या मुसलमानांची नक्कल केलेल्या पक्वान्नाचा इकडील खाद्यपदार्थांत प्रवेश झाला. राज्यकर्त्यांची भाषा सफाईनें लिहिणें व बोलणें ही एक थोरपणाची व अभिमानाची गोष्ट वाटू लागून वरच्या दर्जाचें लोक मुसलमानी भाषेचा अभ्यास जोरानें करूं लागलें. यामुळें त्यांच्या मराठी वाक्यांची रचना फारशी भाषेंतल्या वाक्यांच्या लकबीवर जाऊ लागली. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १५ लेखांक ३६७ च्या पुढील उताऱ्यावरून फारशी भाषेची छाप शके १५१९ च्या सुमारास मराठीवर किती पडली होती तिची कल्पना येईल :—अज रखतखाने राजश्री बाबाजी राजे भोसले दामदौलतहू बिजानेबु काकुनानी हाल व इस्तकबाल व मोकदमानी कसबे पेडगौऊ पा पाडपेडगौऊ बिदानद सुा समान तिसैन व तिसामया दरवज इनाम बदल धर्मादांऊ वे ॥

रामेस्वरभट बिन नारायणभट चिंतामणीभट बिन बाळंभट सेकिन आरवी मुदगल हर्ची जमीन दर सवाद प्रज रामजी चिखलठाणा गजशरायनी

चावर सवा एदमो नखतयाती व महसुलु कुलबाब कुलकानू दिधले असे दुमालो कीजे अवलादी अफलादी चालो दीजे दर हर साल खुर्दखताचा उजूर न कीजे तुम्ही तालीक घेऊनु असेली खुर्दखत इनामदार मजकुरापासी दीजे मोर्तबु


तेरीख २५

माहे जमादिलोवलु माहे जमादिलोवलु[1]

अशा रीतीनें सर्व सृष्टि जरी तुर्की पेहराव पेहरल्यासारखी झाली होती, तरी देखील गोंधळ, कथा, कीर्तनें वगैरे सारख्या घरगुती बाबतींत व धर्म-ग्रंथांत मराठी भाषा बरीच निर्मळ राहिली. मंत्रतंत्र, जादुटोणे यांसंबंधींचीं टिपणें, औषधोपचाराच्या नोंदी व बाडें ही निर्भेळ मराठींत लिहिलीं जात. औषधी ग्रंथांत विष्टल गलांडूच्या रसरत्नदीपाची (शके १४००) भाषा शुद्ध मराठीच आहे. गायकांनीं आपलीं गाणीं, ओव्या, काहाण्या, भूपाळ्या, आरत्या यांचा वेष अस्सल मराठीच चालू ठेवला.

---

१ हिजरी सन ९९८ च्या प्रस्तुत धर्मादाय इनामपत्रांत बाबाजी राजे भोंसले यांनीं आपल्या वर्तमान व भावी कारकुनांना व मुकादमांना बजावले आहे कीं, रामेश्वरभट बिन नारायणभट व चिंतामणभट बिन बाळंभट यांना कोणत्याहि प्रकारचा अडथळा न आणतां त्यांचेकडे इनाम चालू ठेवावें व मूळ खूर्दखत इनामदारांना द्यावें. या इनामपत्रांत साकिन (राहणारा) अव्लादअफ्लाद (वंशपरंपरा) रख्तखाना (कचेरी) अज (पासून) बजानब (कडे) दामदौलतहू (त्याचे राज्य चिरायु असो) बिदानंद (जाणोत) हाल व इस्तकबाल (विद्यमान व भावी) बिन (पुत्र) इत्यादि शब्द फारसी आहेत.



मुक्तेश्वर[1]

मुक्तेश्वरांनीं आपले सुप्रसिद्ध आजोबा एकनाथ यांची आख्यानक-कवितारचनेची परंपरा पुढें चालवून, तिची यशस्वी वाढ केली. एकनाथांनीं भावार्थ रामायण, रुक्मिणीस्वयंवर, ध्रुव, प्रल्हाद, उपमन्यु, सुदामा इत्यादि कथानकपर किंवा आख्यानक काव्यें लिहून तीं चांगलीं लोकप्रिय बनविलीं होतीं. मुक्तेश्वरांनीं त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून आपली कविता लोकादरास पात्र केली. त्यांनीं संक्षेप रामायण, मुक्तेश्वरी भारत, हरिश्चंद्राख्यान, शतमुख-रावणवधाख्यान, शुकरंभासंवाद, श्रीएकनाथचरित्र इत्यादि कथामूलक काव्यें रचून, पौराणिक कथा आबालवृद्धांच्या आवडीच्या बनविल्या. मुक्तेश्वरी काव्य त्याच्या रचनाकालापासून आजतागायत उत्तम काव्याच्या सदरांत पडत आलें आहे. "श्रीमुक्तेश्वर कविवर यातें कोण न शुभेच्छु वंदील। बंदी लक्ष जयाचें, यश ज्याचें भव्य जेंवि मंदील." असें कविवर्य मोरोपंतांनीं आपल्या सन्मणीमालेंत मुक्तेश्वरांविषयीं जें म्हटलें आहे, त्यावरून रसिकांच्या उड्या मुक्तेश्वरी काव्यावर किती व कशा पडत असत हें

---

१ मुक्तेश्वरांच्या निश्चित् जन्म, मृत्यु, गृहस्थिति, शिक्षण वगैरे माहितीचा अभाव आहे. त्यांचा अंदाजी जन्मकाल शके १५२१ असून मृत्युकाल शके १५७१ आहे. एकनाथांच्या गोदा नांवाच्या मुलीचा हा मुलगा. बापाचे नांव चिंतामणी शास्त्री. मुक्तेश्वरांचें खरें नांव मुद्गल. स्वतःच्या इष्टदेवतेचें नांव मुक्तेश्वर हें त्यांनीं पुढें स्वतःचें टोपण नांव म्हणून धारण केलें. लीला विश्वंभर ऊर्फ दत्तात्रेय हेच त्यांचे गुरु. लीला विश्वंभर म्हणजे मुक्तेश्वरांचे आईबाप असें जें मानण्यांत येई तें निराधार असल्याचें अ. का. प्रियोळकर यांनीं आपल्या मुक्तेश्वरकृत आदिपर्वाच्या अधिकृत प्रतींत दाखविलें आहे. मुक्तेश्वर राहणारे पैठणचे परंतु त्यांचे वंशज तेरवाड (कुरूंदवाडजवळ) राहतात. मुक्तेश्वरांचें वृंदावन तेथेंच नदीकांठीं आहे.

कळून येतें. लालित्यपूर्ण, भावपूर्ण, प्रासादिक परंतु आकर्षक काव्य कसें रचावें याचा नमुना म्हणजे मुक्तेश्वरी काव्य होय. काव्य रचनेपासून एखाद्या कवीला आनंद होत असला, त्यांतील कलाविलास, स्वभावरेखन, प्रसंगवर्णन यांनीं तो खुलत असला म्हणजे विषय पौराणिक कां असेना, त्याचें काव्य लालित्यपूर्ण व प्रासादिक बनतें. काव्य रचीत असतांना मुक्तेश्वरांच्या मनाची अशीच स्थिति असावी. पौराणिक काव्यरचनेनें स्वतः कवीला व वाचकाला काय पुण्य मिळावयाचें असेल तें मिळेल. परंतु मुक्तेश्वरांचा त्या गोष्टीवर भर नाहीं. "मुक्तेश्वर कवीची वाणी । नवरसरसें सुगरणी । तृप्त करी सुख भाजनीं । श्रवणद्वारें संतांते (विराटपर्व १००-२)" यांत म्हट-ल्याप्रमाणें नवरसात्मक काव्य रचण्याकडेच त्यांचा ओढा विशेष होता. याचमुळें त्यांच्या काव्यांत अध्यात्माची खटपट वा तत्त्वज्ञानाची रुक्ष चर्चा हीं नसून रसात्मक कथाच प्रामुख्यानें आढळतात. मोरोपंत शब्दांशीं खेळ-ण्यांत—क्वचित् कसरत करण्यांतहि—धन्यता मानीत. मुक्तेश्वर भावनांशीं खेळण्यांत कृतार्थता मानीत. मुक्तेश्वरी ओव्या साध्या पण मनोहर बनल्या आहेत याचें हेंच कारण होय. संस्कृत न जाणणाऱ्या बहुजनसमाजाकरितां आपण देशभाषेंत काव्य करीत आहोंत, याची जाणीव मुक्तेश्वरांनीं सतत ठेविल्यामुळें त्यांची कविता सुलभ तसेंच सुरस झाली आहे.

मुक्तेश्वरांच्या सर्व काव्यांत त्यांचे भारत अत्यंत लोकप्रिय आहे. मुक्तेश्वरी भारतापूर्वी नवरसी नारायणकृत महाभारत, विष्णुदासनामा याचें महाभारत हीं लोकांच्या माहितीचीं होतीं. तथापि तीं कांहीं रसिकांच्या आदरास पात्र झालीं नाहींत. मुक्तेश्वराचे भारत मात्र तयार होतांच त्याचें अपूर्व स्वागत झालें. असलें स्वागत पुढें मोरोपंतांच्या आर्याभारताचें झालें. परंतु भावनोत्कटता व साधेपणा या दृष्टीनें मोरोपंतांच्या भारतापेक्षां मुक्ते-श्वरांचें भारतच श्रेष्ठ ठरेल. "मोरोपंतांपेक्षां मुक्तेश्वराच्या काव्यांत ईश्वरी-प्रसाद ज्यास्त दृष्टीस पडून त्याची काव्यप्रतिभा तप्तसुवर्णप्रतिमेप्रमाणें सर्वत्र उज्ज्वल दिसते. मुक्तेश्वरी भाषा साधी गोड व सरळ आहे. पंतांची

ऐटदार, पांचापेचांनीं भरलेली व खुबीदार आहे...मुक्तेश्वराचें काव्य द्राक्षापाकाच्या वर्गांत मोडणारे असून पंतांचें काव्य नारिकेलपाकाच्या वर्गांत मोडेल...खेड्यांतल्या श्रीमंत पाटलाची शहाणी आणि भावार्थी बायको आणि शहरांतल्या साधारण कारकुनाची हुशार आणि पक्की वस्ताद बायको ह्यांच्यामध्यें जें अंतर असतें, तें मुक्तेश्वर व मोरोपंत यांच्या काव्यांत दिसून येतें"—असें जें कै. प्रो. श्रीधर विष्णु परांजपे यांनीं म्हटलें आहे तें सर्वस्वी योग्य आहे. मोरोपंतांचें लक्ष शब्दचमत्काराकडे असे तर मुक्तेश्वरांचें अर्थमाधुर्याकडे.

मुक्तेश्वरी भारतापैकीं आदि, सभा, वन, विराट, सौप्तिक व शांति हीं सहाच पर्वें उपलब्ध असलीं तरी त्यांवरून मुक्तेश्वरी काव्याची योग्यता उत्तम प्रकारें अजमावितां येते. "मुक्तेश्वर कवीची वाणी। व्यासाश्रयें चामके (वनपर्व ९०-२)" असें कवि स्वतः म्हणत असले, तरी अगदीं स्वतंत्र वाटेल अशा पद्धतीनें त्यांनीं आपल्या भारताची रचना केली आहे. अनेक ठिकाणीं त्यांनीं व्यासांच्या कथांना अजिबात काट दिला आहे किंवा त्या अत्यंत संक्षेपानें सांगितल्या आहेत. उदाहरणार्थ मूळांत वनपर्वाचे ३१५ अध्याय असून, त्यांचा सारांश मुक्तेश्वरांनीं अवघ्या १८ अध्यायांत आणिला आहे. सुदेव पुरोहितानें दमयंतीला तिच्या दोन भुवयांमध्यें असलेल्या रक्तवर्ण तिळावरून ओळखिली असें मुळांत वर्णन आहे. मुक्तेश्वरांनीं तिच्या कपाळावर असलेल्या अमूल्य मण्यानें सुदेवानें तिला ओळखिली असें वर्णन केलें आहे. मुळांतील मार्कंडेय समस्यापर्वाच्या १८२ ते २३२ अध्यायांची बोळवण मुक्तेश्वरांनीं अवघ्या तीन ओव्यांत केली आहे. अष्टावक्र, श्येनकपोती, सोमक, च्यवन, सागर इत्यादि कथा त्यांनीं अजिबात गाळल्या आहेत. द्रौपदीचा धावा ऐकून कृष्ण शय्येवर रुक्मिणीला सोडून उठला असें मुळांत वर्णन आहे. परंतु मुक्तेश्वरांनीं तो जेवत असतांना उठला असें धिटाईचें वर्णन केलें आहे. याशिवाय अनेक ठिकाणीं अगदीं स्वतंत्र वर्णनें त्यांनीं केलीं आहेत. नलोपाख्यानपर्वांतील

नलदमयंतीचीं वर्णनें अत्यंत बहारीचीं व स्वतंत्र आहेत. काम्यकवनांतील भोजनाचें वर्णन असेंच सरस व स्वतंत्र आहे. मुक्तेश्वरी भारतांत जागोजागीं आलेलीं सृष्टिसौंदर्याचीं वर्णनें मनोरम आहेत. जुन्या मराठी कवितेंत निसर्गाचीं वर्णनें नाहींत, असें म्हणणाऱ्यांनीं महानुभाव कवि नरेंद्र व कविवर्य मुक्तेश्वर यांचीं काव्यें वाचल्यास त्यांचा भ्रमनिरास होईल. मुक्तेश्वरी वर्णनांत एकच दोष आहे आणि तो म्हणजे कालविपर्यासाचा: स्वतःच्या काळांतील युद्धरीति त्यांनीं भारतकालांत लागू केली आहे. दुष्यंतराजाच्या अमलाखालील लोकांत त्यांनीं इंग्रज, फिरंगी, हबशी यांचा समावेश केला आहे. ऋतुपर्ण राजाकडून भास्कराचार्यांच्या लीलावतीच्या आधारें वृक्षांच्या पानांची गणना करविली आहे तर जीमूतवाहनाचा पांडवांच्या काळीं उल्लेख केला आहे. या दोषांवरून मुक्तेश्वरांच्या काळांतील परिस्थितीवर प्रकाश पडत असला, द्रौपदीवस्त्रहरणासारख्या प्रसंगीं महाराष्ट्रांतील अनेक पेठांचीं वस्त्रें वर्णन करण्यांत त्यांचा चौकसपणा दिसत असला, तरी ते दोषच होत.

मुक्तेश्वरी भारतांत अनेक आख्यानें केवळ अपूर्व आहेत. आदिपर्वांतील दुष्यन्तशकुंतलाख्यान, वनपर्वांतील नलदमयंती आख्यान व सावित्री-आख्यान, सभापर्वांतील जरासंधवधाख्यान व वस्त्रहरणप्रसंग हीं काव्यदृष्ट्या बहारीचीं आहेत. यांतील पात्रांचें स्वभावरेखन, रसपरिपोष अध्यायांचे आकर्षक व भावनोत्कट शेवट व इतर वर्णनें हीं उत्तम साधलीं आहेत. द्रौपदी, शकुंतला, दमयंती इत्यादि स्त्रियांचीं मुक्तेश्वरांनीं काढिलेलीं शब्दचित्रें केवळ अविस्मरणीय आहेत. वनपर्वांत धर्मराजाच्या साधुवृत्तीची हजेरी द्रौपदीनें पुढील शब्दांत घेतली आहे:—जेणें पाविजे परम दुःख । काय ते साधुवृत्तीचें सुख । धैर्य उपहासिती लोक । म्हणती दीनें अशक्तें ॥ टाकिशी रायाचे धर्म । तोचि रायाते अधर्म । शांतीनें क्लेश परम । कुटुंबेंसी भोगिसी ॥ व्यवहारीं शांति नये कामा । परमार्थ क्रोध नाशो धर्मा । जेथें ज्याचाचि महिमा । तें तेथेंचि योजावें ॥ उर्वशीच्या प्रलोभनांना दाद न

देणाऱ्या अर्जुनाचें स्वभावरेखन असेंच चांगलें झालें आहे. अलंकारांच्या दृष्टीनें पाहतां मुक्तेश्वरांनीं मारवाडी स्त्रिया ज्याप्रमाणें स्वतःचें सर्व शरीर अलंकारांनीं मढवून विरूप करतात तसें आपल्या काव्याचें केलेलें नाहीं. योग्य ठिकाणीं व अगदीं माफक व सुंदर दिसतील अशा तऱ्हेनें त्यांनीं मुख्यतः अर्थालंकारांची योजना केली आहे. हे सर्वच अलंकार रमणीय आंहेत. पुढील चार दोन अलंकारांवरून त्यांचें स्वरूप लक्षांत येईल.

परिमळांमाजी कस्तुरिका । पुष्पांमाजी नवमल्लिका । तेंवी दमयंती नरनायका । आवडली हृदयपद्मीं ॥ तेंवी दमयंती नागपद्मिनी भूपवृक्षांतें अव्हेरुनी । नैषधराजहरिचंदनीं । वेंटाळिली मानसे ॥ न्याहाळुनी पाहतां नयनीं । भैमी वोळखिली लक्षणीं । प्रपंचनिष्ठांमाजी ज्ञानी । आत्मनिष्ठ वोळखे ॥ वातें सारोनी अंबरा । जेंवी लक्षिजे भार्गवतारा । तेंवी वारुनी कबरीभारा । रत्नमणी देखिला ॥ कश्यपारण्याचे पुढील वर्णनहि किती सुंदर आहे पाहा :— तेथें चंदन पारिजात । देवदार केतकी सुपुष्पित । तुळसीवनें सुशोभित । दवनें वनें घमघमिती ॥ सरिता सरोवरिचीं पैं जळें । पद्मगंधें सुशीतळें । रातोत्पळें नीळोत्पळें । सीतोत्पळें कनकाचीं ॥ तेथें राजहंस कारंडक । चकोर सारस चक्रवाक । करींद्र करिणी करिशावक । स्वेच्छा करिती जळक्रीडा ॥ सदा सर्वदा पुष्पी फळीं । वृक्षलवती भूमंडळीं । जैसा कुळीन ऐश्वर्यकाळीं । विनयें भजे सर्वांते ॥ असल्या सरस काव्य-स्थळांना उद्देशूनच हरि नारायण आपटे म्हणतात, "ज्यांस विद्वत्त्व आणि कवित्व यांचें मिश्रण पाहावयाचें असेल त्यांनीं वामन पंडित व मोरोपंत यांचे ग्रंथ पहावे. रसपरिपाक, वर्णन-सौंदर्य व भाषेची अव्याजमनोहरता ज्यांस हवी असेल, त्याचें मन रंजविण्यास मुक्तेश्वर तयार आहेत... निसर्ग मनोहर अशा युवतीच्या दर्शनानें जो आनंद होतो, तो आनंद मुक्तेश्वराच्या काव्यापासून होतो."

रसाळ वाणी व उत्कृष्ट कवित्वशक्ति अंगीं असून मुक्तेश्वर अत्यंत विनयशील होते. पुढील ओव्यांवरून हा मुद्दा चांगला लक्षांत येईल :—

मुक्तेश्वर विनवी संतां। कृपाहस्त ठेऊनि माथां। शिकवाल तशी बोलूं कथा। शुकसारिके सारखी ॥ अंजळी ओढवी सिंधूदका। ब्रह्मांड उचलूं म्हणे अलिका। तुम्ही कराल तरी होय निका। तोच अगस्ती कीं शोष ॥ मुक्तेश्वराची मनोआर्ती। कोरान्न मागे संतांप्रती। अवधान स्नेहाचिया हातीं। स्वल्पमुष्टि न धरावें ॥

मुक्तेश्वरांचें मराठी भाषेवरील किंवा ते म्हणतात त्याप्रमाणें देशभाषेवरील प्रेमहि विलक्षण होते. संस्कृत पंडितांनीं भरलेल्या प्रतिष्ठान उर्फ पैठणसारख्या शहरांत राहूनहि त्यांनीं मराठीचा आदर बाळगला हें विशेष होय. आपलें मराठी काव्य संस्कृतच्या तोडीचे आहे असा आत्मविश्वास त्यांचा होता. म्हणूनच ते म्हणू शकले कीं, "व्यासवचन इक्षुदंडु। गाळूनि सुरस सारांश गोडु। देशभाषा वळिले लाडु। नाचदेचे आवडी ॥ ते जैसे सुज्ञी न सेवणें। तें आग्रहावांचूनि काय म्हणणें। कळंकरेखेस्तव चांदणें। काय चकोरीं वाळिजे ॥ व्यास ग्रंथगिरीचें सोनें। संस्कृत खोटिये गाळूनि मनें। देशभाषा घडिलें लेणें। साहित्यरत्नीं सुजडित ॥ तें लेववितां कर्णभूषण। कांहो परते करावे कान। श्रोते हो तुम्ही विचक्षण। निर्मत्सर विचारा." पैठणस्थ पंडितांनीं मुक्तेश्वराच्या काव्याकडे कदाचित् कानाडोळा केला असला, तथापि इतरांनीं तसें केलें नाहीं, हें मोरोपंतांच्या यावूर्वीच आलेल्या अवतरणावरून कळेल. मुक्तेश्वरांच्या काव्याकडे मराठीभाषाभिमानी तो एक अमूल्य ठेवा आहे या दृष्टीनेंच पाहत आले आहेत व पुढेंहि पाहतील.

८

तुका म्हणे-

देहूच्या तुकाराम[१] महाराजांना जाऊन आज तीनशेच्यावर वर्षें झालीं असलीं, तरी ते महाराष्ट्रांतील बहुजनसमाजाच्या गळयांतील केवळ ताईत बनले आहेत. याचीं कारणें अनेक आहेत. ते बहुजनसमाजापैकीं एक होते. 'याती शूद्र' असें ते स्वतःच्या जातीविषयीं सांगतात. त्यांचा धंदा वाण्याचा होता. असें असून सामान्य व्यवहारापलीकडे असलेल्या भक्तीचे आणि वेदांताचे ते धनि बनले. वामन पंडितांनीं त्यांच्या चाबतींत म्हणूनच असें म्हटलें आहे कीं, "जयाची वदे पूर्ण वेदान्त वाणी, कसें हो म्हणावें तयालागीं वाणी ? परब्रह्मरूपीं असा हा तुकावा, तयाचे तुकीं कोण दूजा तुकावा ?" हिंदुस्थान देशांत दोन वाणी विशेष प्रसिद्धीस आले. एक महाराष्ट्रांतील तुकोबा व दुसरे सौराष्ट्रांतील महात्मा गांधी. मनुष्याचा मोठेपणा हा त्याच्या जातीवर मुळींच अवलंबून नाहीं हें दोघांनींहि सिद्ध केलें. प्रपंचांत रममाण झालेल्यांना परमार्थाची गोडी तुकोबांनीं लाविली. प्रपंच म्हणजेच सर्वस्व मानणाऱ्यांना देशहिताची दिशा गांधीजींनीं दाखवून दिली. जो नर करनी करे, तो नरका नारायण होय, ही म्हण तुकाराम महाराजांनीं अक्षरशः खरी करून दाखविली. त्याकरितां त्यांना कष्टसायास थोडे पडले असें नाहीं. अभ्यासीं नसलेलें चित्त त्यांना अभ्यासांत गुंतवावें लागलें, संतांचे ग्रंथ पाहावे लागले, कीर्तन करणाऱ्याच्या मागें उभे राहून ध्रुपद धरावें लागलें, संतांचा सहवास करावा लागला, आप्तेष्टांचे बोल सहन करावे लागले, सनातन्यांकडून होणारा छळ सहन

---

१ जन्म-माघ वद्य ५ मी गुरुवार शके १५२०; मृत्यु-फाल्गुन वद्य २ शनिवार शके १५७१ (?) देहू येथें.

करावा लागला, स्वतःचे ग्रंथ इंद्रायणींत बुडवावे लागले, अशा एक कीं दोन, शेंकडो कसोट्यांना त्यांना उतरावे लागले. साहजिकच त्यांच्या तोंडीं पुढील उद्गार शोभतात :—साधूनीं बचनाग खाती तोळा. तोळा । आणिकातें डोळा न पाहवे ॥ साधूनी भुजंग धरितील हातीं । आणिकें कांपती देखोनियां ॥ असाध्य तें साध्य करितां सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ॥ सामान्य वाण्याचे परम भगवद्भक्त व संतशिरोमणि तुकोबा बनले म्हणून लोकांच्या आदरास ते विशेष प्राप्त झाले. ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदासादि संतांना त्यांच्या उच्च कुळांतील जन्मापायीं ज्ञानाच्या ठेव्यापैकीं बराच भाग जो सहजीं प्राप्त झाला होता, तसा तुकोबांना झाला नव्हता. स्वप्रयत्नानें त्यांना ज्ञान मिळवावें लागले.

संसारी लोकांनाहि तुकाराम महाराज जवळचे वाटतात. याचें कारण त्यांच्याप्रमाणें तेहि संसारी होते. 'बहु पीडिलों संसारें', 'संवसारें जालों अतिदुःखें दुःखी', 'त्रासला हा जीव संसारींच्या सुखा' असें जें तुकोबांनीं संसाराविषयीं स्वानुभवावरून म्हटलें आहे, तशा प्रकारचे उद्गार मनांतल्या मनांत हजारो लोक काढीत असतात. संसाराच्या दुःखांनीं कंटाळल्यामुळें तुकाराम महाराजांनीं तिकडे उदासीनपणानें पाहण्याचा निश्चय करून पांडुरंगाचे सख्य संपादन केलें. नारायणाचा त्यांना ध्यास लागला. शाश्वत सुखाचे ते उपासक बनले. शेवटीं त्यांना ईश्वरी साक्षात्कार झाला. ते सदेह वैकुंठाला गेले. आपल्या देशांतील बहुसंख्य असे जे संसारी लोक आहेत, त्यांचा ओढा परमार्थाकडे विशेष आहे. शेंकडों वर्षांची त्यांना तशी शिकवण आहे. नरजन्मा येऊनी देहाचें सार्थक्य करण्याचा म्हणजे ईश्वराची प्राप्ति करून घेण्याचा उपदेश त्यांना शतकानुशतकें मिळत आला आहे. हा उपदेश तुकोबांनीं, संसारी तुकोबांनीं, प्रत्यक्ष अंमलांत आणून दाखविल्यानें, त्यांच्या मार्गानें आपण गेलों असतांना आपणालाहि भगवद्प्राप्ति होईल असे बहुतेक संसारी लोकांना वाटते. आणि त्याचमुळें तुकोबांविषयीं त्यांना विशेष आपुलकी वाटते.

बहुजनसमाजाला व गृहस्थाश्रमी लोकांना पेलेल असा ईश्वरप्राप्तीचा मार्ग तुकाराम महाराजांनीं दाखविला, हेंहि त्यांच्या लोकप्रियतेचें एक कारण आहे. परमेश्वर हा भक्तिसाध्य आहे, त्याच्या प्राप्तिकरितां वेदाध्ययन, पुराणश्रवण वगैरे कांहीं नको, फक्त भक्ति हवी, असें त्यांचें सांगणें असे. 'एक भावचि कारण देवा,' 'कासया पाषाण पूजिती पितळ, अष्टधातु खळ भावेंविण ?' 'भावचि कारण भावचि कारण, मोक्षाचे साधन बोलियेलें,' 'युक्ताहार न लगे आणिक साधनें, अल्प नारायणें दाखविलें; कलियुगामाजीं करावें कीर्तन, तेणें नारायण देईल भेटी,' 'नाम घेतां उठाउठी, होय संसारासी तुटी,' 'नामसंकीर्तन साधन पैं सोपें, जळतील पापें जन्मांतरिंचीं. नलगे सायास जावें वनांतरा, सुखें येतो घरा नारायण; ठायींच बैसोनी करा एकचित्त, आवडीं अनंत आळवावा; रामकृष्ण हरि विट्ठल केशवा, मंत्र हा जपावा सर्वकाळ; याहूनि आणिक नाहीं पैं साधन, वाहतसे आण विठोबाची।' इत्यादि शेंकडो वचनांत ईश्वर प्राप्तीचा सोपा मार्ग त्यांनीं दाखविला आहे. ज्ञानेश्वर नामदेवांच्या काळापासून चालत आलेल्या भागवतधर्माचा किंवा भक्तिमार्गाचा प्रसार तुकाराम महाराजांनीं खूपच केला. पंढरपूरच्या पांडुरंगाची वारी करणाऱ्या वारकऱ्यांचा संप्रदाय त्यांच्याच मुळें विशेष लोकप्रिय झाला. संसारांत राहूनहि पूर्णपणें वैराग्य अंगीं आणतां येतें, ही शिकवण त्यांनीं स्वतःच्या उदाहरणानें लोकांना दिली. संसारांत असतांना उदासपणें, अलिप्तपणें राहतां आलें म्हणजे आत्मोन्नति सुलभतेनें करून घेतां येते हें त्यांनीं स्वतःच्या वागणुकीनें लोकांना पटवून दिलें. संसार न सोडतांना तो सुखाचा कसा करतां येईल याविषयीं 'जोडोनियां धन उत्तम वेव्हारें। उदास विचारें वेचकरी' असा सोपा इलाज त्यांनीं सुचविला आहे.

तुकारामबोवांनीं जे अभंग रचिले, लोकांना जो उपदेश केला, तो लोकांना परिचित असलेल्या भाषेंत व लोकांना अडचणीसारख्या वाटणाऱ्या गोष्टींसंबंधानें केला. बहुजनसमाजाला बहुजनसमाजाच्या भाषेंत

स्वतःच्या दुःखांतून बाहेर कसें पडावें हें सांगणारा संतकवि तुकारामांच्या रूपानें मिळाला. शुद्ध बीजा पोटीं । फळें रसाळ गोमटीं ॥ बोलाचीच कंढी बोलाचाचि भात। जेवूनिया तृप्त कोण झाला ?॥ कोणी वंदा कोणी निंदा। आमुचा स्वहिताचा धंदा ॥ बोले तैसा चाले । त्याची वंदावीं पाउलें ॥ नाहीं निर्मळ जीवन । काय करील साबण ॥ नीचपण बरवें देवा । न चले कोणाचाहि हेवा ॥ तुका म्हणे तोचि संत । सोसी जगाचे आघात ॥ इत्यादि शेंकडो अभंगांच्या ओळींतून लोकांना हरघडी जे प्रश्न पडत व पडतात, त्यांचीं उत्तरें अगदीं सोप्या पण वेंचक शब्दांत तुकोबांनीं दिल्यानें, आज तीन शतकें झालीं लोकांच्या जिव्हाग्रीं व त्यांच्या हृदयांत ते बसले आहेत. तुकाराम बोवा हे व्यवहारांत गुंतले नसले, तरी व्यवहार पूर्णपणें ओळखून होते. कांहीं दिवस नरमगरम असा वाण्याचा धंदाहि त्यांनीं केला होता. साहजिकच जीवनाचा अनुभव त्यांना प्रत्यक्ष व पुष्कळ होता. या जीवनावरच त्यांनीं आपल्या अभंगांची रचना केल्यानें, लोकांचीं मनें त्यांच्याकडे ओढलीं गेलीं. तुकाराममहाराजांच्या अभंगांत त्यांच्या स्वतःच्या जीवनाचें जसें निर्मल प्रतिबिंब पडलें आहे, तसेंच सभोंवतालच्या समाजाच्या जीवनाचेंहि पडलें आहे. महाराज कसे होते हें पाह्यला इतर चरित्रें वाचायला नकोत. त्यांच्या अभंगांवरून ते आधीं कसे होते व पुढें कसे बनले हें आपणाला यथार्थपणें कळतें. जुन्या संत-कवींत त्यांच्या इतकी आत्मलक्ष्यी कविता क्वचित्च कोणाची असेल. हीनावस्थेंतून उच्चप्रकारची स्वतःची आध्यात्मिक उन्नति कशी झाली याचें सुंदर चित्र त्यांच्या अभंगांत दिसतें. "काया वाचा मनें अघटित करणें, चर्मचक्षु हात पाय, निंदा द्वेष घात विश्वासीं व्यभिचार, आणि सांगो किती कार्य; लक्ष्मीमदें मातें घडले बहुत दोष, पत्नी दोनी भेदाभेद, पितृवचन घडली अवज्ञा अविचार, कुटिल कुचर निंदावाद; आणीक किती सांगों ते अवगुण, न वळे जिव्हा कांपे मन, भूतदया उपकार नाहीं शुद्धा धीर, विषयी लंपट शुद्धहीन;" "ऐसें भाग्य कईं लाहाता होईन, अवघें देखें जन ब्रह्मरूप," "लाज वाटे

मज मानिती हे लोक, हें तो नाहीं एक माझे अंगीं," "वाचेच्या चापल्यें बहु जालों कुशळ, नाहीं बीजमूळ हाता आले," "माझिये मनींचा जाणा हा निर्धार, जिवासी उदार जालों आतां ! तुजविण दुजें न धरी आणिका भय लज्जा शंका टाकियेली;" "विटलें हें चित्त प्रपंचापासूनी, वमन हें मनीं बैसलेसें; सोनें रूपें आम्हां मृत्तिकेसमान, माणिकें पाषाण खडे तैसे;" "गळित झाली काया, हेंचि लळित पंढरिराया," "रक्तश्वेत कृष्ण पीतप्रभा भिन्न, चैतन्य अंजन सूदले डोळां । तया अंजनगुणें दिव्यदृष्टि जाली । कल्पना निमाली द्वैताद्वैत"—अशा हळुहळू वरच्या अवस्थेपर्यंत जाणाऱ्या तुकोबांनाच शेवटीं "पंधरा दिवसांमाजी साक्षात्कार झाला, विठोबा भेटला निराकार; भांबगिरिपाठारीं वस्ति जाण केली, वृत्ति थिरावली परब्रह्मीं" हें आत्यंतिक सुख प्राप्त झालें व ते आध्यात्मिक सात्विक प्रौढीनें बोलू लागले, "घोंटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हातीं, मुक्ता आत्मस्थिति सांडवीन," "तुका उतरला तुकीं, नवल जालें तिहीं लोकीं; तुका बैसला विमानीं, संत पाहाती लोचनीं, देव भावाचा भुकेला, तुका बैकुंठासी नेला" या व अशाच स्वरूपाच्या इतरहि अनेक अभंगांतून आपली आध्यात्मिक उन्नति कशी झाली याचें स्वच्छ चित्र तुकोबांनीं काढल्यामुळें, अध्यात्माच्या उपासकांना फार मोठी सोय झाल्यासारखी वाटते. तुकोबांच्या अलौकिक लोकप्रीतिचें हेंहि एक कारण आहे.

हें जसें त्यांनीं स्वतःच्या प्रगत होत जाणाऱ्या जीवनाचें चित्र रेखाटलें आहे, तसेंच सभोंवतालच्या सामाजिक जीवनाचेंहि उत्तम प्रकारें रेखाटलें आहे. "ऐसे संत झाले कळीं, तोंडीं तमाखूची नळी । लांबवूनि जटा नेसोनि कासोटा, अभिमान मोठा करिताती । होऊनि संन्यासी भगवी लुगडीं, वासना न सोडी विषयांची । लावूनियां मुद्रा बांधोनिया कंठी, हिंडे पोटासाठीं देशोदेशीं । ऐसे नाना वेष घेऊनि हिंडती, पोटासाठीं घेती प्रतिग्रह । गुरुमार्गामुळें भ्रष्टले सकळ म्हणती यातीकुळ नाहीं ब्रह्मीं । ऐसें कलियुगाच्यामुळें, जाले धर्माचे वाटोळें; सांडुनिया रामराम ब्राह्मण

म्हणती दोमदोम । सोईऱ्यासी करी पाहुणेर बरा, काडितो टोंबरा संतांलागीं । पुराणिक म्हणविती जाणोनि कांदे भक्षिती ! इत्यादि जे शेंकडो अभंग तुकोबांनीं लिहिले आहेत, त्यांच्यावरून त्यांच्याकालीन देशलोकस्थितीची यथार्थ कल्पना होते.

तुकाराममहाराजांच्या लोकप्रियतेचें आणखी एक कारण म्हणजे त्यांचें शुद्ध चारित्र्य व लोकोत्तर भगवद्भाव. संसारी माणसानें शुद्ध कसें राहावें, त्याला शुद्ध कसें राहातां येतें, याचें प्रात्यक्षिक म्हणजे त्यांचें विमल जीवन होय. धुतल्या तांदुळासारखें त्यांचें वर्तन होतें. ' पराविया नारी रखुमाई-समान ' असें तें म्हणत तें अक्षरशः सत्य होते. कनक आणि कांता यांचा मोह त्यांना कधीं पडलाच नाहीं. शिवाजीमहाराजांनीं भक्तिभावानें त्यांच्याकडे मोठा नजराणा पाठविला असतांना त्याला ते शिवलेहि नाहींत. उलट म्हणाले, " मुंगी आणि राव, आम्हां सारखाचि जीव; गेला मोह आणि आशा, कळिकाळचा हा फांसा; सोनें आणि माती, आम्हां समान हें चित्तीं; तुका म्हणे आलें, घरीं वैकुंठ सगळें." सामान्य लोक ' रसना शिश्नाचे अंकित ' असतात. तुकोबा यांच्या पलीकडे गेले होते. विठ्ठलाचा त्यांना ध्यास लागला होता. त्यामुळें इतर कितीहि संकटें वाटेंत आलीं तरी त्यांनीं त्यांची पर्वा केली नाहीं. त्यांची पत्नी जिजाबाई संसाराचा गाडा ओढून थकली म्हणजे मुलांच्या काळजीमुळें त्यांना बरेच टाकून बोले. " कोणाची बाईल होऊनियां बोढूं, संवसारीं काढूं आपदा · किती ? काय तरी देऊं तोडितील पोरें ? मरतीं तरी बरें होतें आतां । उठितें तें कुटितें टाळ, अवघा मांडिला कोल्हाळ ॥ " अशा शब्दांनीं ती माऊली त्यांची निर्भर्त्सना करी. परंतु तुकोबांनीं त्यामुळें कांहीं आपलें पांडुरंगाचें सख्य कमी केलें नाहीं. ' पतिव्रता नेणे आणिकांची स्तुती, सर्वभावें पति ध्यानीं मनी । तैसें माझें मन एकविध जालें, नावडे विठ्ठले विणें दुजें " असें ते आपल्या भगवद्भावाविषयीं म्हणतात. ईश्वराशीं तद्रूप बनून तुकोबा कीर्तन करीत व अभंग रचीत. देहूंतील सालोमालोसारख्या कविब्रुवांना

व मंबाजीबोवांसारख्या ग्रामकंटकांना हें न साहून, त्यांनीं तुकोबांना अनेक प्रकारें छळलें. वेदपठनाबद्दल त्यांना गाढवावर बसवून गांवाबाहेर हाकलून लावण्याची व त्यांच्या अभंगाच्या वह्या इंद्रायणींत बुडविण्याची शिक्षा रामेश्वरभट्ट वाघोलीकरांसारख्या शद्धज्ञानी सनातन्यानें दिली. परंतु याहि परीक्षेला तुकोबा बरोबर उतरले. विठ्ठलानें त्यांच्या वह्या न भिजवितां त्यांना परत केल्या. तें पाहून रामेश्वरभट्टहि चकित झाले व तुकोबांचे शिष्य बनले. संतांचा छळ दुष्ट लोक करतात. पण त्यामुळें लोकांच्या हृदयांतील त्यांचें स्थानच ते अधिक दृढ करीत असतात, हें या विचाऱ्यांच्या कांहीं लक्षांत येत नाहीं.

आणि तुकोबांचे अभंग. आपणाला तुकोबा जे ऐवढे प्रिय आहेत, आदरणीय आहेत, ते त्यांच्या अभंगांमुळेंच. कालिदास त्याच्या शाकुंतलामुळें लोकांना प्रिय. शेक्सपियर त्याच्या नाटकांमुळें लोकांच्या आवडीचा. ज्ञानेश्वर त्यांच्या ज्ञानेश्वरीमुळें अमर झाले. तुकाराम महाराज त्यांच्या अभंगांमुळें लोकांच्या हृदयसिंहासनावर आरूढ झालें आहेत. त्यांचे अभंग हिऱ्याप्रमाणें चमकदार, काबुली द्राक्षांप्रमाणें मधुर आणि बदाम-पिस्त्यांप्रमाणें कसदार आहेत. आज तीनशे वर्षें झालीं अलम महाराष्ट्राला आणि मराठी भाषा जाणणाऱ्यांना ते सुखवीत आहेत, निववीत आहेत, आध्यात्मिक प्रेरणा देत आहेत. "तुका म्हणे श्रम, एक विसरता राम। तुका म्हणे आतां सांभाळारे पुढें, अंतरींचें कुडें देईल दुःख। तुका म्हणे माझा स्वामी अबोलणा। तुका म्हणे केला रांडेनें गाढव। तुका म्हणे भार घातलियावरी होईल कैवारी नारायण। तुका म्हणे नाहीं चालत तांतडी, प्राप्त काळघडी आल्याविण। तुका म्हणे आम्ही तेथील पारखी, नाचे देखोवेखीं जाणों खरें। तुका म्हणे माझें सर्व भांडवल, बोलाविले बोल पांडुरंगें।" इत्यादि शद्धांनीं संपणारे त्यांचे शेंकडो अभंग लोकांच्या चालल्या बोलल्या श्रुती आहेत. चलनी नाण्यांसारखा महाराष्ट्रीय लोक त्यांचा उपयोग करीत असतात. लहान मोठ्या चरणांचे हे अभंग जिव्हाळा

व सहानुभूतीनें तुडुंब भरलेले आहेत. ईश्वराविषयीं प्रेम, मानवाविषयीं प्रेम, पशुपक्ष्यांविषयीं सद्भाव, दुर्जनांबद्दल सहानुभूति, दांभिकांबद्दल तिरस्कार आणि एक प्रकारची सूक्ष्म विनोदबुद्धि यांनीं हे अभंग ओतप्रोत भरले आहेत. हे अभंग दोन प्रकारचे आहेत. कांहीं भावपर आहेत तर कांहीं विचारपर आहेत. भावपर अभंग म्हणजे तीं सुंदर भावगीतेंच होत. त्यांत तुकाराम महाराजांनीं आपल्या विषयींच्या व देवाविषयींच्या भावना इतक्या उत्कटपणें गाइल्या आहेत कीं, त्यांना इतरत्र क्वचित्च तोड मिळेल. अनेक प्रकारें त्यांनीं देवाला आळविंलें आहे. कोपानें, कृतककोपानें लोभानें, प्रेमानें, अगतिकतेनें अशा अनेक परींनीं त्यांनीं परमेश्वराची भावपूजा केली आहे. आपल्या अंतरींच्या भावना कोणताहि आडपडदा न ठेवतां त्यांनीं देवाजवळ प्रगट केल्या आहेत. "लाज वाटे मज मानिती हे लोक, हें तों नाहीं एक माझे अंगीं । माझें मन पाहें कसून, चित्त न ढळे तुजपासून । इतुकें करी देवा ऐकें हें वचन, समूळ अभिमान जाळीं माझा । जेथें जातों तेथें तूं माझा सांगातीं चालविसी हातीं धरूनियां : अपराधी म्हणोनि येतों काकुळती, नाहीं तरी होती काय चाड । 'तुजलागीं माझा जीव झाला पिसा, अवलोकितों दिशा पांडुरंगा । कोण आम्हां पुसे सिणलें भागलें, तुजविण उगलें पांडुरंगा । तुम्ही कांटाळिलां तरी, आम्हां न सोडणें हरी । कां हो देवा कांहीं न बोलाचि गोष्टी, कां मज हिंपुटी करीतसां । लाज वाटे मज म्हणवितां देवाचा, न पुससी फुकाचा तुका म्हणे । तुका म्हणे माझ्या जीवींच्या जीवना, घाला नारायणा उडी वेगीं । प्रेमरसपान्हा पाजीं माझें आई, धांवें वो विठाई वोरसोनि । कासया गुणदोष पाहों आणिकांचे मज काय त्यांचें उणें असें ।" अशा परोपरीनें त्यांनीं काव्यमय भावमय आत्मनिवेदन केलें आहे.

विचारपर अभंग स्तोत्रांसारखे (odes) बरेचसे आहेत. प्रत्येक अभंगांत एखादा प्रमुख विचार मांडलेला असतो. या विचाराच्या समर्थनार्थ कांहीं दृष्टांत दिलेले असतात, लौकिकांतले कांहीं दाखले दिलेले असतात.

विचारांची कक्षा सामान्य व्यवहारापासून ते अत्युच्च तत्त्वज्ञानापर्यंतची असलेली आढळते. " चंदनाचे हात पायही चंदन; जे का रंजले गांजले; ऐसा हा लौकिक कदा राखवेना; काय चा करिसी सोवळें ओवळें; अभक्त ब्राह्मण जळो त्याचें तोंड; फजितखोरा मना किती तुज सांगो; नको नको मना गुंतूं माया जाळीं; ब्रह्म सर्वगत सदा सम; मन करा रे प्रसन्न; न करी रे संग राहें रे निश्चळ " इत्यादि अनेक अभंगांत उच्चप्रकारचे विचार प्रगट झाले आहेत. महाराजांच्या ठिकाणीं विनोदबुद्धि कशी होती याचा प्रत्यय " भ्रतारासी भार्या बोले गुज गोष्टी, मज ऐसी कष्टी नाहीं दुजी; कामाचा अंकित कांतेतें प्रार्थित, तूं कां हो दुश्चित निरंतर; म्हातारपणीं थेंटे पडसें खोकला; जातों वाराणसी निरवीं गाई घोडे म्हैसी;" इत्यादि अभंगांवरून येतो.

तुकाराममहाराज व समर्थ रामदासस्वामी हे सामान्यतः समकालीन असे थोर भगवद्भक्त, संत व लोकप्रिय ग्रंथकार होऊन गेल्यानें, त्यांच्यासंबंधीं त्यांच्या चाहत्यांच्या मनांत तुलनात्मक विचार येणें अस्वाभाविक नाहीं. वारकरी संप्रदायांत तुकोबांविषयीं जसा परम आदर व भक्तिभाव आढळतो, तसाच प्रकार रामदासी संप्रदायांत समर्थांविषयीं आढळतो. असें असून दोन्ही संप्रदायांत या दोन थोर विभूतींविषयीं परस्पर पूज्यभाव मनोमन तरी मान्य आहे. तुकोबांच्या नंतर समर्थ बरींच बर्षें हयात होते, स्वराज्याच्या धामधुमीच्या व वैभवाच्या काळांत वावरत होते, त्याच्याशीं समरस होऊन आपल्या महंतांना व शिष्यांना त्यांत अप्रत्यक्षपणें भाग घ्यायला सांगत होते. साहजिकच त्यांचें वाङ्मय वेगळ्या घडणीचें तयार झालें आहे. तुकोबा प्रपंचाला विटून परमार्थाकडे वळले असल्यानें, त्यांना कोणत्याहि अर्थानें संसाराची गोडी उरली नव्हती. हरिभक्तिचा महिमा त्यांना पटला असल्यानें, तो वाढविण्याचा उद्योग त्यांनीं आरंभिला. साहजिकच त्यांच्या अभंगांची घडण निवृत्तिपर बनली आहे. याचाच परिणाम सामान्य लोकांवर होऊन सामान्यपणें असें समजलें जातें कीं, तुकोबा हे निवृत्तिपर संतकवि असून, रामदास हे प्रवृत्तिपर राजकारणी संतकवि आहेत.

हें सामान्य विधान खरेंच आहे असें माझें मत आहे. तुकाराममहाराजांनीं भक्तिमार्ग लोकांना दाखवून दिला व ईश्वरप्राप्तिकरितां संसार सोडावा लागत नाहीं असेंहि सांगितलें. "जोडोनियां धन उत्तम वेव्हारे, उदास विचारें वेच करी। नको त्यजूं रांडा पोर, बांध सोप्या माड्या घर। नको गुंतों भोगीं, नको पडो त्यागीं, लांबुनि सरें अंगीं देवाचिया। न लगे लौकिक सांडावा वेव्हार, घ्यावें वनांतर भस्म दंड" इत्यादि अभंगांच्या चरणांवरून गृहस्थाश्रमी लोकांना संसाराचा त्याग न करितां, भगवद्प्राप्ति कशी करून घेतां येते हें सांगितलेलें स्पष्ट दिसतें. भागवतधर्माचें हें सारच आहे. एकनाथी भागवतांत देखील अशाच अर्थाच्या अनेक ओव्या आहेत. त्याच परंपरेंत तुकाराममहाराजांनीं बायका पोरांचा त्याग न करितां ईश्वर-प्राप्तीची गोडी लोकांना लागावी म्हणून "नामसंकीर्तन साधन पैं सोपें" सांगितलें. नाम घेतलें असतांना इतर गोष्टी क्रमाक्रमानें होतीलच अशी त्यांची मान्यता होती. "नाम घेतां उठाउठी, होय संसारासी तुटी; नाम घेतां कंठ शीतळ शरीर, इंद्रियां व्यापार नाठवती." अशी त्यांची खात्री असल्यानें भगवद्प्राप्तीचें सोपें साधन 'नाम घेणें' हें त्यांनीं दाखविलें. संसाराचा त्याग न करतां देवाचें नांव घ्या, असें तुकाराममहाराजांनीं सांगितलें एवढ्यावरून त्यांना प्रवृत्तिमार्गी कसें म्हणतां येईल? त्यांच्या अभंगांपैकीं बहुतेक अभंगांत ईश्वरभक्तिवरच सर्वांत अधिक भर आहे. संसार सोडणें कठिण म्हणून तो न सोडतां आत्मोन्नति करावी इतकेंच त्यांनीं सांगितलें. वैयक्तिक संसाराचा राष्ट्रीय संसाराकरितां उपयोग करून घ्यावा, मंडळ्या जमवाव्यात; समुदाय करावेत, सावधपणें राहून लोकांच्या चिंता काय आहेत त्या हेराव्यात, मराठा तेतुका मिळवून महाराष्ट्रधर्म वाढवावा, राजकारण करावें, यत्न तो देव जाणावा, इत्यादि विजिगीषू, राष्ट्रीय, प्रवृत्तिपर शेंकडो गोष्टी शेंकडो ठिकाणीं रामदासांनीं सांगितल्या आहेत. स्वतःचा व राष्ट्राचा संसार सुखाचाच नव्हे तर समृद्धीचा कसा होईल, याचा विचार व आचार समर्थांनीं पुष्कळ ठिकाणीं दाखविला आहे. तसें

वि. वा. १२७

तुकोबांना करण्याची जरूरी भासली नाहीं. यांत त्यांच्याकडे काडी इतका कमीपणा येत नाहीं. त्यांना जो मार्ग पटला व श्रेष्ठ वाटला तो त्यांनीं प्रतिपादन केला. निवृत्तिपर शिकवण आपल्या इकडे पुष्कळांनीं दिली आहे. किंबहुना बुद्धाच्या काळापासून या शिकवणीकडे लोकांचें नेहमीं विशेष लक्ष असतें. अधूनमधून रामदासांसारखे संत निर्माण होतात व ते कर्मयोगावर भर देऊन लोककल्याणार्थ कौशल्यानें कर्म करीत राहण्याचा उपदेश करतात इतकेंच. गेल्या दोन अडीच हजार वर्षांपासूनचें भारतीय मन हें सामान्यतः निवृत्तिपरच आहे असें म्हणावयास चिंता नाहीं.

तें कांहींहि असलें तरी तुकाराम महाराजांनीं महाराष्ट्राच्या दृष्टीनें एक मोठी कामगिरी केली आहे. वारकरी संप्रदायाच्या झेंड्याखालीं त्यांनीं लक्षावधि लोकांना एकत्र करून भक्तिमार्ग दाखविला. भागवतधर्म ऊर्फ भक्तिचा धर्म त्यांनीं आणि त्यांच्या वारकऱ्यांनीं महाराष्ट्रभर पसरविला. या धर्मांत कोणी उच्च नाहीं व कोणी नीच नाहीं. भगवंतापुढें सर्व सारखे. सर्व संतांची एक जात. ते सर्व भगवद्भक्त. जातिभेद, वर्णभेद, धर्मभेद, ईश्वराची प्राप्ति करीत असतांना कोणाच्याहि आड या भागवतधर्मांत येत नाहींत. याच कारणानें चोखामेळा, सावतामाळी, सेना न्हावी, नामा शिंपी, गोरा कुंभार, विसा खेचर, नरहरि सोनार, जोगा परमानंद तेली, शेख महंमद, शेख फरीद, शेख सुलतान, शेख सय्यद, इत्यादि शेंकडो पांडुरंगाचे भक्त निर्माण झाले. शैववैष्णवांचा झगडा महाराष्ट्रांत नाहीं, याचें श्रेय या वारकरी संप्रदायालाच दिलें पाहिजे. आधीं पारमार्थिक दृष्टीनें स्वहित साधा, बाकीच्या गोष्टी मग आपोआप साधतील, हें परमार्थिक स्वहित साधायला कष्ट सायास नको करायला, फक्त ईश्वराचें नांव भक्तिभावानें घेतलें म्हणजे पुरे, इत्यादि मुख्य पण सोप्या तत्त्वांचा प्रसार महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत ज्ञानेश्वर-नामदेवांच्या काळांपासून जो सुरू झाला होता, त्याचाच परमोच्च बिंदु तुकाराम महाराजांनीं गांठला. याच अर्थाचा एक अभंग आहे. "संतकृपा झाली, इमारत फळा आली।

ज्ञानदेवें रचिले पाया, रचियेलें देवालया। नामा तयाचा किंकर, तेणें केला हा विस्तार। जनार्दन एकनाथ, ध्वज उभारिला भागवत। भजन करा सावकाश तुका झालासे कळस।" भागवतधर्म किंवा वारकरी संप्रदायाच्या पुढची पायरी म्हणजे समर्थांचा महाराष्ट्रधर्म होय. भागवत-धर्मांत 'स्वहित' साधण्याचा सोपा मार्ग सुचविला आहे. त्याच्याच पुढची पायरी 'परहित' साधण्याची. 'परहित' साधून, दुसऱ्याचा संसार सुखी करून, सर्व महाराष्ट्र सुखी करण्याचा महामंत्र रामदासांनीं जो दिला तो क्रमप्राप्तच होता असें म्हटलें पाहिजे.

तुकारामाच्या काळींच धामणगांवचे बोधलेबुवा, निंबराज दैठणकर, मोरया गोसावी चिंचवडकर, गणेशनाथ, शेख महंमद, शेख फरीद, शेख सय्यद, बहिणाबाई (जन्म शके १५५० मृत्यु १६२२) इत्यादि कवि व कवियित्री होऊन गेलीं. बोधलेबुवांचें सर्व कुटुंब पंढरीची वारी करीत असे. निंबराज दैठणकर यानें 'जपमाळ' नांवाचें पुस्तक रचिलें असून त्यांत प्रत्येक संतावर चरित्रवैशिष्ट्यपर अभंग आहेत. मोरया गोसावींनीं गणेशपुराण नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. वारकरी गणेशनाथांनीं अनेक पदें व अभंग रचिले आहेत. सेना न्हावी याचे कांहीं अभंग प्रसिद्ध आहेत. शेख महंमदाची ग्रंथरचना बरीच आहे. याचे पवनविजय, निष्कलंकप्रबोध, योगसंग्राम व ज्ञानसागर असे चार ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहेत. योगसंग्रामाची ओंवीसंख्या २५०० आहे. शेख महंमद हा मूळचा मुसलमान असून पुढें पंढरीचा वारकरी बनला. मूर्तिपूजा ही खुळखुळ्या-सारखी होय, मोठें झाल्यावर हा खुळखुळा टाकला पाहिजे, असें तो म्हणतो. ईश्वर तेथून सर्वांचा एकच आहे. हिंदु आणि मुसलमान हा. फरक त्याचें घरीं नाहीं असें सांगतांना तो म्हणतो, "हक्कला इलाहा इल्लाल्ला। हजरत महंमद रसुलल्ला ॥ या दोहीं चरणांत पाहिजे ओळखिला। ईश्वर विश्वरूपें ॥ मुसलमान कहे जिक्कि बुखानद। मराठे म्हणती कथेचा आनंद ॥ परी दोहीं भाषांचा भेद। ईश्वर अल्ला जाणे ॥" शेख महंमदाची रेणुका तेलीण

या नांवाची एक भक्तीण होती. तिनेंहि कांहीं अभंग केले असे म्हणतात. या सर्वांत तुकाराम महाराजांची शिष्या बहिणाबाई हिचे अभंग प्रेमळ असून तिच्या शद्धांत साधेपणा व मोहकपणा आहे. तुकाराम महाराजांनीं स्वप्नांत येऊन बहिणाबाईस उपदेश दिला. त्याविषयीं ती लिहिते– "ठेउनिया कर मस्तकीं बोलिला । मंत्र सांगितला कर्णरंध्रीं ॥ कार्तिकांत वद्य पंचमी रविवार । स्वप्नींचा विचार गुरुकृपा ॥" बहिणाबाईचें अभंगवृत्तात्मक आत्मचरित्र जिव्हाळयानें भरलेलें आहे. तुकारामांच्या चौदा शिष्यांतै प्रमुख असे दोन तीनच होते. बहिणाबाईचा आतांच निर्देश झाला. दुसरे शिष्य तुकोबांचे बंधु कान्होबा. त्यांचें शें सव्वाशें अभंग प्रसिद्ध आहेत. तुकोबा वैकुंठवासी झाल्यावर कान्होबांच्या तोंडून स्रवलेले अभंग करुणरसानें ओतप्रोत भरले आहेत. नाटाचे अभंग, आशीर्वाद, लळित आणि गौळणी अशी त्यांची काव्यरचना आहे. तिसरे शिष्य सुप्रसिद्ध निळोबा पिंपळनेरकर. तुकारामांच्या निर्याणानंतर वीस पंचवीस वर्षांनीं तुकोबांच्या ध्यासानें ते देहूस आले असतांना त्यांना तुकारामांचा स्वप्नसाक्षात्कार व अनुग्रह झाला. वारकरी संप्रदायांतील निळोबा हे शेवटले संतकवि होत. तुकारामांना ज्याप्रमाणें नामदेवांपासून स्फूर्ति प्राप्त झाली, त्याप्रमाणें निळोबांना तुकोबांपासून झाली. ते म्हणतात–"निळा म्हणे आम्ही नोळखुचि देवा । तुकयाचा धांवा करितसों." तुकारामांच्या स्तुतिपर यांनीं कांहीं श्लोकशतकें लिहिलीं असून त्यांत प्रेमळपणा आहे. तुकारामांचा प्रत्यक्ष सहवास नसतांना त्यांच्या साहित्यांतून स्फूर्ति मिळवून, भागवतधर्माची पताका महाराष्ट्रभर फडकविण्याचें कार्य केल्याबद्दल निळोबांना कोणीहि धन्यवादच देईल.

९

समर्थ रामदास

आधुनिक काळांतील राष्ट्रीय कवि विनायक यांनीं रामदासांच्या[1] संबंधीं "साधुसंत झाले लोकी, तयांची न वाण । मात्र रामदासा साजे समर्थाभिधान ॥" अशा प्रकारचे उद्गार काढिले आहेत. शिवशाहींतील राष्ट्रीय कवि, राजकारणी संत किंवा ग्रंथकार म्हणून जर कोणाकडे बोट दाखवितां येत असेल तर तें समर्थांकडेच होय. सभोंवतालच्या परिस्थितीची सूक्ष्म पाहणी व छाननी करणारा, त्या परिस्थितीचें यथातथ्य चित्र आपल्या साहित्यांत जागोजागीं रेखाटणारा, त्या परिस्थितींतून कोणत्या रीतीनें वर डोकें काढावें तें ओजस्वी व अनुभवाच्या शब्दांत सांगणारा जर कोणी ग्रंथकार शिवशाहींत झाला असेल तर ते समर्थ रामदास स्वामी हेच होत. तुकोबारायांच्या काव्यांतहि त्यांच्या काळच्या परिस्थितीचें चित्र उमटलें आहे. परंतु त्या हीन परिस्थितींतून बाहेर निघून समर्थ कसें व्हावें याचा विचार त्यांनीं फारसा केलेला नाहीं. हा विचार तर रामदासी साहित्याचा गाभा आहे. स्वतःच्या आणि इतरांच्या दुःस्थितीला कंटाळून इतर संतांनीं केवळ निवृत्तिपर परमार्थाची कांस धरली. याच्या उलट समर्थांची स्थिति होती. त्यांनीं देखील व्यक्तिशः परमार्थाची कांस धरली असली, तरी

---

१ खरें नांव नारायण. पित्याचें नांव सूर्याजीपंत ठोसर, मातेचे नांव राणूबाई. वडील भावाचें नांव गंगाधर ऊर्फ श्रेष्ठ. रामदासांचा जन्म गोदातीरीं जांब येथें चैत्र शु० ९ शके १५३० रोजीं झाला. त्यांचा मृत्यु सज्जनगडावर माघ वद्य ९ शके १६०३ रोजीं झाला. समर्थांनीं शके १५५४ पर्यंत गोदातीरीं टाकळीस राहून बारावर्षे तपश्चर्या केली. पुढें बारा वर्षे भरतखंडांत तीर्थयात्रा केल्या. शके १५६६ च्या पुढें ते कृष्णातीरीं आले. रामदासी संप्रदाय स्थापून व ग्रंथरचना करून जागोजाग शेंकडो मठ त्यांनीं स्थापिलें ते यानंतरच.

हा परमार्थ सर्वस्वी प्रवृत्तिपर, लोककल्याणकारक, लोकांचें ऐहिक व पारलौकिक हित साधणारा असा होता. 'परमार्थ सकळांस विसावा। परमार्थ जन्माचें सार्थक। परमार्थ संसारीं तारक। परमार्थी तो राज्यधारी। (द. १ स. ९)' ह्या वचनांवरून त्यांची परमार्थाची कल्पना किती विशाल होती हें कळेल. एखाद्या सार्वजनिक कार्यकर्त्यानें आधुनिक काळांत ज्याप्रमाणें आपलें कार्य उत्तम प्रकारें व्हावें म्हणून संसारांत स्वतःला गोंवून घेण्याचें नाकारावें, त्याप्रमाणें समर्थांनीं केलें. लोकांचा संसार सुखाचा व्हावा, नेटका संसार त्यांना करायला सांगतां यावें, त्यांना सर्व प्रकारची मदत करतां यावी, म्हणून त्यांनीं परमार्थांत, उच्च व उज्ज्वल प्रकारच्या परमार्थांत स्वतःला गोंवून घेतलें. उपाधींना न कंटाळतां, संकटांनीं घाबरून न जातां, सावधानता राखून समुदाय जमविण्याची कामगिरी त्यांनीं स्वतः केली व स्वसंप्रदायांतील महतांना करायला सांगितली यांतील मर्म हेंच होय. शिवाजीमहाराजांचा स्वराज्यस्थापनेचा जो प्रचंड खटाटोप चालला होता, त्याला सर्वस्वी उपकारक, प्रोत्साहक अशाच प्रकारची रामदासांची कामगिरी होती.

समर्थांची ग्रंथसंख्या मोठी आहे. त्यांच्या उपलब्ध असलेल्या सुमारे सव्वीस हजार कवितेंत तीन चतुर्थांश कविता अध्यात्मपर आहे. सुमारे चार हजार कविता देवताख्यानपर आहे आणि उरलेली कविता आत्मपर, भावगीतात्मक अशी आहे. अध्यात्मपर कवितेंत ओवी शतांपैकीं बाराशतें, पंचीकरण योग, चतुर्थमान, मानपंचक, पंचमान, आत्माराम, जुना दासबोध (यांसच एकवीस समासी म्हणतात. याच्या १३४० ओव्या आहेत) आणि दासबोधांतील बरेचसे दशक यांचा समावेश होतो. यांत सगुण-निर्गुण, ब्रह्म-माया, पुरुष-प्रकृति, षड्रिपु, नवविधाभक्ति, त्रिविध ताप, द्वैताद्वैत इत्यादि अनेक आध्यात्मिक गोष्टींचें सुबोध विवरण करण्यांत आलें आहे. हे ग्रंथ वेगवेगळे असले तरी त्यांतील मुख्य विषय एकच आहे. अहं ब्रह्मास्मि आणि तत्त्वमसि ह्या दोन वेदांत वाक्यांचा समर्थांच्या खास पद्धतीनें विचार करण्यांत आला आहे. मी ब्रह्म आहे आणि तूंहि

तेंच आहेस हें ज्ञानानें ओळखून त्याचें सतत मनन करणें, त्याचा भावार्थ आपल्या आचरणांत बिंबविणें, सर्वत्र एक अद्वैत आहे या भावनेनें जनतारूपी जनार्दनाची सेवा करणें, सद्गुरूची कांस धरून सगुण अशा ईश्वराची उपासना करणें, भक्ति-ज्ञान-वैराग्य अशा चढत्या क्रमानें आत्मोन्नति करून लोककल्याणार्थ कर्म करीत राहणें हें या सर्व आध्यात्मिक प्रकरणांचें सार आहे. या सर्व अध्यात्मपर ग्रंथांत 'दासबोध' हा सर्वांत मोठा व सर्वांत कालदृष्ट्या शेवटचा असल्यानें समर्थांच्या सर्व उपदेशाचें, विचारांचें सार त्यांत प्रगट झालें आहे. दासबोधासारखा ग्रंथ एकटाकी व एका बैठकींत तयार होणें शक्य नाहीं. जसा बेळ मिळेल आणि जसा प्रसंग उद्भवेल तसा हा ग्रंथ हळुहळू कित्येक वर्षें तयार होत होता. एखादा राजवाडा किंवा कैलासलेण्यासारखें लेणें हें जसें वर्षानुवर्षें तयार होत असतें, त्याप्रमाणें दासबोध हा अनेक वर्षें तयार होत होता. त्यांतहि पहिले आठ दशक प्रथम करून, नंतरच्या दशकांची रचना सावकाश केलेली आढळते आठ दशकांच्या पूर्वार्धाची रचना शके १५८१ च्या सुमारास झाली, आणि उरलेले बारा दशक जरी मधून मधून लिहिले गेले असले तरी एका सूत्रांत असे ते शके १६०३ च्या मार्गशीर्षांत ओविले गेले. पहिले सहा दशक क्रमशः लिहिल्यासारखे दिसतात. सातवा दशक हा स्वतंत्रपणें तयार केलेला दिसतो. कारण त्यांत मंगलाचरण, उपसंहार इत्यादि स्वतंत्र प्रकरणाला शोभेशा गोष्टी आढळतात. आठवा ज्ञानदशक हा सर्वांत आधीं तयार झाला असावा असें शंकर श्रीकृष्ण देव यांचें मत आहे.[1] अशा प्रकारें हा ग्रंथ सुमारे वीसबावीस वर्षें तयार होत होता असें स्पष्ट दिसतें.

रामदासस्वामींच्या दासबोधांत ज्या अनेक विषयांचा परामर्ष घेतला आहे, त्यांच्याकडे पाहून त्याला 'ज्ञानसिंधु' म्हणावेसें वाटतें. यांत अध्यात्मनिरूपण हें तर मुख्य आहेच. पण याशिवाय राजकारण, यत्ननिरूपण, लेखनक्रिया, कवित्वकळा इत्यादि विषयहि यांत उत्तम प्रकारें चर्चिले

१ श्रीसमर्थहृदय पृ. ३२२

आहेत. ग्रंथाच्या सुरुवातीला त्यांत काय काय आलें आहे त्याची यादी आहे. त्यांत भक्तिमार्ग, ज्ञान, वैराग्य, अध्यात्म, मोक्ष, विदेहस्थिंति, मुख्य देव, मुख्य ब्रह्म, मुख्य उपासना या बाबी मुख्यत्वें सांगितल्या असून त्यांना "शिवगीता रामगीता। गुरुगीता गर्भगीता। उत्तरगीता अवधूतगीता। वेद आणि वेदांत। भगवद्गीता ब्रह्मगीता। हंसगीता पांडवगीता। उपनिषदें भागवत" इत्यादि ग्रंथांचा आधार असल्याचें दाखविलें आहे. अशा तऱ्हेनें हा ग्रंथ साधार व सोपपत्तिक असून त्याला समर्थांच्या स्वानुभवाचा पाठिंबा आहे. या ग्रंथासंबंधानें समर्थांच्या ग्रंथांचे थोर अभ्यासक शंकर श्रीकृष्ण देव म्हणतात, "सर्वतोपरि निकृष्ट स्थितीला पोंचलेल्या समाजाला ऐहिक आणि पारमार्थिक कर्तव्याची दिशा स्पष्ट रीतीनें आखून देऊन, शाश्वत सुखाची जोड करून देणें हेंच या ग्रंथाचें प्रयोजन आहे. ऐहिक आणि पारमार्थिक कर्तव्याची संगति या ग्रंथांत जशी घालून देण्यांत आली आहे, तशी दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथांत क्वचित्च असेल. स्वतःचें घरदार, धंदा, स्वतःचीं बायकामुलें, यांच्या संबंधानें आपलें जें कर्तव्य आहे तेवढेंच काय तें ऐहिक कर्तव्य, असें समजावयाचें नाहीं. प्रपंच म्हणजे हा वर दिलेला स्वतःचा प्रपंच अधिक राष्ट्राचा प्रपंच. स्वतःचा प्रपंच प्राणिमात्र करीत आहेत. स्वबांधवांचा प्रपंच करण्यांतच मनुष्याची श्रेष्ठता आहे. हा बोध म्हणजेच महाराष्ट्रधर्माचें शिक्षण होय. अलिकडच्या भाषेंत यालाच स्वदेशाभिमान म्हणतात. असलें शिक्षण देणारा प्राकृतांत तरी एवढाच ग्रंथ आहे. हाच या ग्रंथाचा विशेष...[1]"

समर्थकालीन लोकस्थितिपर उल्लेख मुख्यतः दशक अकरा, चौदा व पंधरा यांत आले आहेत. त्यावरून लोक भांबावलेल्या, निर्नायक अशा अवस्थेंत कसे होते तें दिसतें. समाजाचें बौद्धिक व सांस्कृतिक धूरिणत्व ज्या ब्राह्मणांकडे त्यांची निकृष्टावस्था कशी झाली होती तीहि यांत आहे. मासल्याकरितां कांहीं ओव्या पुढें देत आहें :—नाना मतें निर्माण जालीं। नाना पाषांडें वाढलीं। नाना प्रकारीचीं उठिलीं। नाना बंडें॥ देव

१ श्रीसमर्थहृदय. पृ. ५२४

जाले उदंड । देवांचें मांडलें भंड । भूतादेवतांचें थोतांड । येकचि जालें ॥ शास्त्रांचा बाजार भरला । देवांचा गल्बला जाला । लोक कामनेच्या व्रताला झोंबोन पडती ॥ मतामतांचा गल्बला कोणी पुसेना कोणाला । जो जें मतीं सांपडला । तयास तेंचि थोर ॥ कित्येक म्लेंच होऊन गेले । कित्येक फिरंगणांत आटले । देशभाषानें रुधिले । कितीयेक ॥ मऱ्हाष्ट्रदेश थोडा उरला । राजकारणें लोक रुधिला । अवकाश नाहीं जेवायाला । उदंड कामें ॥ कित्येक युद्धप्रसंगीं गुंतले । तेणें गुणें उन्मत्त जाले । रात्रं दिवस करूं लागले । युध्यचर्चा ॥ कित्येक कामनेचे भक्त । ठाइं ठाइं जाले आसक्त । युक्त अथवा अयुक्त । पाहातो कोण ॥ नीच प्राणी गुरुत्व पावला । तेथें आचारचि बुडाला । वेदशास्त्र-ब्राह्मणाला । कोण पुसे ॥ ब्राह्मण बुद्धीपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले । गुरुत्व सांडून जाले । शिष्य शिष्यांचे ॥ कित्येक दावलमलकास जाती । कित्येक पीरास भजती । कित्येक तुरुक होती । आपले इच्छेनें ॥ गुरुत्व आले नीच याती ॥ कांहीं येक वाढली महंती । शूद्र आचार बुडविती ॥ ब्राह्मणाचा ॥ ...आम्हीहि तेचि ब्राह्मण । दुःखें बोलिलें हें वचन । वडिल गेले ग्रामणी करून । आम्हां भोंवते ॥ या शिवाय 'अस्मानी सुलतानी' व 'परचक्र निरूपण' या दोन प्रकरणांत तीर्थयात्रा प्रसंगीं त्यांना आलेल्या देशस्थितीचा अनुभव वर्णिला आहे.

सभोंवतालच्या निकृष्ट स्थितीनें समर्थ भांबावून गेले नाहींत किंवा लोकांना त्यांनीं संन्यासहि घ्यायला सांगितला नाहीं. आहे ह्याच संसारांत आनंद मानून व तो नेटकेपणानें करून राजकारणमूलक परमार्थाची कांस लोकांना धरावयास त्यांनीं सांगितलें. हें त्यांनीं कसें केलें हें त्यांच्याच शब्दांत आपणास पाहावयास सांपडेल. धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता पाहो । जो जो कीजे परमार्थ लाहो । तो तो पावे सिद्धीतें ॥ १-१०-१ ॥ मुख्य हरिकथानिरूपण । दुसरें तें राजकारण । तिसरें तें सावधपण । सर्व विषईं ॥ ११-५-४ ॥ आधीं प्रपंच करावा नेटका । मग

घ्यावें परमार्थ विवेका । येथें आळस करूं नका विवेकी हो ॥ द. १२ स. १-१ ॥ ज्ञानी आणि उदास । समुदायाचा हव्यास । तेथें अखंड सावकाश । येकांत सेवावा ॥ नष्टासी नष्ट योजावे । वाचाळासी वाचाळ आणावे । आपणावरी विकल्पाचे गोंवे । पडोंच नेदी ॥ ग्रामण्य वर्मीं सांपडावें । रगडून पीठचि करावें । करूनि मारुती सांवरावें । बुडवूं नये ॥ खळ-दुर्जनासीं भ्यालें । राजकारण नाहीं राखिलें । तेणें अवघें प्रगट जालें । बरें वाईट ॥ समुदाय पाहिजे मोठा । तरी तनावा असाव्या बळकटा । मठ करूनी ताठा । धरूं नये ॥ धटासी आणावा धट । उद्धटासी पाहिजे उद्धट ॥ द. १९ स. ९ ॥ उपाधींत सांपडों नये । उपाधीस कंटाळों नये । निसुगपण कामा नये । कोणी येक विषयीं ॥ द. १९ स. १० ॥ राखावीं बहुतांचीं अंतरें ॥ भाग्य येतें तदनंतरें । ऐसीं हीं विवेकाचीं उत्तरें । ऐकणार नाहीं ॥ द. १९ स. ३-१८ ॥ झिजल्यावांचूनी कीर्ति कैंची । मान्यता नव्हे कीं फुकाची । जिकडे तिकडे होते चीची । अवलक्षणें ॥ द. १९ स. ३-२४ ॥ सांकडीमध्यें वर्तोंजाणे । उपाधीमध्यें मिळो जाणें । अलिप्तपणें राहों जाणें । आपणांसी ॥ द. ११ स. ६-१३ ॥ कांहीं गल्बला कांहीं निवळ । ऐसा कंठीत जावा काळ । जेणें करितां विश्रांतीवेळ । आपणासी फावे ॥ द. १९ स. ९-२९ ॥ बहुविषय भोगूं नये । विषयत्याग करितां नये । देहलोभ धरूं नये । बहुत्रास खोटा ॥ द. १४ स. २-७० ॥ उत्कट भव्य तेंचि घ्यावें । मळमळीत अवघेंचि टाकावें । निस्पृहपणें विख्यात व्हावें । भूमंडळीं ॥ द. १९ स. ४-१५ ॥

दासबोधांत प्रवृत्तिमार्गाची शिकवण आहे कीं निवृत्तिमार्गाची? याचें उत्तर म्हणून असें देतां येईल कीं, या दोन्हींच्या पलीकडे असलेल्या व दोन्हींचा स्वतःमध्यें समावेश करणाऱ्या परमार्थाची शिकवण यांत आहे. समर्थ या ग्रंथासंबंधानें शेवटीं म्हणतात, "वीस दशक दासबोध । श्रवण-द्वारें घेतां शोध । मननकर्त्यास विशद । परमार्थ होतो ॥" पहिल्या दशकाचे शेवटीं "नरदेह हा स्वाधेन । सहसा नव्हे पराधेन । परंतु हा परोपकारीं

झिजवून । कीर्तिरूपें उरवावा ॥ सांग नरदेह जोडलें । आणि परमार्थबुद्धि विसरलें । तें मूर्ख कैसें भ्रमलें । मायाजाळीं ॥" असें त्यांनीं जें म्हटलें आहे त्यांवरून त्यांच्या परमार्थाचा अर्थ परोपकारार्थ, जगदुद्धरार्थ, ईश्वरा-विषयीं आदरबुद्धि ठेवून जीवन जगणें असा उघडच ठरतो. समर्थांच्या परमार्थांत स्वतःचा व राष्ट्राचा संसार नेटका करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. गिरिगव्हरांत राहून वैयक्तिक मोक्ष साधणारा त्यांचा परमार्थ नाहीं. तर लोकांत मिसळून त्यांचा आणि आपला ऐहिक व पारलौकिक मोक्ष साधणारा तो आहे. राजकारण, प्रयत्नवाद, समुदाय किंवा मंडळ्या जमविणें इत्यादिसंबंधानें इतके विपुल व स्पष्ट उल्लेख दासबोधांत आहेत कीं त्यांवरून त्यांतील प्रवृत्तिमार्गासंबंधानें कोणत्याहि डोळस माणसाची खात्री झालीच पाहिजे. विशेषतः दशक ११, १२, १५, १८ व १९ यांत राजकारण भरून ओसंडत आहे. परंतु याच्याच जोडीला त्यांत भक्ति-मार्ग, उपासनामार्ग हाहि उत्कटपणें प्रतिपादन केला आहे. किंबहुना स्वतः रामदास लग्न करून संसारांत पडले नाहींत त्यावरून एकट्या. दुकट्याच्या संसारासंबंधानें त्यांचें अनुकूल मत नसावें हें उघडच दिसतें. परंतु सामान्य माणसांच्या मर्यादा आणि महाराष्ट्राच्या गरजा ते ओळखून असल्यानें त्यांनीं आपल्या परमार्थ कल्पनेचें उदात्तीकरण करून तींत राजकारण व प्रयत्नवाद यांचा समावेश केला. एका अर्थानें असेंहि म्हणतां येईल कीं त्यानीं राजकारणाचें परमार्थीकरण केलें. आधुनिक काळांत, महात्मा गांधीजींच्या काळांत, ही कल्पना सुगमपणें कळेल. कारण गांधीजींनीं राजकारणाचें परमार्थीकरण किंवा धर्मीकरणच (स्पिरीच्युअलाइझिंग पॉलिटिक्स) केलें आहे. या दृष्टीनें पाहिलें असतांना (आणि मला वाटतें ही दृष्टि खरी आहे) रामदासांच्या "मुख्य हरिकथानिरूपण । दुसरें तें राज-कारण" ह्या किंवा "सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें । परंतु येथें भगवंताचें अधिष्ठान पाहिजे" ह्या वचनांवर कांहीं वेगळाच प्रकाश पडून त्यांचें सामर्थ्य शतगुणित झाल्यासारखें वाटतें. गांधीजींना

जसा रामराज्याचा ध्यास लागला होता, तसाच रामदासस्वामींनाहि लागला होता, हें साम्यहि लक्षांत ठेवण्याजोगें आहे. राजेशाहीचा तो काळ असल्यानें समर्थ गांधीजींप्रमाणें प्रत्यक्ष राजकारणांत पडले नाहींत. आजच्यासारखा लोकशाहीचा तो काळ असता तर समर्थांनीं काय केलें असतें याची सहज कल्पना करतां येईल.

समर्थांनीं जीं स्फुट प्रकरणें लिहिलीं आहेत त्यांत त्यांच्या पारमार्थिक राजकारणाची कल्पना अधिक विशद करून सांगण्यांत आली आहे. या पारमार्थिक किंवा परमार्थमूलक राजकारणालाच त्यांनीं मऱ्हाष्ट्रधर्म (महाराष्ट्र-धर्म), मऱ्हाष्ट्रराज्य अशीं नांवें दिलीं आहेत. शिवाजीमहाराजांना त्यांनीं शके १५७१ मध्यें जें एक पत्र पाठविलें आहे त्यावरून तसेंच शिवाजी-महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजीराजांना जें पत्र पाठविलें त्यावरून या महा-राष्ट्रधर्माची कल्पना येते. या पत्रांत एके ठिकाणीं म्हटलें आहे "देवधर्म गो ब्राह्मण। करावया संरक्षण। हृदयस्थ जाला नारायण। प्रेरणा केली॥ शूर पंडित पुराणिक। कवेश्वर वैदिक याज्ञिक। धूर्त तार्किक सभानायक। तुमचा ठाईं॥ या भूमंडळाचा ठाईं। धर्म रक्षी ऐसा नाहीं। मऱ्हाष्टधर्म राहिला कांहीं। तुम्हाकरितां॥...कितेक दुष्ट संव्हारिला। कितेकांसी धाक सुटला। कितेकांसी आश्रयो जाला। शिवकल्याण राजा॥." दुसऱ्या पत्रांत म्हटलें आहे, "महाराष्ट्र राज्य करावें जिकडे तिकडे." इतिहासाचार्य राजवाडे म्हण-तात त्याप्रमाणें "समर्थांच्या ह्या उक्तींवरून कळून येईल कीं, सतराव्या शतकाच्या पूर्वार्धांत महाराष्ट्रांतील विचारी पुरुषांचीं मनें एका जबर कल्पनेनें भारून गेलेलीं होतीं. ती कल्पना कोणती तर महाराष्ट्रधर्माची स्थापना करणें ही. ही कल्पना सफल करण्याचें अवघड काम शिवाजीनें केलें...ही कल्पना ध्यानांत ठेवून मग शिवाजीच्या व त्याच्या अनुया-यांच्या कृत्यांचा विचार करावा म्हणजे त्याकालीं महाराष्ट्रांत व कर्नाटकांत जिकडे तिकडे मराठे निष्कारण धांवतांना परकीय इतिहासकारांना जे दिसतात ते मनांत कांहीं विशिष्ट हेतु धरून शिस्तवार मोहिमा करीत

आहेत असें भासूं लागतील...महाराष्ट्रेतर प्रांतांतील हिंदुधर्म+धर्मस्थापना +गोब्राह्मणप्रतिपाल+स्वराज्यस्थापना+एकीकरण+धुरीधरण म्हणजे महाराष्ट्रां-तील हिंदुधर्म होतो अशी त्याकाळीं समजूत होती. ह्याच समजुतीला महा-राष्ट्रधर्म म्हणून समर्थांनीं संज्ञा दिली...दामाजीपंताच्या वेळचा स्तब्ध विठोबा सहिष्णु हिंदुधर्माची मूर्ति आहे व समर्थांचा उद्धाण करणारा मारुति जयिष्णु हिंदुधर्माची पताका आहे.[1]" प्रवृत्तिनिवृत्तींचा मेळ साध-णाऱ्या महाराष्ट्रधर्माकरितांच जणूं काय विविध स्फुट प्रकरणें समर्थांनीं लिहिलीं व त्यांत अनेक प्रकारचा व्यावहारिक उपदेश लोकांना केला. वन्ही तो चेतवावा रे, धीर्धरा धीर्धरा, राजधर्म, सेवकधर्म, धन्य संसार होतसे, मैत्री, खरा देव, गर्व, जन्मसफलता, परनिंदा, स्फूर्ति, प्रपंचाचें वेड, सरस्वति इत्यादि शेंकडो स्फुट प्रकरणांवरून समर्थांच्या राजकारणमूलक परमार्थाची किंवा प्रवृत्तिनिवृत्तींचा समन्वय करणाऱ्या महाराष्ट्रधर्माची उत्तम प्रकारें कल्पना येते.

समर्थांच्या दासबोधादि अध्यात्मपर ग्रंथांना व स्फुट प्रकरणांना काव्य म्हणतां येईल काय, या प्रश्नाचा येथेंच आपण थोडक्यांत विचार करूं. ज्ञानेश्वरी हा अध्यात्मपर ग्रंथ असून आपण त्याला बिनदिक्कत काव्याच्या सदरांत घालतों. तुकारामबोवांचे अभंग तत्त्वज्ञानपर असूनहि आपण त्यांची काव्यांतच गणना करतों. याचें कारण ज्ञानेश्वरी व तुकोबांचे अभंग यांत काव्याला अवश्य असलेली भावनात्मकता व भाषेची सजावट आहे. वर्ण्य वस्तूबरोबरच इतरहि सदृश वा विसदृश अशा अनेक वस्तूंचें एकाच वेळीं रमणीय दर्शन आपणाला घडतें, म्हणून आपण ज्ञानेश्वरी व तुकोबांचे अभंग हीं काव्यें आहेत असें म्हणतो. रामदासांच्या अध्यात्मपर प्रकरणांची भाषा काव्याची असली तरी त्यांत भाषेच्या सजावटीकडे प्रायः मुळींच लक्ष दिलेलें नाहीं. अर्थ रमणीय करून सांगण्याची रामदासांची हातोटी येथें मुळींच दिसत नाहीं. ऐंहिक व पारलौकिक उन्नति साधणारे

---

१ ऐतिहासिक प्रस्तावना पृ. ३१-३२

विचार त्यांनीं साध्या व सोप्या भाषेंत सांगण्यांतच समाधान मानले आहे. गद्यापेक्षां पद्य पाठ करायला सोपें म्हणून त्यांनीं आपल्या ग्रंथांची रचना पद्यांत केली. सांप्रदायिक अर्थानें पाहिलें असतां समर्थांना कवि म्हणण्यापेक्षां थोर ग्रंथकारच म्हणणें अधिक बरोबर होईल. मात्र विचारांची भव्यता व उत्कटता हा काव्यगुण मानल्यास समर्थांना कवि म्हणावयास चिंता नाहीं. इंग्रज कवि ब्राउनिंग याच्या काव्यांत विचारांची भव्यताच आहे. स्वतः रामदास यांनीं "जेणें देहबुद्धि तुटे। जेणें भवसिंधु आटे। जेणें भगवंत प्रगटे। या नांव कवित्व" अशी जी काव्याची व्याख्या केली आहे, तिच्यावरून भाषेच्या सजावटीकडे त्यांनीं कां लक्ष दिलें नाहीं हें समजेल.

असें असलें तरी समर्थांची देवताख्यानपर, स्तोत्ररूप, आत्मपर अशी जी कविता आहे तिच्यांत काव्य भरपूर आहे. रामायणापैकीं सुंदरकांड निःसंशय सुंदर आहे. त्यांत कथानकरचनाचातुर्य व हास्यरस हीं उत्तम प्रकारचीं दिसतात. मारुतीच्या शेपटाचा पराक्रम वाचकांना हंसविल्याखेरीज राहात नाहीं. ब्रह्मदेवानें पत्ररूपानें ही हकिगत रामाला कळविली असतांना "तया वाचितां वाचितां राम हांसे। क्रिडाकौतुकें अंतरामाजि तोषें" असा तिचा परिणाम वर्णन केला आहे. युद्धकांड तर अत्यंत बहारीचें आहे. याचें तेराशे श्लोक असून ते वाचीत असतांना आपण प्रत्यक्ष युद्ध पाहातों आहोंत असें आपणाला वाटतें. रामायणांतील इतर कथाभाग सोडून देवतामुक्ति घडविणारा युद्धप्रसंग समर्थांनीं निवडला यांत त्यांचा हेतु स्पष्ट होतो. त्या काळीं महाराष्ट्राची स्थिति लंकेंतील देवांसारखी झाली होती, आणि शिवाजीराजासारख्या रामाची तो उत्कंठेनें वाट पाहात होता. आनंदवनभुवन हें काव्य भव्य व सुंदर आहे. आनंदवनभुवन म्हणजे वाराणसी व या प्रकरणांत वाराणसीचाच उल्लेख आहे, पण लौकिकांत मात्र हें वर्णन महाराष्ट्राचे आहे असा समज झाला आहे," असें या प्रकरणीं शंकर श्रीकृष्ण देव म्हणतात.[1] करुणास्तोत्रें एकंदर बत्तीस

१ श्रीसमर्थहृदय पृ. १२१

असून त्यांत भक्ति व करुण हे दोन रस ओतप्रोत भरले आहेत. आपल्या मनींची मळमळ आणि तळमळ अगदीं जिव्हाळ्यानें समर्थांनीं यांत वर्णिली आहे. अलंकाररहित काव्य भावनेच्या जोरावर किती प्रभावशाली होऊं शकतें त्याचा उत्तम नमुना म्हणजे हीं करुणास्तोत्रें होत. हीं सर्वच स्तोत्रें सरस आहेत. परंतु त्यांतहि अनुदिन अनुतापें तापलों रामराया,. तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलों, बुद्धि दे रघुनायका, उदासीन हे वृत्ति कोठें न लागे इत्यादि स्तोत्रें अत्यंत बहारीचीं आहेत. समर्थांनीं दुसरें कोणतेंहि वाङ्मय निर्माण न करितां एवढीं स्तोत्रेंच लिहिलीं असतीं तरी मराठी-वाङ्मयांत तीं अमर झालीं असतीं. भीमरूपी स्तोत्रें एकंदर तेरा असून तीं ओजोगुणानें भरलेलीं आहेत. 'मनाचे श्लोक' दोनशे पांच असून त्यांत समर्थांनीं मनाशीं गुजगोष्टी करून त्याचें हित कशांत आहे हें मोठ्या भावपूर्णतेनें सांगितलें आहे. तुकोबांच्या अभंगांवर महाराष्ट्राची जशी प्रीति जडली आहे, तशीच ती रामदासस्वामींच्या या श्लोकांवरहि जडली आहे. महाराष्ट्राचें सारें वातावरण या श्लोकांनीं निनादित झालें आहे. महाराष्ट्रांत ओज व तेज भरण्याचें सामर्थ्य यांत आहे. समर्थांनीं अगदीं प्रसन्न मनानें हे श्लोक गाइले असल्यानें त्यांत भव्यता, उत्कटता व प्रसाद हे गुण सहजच आले आहेत. पदसंग्रहांत एकशे आठ पद्यें असून तीं भक्तिरसानें परिप्लुत आहेत. समर्थांच्या साहित्याला 'इतिश्री' सारखा शोभून दिसणारा व "धांव रे रामराया किती अंत पाहाशी" या शब्दांनीं सुरू होणारा "धांवा" भावोत्कट व रम्य आहे. कोहिनूर हिऱ्याचें तेज आणि काबुली द्राक्षांतील माधुर्य व रसवत्ता यांत आहे.

रामदासांच्या रचनेंत कांहीं दोषहि आहेत. जो मजकूर गद्यांत लिहिला तरी चालेल (किंबहुना जो गद्यांतच लिहिला पाहिजे.) तो त्यांनीं पद्यांत लिहिल्याकारणानें, त्यांचीं पुष्कळ कविता रुक्ष, नीरस झाली आहे. बाग प्रकरण, कारखाने प्रकरण इत्यादि प्रकरणें अशा प्रकारची आहेत. यांत "प्रसंग निघाला स्वभावें । बागेमध्यें काय लावावें । म्हणूनि घेतली नांवें ।

सं. नं. १३१

कांहीं एक ॥१॥ कांटीं रामकांटीं फुलेकांटीं । नेपती सहदेवी कामाटी । साबी चिलारी सागरगोटी । हिंवर खैर खरमाटी ॥२॥ एका विठंबा प्रसंग । लांबी रुंदी यथासांग । चौक नेमस्त व्यंग । असोंचि नये ॥१॥ वीट लांबी नऊ तसू । आणि रुंदी सात तसू । उंची जाणिजे तीन तसू । पाठपोट नेमस्त ॥२॥" अशा प्रकारची गद्यसदृश रचना झाली आहे. रामदासांची प्रतिभा उत्प्रेक्षामूलक किंवा सृजनशील अशी फारशी नसल्यानें त्यांनीं प्रायः काव्यमय प्रसंग असूनहि त्याचें केवळ वर्णन केलें आहे. वर्षाकालीन वनश्रीचें वर्णन करणारें एक जें स्फुट काव्य आहे त्यावरून रामदासी प्रतिभा ही केवळ वर्णनात्मक कशी होती हें समजतें. या खेरीज त्यांच्या वृत्तरचनेंतहि अनेक ठिकाणीं शिथिलता झाली आहे. सुंदर्य (सौंदर्य), राक्षेस (राक्षस), मश्यक (मशक), जन्नानि (जननि), चितोवृत्ति (चित्तवृत्ति), शिवाल्ये (शिवालयें), अद्धात्म (अध्यात्म), स्तूति (स्तुति), अक्षै (अक्षय) इत्यादि सारखीं अशुद्धें त्यांच्या ग्रंथांत जागोजागीं आहेत. ग्रामदासी संप्रदायाचीं जीं वीस लक्षणें[1] सांगितलीं आहेत त्यांत 'प्रथम लिहीणें दुसरें वाचणें । तिसरें सांगणें अर्थांतर' असें लिहिलें आहे. या संप्रदायांत गद्यसदृश रचना कां निर्माण झाली, याचा बोध या सांप्रदायिक दंडकावरून होण्याजोगा आहे.

समर्थ संप्रदायांतील कांहीं प्रमुख व्यक्तींचा व कवींचा उल्लेख येथेंच करणें युक्त होईल. श्री समर्थ रामदास, श्री जयरामस्वामी वडगांवकर (शके १५२१ ते १५९४) रंगनाथस्वामी (शके १५३४ ते १६०६) निगडीकर, आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर (मृ. शके १६१८) आणि केशवस्वामी भागानगरकर (मृ. शके १६०४) या पांचजणांस त्या वेळच्या लोकांनीं 'दासपंचायतन' असें नांव दिलें आहे. जयरामस्वामींनीं लिंगायत घराण्यांत जन्म घेऊनहि कृष्णोपासनेचा प्रसार केला. त्यांनीं दशमस्कंध टीका, रुक्मिणीस्वयंवर, सीतास्वयंवर व अपरोक्षानुभव हे ग्रंथ लिहिले. याच

---

१ श्री रामदासस्वामींचे समग्र ग्रंथ, सं. ल. रा. पांगारकर, पृ. ४८६

रामदासी परंपरेंत जयराम नांवाचा दुसरा कवि झाला. त्याचे श्लोक, पदें, अभंग अशी विविध रचना मनोहर व साधी आहे. राजयोगी रंगनाथ-स्वामींनीं गजेंद्रमोक्ष, गुरुगीता, पंचीकरण योगवासिष्ठसार इत्यादि ग्रंथ लिहिले व पुष्कळ सुंदर पदें रचिलीं. आनंदमूर्ति व केशवस्वामी यांनीं कांहीं पद्यरचना केली. कवयित्रींत वेणाबाई (शके १५५० ते १६००) हिची विशेष ख्याति आहे. हिनें पदें, अभंग व इतर ग्रंथरचना बरीच केली आहे. त्यांत सीतास्वयंवर हा ग्रंथ विशेष सुंदर आहे. ग्रंथ ओंवीबद्ध असून याचे एकंदर चौदा समास आहेत. ग्रंथांत जागोजागीं सुंदर स्वभाव-चित्रें व वस्तुचित्रें आलीं आहेत. रामदासांचे वडील बंधु गंगाधरपंत (शके १५२७ ते १५९९) ऊर्फ श्रेष्ठ (रामीरामदास) यांनीं हरिहरैक्य पट-विणारा 'भक्तिरहस्य' व सगुणोपासनेची तरफदारी करणारा 'सुगमोपाय' असे दोन ग्रंथ लिहिले आहेत. दिनकर गोसावी (शके १५५०-१६२५) यांचा 'स्वानुभवदिनकर' हा ग्रंथ ६७५० ओव्यांचा असून त्यांत वेदांत व भक्तिमार्ग यांचें विवेचन आहे. रामदासी वाङ्मयांत दासबोधाच्या खालोखाल याची योग्यता मानतात. रामदासी संप्रदायांतील इतर कवींची माहिती 'दक्षिण हिंदुस्थानांतील कवि' व 'कृष्णदयार्णव व श्रीधर' इत्यादि विभागांत पुढें दिली आहे.

रामदासांच्या कल्याण उद्धवादि इतर शिष्यांनींहि थोडी फार ग्रंथरचना त्या काळाला अनुसरून केली असली तरी ती सामान्य प्रतीची अशी आहे. रामदासांची कळकळ व स्वदेशप्रीति यांपैकीं एकांतहि नाहीं. नाहीं म्हणायला देवदासाची कांहीं कविता मात्र जोरदार आहे. मुसलमानांची अप्रीति व स्वदेशप्रेम याच्या काव्यांत आहे. यानें गजेंद्रमोक्ष नांवाचें लहान काव्य प्रमाणिका वृत्तांत रचिलें आहे. 'अवचितसुत काशि' यानें श्लोकबद्ध व ओंवीबद्ध असे द्रौपदीस्वयंवर प्रसंगावर दोन ग्रंथ लिहिले असून त्यांपैकीं ओवीबद्ध ग्रंथ शके १६१८ पौष वद्य १० मीस त्यानें पुरा केला असें वर्णन आहे. महानुभाव पंथांत याचे ग्रंथ विशेष वाचिले

जातात. याच काळांत दुसरा एक उल्लेखनीय कवि होऊन गेला. त्याचें नांव शिवराम.[1] शिवरामस्वामींचा जन्म शके १५५४ मध्यें झाला व त्यांनीं हा लोक शके १६११ (?) मध्यें सोडिला. यांनीं शेंकडो ओवीबद्ध व श्लोकबद्ध ग्रंथ रचिले असून ते सर्व वेदांतपर व भक्तिपर आहेत. यानें भागवताच्या एकादशस्कंधावरहि टीका केली आहे.

१ शिवरामाच्या वडिलांचें व गुरूचें नांव पूर्णानंद. पूर्णानंदांच्या गुरूचें नांव ब्रह्मानंद.

१०

वामन पंडित[१]

शिवशाहींत काव्यगुण आणि काव्यसंख्या या दोन्ही दृष्टींनीं सर्वश्रेष्ठ ठरणारा कवि म्हणजे वामन पंडित हाच होय. स्वराज्याच्या ऐश्वर्याला भव्यतेला आणि शुचितेला साजेसेंच त्याचें काव्य होतें. शिवशाही म्हटली कीं तुकाराम आणि रामदास हीं दोन नांवें चटकन् आपल्या नजरेसमोर येतात. याचें कारण दोघांच्याहि मागें असलेलें संप्रदायाचें, पाठबळ. वारकरी संप्रदाय आणि रामदासी संप्रदाय असे दोन प्रभावशाली व बलिष्ठ संप्रदाय तुकाराम- रामदासांना लाभल्यामुळें त्यांचीं नांवें आणि काव्य सर्वतोमुखीं व्हायला मदत झाली यांत शंका नाहीं. तुकाराममहाराज हे उच्च कोटींतील संत होते. काव्यकरण्याच्या दृष्टिपेक्षां मनःपूर्वक पांडुरंगाची सेवा करण्याची त्यांची मनोवृत्ति होती. प्रांजळपणा आणि जिव्हाळा यांमुळें त्यांच्या साध्या उद्गारांना भावगीतांचें स्वरूप आलें आहे. रामदास हे राजकारणी संत होते. आपल्या संप्रदायांतील मंडळींना उपदेश करण्याच्या उद्देशानें त्यांनीं दासबोधाची रचना केली. असें करीत असतांना त्यांचीहि दृष्टि काव्याच्या सजावटीपेक्षां विषयप्रतिपादनाकडेच अधिक होती. कांहीं आख्यानें व करुणाष्टकें सारख्या त्यांच्या रचनेंत काव्यगुण आहेत. परंतु असल्या काव्याची संख्या कमीच भरेल. काव्यगुण ओतप्रोत ज्याच्या काव्यांत भरले आहेत अशा रघुनाथ पंडिताची येथें आठवण होणें साहजिक आहे. नलदयंतीस्वयंवराख्यान हें काव्य अष्टपैलू हिऱ्यासारखें आहे यांतहि शंका नाहीं. परंतु संख्येच्या दृष्टीनें एका हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीहि

---

१ वामन नरहरि शेषे ऊर्फ वामन पंडित हे मूळ विजापूरचे राहणारे. ऋग्वेदी वासिष्ठगोत्री ब्राह्मण. मृत्यु वैशाख शु. ६ शके १६१७.

रघुनाथ पंडिताची काव्यरचना नाहीं. विविधता, विपुलता आणि विदग्धता जर आपणाला पाहावयाची असेल तर वामन पंडिताच्या काव्याकडेच वळलें पाहिजे. तुकाराम-रामदास-रघुनाथ पंडित यांना प्रत्यक्ष राजाश्रय किंवा राजप्रीति यांचा लाभ झाला होता. असल्या आश्रयाकडे किंवा प्रीतिकडे पाठ फिरवून वामन पंडितांनीं वाग्ब्रह्माची उपासना केली. महाराष्ट्रांत पुनः स्थापन झालेल्या स्वराज्याच्या काळांत वामन पंडितानें आपल्या काव्यांची रचना केली असूनहि, यांत त्या स्वराज्याचा प्रत्यक्ष किंवा परोक्ष कोणत्याहि प्रकारचा उल्लेख नाहीं. ज्ञानानंद आणि काव्यानंदांत निमग्न असलेल्या पंडितांना भोंवतालच्या जगाची मुळींच जाणीव असलेली दिसत नाहीं. अर्थात् ही घटना बऱ्याच अंशांनीं तत्कालीन लौकिक काव्य न रचण्याच्या प्रथेवरूनहि निर्माण झाली असावी. सभोंवताली चालू असलेल्या गोष्टींचा ज्याप्रमाणें वामन पंडितानें आपल्या काव्यांत निर्देश केला नाहीं, त्याचप्रमाणें त्यानें खुद्द स्वतःचाहि उल्लेख फारसा कोठें केला नाहीं. वामन पंडिताच्या जीवनाविषयीं—त्याचे मातापितर आणि पत्नी यांच्या नांवाखेरीज आणि गुरु सच्चिदानंद यांच्या भेटीच्या प्रसंगाखेरीज—त्याच्या काव्यांत कोठेंहि कांहीं माहिती आलेली नाहीं.

वामन पंडितांच्या काव्याचे वेदांतविषयक, पौराणिक आख्यानपर आणि भाषांतरित असे तीन भाग पाडतां येतील. त्यांच्या उपलब्ध असलेल्या सुमारे चाळीस हजार कवितेपैकीं (म्हणजे कवितेच्या ओळींपैकीं) निम्म्याहून अधिक कविता वेदांतविषयाला वाहिलेली आहे. यांत यथार्थदीपिका, निगमसार, चित्सुधा, प्रियसुधा, तत्त्वमाला, राजयोग, प्रेमसरी, गीतार्णवसुधा, कर्मतत्त्व इत्यादि छोटीं मोठीं प्रकरणें आहेत. या सर्व काव्यावरून वामन पंडिताची गाढ विद्वत्ता आणि खोल अध्यात्मज्ञान यांचा चांगलाच प्रत्यय येतो. यथार्थदीपिका काव्याच्या २२२६६ ओव्या असून, त्यांत भगवद्गीतेचा जसा असेल तसा अर्थ विस्तारपूर्वक सांगण्याचा हेतु पंडितांचा दिसतो. गीतेच्या सातशे श्लोकांवर सुमारे बावीस हजार

ओव्यांचें केलेलें हें सुबोध व्याख्यानच म्हणावयाचें. ज्ञानेश्वरांनीं सुमारे नऊ हजार ओव्यांची भावार्थदीपिका उर्फ ज्ञानेश्वरी नामक गीताटीका तयार केली. तिच्यापेक्षां वेगळें व अधिक चांगलें आपण कांहीं तरी करतों आहोंत याची जाणीव पंडितांनीं जागोजागीं व्यक्त केली आहे. ज्ञानेश्वरीच्या सुरुवातीला गणपतीला नमन करण्यांत आलें आहे. भगवद्गीता उर्फ कृष्णगीता रचीत असतांना, गणपतीला करण्यांत आलेल्या या वंदनाबद्दल ज्ञानेश्वरांना वामन पंडितांनीं एक कोपरखळी लगाविली आहे. भावार्थ-दीपिकेंत व इतरहि गीताटीकांत गीतेचा खरा अर्थ आलेला नाहीं. तो खराखुरा अर्थ सांगण्याकरितां, निंदास्तुतीची पर्वा न करितां, आपण यथार्थदीपिका तयार करीत आहोंत असें पंडितांचें म्हणणें आहे. ते म्हणतात, "टीका उदंड जाल्या। परी देवतांस तदुपासकास भ्याल्या। यथार्थ अर्थ नाहीं बोलिल्या। तैसी नव्हे हे टीका ॥११६४॥ म्हणोनि यथार्थदीपिका। नांव पावली हे टीका। कीं अद्वैत आणि भजावें एका। श्रीवत्सांका जगद्गुरूतें ॥११६५॥ विघ्न न हो म्हणोनि। आरंभीं देवा एका प्रार्थुनी। स्फूर्ती देईल हे इच्छा धरोनी। पार्थना एका आणिकाची ॥११६५॥ ...कोणाची नसे भीड। आणि कोणाची नसे चाड। अनन्यभक्ति लागतां गोड। या भगवद्गीतेंत ये रीती ॥११७९॥ वाचोत जे वाचिती। न वाचोत जे वाईट मानिती। संतुष्ट होय एक जगत्पति। या यथार्थ निरूपणें ॥११८०॥ अध्याय ७॥" नुसतें रुक्ष ज्ञान किंवा नुसती आंधळी भक्ति ही कुचकामाची असून ज्ञानयुक्त सगुणभक्तिच खरा मोक्ष मिळवून देऊ शकते, हा वामन पंडितांचा ठाम सिद्धांत असून तो त्यांनीं आपल्या सर्व अध्यात्मपर ग्रंथांत स्पष्टपणें मांडला आहे. यथार्थदीपिकेच्या निमित्तानें त्यांनीं हेंच गीतेचें सार पुढील शब्दांत सांगितलें आहे. "ऐसें ब्रह्म तेंचि सगुण। ऐसा ज्ञाननिष्ठ भक्त निपुण। भगवंत भागवत ऐशी खूण। जेथें वेगळी न सांपडे ॥ १२६ ॥ सगुण ब्रह्म चराचर। गीतेंत या ज्ञानाचा आदर। म्हणूनि

'धर्म्यपद' वारंवार। या ब्रह्मज्ञानीं योजिलें ॥ १२७ ॥ अ. १॥" भगवद्गीतेचा यथार्थ प्रगट करणारी व्याख्या करीत असतांना पंडितांनीं जागोजाग श्रुति व श्रीमद्भागवतादि ग्रंथांचे आधार दिले असल्यानें, ती व्याख्या जोरदार बनली आहे यांत शंका नाहीं. यथार्थदीपिका रचीत असतांना काव्य करणाऱ्या कलावंताची दृष्टि पंडितांनीं स्वीकारली नसून, वाचकांना गीतेंतील विषय सुलभतेनें कळावा इतकींच दृष्टि स्वीकारली आहे. ज्ञानेश्वरांनीं गीतेचा भावार्थ सांगत असतांना काव्याचा भावफुलोरा निर्माण केला आहे. ज्ञानेश्वरी आपल्याशीं एखाद्या मैत्रिणीप्रमाणें गुजगोष्टी करीत असलेली दिसते तर यथार्थदीपिका एखाद्या मातेप्रमाणें खराखुरा मोलाचा उपदेश करिते. पंडितांची अध्यात्मपर रचना किती सुबोध असे त्याचा नमुना म्हणून पुढें तीन चार ओव्या दिल्या आहेत. "आत्मा कळतां केवळ। विदित होय हें विश्व सकळ। कीं ओळखितां समुद्र जळ। ओळखिले तरंग सर्वहि ॥ १४२२ ॥ कळतां तंतु एक। पट कळले अनेक। कळतां एक कनक। अलंकार सर्व कळतीच ॥ १४२३ ॥ कळतां एक माती। कळल्या घटादि सर्व जाती। आत्मा कळतां चराचर मूर्ती। अवघ्याच कळल्या ॥ १४२४ ॥ या कारणें आत्मज्ञ। तोचि जगीं सर्वज्ञ। सर्वज्ञास म्हणती अभिज्ञ। विपश्चित् म्हणूनी ॥ १४२५ ॥ अ. २ ॥" ज्ञानेश्वरी ही तिच्यांतील पहिल्या प्रतीच्या काव्यगुणांमुळें आणि वारकरी संप्रदायाच्या पाठबळामुळें अत्यंत लोकप्रिय झाली आहे यांत शंका नाहीं. तसलें भाग्य यथार्थदीपिकेला मिळणें अशक्य असलें तरी ती जाणत्या लोकांच्या आदराला किती पात्र झाली होती हें कविवर्य मोरोपंतांच्या पुढील उद्गारांवरून कळेल. "केली श्री गीतेची व्याख्या। बहुभक्ति जींत गाजविली। साजविली साधु सभा भाषा कविकवनशक्ति लाजविली॥" कर्मतत्त्व या आध्यात्मिक प्रबंधाचे आठ अध्याय असून ते श्लोकवृत्तांत आहेत. फलतत्त्व, यत्नतत्त्व, भोगतत्त्व, भोक्तृतत्त्व, आत्मतत्त्व, वेदतत्व, जीवतत्त्व आणि अनुभवतत्त्व याप्रमाणें या अध्यायांतील विषय आहेत.

भक्ति आणि अद्वैतज्ञान यांची सांगड याहि प्रकरणांत पंडितांनीं श्रुतिप्रमाणानें घातली आहे. आपला हा प्रबंध 'भवबंधहारी' आहे असें ते सांगतात. निगमसार हा ग्रंथ ओवीवृत्तांत असून त्याचे नऊ अध्याय आहेत. सर्व वेदांचें सार म्हणून अद्वैत तत्त्वज्ञानाचें विवरण यांत आलें आहे. वामन पंडितांचे गुरु श्रीसच्चिदानंद यांच्या भेटीचा प्रसंग सुरुवातीला दिला असून तो बहारीचा आहे. पंडितांच्या ग्रंथांपैकीं फक्त याच ग्रंथाच्या शेवटीं "शके पंधरा शते पंचाण्णव। तैं ग्रंथ प्रगटला अभिनव। जो अनादि अनुभव। सकळ संतांचा" ग्रंथाचा रचनाकाल दिला आहे. चित्सुधा, प्रियसुधा, राजयोग, प्रेमसरी, गीतार्णवसुधा, तत्त्वमाला इत्यादि अध्यात्मपर प्रकरणें छोटीं असून श्लोकवृत्तात्मक आहेत. प्रियसुधा हें प्रकरण तर अवघ्या अठरा श्लोकांचें असून त्यांत पंडितांनीं आपली पत्नी-गीरा हिला आपलाच आत्मा आपणाला कसा प्रिय असतो तें सुबोध भाषेंत सांगितलें आहे. 'परम आवडि आपुलि आपणा वळख तूं तुज टाकुनि मीपणा' हें प्रस्तुत काव्याचें पालुपद आहे. यासर्व अध्यात्मपर प्रकरणांत अद्वैतज्ञानाचें प्रतिपादन असून ज्ञानयुक्त सगुणभक्ति ही सर्वश्रेष्ठ होय असा अंतःप्रवाह त्यांत वाहत असतो.

अध्यात्मपर कवितेच्या खालोखाल वामनानें आख्यानपर कविता लिहिली. हीं आख्यानें त्यानें रामायण, महाभारत व श्रीमद्भागवत या ग्रंथांतील कथांच्या आधारें रचिलीं. त्यानें लिहिलेल्या सुमारे चाळीस आख्यानांपैकीं सीतास्वयंवर, भरतभाव, नामसुधा, वनसुधा, वेणुसुधा, हरिविलास, कात्यायनीव्रत, रासक्रीडा, द्वारकाविजय, राधाविलास, राधाभुजंग, जलक्रीडा इत्यादि आख्यानांवर रसिकांच्या उड्या पडतात. हीं सर्व आख्यानें विविध श्लोकवृत्तात्मक असून तीं अत्यंत बहारीचीं आहेत. प्रत्येक आख्यानाच्या सुरुवातीला मंगलाचरण किंवा नमन असून त्यांतच प्रायः आख्यानांतील विषयाचा सारांश सांगितलेला असतो. आख्यानाकरितां निवडलेला प्रसंग नाट्यपूर्ण असून त्याची मांडणी अत्यंत आकर्षक

असंते. नामसुधेंत अजामिळाचा लिंगदेह यमदूत नेत असतांना तेवढ्यांत विष्णुदूत येऊन त्याला सोडवितात. राधाविलासांत श्रीकृष्ण व राधा यांची क्रीडा चालली असतांना बाहेर राधेच्या पतीची हांक ऐकू येते. आकर्षक व नाट्यपूर्ण प्रसंगाबरोबरच आख्यानांत संवादांची कुशलपणें योजना केलेली असते. या संवादांवरून बोलणाऱ्या पात्राचा स्वभाव उत्तम प्रकारें कळतो. शृंगार, वीर, करुण, हास्य इत्यादि रसांचा परिपोष होईल अशा प्रकारें भावनांची गुंफण प्रत्येक आख्यानांत केलेली असते. आख्यानांत वर्णिलेले प्रसंग आपण प्रत्यक्ष पाहतों आहोंत अशा प्रकारें ते रेखाटलेले असतात. वनसुधेंतील मस्तकीं पल्लवांचे तुरे खोंवून आणि गळ्यांत गुंजांच्या माळा घालून व मर्कटपुच्छ हातीं धरून 'वृक्षिं उडो' पाहणारे आणि बेडका-प्रमाणें टुणटुण् उड्या मारणारे 'बाळ ते बल्लवांचे' आपण प्रत्यक्ष पाहतों आहोंत असें आपणाला वाटतें. आख्यानांतील रसाला व प्रसंगाला पोषक अशा वृत्तांत श्लोकरचना केलेली असून हे श्लोक अनुप्रासादि शब्दालंकार व उपमा रूपकादि अर्थालंकार यांनीं नटलेले व सामान्यपणें प्रसादपूर्ण असे असतात. रामचंद्र बडवे यांनीं 'सुश्लोक वामनाचा' म्हणून ज्या श्लोकांचा गौरव केला ते श्लोक आख्यानपर कवितेंत जागोजागीं आहेत. 'गोऱ्या गौळिणि सांवळ्या हरितनू रासोत्सवीं नाचती। श्रीगंगे यमुनेमधें तरल ते कल्लोल आंदोलती। गोपीलोचन मीन लोल-मकर श्रीकुंडले डोलती। गोपस्त्रीकुचकुंभ तारक करी पोहे रतीचा पती॥ किंवा अंग वक्र अधरिं धरि पावा, गोपवेष हरि तोचि जपावा। वाम बाहुवरि गालहि डावा तो ठसा स्वहृदयांत पडावा॥ सारख्या श्लोकांत हिऱ्याची चमक आणि ताज्या खुडलेल्या मोगऱ्याच्या फुलांचा सुगंध नाहीं असें कोण म्हणेल? या सर्व आख्यानांतूनहि ज्ञानयुक्त सगुणभक्तीचाच महिमा वामनानें वर्णिला आहे. ईश्वर स्थावरजंगम सर्व पदार्थांत असला तरी ईश्वरानें जे जे अवतार घेतले त्यांचीं नांवें जाणते-पणानें घेतलीं असतां अमृताप्रमाणेंच तीं घेणाऱ्याला अमृतत्त्व मिळवून

देतात असें नामसुधा या काव्यांत सांगण्यांत आलें आहे. वामन पंड़ितांच्या पूर्वी कांहीं महानुभाव कवि कवयित्रींनीं आणि एकनाथ मुक्तेश्वरादिकांनीं कांहीं आख्यानक कविता लिहिली आहे हें खरें. परंतु वामनाच्या आख्यानांत जी नाट्यपूर्णता, आकर्षकता व सफाईदारपणा आहे ती इतरत्र क्वचितच आढळते. शिवाय विविधता व विपुलता याहि दृष्टीनें पाहतां तो आख्यानक काव्य रचणाऱ्या कवींत फारच वरच्या दर्ज्याचा वाटतो.

वामनाच्या स्फुट रचनेंत करुणाष्टक, उपदेशमाला, मनास बोध, वामऩबोध, सिद्धांत, भगवद्हास्य इत्यादि प्रकरणांचा व पदांचा अंतर्भाव होतो. माझे विशींच मन निष्ठुर केंवि केलें, असें पालुपद असलेलें करुणाष्टक हृदय-स्पर्शी आहे. मना कासया व्यर्थ चिंता वहासी ? दिसे तें नसे क़ाय अज्ञान होसी ?—अशा शद्धांत व्यक्त होणाऱ्या 'मनासबोध' हें काव्य वाचीत असतांना रामदासस्वामींच्या 'मनाचे श्लोक' या काव्याची आठवण होते. वामनानें रामदासस्वामींचा उल्लेख आपल्या काव्यांत कोठेंहि केलेला नसला तरी त्यांच्या ग्रंथांशीं त्याचा चांगलाच परिचय असावा असें प्रस्तुत काव्यावरून वाटतें. पदांपैकीं 'अर्जुना तूं जाण रे, होसील सुजाण रे, विश्व नाहीं मीचि आहे सख्या तुझी आण रे' हें पद सुंदर व अर्थपूर्ण आहे.

वामन पंडितांच्या भाषांतरित काव्यांत चतुःश्लोकी भागवत, शंकराचार्यकृत अपरोक्षानुभूंति, समश्लोकी भगवद्गीता, पंडित जगन्नाथकृत गंगालहरी व भर्तृहरिकृत नीतिशतक, शृंगारशतक व वैराग्यशतक इत्यादि काव्यांचा अंतर्भाव होतो. संस्कृत कवींच्या काव्याचा वामनानें जो मराठी वाचकांना परिचय करून दिला तो त्यांना इतका आवडला कीं, निदान भर्तृहरिपुरतें तरी असें म्हणावयास हरकत नाहीं कीं, हा कवि वामनाच्या द्वारेंच मुख्यतः मराठी जाणणाऱ्यांना माहित आहे. समश्लोकी गीतेसंबंधानें मोरोपंत म्हणतात, "रीति समश्लोकीची अतुला साधेल काय नव्यास। या सुयशें होईल कां रोमांचव्यासकाय न व्यास." या खेरीज पंडितांनीं

नों. नं. ७१४८२
आ७१५३ १४१

सिद्धांतविजय व अनुभूतिलेश नांवाचीं दोन अध्यात्मपर प्रकरणें संस्कृतांत लिहिलीं असून तीं चांगलीं साधलीं आहेत.

वामन पंडितांच्या काव्यांत कांहीं किरकोळ दोष आहेत. पुनरुक्तीचा दोष अनेक ठिकाणीं झाला आहे. नामसुधेंत हा दोष फारच उत्कटत्वानें भासतो. सुताबद्दल सूत, शरणाबद्दल शर्ण, लोपवोनि ऐवजीं लोपोनि, चौघेही ऐवजीं चौघही असली ऱ्हस्वदीर्घांची ओढाताण कांहीं ठिकाणीं आहे. अघझोपडी, सुरराजटाळी, टाळीरवें, मोरपत्रेंसारखे घेडगुजरी किंवा दुष्टसमासहि झाले आहेत. संधिरहितत्वाचा दोषहि अनेक ठिकाणीं झाला आहे. रसदृष्ट्या संभोग शृंगाराचीं जीं वर्णनें राधाविलास व राधाभुजंग या काव्यांत आलीं आहेत तीं देखील आजच्या दृष्टीनें पाहतां सदोष वाटतात. परंतु हे सर्व दोष अल्प असून ते केवळ सूर्यावरील डागांप्रमाणेंच होत. वामन पंडिताची काव्यरचना खरोखरच अपूर्व आहे. श्रीधर म्हणतो, " जैसा चंडांशु संतेज व्योमीं । तैसाचि केवळ वामनस्वामी । ज्याची श्लोकरचना ये भूमीं । भूमंडलावरी अपूर्वगा ॥ "

वामन पंडितांचे समकालीन असे नागेश व विट्ठल यांचा येथेंच उल्लेख केलेला बरा. नागेश हा अहमदनगराजवळील भिंगार येथील वृत्यंशी जोशी होता. याचें उपनांव मुळे. विट्ठलाचें संपूर्ण नांव विट्ठल अनंत क्षीरसागर व हा राहणारा बीडजवळील गौरिपूर गांवचा. याचा धंदा व्यापाऱ्याचा असे. नागेशानें सीतास्वयंवर, चंद्रावळी, रुक्मिणीस्वयंवर, रसमंजरी आणि शारदाविनोद अशीं पांच काव्यें लिहिलीं आहेत. याचें काव्य श्लोकबद्ध असून, जरी त्यांत संयमाचा अभाव असला तरी त्यांत सहज स्फूर्ति आहे. " भ्रम करी प्रकरीपरी चंचला । मन हरी न हरी अशि कोकिला । रसरसी सरसीरुहलोचनी । गजगमा जसि मानसमोहनी ॥ " हें चंद्रावळीचें वर्णन व " रुळत चंचळ अंचळ भूवरी । उसळतो वलयध्वनि अंबरीं । मदभरें मग गौळणी चालती । थरथरां स्तनमंथर हालती ॥ " इत्यादि तिच्याबरोबर गोरस विकावयास जाणाऱ्या मैत्रिणींच्या वर्णनाशीं वामनी

श्लोकाचें कितीतरी साम्य दिसतें. विष्टलाच्या नांवावर हल्लीं रुक्मिणीस्वयंवर (श. १५९६), पांचालीस्तवन (श. १५९६), सीतास्वयंवर (१५९९), रसमंजरी (१६०१), द्रौपदीवस्त्रहरण (श. १६०२), विद्वज्जीवन व बिल्हण चरित्र असे सात ग्रंथ प्रसिद्ध असून ते सर्व श्लोकबद्ध आहेत. सीतास्वयंवर व रुक्मिणीस्वयंवर यांत प्रत्येकी सात सर्ग असून, विद्वज्जीवनांत सात उल्लास आहेत. रुक्मिणीस्वयंवरांत निरनिराळीं वृत्तें, निरनिराळे छत्र, चामर, गज, उष्ट्र, सर्प इत्यादि बंध, चमत्कृतिजनक अशी "वीराजते मत्त उदार पाहें। वीरां धरीं शक्ति शराव साहे। हे सावरा शक्ति शरीं धरावी। हें पारदा उत्तम तेज रावी" सारखीं प्रतिलोम यमकें व अनुप्रासादि अलंकार भरपूर आहेत. आपलें चित्रकाव्यरचनाकौशल्य व छंदःशास्त्रनैपुण्य दाखवून विद्वानांकडून वाहवा मिळवावी अशी याची इच्छा दिसते. विष्टलाच्या पूर्वी अशा प्रकारची बहुबंधात्मक रचना मराठींत कोणींहि केलेली नाहीं. या सर्व खटपटींत खरें काव्य, रसवत्ता, भावनांचा ओलावा इत्यादि कोठेंच दिसत नाहींत. रुक्मिणीस्वयंवर काव्यापेक्षां सीतास्वयंबर काव्य अधिक सरळ, प्रसादपूर्ण व सरस आहे. यांत एक दोनच क्लिष्ट श्लोक असून कांहीं कांहीं वर्णनें हुबेहूब आहेत. भानुदासाच्या संस्कृत रसमंजरीचें व बिल्हणचरित्राचें यानें केलेलें भाषांतर याच्या स्वतंत्र काव्यापेक्षां सरस उतरलें आहे. विशेषतः वसंततिलका या गोड वृत्तांत गाइलेलें बिल्हणचरित्र चांगलें आहे. कल्याणीचा राजा विक्रमांकदेव याची कन्या चंद्रकला हिच्यास्तव वधस्तंभावर जाण्याचा प्रसंग आला, तरी शेवटीं बिल्हणानें तिचाच ध्यास धरिला व त्याचा परिणाम राजाच्या मनावर होऊन त्यानें स्वकन्येचा त्याचाशीं विवाह लावून दिला. हा प्रसंग चांगला वर्णिला आहे. "अद्यापि ते नृपसुता रतिभोगकालीं। प्रेमाकुलें करयुगें धरिं कंठनालीं। दंतोष्ठ पीडनक्षतें सुखभाव दावी। ते मी स्मरें मदनमंदिर देवदेवी॥ अद्यापि धूर्जटि धरी विष्ण ते स्वकंठी। कूर्में धरागिरिवरा धरलें स्वपृष्ठीं। अंभोनिधीस वडवानल नित्य जाळी। केलांगिकार बुध पाळिती सर्व काळीं" इत्यादि ओळींवरून या काव्यांतील प्रसादगुण प्रत्ययास येतो.

११

दक्षिण हिंदुस्थानांतील कवी

शिवाजीमहाराजांच्या काळांत महाराष्ट्रांत ज्याप्रमाणें भरघोंस साहित्य-निर्मिती होत होती, त्याचप्रमाणें जेथें जेथें महाराष्ट्रीय वसत होते, तेथें तेथें ते सरस्वतीची उपासना करीतच होते. मराठी भाल्याबरोबर मराठी लेखणीचीहि चमक या काळीं दूरदूर दिसत होती. मराठे तंजावराकडे शहाजीराजे भोंसले यांच्या बरोबर गेले व तेथें त्यांनीं राज्यस्थापनेबरोबरच आपल्या सारस्वताचाहि प्रसार केला. शहाजी-शिवाजी-व्यंकोजी-शाहू यांच्या दक्षिणेकडील राज्यानें, मराठी भाषा व साहित्य यांचाहि प्रसार त्या प्रांतांत झाला. राजभाषा मराठी असल्यानें, थेट दक्षिणेकडील राजांना व इतर लोकांना तिचा अभ्यास करावा लागला. आपले अर्ज व आपला पत्रव्यवहार त्यांना मराठींतून चालवावा लागला. या कामीं त्यांना महाराष्ट्रांतून गेलेल्या महाराष्ट्रीय मंडळींचा चांगलाच उपयोग झाला. या महाराष्ट्रीय कुटुंबांपैकीं कांहींनीं दक्षिणेंतच स्थायी होऊन, आपल्या संस्कृतीची व साहित्याची चांगली जोपासना व अभिवृद्धि केली. शिवाजीमहाराजांबरोबर रामदासस्वामींनीं आपल्या शिष्यवर्गांपैकीं भीमस्वामी (शके १५६४ ते शके १६६३) अनंतमौनी, राघवस्वामी वगैरे शिष्य तिकडे धाडिले होते. या शिष्य-मंडळींनीं तिकडे रामदासी संप्रदाय व मराठी भाषा यांची उत्तम सेवा केलेली दिसते. यांचे मठ व शिष्यपरंपरा आजहि तंजावर प्रांतांत चालू आहे. भीमस्वामींनीं प्रत्यक्ष साहित्य निर्मिती फारशी केलेली नाहीं. कांहीं पदें व भक्तलीलामृत (श. १७२०) इतकीच त्यांची साहित्यसंपदा आहे. अनंतस्वामींचे शिष्य मेरुस्वामी यांनीं बरीच व सरस ग्रंथरचना केली आहे. रामसोहळा या ९४२७ ओव्यांच्या ग्रंथांत दासबोधांतीलच बहुतेक

विषय असून शिवाय समर्थांचें चरित्र व कवीच्या तीर्थयात्रांचें वर्णन आलें आहे. भीमोपदेश ग्रंथांत मुमुक्षुदशा, राम-मारुति संवाद, पतित-पावन कथा इत्यादि अनंत विषय असले तरी तो रसाळ आहे. रांघव-स्वामींचा शिष्य माधव यानें विपुलरचना केली आहे. श्लोकबद्ध रामायण, ओंवीबद्ध रामायण, योगवासिष्ठ, गणेशपुराण, विष्णुपुराण, अश्वमेध व अठरा पर्वें महाभारत (शके १६२९) अशी याची एकंदर रचना आहे. त्यांपैकीं महाभारताचा प्रसार मद्रास प्रांतांत पुष्कळ झालेला दिसतो. याची अध्यायसंख्या ९२४ असून, कवीनें तो कावेरी नदीच्या कांठीं गौरीमयूर या गांवीं लिहिला. ग्रंथाची भाषा व रचना साधारण प्रतीची आहे. माधवाप्रमाणें विस्तृत रचना करणारा दुसरा या प्रांतांतील कवि रंगनाथ हा होय. यानें 'कावेरीमाहात्म्य' नांवाचें भाविकांच्या उपयोगी पडणारे विस्तृत काव्य लिहिलें आहे. कावेरी नदीच्या कांठीं दासानुदास, भगवंत, वैद्यनाथ नांवाचे आणखीहि कवि होऊन गेले. दासानुदास (शके १६२६) ऊर्फ राम यानें ज्ञानसंन्यास, सिद्धानुभव. कायाजीवलग्न, ज्ञानामृत, ज्ञानसागर इत्यादि ग्रंथ रचिले. भगवंतानें सच्चिदानंदविलास, निजसुख वगैरे ग्रंथ लिहिले आहेत. वैद्यनाथाची रचना फारशी महत्त्वाची नाहीं. या सर्व कवींची रचना अध्यात्मपर, भक्तिपर व अनेकवृत्तात्मक आहे. याच काळांत इकडील कवींनीं लक्ष्मी-नारायणकल्याण नाटकासारखीं शेंकडो पौराणिक नाटकेंहि लिहिलीं. हीं नाटकें कलादृष्ट्या अगदीं सामान्य प्रतीचीं असल्यानें, त्यांच्या कर्त्यांनीं तीं शाहूराजाच्या नांवानें प्रसिद्ध करायला परवानगी दिली असावी. या सर्व रचनेंत पोंवाडे व लावण्या हीं मर्दमराठ्यांचीं गीतें दिसत नाहींत. महाराष्ट्रांतील मराठ्यांचा पराक्रम जसा गाजला, तसा येथील मराठ्यांचा गाजला नाहीं हें कदाचित् याचें एक कारण असेल. निलंगाबाद येथील मठपति अनंत कवि यानें सुलोचना गहिंवर (शके १६४३) व सुलोचना आख्यान (शके १६४५) नांवाचीं काव्यें लिहिलीं. अनंतकवींचें "प्रभात काळीं जननी

यशोदा ।. उठी म्हणे सत्वर बा मुकुंदा । गोपाळ येती तुजला बहाती । गोविंद दामोदर माधवेति " हें गोपीगीत सुप्रसिद्ध असून सोपें व नादमधुर आहे. अनंताप्रमाणें आनंदतनय (मृत्यु शके १६४५) हाहि कवि स्त्रियांच्या व मुलांच्या आवडीचा आहे. यानें पौराणिक प्रसंगांवर गीतें केलीं असून तीं प्रतिभायुक्त नसलीं तरी गोड आहेत. भारत, भागवत, रामायण इत्यादि ग्रंथांतील पौराणिक कथांवर आधारलेलीं याचीं शेंकडों आख्यानें असून तीं कीर्तनकारांना कामधेनूप्रमाणें वाटणारीं आहेत. गोसावीनंदनानें ज्ञानमोदक, सीतास्वयंवर, कांहीं स्तोत्रें व अष्टकें लिहिलीं असून तीं साधीं व गोंडस आहेत.

दक्षिणेकडील या सर्व कवींत तंजावर येथील सुप्रसिद्ध रघुनाथ पंडित हा सर्वश्रेष्ठ दिसतो. आनंदतनयाच्या मुलाला रघुनाथ पंडितांची मुलगी दिली होती. रघुनाथ पंडितानें नलदमयंतीस्वयंवराख्यान, गजेंद्रमोक्ष व रामदासवर्णन इत्यादि काव्यरचना केली. त्यांत त्याची कीर्ति प्रथमच्या काव्यानें महाराष्ट्रभर व आजवर पसरली यांत आश्चर्य नाहीं. कारण नैषधाच्या काव्याच्या आधारानें याची रचना झाली असली, तरी अनेक ठिकाणीं कवीनें स्वतंत्र व बहारीचीं वर्णनें केलीं आहेत. काव्य अनेक वृत्तात्मक असून, बहुतेक श्लोक हिऱ्याप्रमाणें घोटीव व पैलूदार आहेत. यांतील शब्दचित्रें व स्वभावचित्रें अत्यंत रमणीय आहेत. "त्यांतील एक कलहंस तटीं निजेला । जो भागला जलविहार विशेष केला । पोटींच एक पद लांबविला दुजा तो । पक्षी तनू लपवि भूप तया पहातो ॥ आणीकहि पद न वाजत मंद चाले । जो चालतां पदर सावरिला न हाले । हेही करी निजकरी खग सांपडेसा । तोही हळुहळुच होय पलीकडेसा ॥ गजबजोनि समस्त तिच्या सख्या । गजगामा उठल्या तिजसारख्या । पदर सांवरितां नृपबालिका । झळकती हृदयीं मणि-मालिका ॥ " इत्यादि श्लोक याची साक्ष पटवतील. प्रस्तुत काव्यांत कठिण समय येतां कोण कामास येतो, सारखीं जीं अनेक सुभाषितें आहेत, त्यांवरून

विषय असून शिवाय समर्थांचें चरित्र व कवीच्या तीर्थयात्रांचें वर्णन आलें आहे. भीमोपदेश ग्रंथांत मुमुक्षुदशा, राम-मारुति संवाद, पतित-पावन कथा इत्यादि अनंत विषय असले तरी तो रसाळ आहे. रांघव-स्वामींचा शिष्य माधव यानें विपुलरचना केली आहे. श्लोकबद्ध रामायण, ओंवीबद्ध रामायण, योगवासिष्ठ, गणेशपुराण, विष्णुपुराण, अश्वमेध व अठरा पर्वें महाभारत (शके १६२९) अशी याची एकंदर रचना आहे. त्यांपैकीं महाभारताचा प्रसार मद्रास प्रांतांत पुष्कळ झालेला दिसतो. याची अध्यायसंख्या ९२४ असून, कवीनें तो कावेरी नदीच्या कांठीं गौरीमयूर या गांवीं लिहिला. ग्रंथाची भाषा व रचना साधारण प्रतीची आहे. माधवाप्रमाणें विस्तृत रचना करणारा दुसरा या प्रांतांतील कवि रंगनाथ हा होय. यानें 'कावेरीमाहात्म्य' नांवाचें भाविकांच्या उपयोगी पडणारे विस्तृत काव्य लिहिलें आहे. कावेरी नदीच्या कांठीं दासानुदास, भगवंत, वैद्यनाथ नांवाचे आणखीहि कवि होऊन गेले. दासानुदास (शके १६२६) ऊर्फ राम यानें ज्ञानसंन्यास, सिद्धानुभव. कायाजीवलग्न, ज्ञानामृत, ज्ञानसागर इत्यादि ग्रंथ रचिले. भगवंतानें सच्चिदानंदविलास, निजसुख वगैरे ग्रंथ लिहिले आहेत. वैद्यनाथाची रचना फारशी महत्त्वाची नाहीं. या सर्व कवींची रचना अध्यात्मपर, भक्तिपर व अनेकवृत्तात्मक आहे. याच काळांत इकडील कवींनीं लक्ष्मी-नारायणकल्याण नाटकासारखीं शेंकडो पौराणिक नाटकेंहि लिहिलीं. हीं नाटकें कलादृष्ट्या अगदीं सामान्य प्रतीचीं असल्यानें, त्यांच्या कर्त्यांनीं तीं शाहूराजाच्या नांवानें प्रसिद्ध करायला परवानगी दिली असावी. या सर्व रचनेंत पोंवाडे व लावण्या हीं मर्दमराठ्यांचीं गीतें दिसत नाहींत. महाराष्ट्रांतील मराठ्यांचा पराक्रम जसा गाजला, तसा येथील मराठ्यांचा गाजला नाहीं हें कदाचित् याचें एक कारण असेल. निलंगाबाद येथील मठपति अनंत कवि यानें सुलोचना गहिंवर (शके १६४३) व सुलोचना आख्यान (शके १६४५) नांवाचीं काव्यें लिहिलीं. अनंतकवींचें "प्रभात काळीं जननी

यशोदा ।. उठी म्हणे सत्वर बा मुकुंदा । गोपाळ येती तुजला बहाती । गोविंद दामोदर माधवेति " हें गोपीगीत सुप्रसिद्ध असून सोपें व नादमधुर आहे. अनंताप्रमाणें आनंदतनय (मृत्यु शके १६४५) हाहि कवि स्त्रियांच्या व मुलांच्या आवडीचा आहे. यानें पौराणिक प्रसंगांवर गीतें केलीं असून तीं प्रतिभायुक्त नसलीं तरी गोड आहेत. भारत, भागवत, रामायण इत्यादि ग्रंथांतील पौराणिक कथांवर आधारलेलीं याचीं शेंकडों आख्यानें असून तीं कीर्तनकारांना कामधेनूप्रमाणें वाटणारीं आहेत. गोसावीनंदनानें ज्ञानमोदक, सीतास्वयंवर, कांहीं स्तोत्रें व अष्टकें लिहिलीं असून तीं साधीं व गोंडस आहेत.

दक्षिणेकडील या सर्व कवींत तंजावर येथील सुप्रसिद्ध रघुनाथ पंडित हा सर्वश्रेष्ठ दिसतो. आनंदतनयाच्या मुलाला रघुनाथ पंडितांची मुलगी दिली होती. रघुनाथ पंडितानें नलदमयंतीस्वयंवराख्यान, गजेंद्रमोक्ष व रामदासवर्णन इत्यादि काव्यरचना केली. त्यांत त्याची कीर्ति प्रथमच्या काव्यानें महाराष्ट्रभर व आजवर पसरली यांत आश्चर्य नाहीं. कारण नैषधाच्या काव्याच्या आधारानें याची रचना झाली असली, तरी अनेक ठिकाणीं कवीनें स्वतंत्र व बहारीचीं वर्णनें केलीं आहेत. काव्य अनेक वृत्तात्मक असून, बहुतेक श्लोक हिऱ्याप्रमाणें घोटीव व पैलूदार आहेत. यांतील शब्दचित्रें व स्वभावचित्रें अत्यंत रमणीय आहेत. "त्यांतील एक कलहंस तटीं निजेला । जो भागला जलविहार विशेष केला । पोटींच एक पद लांबविला दुजा तो । पक्षी तनू लपवि भूप तया पहातो ॥ आणीकहि पद न वाजत मंद चाले । जो चालतां पदर सावरिला न हाले । हेही करी निजकरी खग सांपडेसा । तोही हळुहळुच होय पलीकडेसा ॥ गजबजोनि समस्त तिच्या सख्या । गजगामा उठल्या तिजसारख्या । पदर सांवरितां नृपबालिका । झळकती हृदयीं मणि-मालिका ॥ " इत्यादि श्लोक याची साक्ष पटवतील. प्रस्तुत काव्यांत कठिण समय येतां कोण कामास येतो, सारखीं जीं अनेक सुभाषितें आहेत, त्यांवरून

कवीचें मनुष्यस्वभावाविषयींचें ज्ञान उत्कृष्ट दिसतें. तेजी, फौज, हेजीब, लगामीं, राजी इत्यादि अनेक फारसी शब्द जे या काव्यांत दिसतात, ते तत्कालीन भाषेला अनुरूप असेच आहेत. काव्यांतील मुख्य दोष म्हणजे कांहीं ठिकाणीं रचना क्लिष्ट झाली असून, श्लोकांचा अर्थ नीट लागत नाहीं. असें असलें तरी पदलालित्य, सुंदर उपमा व विविध बहारीचीं वृत्तें यांमुळें हें काव्य महाराष्ट्रीयांच्या अत्यंत आवडीचें बनलें आहे. केवळ भक्तिपर किंवा अध्यात्मपर काव्य रचण्याच्या त्या काळांत, काव्यकलेनें मंडित असें आपलें काव्य रचिल्याबद्दल रघुनाथ पंडिताला कोणीहि धन्यवाद देईल. काव्य रचनेचा आनंद वामन पंडितांनीं किंवा पुढील काळांत जसा मोरोपंतांनीं मानला, तसा कांहींसा यानेंहि मानलेला त्याच्या काव्यावरून दिसतो.

१२

शाहू महाराजांच्या वेळचे कांहीं कवी

श्रीमंत सरकार शाहू महाराज यांचे वेळीं महाराष्ट्रांत जे कवी होऊन गेले त्यांत कचेश्वर,[1] निरंजन माधव व सामराज हे प्रमुख होते. कचेश्वरानें सुदामचरित्र व गजेंद्रमोक्ष हीं काव्यें रचिलीं असून त्यांत घरगुती शब्दांची योजना केली आहे. याचीं काव्यें अत्यंत लोकप्रिय आहेत. निरंजन माधव थोरले बाजीराव पेशवे यांचे आश्रयानें राही. पुढें तो बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांच्या आश्रयानें राहू लागला. याला नोकरी-निमित्तानें उत्तरेंत व दक्षिणेंत बराच प्रवास करावा लागला व त्याची छाया त्याच्या काव्यांत जागोजाग उमटली आहे. यानें 'सांप्रदाय परिमळ' नांवाचा ग्रंथ आपल्या पत्नीस गुरुपरंपरेची हकीकत सांगण्याकरितां रचिला. निरंजनाचे दोन गुरु होते. एक लक्ष्मीधर ऊर्फ बापूभट बर्वे व दुसरा बापजी पंडित. निरंजनानें कृष्णानंदसिंधु नांवाचा अध्यात्मपर ग्रंथ प्रथम लिहून तो श्रीरंगपट्टण येथें पूर्ण केला. याशिवाय त्यानें चिद्बोध रामायण, रामकर्णामृत, मंत्ररामचरित, निर्बोष्ट राघवचरित, ज्ञानेश्वरविजय, वृत्तावतंस, वृत्तमुक्तावलि, अनेक स्तोत्रें व यात्रावर्णनें इत्यादि रचना केली आहे. ज्ञानेश्वरविजय (शके १६८७) हें खंडकाव्य असून त्याची रचना चांगली आहे. याचीं प्रवासवर्णनें फारच बहारीचीं आहेत. प्रयागवळांची व गंगा-पुत्रांचीं वर्णनें संतापजनक व विनोदी अशीं आहेत. "गंगापुत्र गुमान फार धरिती घांटीं सदा हिंडती। कंगालासि पिडा करूनि धरिती दे

---

१ राहणारा चाकणचा, उपनांव ब्रह्मे. भगवद्भक्त, शाहू महाराज याचें शिष्य, बाळाजी विश्वनाथाला याचेविषयीं प्रेमादर वाटे, मृत्यु शके १६५३ फाल्गुन शु० २ उंब्रज येथें.

दक्षिणा बोलती। थोडी घेति न बोलती खलमती नानापरी पीडिती। आंगासी झटती किचाट करिती हाणोनि घेती किती" हें वर्णन किती हुबेहूब आहे. महाराष्ट्र सारस्वतकार वि. ल. भावे यांनीं निरंजनकवीला 'सप्तरस' म्हटले आहे; कारण यानें चरित्रपर, वेदांतपर, ईशस्तवनपर, प्रवासपर अशी रचना केली आहे. मात्र काव्यदृष्ट्या ही रचना मध्यमप्रतीची आहे. सामराज (शके १५३०–१६१०) कवीनें निरंजनमाधवाप्रमाणेंच बहुविध रचना केली. कोकशास्त्रापासून भागवतटीकेपर्यंत निरनिराळे दर्जाचे ग्रंथ यानें लिहिले. यांपैकीं मुद्गलाख्यान व रुक्मिणीहरण हीं काव्यें विशेष सरस व प्रसिद्ध आहेत. रुक्मिणीहरणाचे आठ सर्ग असून श्लोक अकराशेच्या वर आहेत. यांतील वर्णनें विविध प्रकारच्या अर्थालंकारांनीं व शब्दालंकारांनीं नटलेलीं आहेत. शिवाय रुक्मिणी, श्रीकृष्ण, सुदेव यांचीं स्वभावचित्रेंहि रेखीव अशीच आहेत. या काव्यांत आलेलीं निसर्गाचीं वर्णने केवळ बहारीचीं आहेत. प्रसाद, प्रतिभा, प्रौढार्थ व पदलालित्य या दृष्टींनीं रुक्मिणीहरण हें काव्य बऱ्याच वरच्या दर्ज्याचें आहे यांत शंका नाहीं.

कृष्णदयार्णव व श्रीधर

काव्यप्रयोजनांत मम्मटानें 'शिवेतरक्षतये' म्हणजे 'अशुभनिवारणार्थ' असें एक प्रयोजन दिलें आहे. महाराष्ट्रीय कवींत या प्रयोजनाची यथार्थता कृष्णदयार्णवानें[1] सिद्ध केली. याला आनंद संप्रदायांतील गोविंद नांवाच्या सत्पुरुषाकडून उपदेश मिळाला. याचें मूळचें नांव नरहरि. गोविंद गुरूनें 'कृष्णदयार्णव' हा मंत्र दिल्यानें ते स्वतःला कृष्णदयार्णवच म्हणवू लागले. संसारांत यांच्यावर अनेक आपत्ति आल्या. त्यांत महारोगहि झाला. तेव्हां गोविंद गुरूंनीं व इतर संतांनीं यांस भागवताच्या दशमस्कंधावर प्राकृत टीका लिहिण्यास सांगितलें. त्याप्रमाणें वयाच्या ५४ व्या वर्षीं यांनीं

१ जन्म शके १५९६ अक्षय्यतृतीया कोपरडें येथें. मृत्यु शके १६६२ मार्गशीर्ष शु. पंचमी, पैठण येथें.

आपल्या सुप्रसिद्ध 'हरिवरदा' या टीकेस प्रारंभ केला. ४९ अध्यायांचा पूर्वार्ध संपायला सात वर्षें लागलीं व तोंपर्यंत महारोगहि बरा झाला. त्यानंतर यांनीं उत्तरार्ध सुरू केला. याचें ३७ अध्याय झाल्यावर यांना मृत्यु आला. उरलेला ग्रंथ यांचा शिष्य उत्तमश्लोक यानें शके १६६५ मार्गशीर्ष शु. ५ स पुरा केला. अशा तऱ्हेनें हा ग्रंथ सोळा वर्षांनीं पूर्ण झाला. 'हरिवरदा' ग्रंथ ओंवीबद्ध असून, ओंवी संख्या ४२००० आहे. ओंवी एकनाथी ओंवीप्रमाणें साडेचार चरणी आहे. ग्रंथांत प्रतिभेचा उच्च विलास नसला, तरी जागोजागीं सुंदर वर्णनें व प्रसाद गुण भरपूर आहे. वर्णनांत संयमाचा अभाव असला तरी क्लिष्टता कोठेंहि नाहीं.

कृष्णदयार्णवाचा समकालीन असा दुसरा कवि म्हणजे सुप्रसिद्ध श्रीधर[1] हा होय. याच्या कवित्वावर गेलीं अडीचशें वर्षें झालीं उभा महाराष्ट्र खूष आहे. नामदेव तुकारामांचे अभंग फार पसरले खरे; पण ते फक्त पुरुषांत. आपली कविता स्त्रियांच्याहि जिव्हाग्रीं वसविणारा कवि श्रीधरच. याचे ग्रंथ मुख्यतः ओंवीबद्ध असून ते पौराणिक संस्कृत व प्राकृत ग्रंथांच्या आधारानें त्यानें रचिले आहेत. परतु ते रचीत असतांना इतक्या तन्मयतेनें रचिले आहेत कीं, ते स्वतंत्र काव्याप्रमाणेंच वाटावेत. याच्या काव्यांत विविध रस असून तें अत्यंत सोपें व मधुर आहे. याचीं विविध प्रसंगांचीं वर्णनें अत्यंत हुबेहूब व नाट्यपूर्ण अशीं आहेत. वामनी आख्यानांप्रमाणेंच यांचींहि आख्यानें अत्यंत लोकप्रिय झालीं आहेत. वाचक कोणत्याहि वयाचा व वृत्तीचा असो, श्रीधराच्या ग्रंथांत त्याला आपलासा करण्याचें भरपूर सामर्थ्य आहे. याच्या ग्रंथांत हरिविजय (शके १६२४), रामविजय (शके १६२५), वेदांतसूर्य (शके १६२५), पांडवप्रताप (शके १६३४), शिवलीलामृत (शके १६४०), जैमिनी अश्वमेध (शके १६३७), श्रीपंढरीमाहात्म्य व मल्हारीविजय हे मुख्य होत. हरिविजयांत श्रीकृष्णाच्या लीला वर्णिल्या आहेत तर रामविजयांत रामायण कथा

१ जन्म शके १६०० मृत्यु शके १६५१ माघ वद्य ३ पंढरपूर येथें.

आली आहे. वेदांतसूर्य हा बारा अध्यायांचा अध्यात्मपर ग्रंथ आहे. पांडव-प्रताप म्हणजे एक प्रकारें महाभारतच होय. पांडवांचा प्रताप यांत मुख्यतः वर्णिला असल्यानें ग्रंथाला कवीनें पांडवप्रताप म्हटलें आहे. शिवलीलामृतांत शिवभक्तीचें वर्णन आलें आहे. श्रीधराची गुरुपरंपरा रामानंद –अमलानंद–सहजानंद––पूर्णानंद–दत्तानंद–ब्रह्मानंद–श्रीधर अशी आहे. आनंद संप्रदायांतील मंडळींनीं अलोट ग्रंथरचना केली आहे. 'श्रीधराचे वडील व गुरु ब्रह्मानंद यांनीं 'आत्मप्रकाश' नांवाचा ग्रंथ शके १६०३ मध्यें लिहून पूर्ण केला. श्रीधराचा पुत्र दत्तात्रय व कुटुंबांतील इतर मंडळीहि काव्यरचना करीत.

आनंद संप्रदायाप्रमाणेंच या काळांत रामदासी संप्रदायांतील मंडळीहि ग्रंथरचना करीत. मागें याचा उल्लेख आलाच आहे. श्रीधराच्या समकालीन अशा रामदास सांप्रदायी गिरिधर[1] स्वामी (जन्म शके १५७५) यांची बरींच ग्रंथरचना आहे. याची गुरुपरंपरा रामदास–वेणाबाई––चाइजाबाई––गिरिधर अशी आहे. यानें 'समर्थप्रताप' ग्रंथांत समर्थांचें चरित्र वर्णिलें आहे. या शिवाय यानें अद्वैतरामायण, मंगलरामायण, छंदोरामायण, ग्रंथ भावार्थ, ग्रंथान्वय, ग्रंथराज भावार्थ, सुंदररामायण, संकेतरामायण व करुणारामायण, देवदर्शन, स्वामीदर्शन इत्यादि ग्रंथ लिहिले आहेत. ही सर्व रचना सोपी व प्रेमळपणानें भरलेली आहे. गिरिधराचा एक भाऊ भीम याचा शिष्य नरहरि मोरेश्वर नांवाचा होऊन गेला. यानें महाभारताच्या उद्योग (श. १६८१) भीष्म, द्रोण व कर्ण (शके १६९०) या पर्वांवर टीका रचिली आहे. त्याची भाषा चांगली असून रचनेचा नोकझोकहि चांगला आहे. श्रीधराच्या मानेइतकी याची भाषा सोपी नसली, तरी तींत प्रसाद गुण भरपूर आहे.

---

१ समाधि शके १६५१ वैशाख शु. ८ वाडे येथें.

१३

स्वतंत्र काव्याची सुरुवात

मुकुंदराजापासून ते श्रीधरापर्यंतची मराठी कविता ही अध्यात्माला व पौराणिक आख्यानांना विशेषतः वाहिलेली होती. या कवितेला भगवद्गीता, महाभारत, भागवत, रामायण, उपनिषदें इत्यादिंचा आधार असल्यानें ती बव्हंशीं रूपांतरात्मकच होती. अमृतानुभवासारखीं कांहीं काव्यें स्वतंत्र असलीं तरी तीं वेदांतविषयक होतीं. स्वतंत्र कल्पित कथानक पद्यरूपानें फारसें कोणीं मांडलें नव्हतें. पेशवाईच्या काळांत वाढत्या ऐश्वर्याबरोबर व स्वास्थ्याबरोबर कवींचें लक्ष या गोष्टीकडे जाऊन, त्यांपैकीं कांहींनीं स्वतंत्रपणें काव्यनिर्मितीला सुरुवात केली. जगन्नाथ (शके १६६९) कवीचें शशिसेना काव्य हें अगदीं स्वतंत्र आहे. सुमारे सहाशे पदांचें हें काव्य असून त्यांत प्रधानपुत्र अहिमाणिक व राजकन्या शशिसेना यांच्या परस्परप्रेमाचें व त्या प्रेमाच्या आड येणाऱ्या अनेक संकटांचें वर्णन आलें आहे. "तूं प्राण माझा सगुणे तुझा मीं। तूं चंद्रमा कौमुदिनी तुझी मी। सुगंध तूं मी वन-पुष्पवल्ली। जशी सुरंगी समयुक्त लाली" अशा प्रकारच्या साध्या व सोप्या भाषेनें मंडित झालेलें हें काव्य बऱ्यापैकीं आहे. जगन्नाथानें याशिवाय पौराणिक आख्यानांवर व वेदांतविषयावर बरीच रचना केली. बोधवैभव, ज्ञानबत्तिशी, वाक्यसुधा, भगवद्गीता टीका इत्यादि रचना अशापैकीं होय.

जगन्नाथाप्रमाणेंच जीवन नांवाच्या दुसऱ्या कवीनें 'अनुभवलहरी' नांवाचें काव्य रचिलें आहे. एका बेकार गृहस्थाला त्याच्या कुटुंबांतील माणसांनीं व पत्नीनें पाणउतारा केल्यावर आयुष्यांत जे निरनिराळे अनुभव

आले, सैन्यांत दाखल झाल्यावर जे विविध अनुभव आले, त्याचें वर्णन 'अनुभवलहरींत' करण्यांत आलें आहे. शिवराम कवीनें दूरदेशीं गेलेल्या एका गृहस्थाच्या पत्नीची विरहावस्था व तो परत आला त्यावेळची तिची सुखावस्था एका काव्यांत वर्णिली आहे. पुढच्या काळांत झालेल्या शाहिरांनीं आपल्या लावण्यांतून विरहिणींचीं जीं वर्णनें केलीं आहेत, त्यांची जणूं काय पूर्वसूचनाच या असल्या काव्यांत पाहावयास सांपडते. विष्टल व त्र्यंबक या कवींनीं 'बारा मास' म्हणून कांहीं स्फुट वर्णनात्मक प्रकरणें लिहिलीं आहेत.

या सर्व स्वतंत्र किंवा लौकिक काव्य रचणाऱ्या कवींत सुप्रसिद्ध मध्वमुनींचें (समाधि शके १६५६ मार्गशीर्ष शु० १) धनेश्वरचरित्र अभंगवृत्तांत असून सरस आहे. धनलोभापायीं आपल्या पांच वर्षांच्या मुलाला नरबलीप्रीत्यर्थ विकणाऱ्या आईबापांची व दुर्दैवी बालकाची कथा यांत वर्णिली आहे. काव्यांत करुण रसाचा परिपोष चांगला झाला आहे. याशिवाय यांनीं प्रल्हादचरित्र, सखुचरित्र, मत्स्येंद्रचरित्र, गणेशाष्टक, गंगाष्टक, अभंग व पदें लिहिलीं आहेत. यांचीं पद्यें विशेष प्रसिद्ध असून तीं मधुर आहेत. पुढील पद्य किती गोड आहे तें पाहा:...हरि तुझी मुरली ऐकुनि गोड । नीरस तरुवर फुटती । निघती पल्लव मोड ॥ सखिये सजीव होते । ते स्थळिं निर्जिव खोड ॥ १ ॥ प्रसवति वांझा गाई । त्या पुरविति सर्वहि कोड । सखया चुरुचुरु थानें प्राशिति । वत्सें न दीसति रोड ॥ २ ॥ मध्वमुनेश्वरस्वामी तूं माझें बंधन तोड । सखया निजपद दावि । तूं पुरवी सर्वहि कोड ॥ ३ ॥

मध्वमुनींचे शिष्य अमृतराय (शके १६२० ते १६७५ समाधि औरंगाबाद येथें) हे त्यांच्या अनेकोत्तम कटावांबद्दल प्रसिद्ध आहेत. यांच्या काव्यांत हिंदी व संस्कृत शब्दांची योजना मोठ्या चतुराईनें केलेली आढळते. प्रासानुप्रासांची रचना इतकी सफाईदार यांच्या काव्यांत असते कीं, एक-दोन वाचनांतच वाचक काव्य गुणगुणू लागतो. शब्दांची ठसकेदार ठेवण,

वाक्यांची डौलदार धाटणी व वर्णनाचा हुबेहूबपणा यांमुळें यांच्या कटावांवर श्रोत्यांच्या उड्या पडत. मराठींत कटाव करण्याची चाल पूर्वी नव्हती. अमृतरायांनीं ती हिंदीच्या अनुकरणानें सुरू केली. अमृतरायांनीं स्फुट श्लोक, पदें, कटाव जसे पुष्कळ लिहिले, तसे पौराणिक आख्यानपर असे दामाजीपंत, कृष्णलीला, द्रौपदीवस्त्रहरण, रामजन्म, लंकावर्णन, सुदामचरित्र, वत्सलाहरण इत्यादि काव्येंहि पुष्कळ रचिलीं. त्यांच्या कटावाचा थोडासा नमुना पुढें दिला आहे:—"म्लानवदन अति अस्वस्थ होवुनि, सलज्ज मतिनें जवळ जाउनी, गृहांत आमुच्या नसे कामिनी, चैन पडेना दिवसयामिनी, अग्निहोत्र मज अवश्य घेणें, अनुभवोनियां पुनरपि देणें, अभिलाषाची वृत्ति नेणें, रमाकांत एकांत पाहुनी, कांता तुमच्या समीची न घरीं, कमीचि नसतां शुद्धबुद्ध तो मुनिवर (नारद) वदला, 'विषयसर्प कंदर्प झोंबला,' भ्रमला जाणुनि अबला मागे; कमलापतिचे करकमलानें कमलोद्भवसुत धरि करकमला कमलनभ तो प्रसन्न वदला..."

अमृतरायांच्या कटावांचा रंग पाहून शंकर, माधव, ब्रह्मगिरी, विनायक या त्यांच्या शिष्यांनीं व चाहत्यांनीं कटावरचना पुष्कळ केली. या एका गोष्टीवरून अमृतरायांची लोकप्रियता किती होती ती उत्तम प्रकारें दिसते.

१४

संत चरित्रकार

संतांचीं चरित्रें लिहिण्याचा प्रघात महाराष्ट्रांत फार पूर्वीपासून म्हणजे सच्चिदानंदबावा-नामदेव इत्यादिकांपासून असला, तथापि तीं चरित्रें एकट्या दुकट्या संतांचीं आहेत. सच्चिदानंदबावांनीं ज्ञानेश्वरांचें चरित्र लिहिलें आहे. "तीर्थावळीचे अभंग" यांत नामदेवांनीं ज्ञानेश्वर व त्यांचीं भावंडें यांचीं चरित्रें गाइलीं आहेत. निरंजन माधवानें आपल्या 'ज्ञानेश्वरविजयांत' ज्ञानोबांचें चरित्र विस्तारानें वर्णिलें आहे. परंतु एकाच ग्रंथांत अनेक संतांचीं चरित्रें एकत्रित करण्याची स्फूर्ति महाराष्ट्रीय कवींना ग्वाल्हेरकडील नाभाजीच्या हिंदी 'भक्तमाला' या काव्यापासून झाली. नाभाजीच्या (शके १६०० चा सुमार) भक्तमालेंत १९७ छप्पे असून, त्यांत ज्ञानेश्वर-नामदेव या महाराष्ट्रीय व इतर अनेक महाराष्ट्रीयेतर संतांचीं त्रोटक चरित्रें आलीं आहेत. नाभाजीचा शिष्य प्रियादास (शके १६३५) यानें भक्तिरसबोधिनी नांवाचा हिंदींत संतचरित्रपर ग्रंथ लिहिला आहे. या दोन्ही ग्रंथांमुळें उद्धवचिद्घन, दासोदिगंबर, महिपतिबुवा इत्यादिकांना मराठींत संतचरित्रें लिहिण्याची प्रेरणा झाली. उद्धवचिद्घन (शके १६११ नंतर) याचें 'भक्तकथा-मृतसार' अप्रसिद्ध व अनुपलब्ध असलें, तत्रापि त्यानें लिहिलेलीं नागनाथ, हेगराज, बहिरापिसा, गोराकुंभार इत्यादिंची साकी वृत्तांतील चरित्रें उपलब्ध आहेत. या शिवाय याची 'संतमाला' उपलब्ध असून तींत पुष्कळ संतांचा उल्लेख आहे. दासो दिगंबर यांचा संतविजय नांवाचा ग्रंथ उपलब्ध असून, त्यांत ३४ प्रकरणांत अनेक संतांची माहिती देण्यांत आली आहे. यानें आपल्या ग्रंथांत नाभाजीचा उल्लेख

केला आहे. दासो दिगंबरांच्या ग्रंथांत चौकसपणाचा अभाव आहे. महिपति-बोवा[1] ताहराबादकरांनीं अनेक संतचरित्रें लिहून संतचरित्रकार म्हणून उत्तम नांवलौकिक मिळविला. तुकोबांनीं स्वप्नांत येऊन यांना संतचरित्रें लिहिण्याची आज्ञा केली व त्याप्रमाणें बोवांनीं हें कार्य तडीस नेलें. प्रथम त्यांनीं भक्तविजय (शके १६८४) हा ग्रंथ रचिला. नाभाजी व उद्धव-चिद्घनाचें ऋण ग्रंथारंभीं महिपतीनें कबूल केलें आहे. तत्रापि अनेक संत-चरित्रें स्वतंत्रपणें व विस्तारानें त्यांनीं भक्तविजयांत दिलीं आहेत. ज्ञानेश्वर, नामदेव, दामाजी, भानुदास, तुकाराम इत्यादिंचीं चरित्रें स्वतंत्र आहेत. इतर भक्तमालेवरून घेतलीं आहेत. 'कथासारामृत' (१६८७) या ग्रंथांत कार्तिक, माघ, वैशाख व एकादशी अशीं मुख्य चार विष्णूचीं व्रतें वर्णिलीं आहेत. यांत पुष्कळ पौराणिक कथा आल्या आहेत. पांडुरंगमाहात्म्य (शके १६८८) या ग्रंथांत शंकरपार्वतींच्या संवादरूपानें पुंडलिकाचें चरित्र मुख्यतः वर्णन करण्यांत आलें आहे. संतलीलामृत (शके १६८९) या ग्रंथांत चांगदेव, रोहिदास, एकनाथ, तुकाराम हीं मुख्य चरित्रें व इतर संतांचीं त्रोटक चरित्रें आलीं आहेत. भाषेच्या दृष्टीनें एकनाथ-तुकारामांचीं चरित्रें सुरस व चित्तवेंधक बनलीं आहेत. यानंतर बोवांनीं भक्तलीलामृत (शके १६९६) ग्रंथ लिहून त्यांत आणखी कांहीं संतांचीं चरित्रें दिलीं. या ग्रंथानंतर 'संतविजय' नांवाचा ग्रंथ लिहायला सुरवात करून त्यांत रामदास स्वामीचें व बाबाजी गोसाव्याचे अशीं दोन चरित्रें त्यांनीं लिहिलीं. हा ग्रंथ अपूर्ण आहे. याशिवाय लहान लहान स्तोत्रें बोवांनीं पुष्कळ रचिलीं आहेत. त्यांपैकीं 'पांडुरंग स्तोत्र' काव्यदृष्ट्या सुंदर आहे. महिपतिबोवांचें चरित्रग्रंथ चिकित्सक बुद्धीनें लिहिले नसले तरी त्यांत माहिती व जिव्हाळा हीं भरपूर आहेत.

---

१ जन्म शके १६३७ ताहराबाद येथें, मृत्यु शके १७१२ श्रावण वद्य १२ ताहराबाद येथें. ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण उपनांव कांबळे. वडिलाचे नांव दादोपंत व आईचें गंगाबाई.

महिपतिबावांच्या नंतर दोन संतचरित्रकार झाले. एक भीमस्वामी व दुसरे राजाराम प्रासादी (शके १७५६ चा सुमार). भीमस्वामी हे रामदासीपरंपरेंतील असून शिरगांव मठाचे अधिपति होते. यांनीं भक्त-लीलामृत (शके १७२०) नांवाचा अभंगमय ग्रंथ लिहून त्यांत प्रथम श्रीसमर्थांचें चरित्र देऊन पुढें निरनिराळीं सदतीस भक्तांचीं चरित्रें सांगितलीं आहेत. मात्र ग्रंथ यथातथाच आहे. राजाराम प्रासादी हेहि रामदासी संप्रदायांतील होते. त्यांनीं आपल्या 'भक्तमंजरीं'तील १०९ अध्यायांत सुरुवातीला रामदासांचें चरित्र देऊन पुढें सुमारे सव्वाशे साधूंचीं चरित्रें दिलीं आहेत. राजाराम प्रासादींनीं आपल्या ग्रंथांत माहिती पुष्कळ प्रयासांनीं मिळवून दिली आहे. उपलब्ध असलेल्या संतचरित्रांत भक्तमंजरी हा ग्रंथ वरच्या दर्ज्याचा आहे. उद्धवसुत नांवाच्या समर्थ-शिष्याचें रामदासचरित्र (श. १६९६) ५१ अध्यायांचें आहे. "श्रीदास विश्रामधाम" या प्रचंड चरित्राचा कर्ता आत्मारामम्हाराज येक्केहाळीकर हा असून चरित्राची ओवीसंख्या सोळा हजारांवर आहे. यांत रामदासां-बरोबर शेंकडो ज्ञात व अज्ञात पुरुषांचीं पदेंहि दिलीं असून तीं चरित्राचा भाग म्हणून समजण्यांत आलीं आहेत! नरहरि धुंडिराज मालु यानें 'मालुतारण' व 'भक्तिकथामृत' नांवाचे दोन मोठाले संतचरित्रपर ग्रंथ लिहिले आहेत. यांत मनमानेल त्याप्रमाणें संतांविषयीं सविस्तर पण चुकीची माहिती देण्यांत आली आहे.

१५

मोरोपंत

पेशवाईतील रणधुमाळीच्या, साम्राज्य विस्ताराच्या, युद्धजन्य यशापयशाच्या परंतु एकंदरींत मराठ्यांच्या कर्तबगारीच्या व कीर्तिकर अशा काळांत मोरो पंत[1] होऊन गेले. तो वीरांचा काळ होता. भीमथडी तट्टांवर बसून मराठे सारा हिंदुस्थान पादाक्रांत करीत होते. यवन त्यांना वचकून होते. सारा महाराष्ट्र शौर्याच्या आणि वीर्याच्या कथा गात होता. शाहीर पोवाडे आणि लावण्या रचून मराठ्यांच्या पराक्रमाला आणि प्रेमाला अमररूप देत होते. अशा वेळीं आपली पूर्व परंपरा देखील शौर्याची आणि धैर्याची आहे हें दाखविण्याचें व लोकांना प्रेरणा देण्याचें कार्य मोरो पंतांनीं रामायण भारतादि काव्यें मराठींत रचून केलें. याच करितां विठोबा अण्णा कऱ्हाडकर दप्तरदार (शके १७३५–१७९५) यांनीं मोरो पंतांना वीरकवि म्हणून संबोधिलें आहे. ते म्हणतात "आर्याछंदे जोडुनि रामायणभारतादि आयकवी । नायक वीरकवींचा ऐसा होईल अन्य काय कवी ? ॥"

मोरोपंत हे कलाभिज्ञ कवि, प्रभावशाली पुराणीक आणि खरेखुरे भगवद्भक्त असल्यानें या तिन्ही वृत्तींना साजेसें त्यांनीं विविध, विपुल व

---

१. मोरोपंत यांचा जन्म पन्हाळगडावर. शके १६५१ मध्यें झाला. त्यांच्या पित्याचें नांव रामाजीपंत व आईचें लक्ष्मी. त्याचें आडनांव पराडकर. मोरो पंतांच्या पूर्वजांचें गांव सौंदळ, विद्याभ्यासाचें गांव पन्हाळगड, कर्तृत्वाचें गांव बारामती व त्यांच्या वंशजांचें गांव पंढरपूर. पंतांचें गुरु केशव पाध्ये, त्यांचे आश्रयदाते बाबुजी नाईक जोशी बारामतीकर. इ. स. १७८९ मध्यें त्यांनीं अमरसिंह जाधवाबरोबर काशीयात्रा केली. पंतांचा मृत्यु चैत्र शुद्ध पौर्णिमा शके १७१६ ला बारामती येथें झाला.

विदग्ध काव्य निर्माण केलें. उत्तम चित्रकाराला चित्रविषयाइतकेंच रंग, कुंचला, कॅनव्हस या साधनांचें महत्त्व वाटतें. नव्हे या जिन्नसांवर त्याचें प्रेम असतें व तो त्यांचा अत्यंत जाणतेपणानें स्थलकाल पाहून उपयोग करतो. मोरोपंतांचें असेंच होतें. ते अव्वल दर्जाचे शद्वप्रभु होते. शद्वाचें सौंदर्य, सामर्थ्य, गतिमानता हीं त्यांना पुरेपुरी अवगत होती. प्रसंग पाहून ते संस्कृतप्रचुर, प्रौढ किंवा सुबोध-साधी रचना करीत. त्यांचें सुप्रसिद्ध सीतागीत किंवा कर्णपर्वातील 'पूर्वी सागरतीरीं साधुनृपाच्या पुरांत एक धनि' अशा प्रासादिक वाणीनें सुरूं होणारें हंसकाकीय आख्यान हीं सुबोध सोप्या भाषेचीं उदाहरणें म्हणून सहज दाखवितां येतील. अनेक प्रकारचे शद्वालंकार, अर्थालंकार व विविध रस मोरोपंतांनीं आपल्या काव्यांत योजिले ते काव्यविषयाचा मगदूर पाहून. आपण कलापूर्ण काव्य करतों आहोंत याची जाणीव त्यांना सतत होती असें त्यांच्या काव्यसंभाराकडे पाहिलें असतांना वाटतें. बाबूजी नाईक जोशी बारामतीकर या सरदाराकडे पुराणीक या नात्यानें मोरोपंत सुमारे चाळीस वर्षें होते. निरनिराळीं पौराणिक आख्यानें व महाकाव्यें त्यांनीं कां रचिलीं याचें कारण त्यांचा हा पुराणिकाचा पेशा. आणि हा पेशा देखील त्यांनीं आनंदानें कां पत्करला तर ते खरेखुरे भगवद्भक्त होते म्हणून. एकीकडे उदरनिर्वाहाचें साधन लाभून, त्या साधनाच्या द्वारेंच ईश्वराची सेवा करायला लाभल्यानें मोरोपंतांना खचित् धन्यता वाटत असली पाहिजे. ते अल्पसंतोषी होते. त्यांच्या काव्यावर खूष होऊन दुसऱ्या बाजीरावसाहेबांनीं त्यांना आपल्या आश्रयाला बोलाविलें असतांना, बारामतीकर जोशांचा आश्रय सोडून ते गेले नाहींत. ईश्वराच्या अनेक कथा अनेक तऱ्हांनीं गाऊन (परंतु रामायण, मंत्ररामायण, निरोष्ठ रामायण इत्यादि अष्टोत्तरशत रामायणें) त्यांनीं त्याची सेवा केली. काव्यरचना करीत असतांना आत्मोद्धाराची भावना पंतांच्या ठिकाणीं सतत जागृत असे. आर्याभारताच्या सुरुवातीलाच त्यानीं आपला हेतु स्पष्ट केला आहे तो असा :—" हरि ज्यांचा कैवारी त्या पांडुसुतांसि वंदितो भावें ।

सं. नं. ...१५९

वाटे चरित्र त्यांचें कांहीं आपण तरावया गावें." व्युत्पत्तिप्रचुर, व्यवहारोपयोगी उपदेश व भक्तिभाव असे तीन प्रवाह पंतांच्या काव्यसरितेंत सामील झाले आहेत. त्यांपैकीं भक्तिभावाचा जोमानें वाहात असल्यानें त्याला प्रयागराज तीर्थांतील त्रिवेणी-संगमाचें महत्त्व आलें आहे. अनेक प्रकारचीं रामायणें, अनेकविध यमकें, अनेक ढंगांचे प्रास, कथांतील संक्षेप विस्तार, विविध रस आणि वैशिष्ट्यपूर्ण स्वभावचित्रें हीं कलाविलासाच्या सदरांत पडतील. रामायणें, महाभारत, हरिवंश, कृष्णविजय, मंत्रभागवत, ब्रह्मोत्तरखंड, कुशलवाख्यान इत्यादि काव्यें पंतांनीं मनोरंजन व लोकशिक्षण हे हेतु मुख्य धरून लिहिलीं. यांतहि अप्रत्यक्षपणें ईश्वराची सेवा करण्याचा त्यांचा हेतु होताच. परंतु केवळ भक्तिभावानें परमेश्वराची आळवणी करण्याकरितांहि कांहीं काव्य त्यांनीं रचिलें. हें काव्य ते देहावसानापर्यंत लिहीत होते. अशा काव्यांत सन्मणिमालादि काव्यासारख्या संतांच्या प्रशस्ति, देवतांचीं स्तोत्रें, संशय-रत्नमाला, स्तोत्र केकावली वगैरे काव्यें येतात. ईश्वरविषयक लडिवाळपणा, साधुसंतांविषयीं आदर, आत्मोद्धाराची तळमळ, श्रद्धा, सगुणाबद्दल प्रेम इत्यादि भक्तीची विविध रूपें या काव्यांत असून तें जिव्हाळ्यानें आणि व्यक्तिमत्वानें भरलेलें आहे.

मोरोपंतांची कविता समुद्राप्रमाणें विशाल व बहुरत्ना असून तिच्या-पैकीं सुमारे साठ हजार कविता ग्रंथरूपानें आज उपलब्ध आहे. या कवितेवर तिच्या रचनाकालापासून रसिकांच्या उड्या पडत आहेत. रामजोशी, विठोबा अण्णा, चिंतामणि जोशी, धुंडिराज, राजाराम प्रासादी, परशुरामपंत तात्या गोडबोले, दादोबा पांडुरंग, विष्णुशास्त्री चिपळूणकर, वामनरावजी ओक, बाळकृष्ण मल्हार हंस, श्रीधर विष्णु परांजपे, लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, इत्यादि कवींनीं आणि रसिक सहृदयांनीं पंतांच्या कवितेवरून स्वतःचा देह ओवाळून टाकला आहे. असें असलें तरी पंत-काव्याचे कांहीं विरोधी टीकाकार असून ते चांगले वजनदार आहेत. न्यायमूर्ति माधवराव रानडे यांच्या दृष्टीनें पंतांचें काव्य कृत्रिम आहे.

डॉ. विल्सन यांच्या मतें मोरोपंतांनीं कृत्रिम काव्यें रचून आपल्या बुद्धीचा अपव्यय केला. विष्णुशास्त्र्यांचें वडील कृष्णशास्त्री चिपळूणकर मोरोपंतांना भाषांतऱ्या म्हणत. राजा शिवाजी काव्यकर्ते कुंटे यांच्या दृष्टीनें पंतांच्या ठिकाणीं प्रसाद, कवित्व, कल्पनाचातुर्य वगैरे कांहीं नसून पंत नुसती यमकें जुळविणारा अरसिक मनुष्य होते ! कृत्रिमपणाचा आरोप हा इतका लवचीक आहे कीं त्यांतून प्रायः कोणत्याच कवीची कविता सुटूं शकणार नाहीं. गद्यापेक्षां पद्यांत कांहीं 'कृत्रिम' भाग असणारच. मोरोपंतांच्या काव्यांतील यमक, अनुप्रास, श्लेष इत्यादि शब्दालंकारांवरून हा आरोप केला गेला असली तरी त्यांत फारसा अर्थ नाहीं. 'याचें कारण यमक अनुप्रासादिकांमुळें पंतांच्या काव्याचें सौंदर्य वाढलें' असून तीं साधायला त्यांना कष्ट पडत नसत. अत्यंत सफाईनें सयमक कविता ते करीत. किंबहुना त्यांच्या काळीं सयमक व सानुप्रास कविता करणें हें सुळींच अवघड किंवा कृत्रिम समजलें जात नसे. शाहिरी काव्याकडे पाहिलें असतांना या म्हणण्याचा प्रत्यय सहज येईल. मोरोपंत हे केवळ 'भाषांतरे' होते या म्हणण्यांतहि कांहीं अर्थ नाहीं. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंतची सर्व मराठी कविता ही बव्हंशीं रामायण, महाभारत, भागवत, विविध पुराणें यांवर आधारलेली असल्यानें एका दृष्टीनें ती सर्वच भाषांतररूप ठरेल. परंतु तसें वस्तुतः नाहीं. कवींनीं आपले विषय पुराणांतून घेतले असले तरी त्यांची मांडणी स्वतंत्रपणें केली आहे. मोरोपंतांच्या बाबतींत तर हें विशेषत्वानें खरें आहे. रामायण, महाभारत, भागवतादि ग्रंथांवरून त्यांनीं आपल्या काव्याची रचना केली असली, तरी ती करीत असतांना स्वतंत्र बुद्धिच सर्वत्र चालविली आहे. त्यांनीं केलेले संक्षेप विस्तार पाहिले असतांना ही गोष्ट पटते. आर्याभारत रचीत असतांना त्यांचा भर पांडवांच्या चरित्रावर होता. याच कारणानें आदिपर्वांत दुःशला जन्म, दुःशला विवाह, कलमाषपादकथा, उरुकथा वगैरे त्यांनीं गाळल्या आहेत. मूळची कणिकनीति त्यांनीं फारच

थोडक्यांत सांगितली आहे. " विस्तरभयास्तव कणिकनीत्यंतर्गत कथाचि-असि कांहीं लिंहिली " (अ. २८ गीति २६) असे स्वतः पंतच सांगतात. कर्णपर्वांत त्रिपुराचा इतिहास त्यांनीं गाळला आहे. आणि तसें करीत असतांना असें म्हटलें आहे कीं, " गाया; श्रवण कराया, योग्य, परिग्रंथ विस्तराकरितां । इतिहास गाळला हा; झाला श्रम मलाहि चित्त आवरितां ॥ " कर्णपर्वांतील मूळच्या ४९ अध्यायांचा म्हणजे २११७ श्लोकांचा सारांश त्यांनीं ३० अध्यायांत किंवा १२३२ गीतींत सांगितला आहे. स्त्रीपर्वांत असाच संक्षेप विस्तार केला आहे. पहिल्या अध्यायांतील धृतराष्ट्राचा शोक पंतांनीं अजिबात गाळला आहे. विदुरकृत धृतराष्ट्रसांत्वनाच्या मूळच्या ११६ श्लोकांऐवजीं पंतांनीं चारच गीती योजिल्या आहेत ! याच्या उलट दुसऱ्या अध्यायांतील कुरुस्त्रियांनीं धर्मराजास उद्देशून केलेलें उपालंभयुक्त भाषण पंतांनीं अधिक विस्तारानें दिलें आहे. राधेनें कर्णाबद्दल केलेला विलाप केवळ पंतप्रतिभेचाच विलास होय, उत्तराविलाप, कर्णाबद्दल कुंति व धर्म यांचा विलाप, हे दोन विलाप व्यासभारताला बहुतांशीं सोडूनच आहेत. ' पांडुसुतांच्या ' कथा ' स्वल्पांतचि ' आणीत असतांना व्यासकृत महाभारत पंत आपल्या जवळपास ठेवीत यांत शंका नाहीं. कारण अनेक श्लोकांत व गीतींत शब्दांचें साम्य आढळतें. (मंत्रौषधयत्नांही देहापासून रोगसा नेला । अश्वांनीं दूर द्विज; अर्जुन संसप्तकांकडे गेला ॥ या मोरोपंती गीतींत व व्यासांच्या पुढील श्लोकांत साम्य आहे. प्रतीपकामे तु रणादश्वत्थाम्नि हृते हयैः । मंत्रौषधिक्रियायोगैर्व्यापौ देहादिवाहृते) असें असलें तरी अनेक ठिकाणीं मूळापेक्षां कितीतरी पट अधिक चांगली रचनाहि त्यांनीं केली आहे. कर्णपर्वांतीलच पुढील दोन श्लोकांवर पंतांनीं किती रमणीय उत्प्रेक्षा केल्या आहेत त्या बघा :—पश्य पार्थ यथा सेना धार्तराष्ट्रीह संयुगे । कर्णेन विहिता वीर गुप्ता वीरैर्महारथैः ॥ हतवीरतमा ह्येषा धार्तराष्ट्री महाचमूः । फल्गुशेषा महाबाहो तृणैस्तुल्या मताममं ॥ मकरव्यूह विलोकुनि ' पहा ' म्हणे धर्म सव्यसाचीसीं । कर्णे केली रचना दिसते, द्यायासि भव्य, साचीसी ॥

सूतवरुनि लाजे कुरुवर गुरुविरहाकुळा, कृशा निपट । अरिसेना काढीवा धूलिपटलमिष मुखावरूनि पट ॥ पंत हे केवळ भाषांतरकार होते, त्यांच्या ठिकाणीं रसिकता नव्हती, वगैरे विधानें किती बेजवाबदारपणाचीं आहेत हें आतां कळेल. आर्याभारतांत संस्कृत साहित्यशास्त्रांत आढळणारे निरनिराळे अलंकार व रस यांची मेजवानीच वाचकांना अर्पण करण्यांत आली आहे. आणि मौज ही कीं, यांपैकीं बहुतेक सर्व ठिकाणच्या कल्पना स्वतः मोरोपंतांच्याच आहेत. रणांगणावर होणाऱ्या प्रचंड ध्वनीची कल्पना होण्याकरितां ध्वनिद्योतक वर्णांची पंतांनीं योजना कशी केली आहे ती पाहा :—आनकदुंदुभि दर्दुरडिंडिमभेरी सुशंखपणवांचे । ध्वनि उंठले यच्छ्रवणें न क्षण ही त्या स्थळीं कृपण वांचे ॥ तसेंच बाणांची शीघ्रगति दर्शविण्याकरितां त्यांनीं अनुप्रासांची कशी मदत घेतली आहे ती बघा :—अरिगिरिवरिशरवृष्टिहि, तें प्रेक्षुनि शक्रहि धरि व्रीडा. आर्याभारतांत तसेंच इतर ठिकाणींहि पंतांनीं उत्तम प्रकारें रसपरिपोष केला आहे. कर्ण व द्रोणपर्वांतील वीररस आणि स्त्रीपर्वांतील करूण रस फारच बहारीचा आहे. याच्याच जोडीला स्वभावचित्रांचा विचार करायला हवा. वैशिष्ट्यपूर्ण, ठसठशीत, मनोवेधक अशा स्वभावचित्रांनीं मोरोपंती कविता खचून भरली आहे. कर्ण, धृतराष्ट्र, कुंति, कृष्ण, द्रोणाचार्य, सीता, द्रौपदी, सुभद्रा, अर्जुन इत्यादि शेंकडो स्त्रीपुरुषांचीं मनोज्ञ शब्दचित्रें पंतांनीं आपल्या काव्यांत रेखाटलीं आहेत. यांच्या जोडीला संशयरत्नमाला आणि केकावली सारखीं भावोत्कट आणि स्वतंत्र काव्यें आपण ठेविलीं आणि मोरोपंती कवितेचा साकल्यानें विचार करू लागलों तर ती कृत्रिम व भाषांतरित न वाटतां उलट ती स्वतंत्र घडणीची कलापूर्ण व अभिजात अशीच वाटेल. संशय रत्नमाला आणि केकावली या काव्यांत पंतांनीं ईश्वराला परोपरीनें, लडिवाळपणानें, कृतककोपानें पण सर्वत्र प्रौढ अशा भक्तिभावानें आळविलें आहे. उत्तम काव्यांत ध्वनिसौंदर्य असतें. केकावलींत अशा कित्येय केका आहेत कीं, ज्या ध्वनिसौंदर्यानें नुसत्या

न्हाल्या आहेत. " दिलें बहु बरें खरें, परि गमे कृपा व्यंग ती । अलंकृति-मती सती मनिं झुरे, न जो संगति ॥"—सारख्या केकेंतील ध्वन्यर्थ किती बहारीचा आहे तो बघा.

मोरोपंती भाषा व काव्यविषय यांच्या संबंधानें येथें थोडासा विचार करूंया. मोरोपंती स्त्रीगीतें व हंसकाकीय आख्यानांसारखीं कांहीं आख्यानें पाहिलीं असतांना पंत किती सोपी व रसाळ कविता लिहू शकत याचा उत्तम प्रत्यय येतो. " ऐशी बाई माझी ऐकतांची वाणी । डोळां आलें पाणी भावोजींच्या । "—अशा सारखी बालबोध व घरगुती भाषा लिहिणाऱ्या पंतांनीं आर्याभारत, रामायण, कृष्णविजय, हरिवंश, केकावली सारख्या काव्यांत आढळणारी संस्कृतप्रचुर रचना केलेली पाहून पुष्कळांना आश्चर्य वाटतें. परंतु हीं काव्यें बहुजनांकरितां नसून तत्कालीन संस्कृतज्ञ रसिकांकरितां होतीं हें ध्यानांत धरल्यावर त्यांना आश्चर्य वाटणार नाहीं. शिक्षणाचा प्रसार आज जर अवघा दहा टक्के आहे, तर पंतांच्या कालीं शिकलेल्यांची संख्या कांहीं हजारांपेक्षां खचित् ज्यास्त नसेल. हे सर्व लोक त्यावेळच्या पद्धतिप्रमाणें संस्कृत शिकत. अशा लोकांच्या पसंतीला उतरेल अशा प्रकारची प्रौढ रचना पंतांनीं मुद्दामच केली आहे. कवितेचा अर्थ लावण्यांत थोडे श्रम पडावेत व नंतर तिची गंमत कळावी असें या संस्कृतज्ञ रसिकांना वाटे. तत्कालीन पुराणीक आणि कीर्तनकार पंतांच्या आर्या लावून दाखविण्यांत धन्यता मानीत; आणि श्रोतेहि मग त्यांचा भिटक्या मारीत आस्वाद घेत. माझ्या मऱ्हाटाचि बोल कवतुकें परि अमृतातेंही पैजा जिंके अशी प्रतिज्ञा ज्ञानेश्वरांची होती. मोरोपंतांची प्रतिज्ञा अशी असावी—माझा मऱ्हाटाचि बोल कौतुकें । परि संस्कृतातेंही पैजा जिंके. आणि खरोखरच मोरोपंतांनी ही पैज जिंकली. काशीक्षेत्रांत ते आपली कविता घेऊन गेले व तत्रस्थ संस्कृत पंडितांना त्यांनीं ती दाखविली. पंडितांनीं पंतांच्या कवितेची शलाकापरीक्षा करून ती अत्युत्तम असल्याचा अभिप्राय दिला. पंतांनीं आपल्या काव्यांत विविध यमकें, अनुप्रास, श्लेष

हे मुद्दामच असल्या पंडित रसिकांना ते आवडत असत म्हणून वापरले आहेत. आज आपणाला पंतांच्या काव्यांत अपरिचित संस्कृत शब्द, दीर्घ समास, दूरान्वयादि दोष जे व जितक्या प्रमाणांत आढळतात, ते व तितक्या प्रमाणांत त्यांच्या काळच्या पंडित वाचकांना वाटत नसावेत. मुक्तछंदाच्या सध्यांच्या जमान्यांत मोरो पंती यमकें केवळ कृत्रिम ठरलीं, तरी तीं मोरोपंतांच्या काळांत स्वागतार्हच होतीं. 'अनळसमीहित साधी राया ! वारा महीवरा ! कामा । अनळस मी हि तसा धीरा ! यावा रामही वराका मा ! ॥" अशा एखाद दुसऱ्या मुद्दामच काव्यकलाकौतुक म्हणून केलेल्या गीतींतील यमकें सोडल्यास मोरोपंतीं यमकें सोपीं, अर्थपोषक व चमत्कृतिजनक असतात यांत शंका नाहीं. यमकें, अनुप्रास, श्लेष इत्यादि बंधनें संभाळूनहि पंतांनीं आपल्या भाषेचें स्वरूप सर्वत्र शुद्ध ठेवलेलें पाहून त्यांच्याविषयीं आदर वाटतो. "मराठीला व्याकरणसंस्कारानें पावन करून संस्कृतच्या पदवीला चढविण्याची पंतांना आवड होती असें उघड दिसतें," असें जें पांगारकरांनी[1] म्हटलें आहे तें अक्षरशः खरें आहे. असें असूनहि घरगुती दृष्टांत व लोकोक्ति यांचा इतक्या मोठ्या प्रमाणावर पंतांनीं उपयोग केला कीं चलनी नाण्यांसारख्या त्यांच्या काव्यपंक्ती महाराष्ट्रीयांच्या संवादांत वापरल्या जाऊ लागल्या व जात आहेत. "जरि उकिरड्यांत पडला मळला न हिरा तथापि सामान्य । प्रार्थुनि मागति पुत्रच्छात्रापासुनि भले परिभवातें । हंसें मुक्ता नेली मग केला कंलकलाट काकांनीं । परि प्रभुहि संग्रहीं सकल वस्तुला ठेविती । व्रणार्त-पशुच्या शिरावरि वनिं उभे काकसे । पुरुषें आरंभावें कर्म न पौरुष कदापि सोडावें । जों मृदु लागे तों तों दडपी शिशु फार ऊन भातातें । फाऱ्च बरी निरयगति परवशता शतगुणें करी जाच । हांसत कर्म करावें भोगावें रडत तेंचि परिणामीं ।" इत्यादि ओळी या म्हणण्याची साक्ष देतील. मोरोपंतांनीं निवडलेल्या काव्यविषयांसंबंधानें इतकेंच म्हणतां येईल कीं,

१ मोरोपंतांचें चरित्र पृ. ५५७

तत्कालीन लोकांच्या आवडीप्रमाणें व इतर ग्रंथकारांप्रमाणें त्यांनीं पौराणिक कथानकांची निवड केली. कालिदासासारख्या स्वतंत्र प्रतिभेच्या कवीनें देखील जेथें कुमारसंभव, रघुवंश, शाकुंतल इत्यादि सारखे ग्रंथ पौराणिक कथाभाग घेऊन सजविले, तेथें मोरोपंतांना दोष देण्यांत काय अर्थ आहे. केवळ कल्पित कथानकें रचण्याची आधुनिक तऱ्हा त्यावेळीं रसिकमान्य झाली नव्हती. ग्रंथकाराचें श्रेष्ठत्व तो रसपरिपोष, स्वभावपरिपोष कसा करतो, ग्रंथाची मांडणी कशी करतो, अलंकार व ध्वनि यांचा उपयोग कसा करतो, यांवर अवलंबून असे. मोरोपंतांनीं या सर्व गोष्टीं उत्तम प्रकारें करून दाखविल्यानें ते त्यांच्याच काळीं नव्हे तर मागाहून आज इतकीं वर्षें श्रेष्ठ कवि म्हणून प्रसिद्ध आहेत.

आर्यापति म्हणून पंत विख्यात आहेत. ज्ञानेश्वरांची ओवी, तुकोबांचा अभंग, वामनांचा श्लोक, त्याप्रमाणें आर्या अशी मयूरपंतांचीच. पंतांच्या आर्येसंबंधानें पांगारकर[1] म्हणतात, "पंतांनीं जरी विविध वृत्तांत काव्यें केलीं असलीं तरी त्यांची प्रसिद्धी 'आर्यापति' म्हणूनच आहे. पंतांपूर्वी आर्यावृत्त मराठी वाचकांना माहीत नव्हतें. नामसुधाचक्रकांत पंतांनीं आर्यावृत्तावर दहा आर्या केल्या आहेत. आर्यासुधा ही गीर्वाणभाषानिष्णात अशा बुधांनीं आकंठ प्राशिली होती पण प्राकृतांनीं ती कानांनीं मात्र ऐकिली होती (११५). त्यांनीं दया करून मला ती शिकविली (११६). शंकरांनीं ती प्रथम छंदःशास्त्रांत पिंगलाचार्यांना शिकविली होती व त्यांजपासून मी ती शिकलों (११४). प्राकृतवाचकांस पूर्वी इतर कांहीं छंद माहीत होते:—गद्यें ओव्या सवया दोह्यांतें सर्व जाणती लोक। श्लोक प्रिय त्यांस जयां प्रसन्न तूं पुण्यपूर्वक श्लोक ॥ ११३ ॥ ओव्या, दोहे, श्लोक वगैरे लोकमान्य झालेल्या वृत्तांचा उल्लेख करून पंत म्हणतात:—प्रकटी प्रथम भगीरथ नृपलोकीं सुरनदीस ती आर्या। तसि हे मयूर नाहीं तरि सर्वांना न दीसती आर्या ॥ १११ ॥ आर्याभागीरथीच्या जनकाचा हा अभि-

१ मोरोपंतांचें चरित्र पृ. ५६८

मानोद्धार ऐकून कोणास कौतुक वाटणार नाहीं !.....पंत शंकरापाशीं मागतात :—उचित प्रचार भासो रसिकांस प्राकृतांत आर्यांचा । युष्मद्वरेंचि होतो सत्कार प्राकृतांत आर्यांचा ॥ ११२ ॥ पंतांच्या आर्येला संस्कृतांत गीति असें नांव आहे." पंतांच्या आर्या त्यांच्या काळींच लोकमान्यतेस पावल्या. गडकऱ्यांच्या भाषेची पकड ज्याप्रमाणें दहावर्षांपूर्वी महाराष्ट्रीयांच्या मनावर होती, तशा प्रकारची पकड मोरोपंती आर्येची सुमारे शंभरसव्वाशें वर्षें होती. आर्यासंप्रदायच महाराष्ट्रांत निर्माण झाला. मोरोपंतांना जितके अनुयायी कवी लाभले तितके क्वचित्च इतर मराठी कवींना लाभले असतील. विठोबा अण्णा, राम वडवे, चिंतामणि जोशी, धुंडिराज, काशि कवी, परशुराम ढवळे, राजाराम प्रासादी, बापूसाहेब कुरुंदवाडकर इत्यादि शेंकडों कवींनीं आपली काव्यरचना आर्यावृत्तांत केली आहे. धुंडिराज कवीनें प्रल्हादचरित्र, नारदाची लावणी, रासक्रीडा इत्यादि काव्यरचना केली आहे. " न मरे यास्तव नेला पर्वतशिखरासि लोटिला खाली । परि तो निर्भय चित्तीं वाहे नारायणासि लाखोली " ही प्रल्हाद चरित्रांतील आर्या सर्वांच्या परिचयाची आहे. जनार्दन कवीनें दामाजीपंतचरित्र आर्यावृत्तांत रचिलें असून कृष्णानंदनिमग्न या कवीचा 'राधाविलास' आर्यावृत्तांतच आहे. विष्ठल केरीकर (शके १७०० नंतर) हा पंतानुयायी असून याच्या काव्यांपैकीं वामनचरित, शुकरंभासंवाद, कबीरकथा, गजगौरीव्रत हीं प्रसिद्ध आहेत. नारायण कवीनें लिहिलेल्या कचिराख्यानांत तसेंच शिवमोहिनी आख्यानांत त्यानें पंतांचें अनुकरण पुष्कळ केलें आहे. चिंतामणी कवीनें गोपीचंदाख्यानाचे प्रारंभीं "विद्वज्जनवृक्षवना सौरभ-गुणवृद्धिला महागुरुला । भावें ध्यातों प्राकृतकाव्याचार्या मयूरकविराया" मोरोपंतांना नमन केलें आहे. यानें 'सीतास्वयंवर' हें प्रकरणहि आर्या-वृत्तांत रचिलें आहे. याशिवाय यानें गणपतीवर अकराशे आर्या केल्या आहेत. सोलापुरचे रामजोशीबुवा, पंढरपूरचे रामचंद्रपंत वडवे, रघुनाथपंत कोशे यांनींहि पंतांच्या धर्तीवरच काव्यरचना केली आहे.

मोरोपंतांच्या श्रेष्ठत्वाचा हाहि एक अप्रत्यक्षच कां होईना पण भक्कम पुरावा आहे.

मोरोपंतांच्या समकालीन अशा कांहीं कवींचा येथेंच उल्लेख केलेला बरा. गोपाळ, शुभानंद, माधव आणि जिवाशिवा यांनीं महाभारतांतील कांहीं पर्वांवर मराठी टीका केली आहे. गोपाळ हा नेवासें येथील राहणारा होता व शुभानंद हा अंकोले येथील राहणारा होता. मुरारी, जनार्दन, शिवनाथ, अनंतनय, हरिदास कान्हा याहि कवींनीं महाभारतांतील कांहीं पर्वें मराठींत अनुवादिलीं आहेत. मुरारीनें भीष्मपर्व शके १६७६ मध्यें रचिलें. शिवनाथानें भीष्म व द्रोण हीं पर्वें शके १६८८ मध्यें तयार केलीं. अनंततनयानें उद्योगपर्व रचिलें असून हरिदास कान्हयाचें भीष्मपर्व उपलब्ध आहे. याचा काळ शके १७०० चा समजतात. सोहिरोबानाथ अंबिये (जन्म शके १६३६ मृत्यु शके १७१४) हे बांदे या गांवचे राहणारे होते. यांनीं अक्षयबोध, पूर्णाक्षरी, अद्वयानंद, सिद्धांतसंहिता, महदनुभवेश्वरी इत्यादि अध्यात्मपर व उपदेशात्मक ग्रंथ लिहिले असून शिवाय पदें व अभंगहि पुष्कळ रचिले आहेत. जोतिपंतदादा (मृत्यु शके १७१० मार्गशीर्ष कृ. १३) यांनीं सबंध भागवतावर मराठींत टीका लिहिली असल्यानें यांना जोतिपंतदादा महाभागवत म्हणतात. यांनीं आपल्या काव्यांत अभंग व ओवी या दोन्ही वृत्तांचा उपयोग केला आहे. रघुनाथ ऊर्फ हरिदास या कवीनें योगवासिष्ठ हा ग्रंथ मराठींत अनुवादिला आहे. ग्रंथाची ओंवीसंख्या सोळाहजारांहून अधिक आहे. हरिबुवा भोंडवे (समाधि शके १६९९) जातीनें शिंपी असून मोठे विठ्ठलभक्त होते. हे रामदासी संप्रदायांतील होते. यांनीं हरिबोध (शके १६९०) व ज्ञानसागर (शके १६९५) असे दोन अध्यात्मपर ग्रंथ लिहिले आहेत. शिवाय यांची अभंग रचनाहि सुमारे पाऊणलाख आहे. भिक्षु कवीनें 'भक्ति अनुभव' (शके १६९६) नांवाची वीस अध्यायांची उद्धवगीतेवर मराठींत टीका केली आहे.

१६

" मराठी काव्याची पहांट "

शिवाजीमहाराज, राजाराम महाराज, बाजीरावसाहेब, नानासाहेब, सवाई माधवराव इत्यादिकांचा स्वराज्यस्थापनेचा व साम्राज्य विस्ताराचा अभूतपूर्व असा पराक्रम महाराष्ट्रांत व महाराष्ट्राबाहेर चालला असतांना, साहित्यिकांचा एक वर्ग आध्यात्मिक पौराणिक उपदेशात्मक अशा प्रकारची काव्यरचना करीत होता. या साहित्यिकांत तुकाराम महाराज, कांहीं अंशांनीं रामदास, वामनपंडित, रघुनाथपंडित, श्रीधर, मोरोपंत यांच्यासारखे थोर कवी येतात. ज्या जगांत हे वावरत होते, त्यांतून काव्यविषयक न निवडतां, उपनिषदें आणि रामायण-महाभारतांतून त्यांनी आपले विषय निवडिले! लौकिक जगाहून कांहीं वेगळ्याच जगांत हे राहात असल्यागत यांची काव्यसृष्टि आहे. साहित्यिकांचा दुसरा वर्ग मात्र अधिक जागरूक होता. मराठे वीरांच्या पराक्रमांत आणि प्रेमांत, सुखांत आणि दुःखांत, सहानुभूतिपूर्वक सहभागी होऊन यानें आपल्या काव्याची रचना केली. सभोंवतालच्या सृष्टीशीं एकरूप होऊन या वर्गानें काव्यरचना केली असल्यानें, त्याच्या काव्यांत एक प्रकारचा जीवंतपणा नि जिव्हाळा, वास्तवता नि मराठेबाणा ओतप्रोत भरला आहे. या साहित्यिकांत अज्ञानदास-तुलसीदासापासून ते प्रभाकर-परशुरामापर्यंतचे सर्व शाहीर येतात. यांचें काव्य अस्सल मराठी काव्य आहे. मुकुंदराजापासून ते मोरोपंतांपर्यंतच्या काव्याला मराठी काव्य म्हणण्यापेक्षां भारतीय काव्य म्हटलेलें अधिक शोभेल. कारण त्यांत महाराष्ट्राची विशिष्टता अशी फार थोडी उतरली आहे. अखिल भारतीय कथा आणि अखिल भारतीय तत्त्वज्ञान यांचाच काव्यात्मक किंवा पद्यात्मक परामर्श यांनीं घेतला आहे. याच्या उलट शाहिरांच्या पोवाड्यांची आणि

लावण्यांची स्थिति आहे. मराठ्यांचें मनगट, मराठ्यांचें मन, मराठ्यांच्या भावभावना, मराठ्यांचे आचार विचार, मराठ्यांचा पोषाख आणि मराठ्यांचा मानधनी मोठेपणा या सर्वांचें प्रतिबिंब पोवाड्यांत आणि लावण्यांत उत्तम प्रकारें पडलें आहे. हें खरें मराठी काव्य होय. हें व्यासोच्छिष्ट काव्य नव्हे. मराठी काव्याची सुरुवात या लोकाभिमुख काव्यापासून झाली असें म्हटलें पाहिजे. अच्युतराव कोल्हटकर यांनीं या काव्याला उद्देशून 'मराठी काव्याची पहांट' असें जें म्हटलें आहे तें अगदीं यथार्थ आहे.

शाहिरांच्या पोवाड्यांकडे आणि लावण्यांकडे लोकांचे लक्ष शिवकालापासून असलें, तरी साहित्याच्या दृष्टीनें त्यांचें महत्त्व ओळखून ते छापून काढण्याचें काम इ. स. १८६९ पर्यंत कोणी केलें नव्हतें. या सालीं विविधज्ञानविस्तार मासिकाचा जन्म झाला. या मासिकांतच १८७२ मध्यें नारायणरावांच्या वधाचा, १८७५ मध्यें कोल्हापूरकर आबासाहेब यांच्या खुनाचा, १८७७ मध्यें बाळा लक्ष्मण शाहीराचा खर्ड्याचा, १८७८ मध्यें सातारकर जंगली राजाच्या जन्माचा व १८७९ मध्यें प्रभाकर शाहीराचा खर्ड्याचा इत्यादि पोवाडे प्रसिद्ध झाले. याच सुमारास निबंधमालेंत विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं कांहीं पोवाडे छापले. महाराष्ट्रांत इतिहाससंशोधनाची स्फूर्ति शास्त्रीबोवांपासूनच निर्माण झाली. शास्त्रीबोवांचे स्नेही शंकर तुकाराम शाळिग्राम यांनीं त्यांच्यापासून प्रेरणा मिळवून, पोवाडे जमा करण्याचें काम शिरावर घेतलें. १८७९ सालीं त्यांनीं सुमारे चाळीस पोवाड्यांचा एक संग्रह प्रसिद्ध केला. पोवाडे जमविण्याचा नाद याच सुमारास ऑक्वर्थ या इंग्रज गृहस्थासहि लागला. पुढें त्यांनीं व शाळिग्राम यांनीं मिळून १८९० सालीं पोवाड्यांचा दुसरा संग्रह प्रसिद्ध केला. गोविंद बल्लाळ शितूत यांनीं सुमारे शंभर पोवाडे मिळवून त्यांचा संग्रह कोल्हापूर सरकारकडून प्रसिद्ध करविला. दुर्दैवानें हा संग्रह कोठेंहि उपलब्ध नाहीं. त्यानंतर १८९३ मध्यें बाळकृष्ण आत्माराम गुप्ते

यांनीं 'होळकरशाहींतले पोवाडे' नांवाचा १९ पोवाड्यांचा संग्रह प्रसिद्ध केला. शाळिग्रामांनीं पुढें शाहिरांच्या लावण्याहि प्रसिद्ध केल्या. चित्रशाळा छापखान्यानें प्रभाकर, होनाजीबाळा, अनंत फंदी इत्यादि शाहिरांच्या लावण्या व पोवाडे इ. स. १९२० च्या सुमारास प्रसिद्ध केले. गो. गो. अधिकारी यांनीं सगनभाऊ व पट्टे बापूराव यांच्या पोवाडे व लावण्यांना प्रसिद्धी दिली. त्यानंतर य. न. केळकर यांनीं ऐतिहासिक पोवाडे भाग पहिला (१९२८) व भाग दुसरा (१९४४) प्रसिद्ध करून मराठ्यांचा काव्यमय इतिहासच जनतेपुढें ठेविला. या सर्व संग्रहांत मिळून सुमारे तीनशे पोवाडे उपलब्ध आहेत. यांपैकीं शिवकालीन सात, पेशवेकालीन दीडशे व अव्वल इंग्रजींतील दीडशे असे पोवाडे आहेत. ऐतिहासिक पोवाड्यांत फक्त सगनभाऊचा पानपतचा पोवाडाच विषमकालीन आहे. बाकी सर्व पोवाडे समकालीन असल्यानें इतिहासाच्या दृष्टीनें फार महत्त्वाचे आहेत. किंचहुना कांहीं पोवाडे उपलब्ध ऐतिहासिक साधनांपेक्षां चांगले आहेत. उदाहरणार्थ मल्हारदास शाहीरकृत डभईच्या लढाईचा पोवाडा. यांत माहिती भरपूर आली आहे. लहरीमुकुंदाच्या नारायणरावांच्या वधावरील पोवाड्यांत आनंदीबाईवरील आरोप निर्मूल केला आहे. प्रभाकराच्या खर्ड्याच्या पोवाड्यांत पेशव्यांच्या सरदार शिलेदारांची बिनचूक यादी आहे. बखरींत हें नाहीं. प्रभाकराच्या एका पोवाड्यांत बाजीरावाचे दोन लेकवळे (कुशाबा व हैबती) यांचा अन्यत्र नसलेला उल्लेख आहे.

पोवाड्यांचे तीन काल कल्पितां येतात. पहिला काळ शिवाजी ते पहिले बाजीरावांचा. यांत फार थोडे पोवाडे आहेत. शिवाजीच्या मृत्युनंतरच्या बेबंदशाहींत हे पोवाडे नष्ट झालें कीं काय कळत नाहीं. दुसरा काळ, पानपत ते खडकीपर्यंतचा. यांत पुष्कळ पोवाडे आहेत. पहिल्या कालांतील शाहीर गोंधळी व मराठे आहेत. दुसऱ्यांतील गोंधळी-मराठे-ब्राह्मण असे सर्व जातींचे आहेत. खर्ड्याचा युद्धसंग्राम आणि पुण्यांतला श्रीमंत सवाई माधवराव साहेबांचा डोळेभरून पाहिलेला रंग, या कवीं-

समोर असल्यानें होनाजी बाळा, अनंतफंदी, रामजोशी, प्रभाकर, सगनभाऊ, रामचंद्र, परशराम इत्यादि सर्वांनीं या प्रसंगांचीं मनोहर वर्णनें करून आपल्या देशबांधवांस ऐकविलीं व आनंदानें व स्फूर्तीनें लोकांचे देह फुलवून सोडिले. पोवाड्यांच्या पहिल्या काळांत एकहि लावणी नाहीं. दुसऱ्यांत अगणित आहेत. पहिल्या काळांत गद्यसदृश सुलभ वृत्त आहे तर दुसऱ्यांत अनेक चालींचे व रागांचे पोवाडे व लावण्या आहेत. तिसऱ्या काळांत इंग्रजी अंमलाचीं वर्णनें असून शाहिरांची बडोदे, ग्वाल्हेर, इंदूर अशी वाताहत झालेली दिसते. 'जुने कायदे अगदि मोडले जघिपुन झाली इंग्रेजी' असे एका शाहिरानें म्हटलें आहे. शाहूच्या कारकीर्दीपासून मराठी राज्यांत शाहिरांची चलती होती. तिचा कडेलोट दुसऱ्या बाजीरावांच्या कारकीर्दीत झाला. गंगूहैबतीच्या फडाला सवाईमाधवरावांकडून आश्रय होता. होनाजीला कुंडनपूरचें इनाम व शिमग्याच्या तमाशाबद्दल सालीना ३०० रु. मिळत. दुसरा बाजीराव आपल्याबरोबर शाहीर मिरवी. वेंकट नरसी नांवाच्या कंचनीला त्यानें नाचाबद्दल २६००० रु. दिल्याचा उल्लेख आहे. दुसऱ्या सयाजीरावांच्या कारकीर्दीत बडोद्यांत पेशवाईतील शाहिरांना उत्तम आश्रय मिळाला. परशुराम एकवीस वेळां बडोद्यात आला होता.

पोवाड्यांचा प्रसार शाहिरांनीं तर केलाच, पण त्यांच्याहिपेक्षां चित्रकथे, बहुरुपी, भराडी, गोंधळी यांनीं विशेष केला. हे सर्वजण लावण्या आणि पोवाडे म्हणत, आणि ते म्हणतांना ढोलकीं, एकतारी, डौर, संबळ, डफ हीं अस्सल देशी वाद्यें वाजवीत. अंबाबाई, भैरव, एकवीरा वगैरे सारख्या देवतांचे गोधळांत पोवाडे म्हणण्याचा परिपाठ गोंधळयांनीं सुरू केला. घरांत एखादें शुभ कार्य असलें कीं गोंधळ हटकून होई. आणि गोंधळ म्हटला कीं त्याची पूर्तता पोवाड्यावांचून होत नसे. महाराष्ट्रीयांना या पोवाड्यांविषयीं आत्मीयता वाटे याचें कारण त्यांच्या कुळांतील, त्यांच्या नात्यापैकीं, त्यांच्या पूर्वजांपैकीं, कोणीनाकोणी तरी पोवाड्यांत वर्णन केलेल्या

लढाईवर गेलेला असे. साहजिकच पोवाडे ऐकून त्यांना वीरश्रीचें व समाधानाचें भरतें येई. पोवाडे व लावण्या केव्हांहि ऐकायला आनंददायक असल्या तरी त्या रणभूमीवर विश्रांतीच्या वेळीं अधिक मनोरंजक वाटत असतील यांत शंका नाहीं. कारण वीरांच्या पराक्रमाचें वर्णन जसें पोवाड्यांत असतें, तसेंच त्यांच्या शृंगाराचें वर्णन लावण्यांतून केलेलें असते. वीरभोग्य असेच हे कवनाचे दोन प्रकार आहेत.

अगदीं पहिला पोवाडा अग्निनदास किंवा अज्ञानदासाचा अफझलखानाच्या वधावर आहे. शाहिरानें हा प्रसंग स्वतःच्या कानीं घडलेला असा ऐकला आहे. या पोवाड्याची रचना गद्यासारखी तुणतुण्यावर सहज म्हणतां येईल अशी आहे. या पोवाड्याबद्दल शिवाजीमहाराजांकडून अज्ञानदासाला घोडा बक्षीस मिळाला होता. दुसरा पोवाडा तुलसीदासाचा असून तो तानाजीवर किंवा सिंहगडावर आहे. अज्ञानदासाची तडफ यांत नाहीं. परंतु काव्य ज्यास्त आहे. या पोवाड्याबद्दल शाहीराला शिवबाकडून सोन्याचा तोडा मिळाल्याचा उल्लेख आहे. यमाजीच्या पोवाड्यांत बाजी पासलकराच्या झटापटीचें वर्णन आहे. बाबू सवाई रामा यानें १७२६ सालांतील कर्नाटकस्वारीचा पोवाडा गाईला आहे. मल्हारदासानें डभईच्या लढाईवर पोवाडा रचिला आहे. पानपतच्या युद्धावर सगनभाऊ, रामा सटवा, पिंपळगांवकर शिवराम, रंगराव, अशा अनेक शाहीरांनीं पोवाडे केले आहेत. "भाऊसारखा मोहरा। आम्हांवर कां रुसला पंचीप्यारा" या ध्रुवपदाचा रामा सटवाचा पोवाडा करुण रसानें भरलेला आहे. लहरी मुकुंदाचा "दख्खनचा दिवा मालवला हिरा हरपला। काय गुपीत घाला केला नारायणरावाला"—हा नारायणरावाच्या वधाचा पोवाडाहि करुणरसानें ओतप्रोत आहे. सवाई माधवरावांच्या रंग खेळण्यावर अनेक पोवाडे आहेत. त्यांत प्रभाकर व होनाजी बाळा यांचे बहारीचे आहेत. "जसा रंग श्रीरंग खेळले वृंदावनिं द्वापारांत। तसा रंग श्रीमंत खेळले कलियुगांत अति आदरांत" अशी आपल्या

पोवाड्याची आकर्षक सुरुवात प्रभाकरानें केली आहे. खड्र्याच्या लढाई-वर प्रभाकर, आप्पा यशवंत, कुशाबा, अनंतफंदी, बाळा लक्ष्मण, होनाजी बाळा, रामचंद्र, बहुरंगी अशा अनेक शाहिरांनीं पोवाडे रचिले आहेत. हे सर्व पोवाडे वीरश्रीयुक्त आहेत. याशिवाय सवाईं माधवरावांचा मृत्यु, पट्टणकुडीची लढाई, यशवंतराव होळकर, दुसरा बाजीराव, इ. स. १८०४ व १८०५ सालचा दुष्काळ, खडर्का व अष्टीची लढाई, महादजी शिंदे, नाना फडणीस, आनंदराव धुळप, दत्ताजी जाधव, सेखोजी आंग्रे, फत्तेसिंग गायकवाड, दुसरे सयाजीराव, डामाजी नाईक, अहिल्याबाई होळकर, इत्यादि व्यक्तींवर व प्रसंगांवरहि शाहिरांनीं पोवाडे तयार केले असून ते ऐतिहासिक माहितींनीं भरलेले असून, रचनेच्या दृष्टीनेंहि सफाईदार आहेत.

पोवाड्यांत ऐतिहासिक वीरपुरुष आणि मुत्सद्दी यांनीं शत्रूशीं घेतलेलीं झुंजें आणि गाजविलेले पराक्रम, त्यांनीं रचलेलीं कारस्थानें इत्यादिंची माहिती ज्याप्रमाणें मिळते, त्याप्रमाणें लावण्यांतून ऐतिहासिक कालांतील समाजस्थितिविषयीं, लोकसमजुतीविषयीं माहिती कळते. मराठेशाहींत लोकांचा शकुनांवर, मुहूर्तावर किती विश्वास होता, विवाह कोणच्या मर्यादे-पर्यंत होत, दागदागिने कोणते घालीत, यात्रा कोणत्या करीत, सणवार कोणते उजवीत, आपापसांतील संबंध कसे असत, गृहव्यवस्था कशी असे इत्यादि अनेक गोष्टींवर लावण्या उत्तम प्रकारचा प्रकाश पाडतात. मराठेशाहीचा सामाजिक इतिहास या लावण्यांतून जसा व्यक्त झाला आहे तसा क्वचित्च इतरत्र झाला असेल. "हिण माझें प्रालब्ध वांझपण कधीं फिटेल बाई। एक बाळक पोटीं नाहीं"; या होनाजीच्या लावणींत संततीचें महत्त्व त्या काळीं किती वाटे तें दिसतें. रणांगणावर गेलेला पति यश घेऊन परतून येत आहे असें कळल्यावर होणारा आनंद होनाजीच्या "सहज मनामध्यें आलें साजणी कधीं स्वामीचा येकांत घडे। तों जासूद येऊन सांगितलें मुकाम गंगे आलीकडे" या लावणींत व्यक्त झाला आहे. नागपंचमी-नवरात्र या सणांचे प्रसंगीं पति घरीं

नसला म्हणजे स्त्रियांना काय वाटे ते प्रभाकराच्या "नऊदिवस नवरात्र गृहीं प्राणसखा नाहीं । घटीं ग बसली अंबाबाई ॥ काय करूं किती आवरूं भर नौतिग मी । पती वांचुन चालली सुनी नागपंचमी" या ओळींत दिसते. त्याकाळीं दागिने कोणते घालीत ते प्रभाकर सांगत आहे:—"गोठ हातसर जवे खिजमत्या मिनेदार करीं चुडे । चालतां विचित्र दृष्टि पडे । वाकड वेळा बाहुभूषणें बाजुबंद त्यापुढें । बोलतां कोकिळ वृक्षीं दडे ॥ चिंचपेट्या तन्मणी हिऱ्याचे छेदिव कोंदण खडे । तांदळी पोत दृष्टि ना पडे ॥ पायीं विरोद्या जोडवी अनवट बिचवे गेंद । रुइफुली विरोद्या भारी नगांची चेंद । जड झालें शरीर मदन तोरें धुंद..." मूल न होणाऱ्या बाया काय करीत ते परशुरामाच्या पुढील लावणींत पाहावयास सापडते, "पोट पिकेना म्हणून बांधिले भाराभर गंडे ।...पंचाक्षरी आणून आधीं । घरबंधन मी केलें । लेकाची माय पाहून गे तिच्या बाजेजवळ गेले । तिशीं ना कळतां चोरूनग जावळाचे केस आणिले ।...वेरुळांत वैनगंगा उभयतां आलों जोड्यानें न्हाऊन ।...नागबळी नारायण बळी केला जाऊन त्रिंबकेश्वरीं ।...घेतल्या-तप्तमुद्रा । पावला देव मजला । झालें बाळग नवमासीं । त्या सुखासी काय वाणूं । पति केवळ गुणराशी." शकुनावरील विश्वास परशुरामाच्या पुढील लावणींत दिसतो:—"बोले कावळा लवतो डोळा फुरफुरती बाही । गेले प्रवासी घरीं कधीं येतील आमचे शिपाई." पेशवाईतील ऐश्वर्याची कल्पना यायला परशुरामाच्या या ओळी वाचा:—"छपर पलंग झोपाळे साकळ्या चांदीचे लटकती हलके । पडदे चिकाचे रंगित संगीत जणूं घट्टा काळीज कलके ।.....खणोखणीं तजबिरा काढिल्या आंग्रेजी ऐने जडले । शाल दुशाले महालीं बिछायत मखमालीं तक्के पडले ।"

शाहिरी वाङ्मय निर्माण करणाऱ्यांत रामजोशी, अनंतफंदी, प्रभाकर, होनाजीबाळा, सगनभाऊ, परशुराम, गंगु हैबती यांची गणना प्रामुख्यानें होते. सुप्रसिद्ध रामजोशी सोलापूरकर (जन्म शके १६८४, मृत्यु शके १७३४) सर्व शाहीरांत तुऱ्याप्रमाणें होत. त्यांचा जन्म वेदशास्त्रसंपन्न

अशा पित्याच्या पोटीं झाला होता. परंतु लहानपणापासून त्यांची वृत्ति रंगेल असल्यानें त्यांना लावण्यांचा नाद लागला. पुढें ते स्वतःच सुंदर व मार्मिक लावण्या तयार करू लागले. बयाबाई व चिमाबाई या मैत्रिणींच्या संगतींत त्यांची प्रतिभा प्रज्वलित होऊन अनेकोत्तम लावण्यांना जन्म देती झाली. बयाबाईविषयीं एका लावणींत ते म्हणतात, "कविता इजसंगें रंगा आली। धन्या सत्कविता कविरायाची, रसिकता बयाची। दैवें ही गांठ बयाबाईची ॥". यांच्या लावण्यांतील शब्दयोजना इतकी सरस असे कीं, ती पाहून कविवर्य मोरोपंतांसारखा शब्दप्रभूहि खूष झाला. मोरोपंतांच्या सांगण्यावरून रामजोशांनीं पुढें निव्वळ शृंगारिक लावण्या न रचतां, अध्यात्मपर व पौराणिक कथानकपर लावण्या रचिल्या. यांच्या लावण्यांतील शब्द इतके बेमालूम वसवलेले असत कीं त्यांत इकडचा तिकडे करणें कोणालाहि कठीण वाटावें. "सुंदरा मनामधिं भरली, जरा नाहिं ठरली, हबेलिंत शिरलि, मोत्याचा भांग" या लावणींतील सुरुवातीचेच शब्द किती चपखल आहेत ते बघा. रामजोशांना दांभिकपणाचा किती तिटकारा होता तें "हटातटानें पटा रंगवुनि जटा धरिशि तूं शिरीं। मठाची उठाठेव कां करी" हा त्यांनीं सुबरावबावा नांवाच्या मठपतीला जो फटका लगाविला आहे त्यावरून कळतें. जोशीबुवांची प्रसिद्धी त्यांच्या छेकापन्हुतींवर विशेष आहे. राधा व तिची सखी यांचा संवाद वर्णन करणारी पुढील छेकापन्हुति पाहा :—"गुणवंत कुचावर लोळे अति शोभला। तो कृष्ण काय? नव्हे; हार कळेना तुला। बाई अंगमर्दनीं अति सुखकर वाटला। तो कृष्ण काय? नव्हे; कर दूतिचा भला। मज शीतळ करितो, श्रमि होउनियां भला। तो कृष्ण काय? नव्हे; व्यजन सुवंशांतला।"

संगमनेरचे अनंतफंदी (जन्म शके १६६६, मृत्यु शके १७४३) हे त्यांच्या फटक्यांमुळें व लावण्यांमुळें विशेष प्रसिद्ध आहेत. त्यांचा घरचा धंदा सराफीचा. त्यांचें उपनांव घोलप. परंतु त्यांचे धंद्यांत लक्ष असण्याऐवजी अनेक प्रकारच्या फंदांत असे. याचमुळें लोक त्यांना फंदी म्हणू

लागले व तें त्यांचें उपनांव ठरलें. खर्ड्याची लढाई, यशवंतराव होळकर, दुसरें बाजीराव यांच्यावर रचलेले त्यांचे पोवाडे रचनेच्या दृष्टीनें चांगले आहेत. "लंडेगुंडे हिरसे तट्टु यांची संगत धरूं नको", "वर्म काढुनि शरमायाला उणे कोणाला बोलूं नको। स्नेहासाठी पदरमोड कर, पण जामिन कोणा राहु नको." इत्यादि व्यवहारांतील उपदेश करणारे त्यांचे फटके आजहि लोकांच्या जिव्हाग्रीं वसत आहेत. अनंतफंदींची रचना विविध होती. मात्र तिच्यांत रसवत्ता हा गुण बेताचाच होता. प्रभाकर जनार्दन दातार (मृत्यु शके १७६५) हा कलाभिज्ञ शाहीर होता. त्याची प्रतिभा उज्ज्वल असून वर्णनशैली अचुक आहे. रसवत्ता, पदलालित्य, नाद-माधुर्य या दृष्टींनीं पाहतां प्रभाकराची बरोबरी करणारा दुसरा शाहीर दिसत नाहीं. यानें देवादिकांच्या स्तुतिपर कविता, राजकारणी पुरुषांचे पोवाडे व शृंगारविषक लावण्या अशी त्रिविध काव्यरचना केली असून ती उत्तम काव्यांत मोजण्याजोगी आहे. सवाई माधवराव यांच्या रंग खेळण्याच्या प्रसंगावरील याच्या बहारीच्या पोवाड्याचें वर्णन मागें आलेंच आहे. दुसऱ्या बाजीरावाच्या अपयशावरील पोवाड्यांत याच्या मनांतील खिन्नता काव्यरूप घेऊन कशी बाहेर पडली आहे ती बघा :—"यशस्वी झाले श्रीमंत पहिले सवें लढायाला। आतांच आलें अपेश कोठून बाजीरायाला ॥ ॥ धृ० ॥ विपरीत आला काळ मेरुला गिळिलें मुंग्यानीं। पंडीतास जिंकिलें सभेमध्यें मदांध भंग्यांनीं। भीमास आणिले हारीस रणांगणीं अशक्य लुंग्यांनीं। कुबेरासि पळविलें अकिंचन कसें तेलंग्यांनीं। जळीं राघवमाशास अडविलें असंख्य झिंग्यांनीं। जर्जर जाहला विष्णुवाहन बदकांचें दंग्यांनीं ॥" याच्या शृंगारिक लावण्या सरस आहेत. थोड्क्याशा शब्दांत वाचकांच्या समोर चित्र उभे करण्याची याची हातोटी पुढील ओळींत व्यक्त होते :—"निकोप गाभा सरळ कदळी हस्त तसे नाजुक दिसले। अधर लाल लवथवित नौतीच्या रंगरसामधीं रसरसले।"

होनाजी बाळा हा जातीनें नंदगवळी होता. याच्या आजाचें नां

साताप्पा. हाहि लावण्या करी. साताप्पाचा थोरला मुलगा बाळा बहिरू हाहि लावण्या रचीत असे. अशा रीतीनें होनाजीच्या ठिकाणीं कवित्व आनुवंशिकतेनें आलें असें म्हणावयास हरकत नाहीं. होनाजीनें पोवाडे व लावण्या अशी दुहेरी रचना केली असून ती प्रसादपूर्ण आहे. याच्या कांहीं छेकापन्हुति देखील आहेत. याच्या सर्व कवनांत "घनःश्याम सुंदरा श्रीधरा, अरुणोदय झाला। उठि लौकर वनमाळी उदयाचळीं मित्र आला" ही भूपाळी सर्वांगसुंदर असून आज दीडशे वर्षें महाराष्ट्राला आनंद देत आहे. होनाजीच्या तोडीचा दुसरा शाहीर सगनभाऊ (इ. स. १७७८ ते १८४०?) हा होय. हा जेजुरीचा राहणारा व जातीनें शिकलगार मुसलमान होता. यानें रागदारीच्या लावण्या व पोवाडे रचिले आहेत. पूर्वी, लीलांबरी, झाम, भैरवी, पहाडी, गारा अशीं रागांचीं नावें याच्या लावण्यांवर दिलेलीं असतात. "लाडे लाडे येते मनरंजना। उचलून कडेवर कां ध्याना" ही याची लावणी भावपूर्ण आहे. याचा पानपतचा पोवाडाहि चांगला आहे. गंगू हैबती, कुशाबा माळी, गोविंदा, मोतीराम. हेहि शाहीर बऱ्यापैकीं होते. ज्याचा उल्लेख अवश्य केला पाहिजे असा शाहीर म्हणजे परशुराम (मृत्यु इ. स. १८४४) हा होय. हा जातीनें शिंपी होता. याला संत शाहीर म्हणतात. याचें कारण त्याचे तमाशे एकादशीच्या दिवशींहि करवीत असत. हा निस्ग्रह असून अत्यंत सात्विक वृत्तीचा होता. यानें तात्त्विक, पौराणिक कथात्मक, विनोदी, उपदेशात्मक व संकीर्ण अशा लावण्या रचिल्या असून त्या लोकस्थितिपर व प्रौढ अशा आहेत. मागें त्यांचा उल्लेख आलाच आहे. "दुघड नार नवऱ्याला शिकवी म्हणे वेगळें निघा। जहामर्दी संसार दावितें करून तुम्हांला बघा," "धट्टाकट्टा तरणा-ताठा कांहीं करीना चाकरी। कुटुंबघातकी तीन शेरांच्या नित उडवी भाकरी," इत्यादि लावण्यांतील विनोद तसेंच "दहा शिंदळक्या करीन परंतु एक लग्नाचा नको नवरा। माहेरीं माझें चित्त मन रमलें सासरचा नलगे वारा ॥ परेहून परता त्याहून वरता परपुरुष पाहून बाई। करून इतके

पतिव्रता मी मन याला माझें ग्वाढि," "वैराग्य पलंगीं शेज सवारून पर-पुरुषाची । वाट पाहतसे । बसून निरंजन मठीं । रात्रंदिशिं एक तार लाविली । कधीं पाहीन हटतटीं" इत्यादि लावण्यांतील 'भेदिक' तत्त्वज्ञान हीं दोन्ही वैशिष्ट्यपूर्ण आहेत यांत शंका नाहीं.

वर उल्लेखिलेल्या शाहिरांत जमा होणारे परंतु बऱ्याच पुढच्या काळांत झालेले श्रीधर कृष्णाजी कुलकर्णी ऊर्फ पट्टे बापुराव (मृत्यु इ. स. १९४५ डिसेंबर ता. २२ मुक्काम पुणें येथें) यांचा उल्लेख येथेंच केलेला शोभून दिसेल. "जन्मानें ब्राह्मण पण उभे आयुष्य महारांच्या सांगाती, लौकिक दृष्टीनें बहिष्कृत व अस्पृश्य पण सरस्वतीच्या दरबारांतील मानकरी व स्पृश्य, लहरी व ताठर, बाणेदार पण मनाचा हळुवार व दिलाचा दिलदार अशा विरोधांचे पट्टे बापूराव एक चित्र आहे[1]." हल्लींच्या तमाशांत हार्मोनियम आवश्यक असते. परंतु पट्टे बापूरावांनीं संबळ-डफ-तुणतुण्याची जुनीच पद्धत चालू ठेविली होती. त्यांच्या लावण्या भेदिक म्हणजे तत्त्वज्ञानपर आहेत. परशुरामाच्या असल्या लावण्याशीं त्यांच्या लावण्यांची तुलना होऊ शकेल. 'मला सांगा मत' या लावणींतील पुढील ओळी या दृष्टीनें चिंत्य आहेत. ' तुम्ही घेऊन आला एक उसनी जिन्नस । तिला निजला देउन उस । तिची ओळख विसरला खास घर बांधल सक्त । हा आमुचा सवाल तुमच्या बिऱ्हाडा भौत । सांग गुणक्षोभणी किती पसरली माया । आली सगुणात खेळाया । तिनें वेळु खला एक ठाया । त्याला चहू शून्याचा पाया । सोहं शब्द ढोल बडवाया' बापूरावांच्या शृंगारिक लावण्या देखील मर्यादशील व भावपूर्ण असून, त्यांतील शब्द-योजना रमणीय आहे. 'मुंबई शहर' या लावणींतील मुंबईचें वर्णन माहितीनें भरलेले आहे.

शाहिरांच्या लावण्या म्हटल्या कीं, त्या येथून तेथून सर्व उत्तान शृंगारिक, अशी समजूत त्या न वाचणाऱ्या व गांवठी तमाशे पाहणाऱ्यांनीं

---

१. ज. वा. पाटणकर.

करून घेतलेली असते. ही समजूत साफ चुकीची आहे. सुप्रसिद्ध शाहिरांच्या एकंदर लावणीवाङ्मयांत ज्यांना अश्लील म्हणतां येतील अशा लावण्या ज्यास्तींत ज्यास्त दहा-पंधरा असतील. बाकीच्या लावण्या शृंगारिक म्हणण्यापेक्षां प्रेमविषयक आहेत. हीं सर्व भावगीतें किंवा प्रेमगीतें आहेत. प्रेमाच्या शंका-कुशंका, रुसवे-फुगवे, भेटी-विरह इत्यादींचीं मोकळ्या मनानें व प्रामाणिकपणानें केलेलीं लावण्ययुक्त वर्णनें म्हणजे या लावण्या होत. ज्यांना सोंवळ्या अर्थानें अश्लील म्हणतां येतील अशा लावण्यांतहि जें कांहीं संभोगशृंगाराचें वर्णन आहे तें ध्वन्यर्थानें केलेलें आहे. रा. मर्ढेकरादिकांच्या आधुनिक वास्तवतावादी काव्यांत गुप्तेंद्रियांचीं जीं बीभत्स वर्णनें येतात, तसलीं वर्णनें या जुन्या शाहिरांच्या काव्यांत मुळींच येत नाहींत. संभोगशृंगाराचीं सूचक वर्णनें कांहीं थोड्या लावण्यांत आहेत. बाकीच्या सर्व लावण्यांत एका प्रेमभावनेचे विविध प्रकार लालित्यपूर्ण परंतु सरळ व सोप्या भाषेंत वर्णन केलेले आढळतात. मराठी साहित्यांत शाहिरी वाङ्मयाला स्वतंत्र व मानाचें स्थान द्यावयाला हवें.तें याचकरितां.

पेशवाई अखेरील कवी

पेशवाईच्या अखेरीस ज्याप्रमाणें शाहिरी काव्य निर्माण होत होते, त्याचप्रमाणें जुन्या वळणाचेंहि कांहीं काव्य तयार होतच होतें. असलें काव्य तयार करणाऱ्या कवींत देवनाथ (जन्म शके १६७६ मृत्यु शके १७४३ ग्वाल्हेर येथें) हें मुख्य होते. देवनाथ हे वऱ्हाड प्रांतांत सुरजी अंजनगांव येथें राहात असत. त्यांची गुरुपरंपरा पुढीलप्रमाणें आहे :— नृसिंहसरस्वती—जनार्दनस्वामी—एकनाथ—गावबा ऊर्फ नित्यानंद—कृष्णनाथ —विश्वंभरनाथ—मुरारनाथ—रंगनाथ—गोपाळनाथ—गोविंदनाथ—देवनाथ. या परंपरेंतील बहुतेक पुरुषांनीं ग्रंथरचना केली आहे. एकनाथ व गावबा यांचीं नांवें यापूर्वीच आपल्या परिचयाचीं झालेलीं आलेत. गोपाळनाथ (समाधि शके १६८८) यांनीं ' सिरोमणी ' नांवाचा सुमारे नऊ हजार ओंव्यांचा एक ग्रंथ लिहिला आहे. याशिवाय समाधिबोध नांवाचा दुसराहि-

लागले व तें त्यांचें उपनांव ठरलें. खर्ड्याची लढाई, यशवंतराव होळकर, दुसरें बाजीराव यांच्यावर रचलेले त्यांचे पोवाडे रचनेच्या दृष्टीनें चांगले आहेत. "लंडेगुंडे हिरसे तट्टु यांची संगत धरूं नको", "वर्म काढुनि शरमायाला उणे कोणाला बोलूं नको। स्नेहासाठी पदरमोड कर, पण जामिन कोणा राहु नको" इत्यादि व्यवहारांतील उपदेश करणारे त्यांचे फटके आजहि लोकांच्या जिव्हाग्रीं वसत आहेत. अनंतफंदींची रचना विविध होती. मात्र तिच्यांत रसवत्ता हा गुण बेताचाच होता. प्रभाकर जनार्दन दातार (मृत्यु शके १७६५) हा कलाभिज्ञ शाहीर होता. त्याची प्रतिभा उज्ज्वल असून वर्णनशैली अचुक आहे. रसवत्ता, पदलालित्य, नाद-माधुर्य या दृष्टींनीं पाहतां प्रभाकराची बरोबरी करणारा दुसरा शाहीर दिसत नाहीं. यानें देवादिकांच्या स्तुतिपर कविता, राजकारणी पुरुषांचे पोवाडे व शृंगारविषक लावण्या अशी त्रिविध काव्यरचना केली असून ती उत्तम काव्यांत मोजण्याजोगी आहे. सवाई माधवराव यांच्या रंग खेळण्याच्या प्रसंगावरील यांच्या बहारीच्या पोवाड्याचें वर्णन मागें आलेंच आहे. दुसऱ्या बाजीरावाच्या अपयशावरील पोवाड्यांत याच्या मनांतील खिन्नता काव्यरूप घेऊन कशी बाहेर पडली आहे ती बघा :—"यशस्वी झाले श्रीमंत पहिले सवें लढायाला। आतांच आलें अपेश कोठून बाजीरायाला ॥ ॥ धृ० ॥ विपरीत आला काळ मेरुला गिळिलें मुंग्यानीं। पंडीतास जिंकिलें सभेमध्यें मदांध भंग्यांनीं। भीमास आणिले हारीस रणांगणीं अशक्य लुंग्यांनीं। कुबेरासि पळविलें अकिंचन कसें तेलंग्यांनीं। जळीं राघवमाशास अडविलें असंख्य झिंग्यांनीं। जर्जर जाहला विष्णुवाहन बदकांचें दंग्यांनीं ॥" याच्या शृंगारिक लावण्या सरस आहेत. थोड्क्याशा शब्दांत वाचकांच्या समोर चित्र उभे करण्याची याची हातोटी पुढील ओळींत व्यक्त होते :—"निकोप गाभा सरळ कदळी हस्त तसे नाजुक दिसले। अधर लाल लवथवित नौतीच्या रंगरसामधीं रसरसले।"

होनाजी बाळा हा जातीनें नंदगवळी होता. याच्या आजाचें नांव

साताप्पा. हाहि लावण्या करी. साताप्पाचा थोरला मुलगा बाळा बहिरू हाहि लावण्या रचीत असे. अशा रीतीनें होनाजीच्या ठिकाणीं कवित्व आनुवंशिकतेनें आलें असें म्हणावयास हरकत नाहीं. होनाजीनें पोवाडे व लावण्या अशी दुहेरी रचना केली असून ती प्रसादपूर्ण आहे. याच्या कांहीं छेकापन्हुति देखील आहेत. याच्या सर्व कवनांत "घनःश्याम सुंदरा श्रीधरा, अरुणोदय झाला। उठि लौकर वनमाळी उदयाचळीं मित्र आला" ही भूपाळी सर्वांगसुंदर असून आज दीडशे वर्षें महाराष्ट्राला आनंद देत आहे. होनाजीच्या तोडीचा दुसरा शाहीर सगनभाऊ (इ. स. १७७८ ते १८४०?) हा होय. हा जेजुरीचा राहणारा व जातीनें शिकलगार मुसलमान होता. यानें रागदारीच्या लावण्या व पोवाडे रचिले आहेत. पूर्वी, लीलांबरी, झाम, भैरवी, पहाडी, गारा अशीं रागांचीं नावें याच्या लावण्यांवर दिलेलीं असतात. "लाडे लाडे येते मनरंजना.। उचलून कडेवर कां घ्याना" ही याची लावणी भावपूर्ण आहे. याचा पानपतचा पोवाडाहि चांगला आहे. गंगू हैबती, कुशाबा माळी, गोविंदा, मोतीराम. हेहि शाहीर बऱ्यापैकीं होते. ज्याचा उल्लेख अवश्य केला पाहिजे असा शाहीर म्हणजे परशुराम (मृत्यु इ. स. १८४४) हा होय. हा जातीनें शिंपी होता. याला संत शाहीर म्हणतात. यांचें कारण त्याचे तमाशे एकादशीच्या दिवशींहि करवीत असत. हा निग्रह असून अत्यंत सात्विक वृत्तीचा होता. यानें तात्त्विक, पौराणिक कथात्मक, विनोदी, उपदेशात्मक व संकीर्ण अशा लावण्या रचिल्या असून त्या लोकस्थितिपर व प्रौढ अशा आहेत. मागें त्यांचा उल्लेख आलाच आहे. "दुघड नार नवऱ्याला शिकवी म्हणे वेगळे निघा। जहामर्दी संसार दाविते करून तुम्हांला बघा," "धट्टाकट्टा तरणा-ताठा कांहीं करीना चाकरी। कुटुंबघातकी तीन शेरांच्या नित उडवी भाकरी," इत्यादि लावण्यांतील विनोद तसेंच "दहा शिंदळक्या करीन परंतु एक लग्नाचा नको नवरा। माहेरीं माझें चित्त मन रमलें सासरचा नलगे वारा॥ परेहून परता त्याहून वरता परपुरुष पाहून बाई। करून इतके

पतिव्रता मी मन याला माझें ग्वाढि," "वैराग्य पलंगीं शेज सवारून पर-पुरुषाची । वाट पाहतसे । बसून निरंजन मठीं । रात्रंदिशिं एक तार लाविली । कधीं पाहीन हटतटीं" इत्यादि लावण्यांतील 'भेदिक' तत्त्वज्ञान हीं दोन्ही वैशिष्ट्यपूर्ण आहेत यांत शंका नाहीं.

वर उल्लेखिलेल्या शाहिरांत जमा होणारे परंतु बऱ्याच पुढच्या काळांत झालेले श्रीधर कृष्णाजी कुलकर्णी ऊर्फ पट्टे बापुराव (मृत्यु इ. स. १९४५ डिसेंबर ता. २२ मुक्काम पुणें येथें) यांचा उल्लेख येथेंच केलेला शोभून दिसेल. "जन्मानें ब्राह्मण पण उभे आयुष्य महारांच्या सांगाती, लौकिक दृष्टीनें बहिष्कृत व अस्पृश्य पण सरस्वतीच्या दरबारांतील मानकरी व स्पृश्य, लहरी व ताठर, बाणेदार पण मनाचा हळुवार व दिलाचा दिलदार अशा विरोधांचे पट्टे बापूराव एक चित्र आहे[1]." हल्लींच्या तमाशांत हार्मोनियम आवश्यक असते. परंतु पट्टे बापूरावांनीं संबळ-डफ-तुणतुण्याची जुनीच पद्धत चालू ठेविली होती. त्यांच्या लावण्या भेदिक म्हणजे तत्त्वज्ञानपर आहेत. परशुरामाच्या असल्या लावण्याशीं त्यांच्या लावण्यांची तुलना होऊ शकेल. 'मला सांगा मत' या लावणींतील पुढील ओळी या दृष्टीनें चिंत्य आहेत. ' तुम्ही घेऊन आला एक उसनी जिन्नस । तिला निजला देउन उस । तिची ओळख विसरला खास घर बांधल सक्त । हा आमुचा सवाल तुमच्या बिऱ्हाडा भौत । सांग गुणक्षोभणी किती पसरली माया । आली सगुणात खेळाया । तिनें वेळु खला एक ठाया । त्याला चहू शून्याचा पाया । सोहं शब्द ढोल बडवाया' बापूरावांच्या शृंगारिक लावण्या देखील मर्यादशील व भावपूर्ण असून, त्यांतील शब्द-योजना रमणीय आहे. 'मुंबई शहर' या लावणींतील मुंबईचें वर्णन माहितीनें भरलेले आहे.

शाहिरांच्या लावण्या म्हटल्या कीं, त्या येथून तेथून सर्व उत्तान शृंगारिक, अशी समजूत त्या न वाचणाऱ्या व गांवठी तमाशे पाहणाऱ्यांनीं

१. ज. वा. पाटणकर.

करून घेतलेली असते. ही समजूत साफ चुकीची आहे. सुप्रसिद्ध शाहिरांच्या एकंदर लावणीवाङ्मयांत ज्यांना अश्लील म्हणतां येतील अशा लावण्या ज्यास्तींत ज्यास्त दहा-पंधरा असतील. बाकीच्या लावण्या शृंगारिक म्हणण्यापेक्षां प्रेमविषयक आहेत. हीं सर्व भावगीतें किंवा प्रेमगीतें आहेत. प्रेमाच्या शंका-कुशंका, रुसवे-फुगवे, भेटी-विरह इत्यादींचीं मोकळ्या मनानें व प्रामाणिकपणानें केलेलीं लावण्ययुक्त वर्णनें म्हणजे या लावण्या होत. ज्यांना सोंवळ्या अर्थानें अश्लील म्हणतां येतील अशा लावण्यांतहि जें कांहीं संभोगशृंगाराचें वर्णन आहे तें ध्वन्यर्थानें केलेलें आहे. रा. मर्ढेकरादिकांच्या आधुनिक वास्तवतावादी काव्यांत गुप्तेंद्रियांचीं जीं बीभत्स वर्णनें येतात, तसलीं वर्णनें या जुन्या शाहिरांच्या काव्यांत मुळींच येत नाहींत. संभोगशृंगाराचीं सूचक वर्णनें कांहीं थोड्या लावण्यांत आहेत. बाकीच्या सर्व लावण्यांत एका प्रेमभावनेचे विविध प्रकार लालित्यपूर्ण परंतु सरळ व सोप्या भाषेंत वर्णन केलेले आढळतात. मराठी साहित्यांत शाहिरी वाङ्मयाला स्वतंत्र व मानाचें स्थान द्यावयाला हवें.तें याचकरितां.

पेशवाई अखेरील कवी

पेशवाईच्या अखेरीस ज्याप्रमाणें शाहिरी काव्य निर्माण होत होते, त्याचप्रमाणें जुन्या वळणाचेंहि कांहीं काव्य तयार होतच होतें. असलें काव्य तयार करणाऱ्या कवींत देवनाथ (जन्म शके १६७६ मृत्यु शके १७४३ ग्वाल्हेर येथें) हें मुख्य होते. देवनाथ हे वऱ्हाड प्रांतांत सुरजी अंजनगांव येथें राहात असत. त्यांची गुरुपरंपरा पुढीलप्रमाणें आहे :— नृसिंहसरस्वती—जनार्दनस्वामी—एकनाथ—गावबा ऊर्फ नित्यानंद—कृष्णनाथ —विश्वंभरनाथ—मुरारनाथ—रंगनाथ—गोपाळनाथ—गोविंदनाथ—देवनाथ. या परंपरेंतील बहुतेक पुरुषांनीं ग्रंथरचना केली आहे. एकनाथ व गावबा यांचीं नांवें यापूर्वीच आपल्या परिचयाचीं झालेलीं आलेत. गोपाळनाथ (समाधि शके १६८८) यांनीं ' सिरोमणी ' नांवाचा सुमारे नऊ हजार ओंव्यांचा एक ग्रंथ लिहिला आहे. याशिवाय समाधिबोध नांवाचा दुसराहि-

एक लहानसा ग्रंथ त्यांचा आहे. गोपाळनाथांचे शिष्य शेख सुलतान व गोविंदनाथ. शेख सुलतान हा पंढरीचा वारकरी होता व त्यानें कांहीं अभंग रचिले आहेत. गोविंदनाथ (जन्म शके १६४३ व मृत्यु शके १७३३) रत्नागिरीकडील मूळचे राहणारे व यांचें उपनांव परांजपे. वऱ्हाडांत अकोले जिल्ह्यांत धूसर येथें हे राहात. यांनीं ब्रह्मणपूर येथें मठ स्थापिला असून त्या ठिकाणीं अजूनहि यांची शिष्यपरंपरा आहे. नाथ-कवींमध्यें ओंवी एकनाथाची, अभंग गोविंदनाथाचे आणि पदें देवनाथाचीं सरस समजलीं जातात. गोविंदनाथांचे पांच हजार अभंग व कांहीं पदें उपलब्ध आहेत. देवनाथांनीं श्रावणारंभ्यान, अहिमही आख्यान, कृष्णजन्मा-ख्यान वगैरे आख्यानें व अनेक सुरस कटाव रचिले आहेत. "अमोल काया जाइल वांया, जसी कांच कीं फुटे फटकन्। उभा काळ विक्राळ, लक्षितो वेळ, होय सावध चटकन्" हा यांचा कटाव डौलदार आहे. तसाच सांवळ्या सगुणसुंदरा, चला मंदिरा, इंदिरा वरा, अति सदय हृदय मृदु, तरि हरि तुम्ही कठिणता कां वरा" हा धावाहि बहारीचा आहे.

या सुमाराच्या मुसलमान भक्तांत शहामुनींचें नांव विशेष घेतलें जातें. यांनीं सिद्धांतबोध (शके १७८४) नांवाचा स्वतंत्र अध्यात्मपर ग्रंथ लिहिला आहे. अल्ला-जीसस-विष्णु हीं सर्व एकाच परमेश्वराचीं नांवें आहेत आणि वेद व कुराण यांचा वक्ता एकच आहे असें यांत कवीनें सुचविलें आहे. बहेरु, साबाजी, कृष्णदास, विठ्ठलनाथ वगैरे या काळांतील कवी पदें अभंग वगैरे बऱ्यापैकीं रचीत असत. "राधिकेचा रंग पाहुनि कृष्ण दंग जाहला हें विठ्ठलनाथाचें पद सुंदर आहे. सदाशिव कवीनें 'उमाविलास' नांवाचें काव्य लिहून शिवपार्वती यांच्यांतील चतुर व विनोदी संवाद वर्णिले आहेत. प्रल्हादचरित्र कर्ता शंकर पाटणकर, शतमुखरावणवधा-ख्यान लिहिणारा अमृतराव ओक, भावार्थसिंधु रचणारा विष्णु गोखले, पांडोबा पेंडसे व दाजीबा गोळे हे कोंकणस्थ ब्राह्मणांतील या काळांतील कवी उल्लेखनीय आहेत. 'छंदोमंजरी' नांवाचा छंदशास्त्रावरील ग्रंथ रामचंद्र

दैवज्ञ यानें रचिला असून त्यांत गणवृत्तें दिलीं आहेत. वृत्तांचीं उदाहरणें रामचंद्राची फार चित्तार्कषक आहेत. हा रामचंद्र उंबरज जवळील बेलवंडे या खेड्यांतील राहणारा होता. हा उत्तम ज्योतिषी असून प्रतापसिंह महाराजांच्या पदरीं होता. छंदोमंजरी हा ग्रंथ कवीनें अठराव्या शतकाच्या पूर्वार्धांत लिहून पुरा केला. संतुबाई, रामराय, माधवेंद्र, हरिराज शेंडे, शंकरदास ही मंडळी रामचंद्र ज्योतिषाची समकालीन असून, यांनीं कांहीं किरकोळ रचना केली आहे.

१७

महानुभावेतर गद्यसाहित्य व बखरी

महानुभावांच्या तत्त्वज्ञानाचा व साहित्याचा मागें विचार करीत असतांना, महानुभावीय गद्यानें मराठी गद्याचा पाया कसा घातला याचा आपण विचार केला. आतां महानुभावेतर गद्यसाहित्याचा व तदनुषंगानें मराठी बखरींचा विचार करूं या. प्राचीन मराठी साहित्य बव्हंशीं पद्यमय असलें तरी ज्योतिष, वैद्यक इत्यादि शास्त्रीय ग्रंथ गद्यांत लिहिण्याचा परिपाठ ज्ञानेश्वरांच्या काळापासून होता. श्रीपतीची ज्योतिषविषयक 'रत्नमाळा,' नागार्जुनाचा जारणमारणावर 'योगरत्नमाला' नांवाचा ग्रंथ, विठ्ठलगलांडूचा रसरत्नदीप हे अशा प्रकारचे होत. 'छत्तीस यक्षिणी' या ग्रंथांतील मंत्रांचे प्रयोग व त्यांचीं तंत्रें मराठींत दिलीं आहेत. 'महालक्ष्मी शकुनवंती' हा एक शकुन पाहण्याचा ग्रंथ आहे. हा सोळाव्या शतकाच्या प्रारंभीं लिहिला गेला आहे. रामसीता शकुनवंती, हनुमान शकुनवंती, नरहरी शकुनवंती इत्यादि शकुनासंबंधींचे ग्रंथ यानंतरचे आहेत. हेमाडपंती मेस्तक व भास्कराचार्यांची लीलावती अशीं नांवें धारण करून त्यांत वाटेल तो मजकूर कोंबणारीं कांहीं गद्य चोपडीं आहेत. 'अश्वचिकित्सा' नांवाचा विश्वेश्वरानें लिहिलेला ग्रंथ उपलब्ध आहे. 'भूगोल' नांवाच्या एका प्रकरणांत दधिसमुद्र, मेरु, मांदार वगैरेंचीं काल्पनिक माहिती दिली आहे. पंधराव्या शतकांतील पंचतंत्राचीं भाषांतरेंहि बरींच आहेत. वेताळ पंचविशी, विक्रमबत्तिशी सारखे कथात्मक गद्य ग्रंथहि अनेक आहेत. दासोपंतांचा 'वाक्यवृत्ति' या नांवाचा एक प्रश्नोत्तररूपी गद्यग्रंथ आहे. ख्रिस्तपुराण या फादर स्टीफन विरचित (शके १५३६) पद्यग्रंथाची प्रस्तावना गद्यांत आहे. सोळाव्या शतकांतील गोमंतक प्रांतांत

मराठी भाषा कशाप्रकारची होती ती कळण्याच्या दृष्टीनें सदरहू प्रस्तावनें-तील कांहीं भाग पुढें दिला आहे :—"म्हणुनु खिस्तांव तुमी उदंड करुनु परमेश्वरासी अर्घें देआ आणि उपेगू माना का तुमांसि येमकोंडिचेया मार्गाचे व अनुभावार्थीयांचेया अंधकारांतुले काढुनु खिस्तावपणा भितुरी मेळसे केले. तेयाचेया उत्तमा क्षास्त्राचा उजवाडु भोगुन्शी आमी जे कार्यें करुन्शी आधारले ते परमेश्वराचे कृपेस्तव आमचे अल्पशक्ति संगडे सिद्धी पावले; दो पुराणांचे अभंग केलें; तेयामाजी कांहीं उत्तरांची चुकी जाहाले-यावरी ती तुमी खेमा करा." या शिवाय राजवाडे, खरे, पारसनीस, सरदेसाई, सबनीस इत्यादिकांनीं अनेक खंडात्मक ऐतिहासिक पत्रव्यवहार प्रसिद्ध केलेला असून तो बहुमोल आहे. हे सर्व ग्रंथ उल्लेखनीय असले, तरी साहित्याच्या कसोटीला क्वचित्च उतरणारे आहेत.

साहित्याच्या कसोटीला कांहीं अंशांनीं उतरणारे ग्रंथ म्हणजे बखरी होत. मुसलमानांच्या सहवासानें, त्यांच्या तवारिखा पाहून, मराठ्यांनीं बखरी लिहिण्यास सुरुवात केली. पेशव्यांच्या येथें बखरनवीस असत. त्यांचा धंदा जुने कागदपत्र पाहून बखरी सजविण्याचा असे. यांच्या नकला होऊन बाहेर जात. इतरत्रहि लोक बखरी लिहीत. सर्वांत जुन्या बखरी रामदेवरायांच्या बखरी व बिंबस्थानची ऊर्फ ठाण्याची बखर या होत. या नक्की केव्हां रचिल्या गेल्या तें कळायला मार्ग नाहीं. तालिकोटची लढाई शके १४८६ मध्यें झाली. या लढाईवर रचलेली "तालिकोट ऊर्फ राक्षस-तागडीची बखर" प्रसिद्ध आहे. बखरीची भाषा पंधराव्या शतकांतील असून, लेखक लढाईच्या वेळीं हयात असावा असें बखरींतील वर्णनावरून वाटतें. लढाईचे आदले दिवशीं विजयनगरच्या राजभूवरास एक दुःस्वप्न पडलें. त्या स्वप्नाचा कांहीं भाग बखरीच्या भाषेचें स्वरूप कळावें म्हणून पुढें दिला आहे :—" देखिलें जे आपुले कानीचे मोती तोडून घेत होते बैसले सिंहासन हिरोन घेत असे आंपणासी दूत येऊनु वोढीत असे पाहुनु घाबिरा होऊनु उठिला सवेची थोर थोर जोइसी व पंडित

वेदशास्त्री व ग्रामजोसी...बहुता दिवसांचे होते त्यासी बोलाऊ पाठविले."

हल्लीं ज्या ऐतिहासिक बखरी प्रसिद्ध आहेत त्या सर्वांत ९६ कलमी बखर ही फार जुनी आहे. ही प्रथम अरुणोदय वर्तमान पत्रांत व नंतर 'भारत-वर्षांत' छापिली गेली. ही फार महत्त्वाची असून हिच्या नंतरच्या अनेक शिवचरित्रकारांनीं हिचा उपयोग केलेला आहे. बखरीच्या शेवटीं पुढील मजकूर आहेः—" सदरहु आख्यान नवद प्रकरणें पुण्यश्लोक राजा त्याची कथा दत्ताजीपंत वाकेनिवीस त्यांपासी तपसीलवार लिहिली होती. त्यांपासून संकलित तालिक लेहून घेतली. अनाजी रंगनाथ मलकरे यांचे पुत्र खंडो अनाजी मलकरे यार्णी हस्ताक्षरें तालिक लिहिली आहे." दुसरी बखर कृष्णाजी अनंत सभासद यांनीं राजाराम महाराजांचे सांगण्यावरून शके १६१६ चे सुमारास रचलेली 'सभासदी बखर' होय. कृष्णाजी अनंतानें चंदीचंदावर प्रांतीं असतां ती लिहिली. यांतील हकीकत विश्वसनीय असून, लिहिण्याची शैलीहि चांगली आहे. यानंतर शके १६४० मध्यें शिव-दिग्विजयाची रचना झाली. ही बखर बडोदें येथें पांडुरंग रामचंद्र नंदुर-बारकर यांनीं सुमारें इ. स. १८९५ मध्यें छापून प्रसिद्ध केली. मुद्रित बखरींत हीच पहिली होय. शिवाजी प्रताप (१८९५) नांवाची दुसरी एक बखर याच नंदुरबारकरांनीं प्रसिद्ध केली. शिवदिग्विजय आकारानें व महत्त्वानेंहि मोठी अशी बखर आहे. बाळाजी विश्वनाथानें दिल्लीस जाऊन अवरंगझेबाच्या मुलीच्या मार्फत शाहूची सुटका करून त्यास महाराष्ट्रांत आणिलें याचें वर्णन करणारी एक बखर आहे. शके १६८२ मध्यें पानपतचा घनघोर युद्धसंग्राम झाला. या प्रसंगावर पांच बखरी आहेत. पहिली मोरो हरी नांवाच्या इसमानें नारो सखाराम नांवाच्या इसमास लिहिलेली. दुसरी पानपतास स्वतः हजर असलेल्या अंताजी माणकेश्वर या या राजकारणी पुरुषानें लिहून ठेवलेली. तिसरी मल्हारराव होळकर यांनीं सबंध मोहिमेची आपले धनि श्रीमंत पेशवे सरकार यांस

लिहून कळविलेली व 'होळकरांची थैली' या नांवानें प्रसिद्ध असलेली; चवथी कृष्णाजी शामराव यानें लिहिलेली व 'भाऊसाहेबांची बखर' या नांवानें प्रसिद्ध असलेली; आणि पांचवी श्रीमंत मातुश्री गोपिकाबाईसाहेब यांच्या आज्ञेवरून रघुनाथ यादव यानें तयार केलेली. 'भाऊसाहेबांची बखर' ही एका सावकाराच्या दिल्ली येथील कृष्णाजी शामराव नांवाच्या गुमास्त्यानें लिहिली आहे. दादासाहेबांनीं जाटास कुंभेरीच्या किल्ल्यांत कोंडिलें तेव्हांपासूनचे हकीकतीस सुरवात करून ती शेवटचे पानपत येथील युद्धापर्यंत आणून सोडली आहे; व अखेर नानासाहेबांच्या मृत्युचा प्रसंग सांगून बखरीचा शेवट केला आहे. हींतील वर्णनें फारच सरस असून, गद्य वैभवशाली आहे. वीररस व करुणरस यांत बहारीचे साधले आहेत. कालविपर्यासाचा दोष जो इतर बखरींत फार आढळतो, तो हींत अत्यंत कमी आहे. रघुनाथ यादव याची बखर विशेष विश्वसनीय आहे. याच प्रसंगावरील नाना फडणवीस यांचें आत्मचरित्रहि उल्लेखनीय असून सरस आहे. पानपतच्या अग्निदिव्यांतून ते कसे बाहेर पडले त्याचें वर्णन अपूर्व आहे. ऐन प्रसंगीं पानपतावर सरदारांनीं भाऊसाहेबास मदत केली नाहीं त्याचें वर्णन पुढीलप्रमाणें आहे :—"लक्ष सैन्य त्यांत मोठे मोठे सरदार असतां एकही त्या समयीं श्रीमंतास आप्त न जाहला. बहुत दिवस अन्न भक्षिलें. कृपा पुत्रवत् केली. तितकें चांगला काळ होता तेव्हां केशास ढका लागल्यास प्राण देऊं अशा प्रतिज्ञा. परंतु ईश्वरघटित विपरीत काळ त्यांत सोबती कोण होतो! सर्व सुखाचे सोबती." आपल्याविषयीं ते लिहितात, "क्षुधा तिसरे प्रहरीं लागली. तेव्हां बोरीचा पाला सांपडला तो खाऊन पाहिला, तो तोंडांत जाईना. तसाच सायंकाळीं एका ग्रामाबाहेर आलों. तों एका बैराग्यानें पीठ आणून दिलें. त्याची भाकर खादली. ती अमृतप्रमाण लागली."

पानपतच्या प्रसंगाशिवायच्या दुसऱ्याहि कांहीं बखरी आहेत. नाना-

फडणवीस यांच्या सांगण्यावरून बाळाजी गणेश यानें मालोजी भोंसल्यांपासून ते सवाई माधवराव पेशवे यांच्या काळापर्यंतची लिहिलेली बखर. ही बखर सवाई माधवराव यांच्याकरितां मुद्दाम लिहवून घेण्यांत आली आहे. ही शके १७०४ मध्यें तयार केली आहे. जयराम स्वामी वडगांवकरांची बखर शके १७३०-३५ चे सुमाराची आहे. हींत त्या गादीचे संस्थापक शांतलिंगाप्पा यांचे पासून तो महादेवबावापर्यंत हकीकत आली आहे. हनुमंतस्वामींची बखर शके १७१५ मधील असून तींत समर्थांचें चरित्र देण्यांत आलें आहे. रघुनाथ यादव चित्रे यानें 'चित्रगुप्ताची बखर' (शके १६८५ चा सुमार) लिहून तींत शिवाजीची सर्व हकीकत वर्णिली आहे. हिची रचना साधारण प्रतीची आहे. मात्र शब्द अगडबंब वापरण्यांत आले आहेत. रघुनाथ यादवांपेक्षां मल्हार रामराव चिटणीस (बाळाजी आवजीचा निपणतू) यानें लिहिलेला 'शिवछत्रतींचें सप्त प्रकरणात्मक चरित्र' हा ग्रंथ वरच्या दर्जाचा आहे. मात्र कालविपर्यासाचे दोष यांत फार झाले आहेत. यांच्याच नांवावर प्रसिद्ध असलेलें 'राजनीति' हें प्रकरण चांगलें आहे. त्यांत राजे लोकांच्या सर्व व्यवहारासंबंधीं सुरेख विवरण केलें आहे. नागपूरकर भोंसल्यांच्या बखरी गंगाधर माधवराव चिटणीस, खंडो भगवंत परभू व विनायक आनंदराव औरंगाबादकर यांनीं रचिल्या आहेत. "मराठी साम्राज्याची छोटी बखर" शके १७३९ कार्तिक शु. ८ मीस तयार झाली. बाबाजी भोंसले यांच्यापासून तों तहत शेवटील प्रतापसिंह महाराजांपर्यंतची सर्व हकीकत या बखरींत आहे. बखर चांगली आहे, पण कर्त्याचें नांव तिच्यांत दिलेलें नाहीं. "पेशव्यांची बखर" कृष्णाजी विनायक सोहोनी यांनीं तोंडी मजकूर इतरांना सांगून लिहविली आहे. बखरीची भाषा डौलदार आहे परंतु तींत कालविपर्यासाचे दोष पुष्कळ आहेत. याशिवाय हरिवंशाची बखर अथवा पटवर्धन सरदारांच्या हकीकती, साष्टीची बखर, श्री शाहूमहाराज यांची बखर, श्रीमंत नारायणराव पेशवे यांची बखर, रघूजी भोसल्याची वंशावळी, महिकावतीची बखर, ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर

यांच्या निधनाची बखर, गोविंदपंत बुंदेल्याची कैफियत, नागपूरकर भोंसल्याची बखर इत्यादि उल्लेखनीय आहेत. बखरींतील जोरदार भाषेचा नमुना म्हणून पुढें एक लहानसा उतारा कृष्णाजी शामराव याच्या भाऊसाहेबांच्या बखरींतून दिला आहे :—"बाणांचा वर्षाव मेघाप्रमाणें जाला. मोठा कडाका जाला. धुराची व धुळीची धुंदी जाली. कोणाचे तोंड कोणाचे दृष्टीस पडेनासें जालें. यंत्राच्या धडाक्याखालीं घोडे मनुष्यें बधिर जालीं. क्षणभर अशी गर्दी होऊन दोहींकडून हर! हर! म्हणोन एकदांच घोडे घातले. दोहींकडून घोडियांचीं तोंडें आंत शिरलीं. ते समयींचा कडाखा तेथील अनुभविक असतील त्यांस ठाऊक असेल. ऐशी आग जाली. नंतर आगीचा मार राहून तरवारीची खणाखणी जाली. त्यांत ते आधींच रजपूत, त्यांत मारवाडी हाडें, त्यांचे मर्दुमीचें नवल नाहीं. परंतु मराठियांनीं फार शर्थ केली. ऐसें युद्ध गनिमांत कोणीं केलें नाहीं. मल्हारराव यांचे इरेनें दांतनिसर्कीस येऊन मोठमोठे खेतांत येऊन जिवाअधिक केली. मोठा प्रलय जाहाला. न भूतो न भविष्यति."

सर्व बखरींसंबंधानें सावधानतेची सूचना देतांना सुप्रसिद्ध इतिहास संशोधक विश्वनाथ काशिनाथ राजवाडे म्हणतात, " कोणतीहि बखर घ्या, तींत कालाचा विपर्यास झाला नाहीं असें क्वचित्च आढळेल...रामरावणी कथांच्या पौर्वापर्याचें महत्त्व ह्या बखरनविसांच्या अगदींच लक्ष्यांतून गेले. शिवाजीची सूर्यवंशापासून उत्पत्ति, भाऊसाहेबांच्या बखरींतील मलका-जमानीचें रडगाणें इत्यादि कथा कमज्यास्त कल्पित असून क्षुल्लक आहेत... शिवाजीच्या पूर्वीच्या व त्याच्या वेळच्या मुसलमानी राज्यांची माहिती, शिवाजीच्या कोणत्याहि मोहिमेचा संगतवार वृत्तांत, शिवाजीच्या किंवा पेशव्यांच्या गृहस्थितीची चोख हकीकत ह्या बखरींतून बिलकूल मिळण्या-सारखी नाहीं...केवळ ह्या बखरींवर भिस्त ठेवून इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केल्यास, सत्यासत्यतेच्या निर्णयाची कसोटी जवळ नसल्यामुळें, तो

मराठ्यांचे व इंग्रजांचे राजकीय संबंध दृढ होतांच, फोर्ट विल्यिम महाविद्यालयांत मराठी भाषेचा अंतर्भाव झाला. आतांपर्यंत संस्कृत व बंगाली शिकविणाऱ्या डॉ. विलियम कॅरी (जन्म इ. स. १७६१) यांच्याकडे मराठी अध्यापनाचें काम आलें. हें काम करीत असतांनाच डॉ. कॅरी यांना इकडील भाषांची गोडी लागून प्राथमिक पुस्तकें व व्याकरणकोशादि ग्रंथ तयार करण्याची स्फूर्ति झाली. याच्यापूर्वी डॉ. कॅरी कलकत्त्याजवळील डॅनिश सत्तेखालीं असलेल्या श्रीरामपुरीं बॅप्टिस्ट सोसायटींत ख्रिस्ती धर्मप्रसाराचें काम इ. स. १७९३ पासून करीत होते. मराठीचे प्राध्यापक बनतांच त्यांना आपल्या प्रचारकार्याचेंहि स्मरण होऊन त्यांनीं प्रथम मराठी भाषेचें व्याकरण (१८०५) इंग्रजींत तयार केले. यानंतर मराठी इंग्रजी कोश (१८१०) त्यांनीं तयार केला. या ग्रंथांत मराठी शब्द मोडी ठसे करून छापले आहेत. याशिवाय पंडित वैजनाथ शर्मा ऊर्फ विद्यानाथ यांच्या साहाय्यानें त्यांनीं सेंट मॅथ्यु (१८०५), बायबल (१८०७), मंगळ समाचार (१८१०), सिंहासनबत्तिशी (१८१४), पंचतंत्र (१८१५), हितोपदेश (१८१५), रघुजी भोसल्याची वंशावळ (१८१६) इत्यादि सुमारे पंधरा पुस्तकें मराठींत श्रीरामपुर मिशनच्या विद्यमानें प्रसिद्ध केलीं. श्रीरामपुरी मराठी भाषेचा नमुना म्हणून सिंहासनबत्तीशींतील पुढील छोटा उतारा बघण्यासारखा आहे:—

"अवंतीपुरींत राजा विक्रमादित्य साम्राज्य करीत असे. यके दिवसीं राज्यानें सेवकास् आज्ञा केली तुम्ही कोणते देशाची कशी चरीत्र समझुन या. चाकर राजाज्ञा पावून अवघे देशांत भ्रमण करून काश्मीर देशांत पावलेत. त्या देशांत धनवान् यके मनुष्यानें मोट यक तळ केले आहे परंतु त्यांत पाणी नसे..." मराठी साहित्य गंगेंत एक निराळाच उपप्रवाह बंगालच्या दिशेनें येऊन मिळाला असें या उताऱ्यावरून कळून येईल. या उपप्रवाहानें अर्वाचीन मराठी गद्यवाङ्मयाचा एक प्रकारें पायाच घातला असें म्हणतां येईल. याचें कारण यापुढें जें गद्य निर्माण झालें त्याला जशी

महानुभावी गद्याची परंपरा नव्हती, तशीच बखरींतील गद्याचीहि नव्हती. या दोन्ही सरस व सकस परंपरा सोडून हें नवें गद्य प्रथम तरी इंग्रजी वळणावर व पाश्चिमात्यांकडून किंवा पाश्चिमात्यांच्या मार्फत तयार होऊ लागले. बंगालप्रमाणें महाराष्ट्रांतहि मिशनऱ्यांनीं धार्मिक प्रसार करण्याचें जें कार्य केलें, त्यानें मराठी साहित्यांत भर घातली गेली. इ. स. १८१५ मध्यें मुंबईत अमेरिकन मिशनची स्थापना झाली. तत्पूर्वी लंडन मिशनरी सोसायटीचे दोन प्रचारक मुंबईस आले होते. स्कॉटिश मिशनची स्थापना मुंबईत इ.स. १८२२ मध्यें झाली. बॉंबे बुक अँड ट्रॅक्ट सोसायटी नांवाची खिस्ती धर्मपर पुस्तकें छापणारी संस्था इ. स. १८२७ पासून आपलें कार्य करू लागली. या मिशनरी संस्थांनीं धर्मप्रसाराच्या उद्देशानें मराठी भाषेचा अभ्यास केला, एतद्देशीयांकरितां शाळा व दवाखानें यांची स्थापना केली आणि क्रमिक पुस्तकांचीं तसेंच बायबलादि धर्मग्रंथांचीं भाषांतरें करविलीं. इ. स. १८२६ पासून ते इ. स. १८७४ पर्यंतच्या सुमारे पन्नास वर्षांत अमेरिकन मिशन, स्कॉटिश मिशन व ट्रॅक्ट सोसायटी यांनीं सुमारे सव्वाशे पुस्तकें मराठींत तयार केलीं. या एका गोष्टीवरून या मंडळींचें कार्य किती जोरानें चाललें होतें त्याची कल्पना येईल. या पुस्तकांच्या लेखकांत रॉबर्ट निज्बिट, रे. मिचेल, रे. फरार, रे. डिक्सन, रे. बार्थ, रे. बाबा पदमनजी, रे. नारायण शेषाद्रि, हरि केशवजी हे प्रमुख होते. यांत खिस्ती धर्माचें महत्त्व गाणारीं पुस्तकें जशीं आहेत, तशींच हिंदुधर्माची अवहेलना करणारी मूर्तीचा उच्छेद (१८५०), पुनर्जन्मनिर्णय (१८५३), खंडोबाची गोष्ट (१८७४), तुळशीचें लग्न (१८७४), ज्ञातिभेदनिर्णय (१८६५), नवसाला पावणें याविषयीं विचार (१८६८), कृष्ण आणि खिस्त यांची तुलना (१८७१)—यासारखींहि पुस्तकें आहेत. याशिवाय बालबोध गोष्टी (मिसेस फ़रार, १८३८), यात्रिकक्रमण (हरि केशवजी १८४१), बाबाजीची बखर (बाबाजी रघुनाथ मराठे १८४४), राजाचा पुत्र (१८७४) इत्यादि कथात्मक आणि पावसा-

विषयीं विचार (१८४५), सचोटीविषयीं (१८५३), गालिप्रदान (१८६९), गुरुजनांचें अर्थशास्त्र (१८७०) इत्यादि ज्ञानपर संकीर्ण अशींहि पुस्तकें आहेत. या सर्व ग्रंथनिर्मितींत हिंदूंना आपल्या धर्मांत ओढून घेण्याचा हेतु स्पष्ट दिसत असला, तरी देखील अप्रत्यक्षपणें मराठी साहित्यवृद्धीच्या कामीं तिचा उपयोग निःसंशय झाला. या साहित्यांत नवे विचार आल्यानें, आपल्या इकडील मंडळींनाहि आपल्या विचारांची पारख करतां येऊन ते निश्चित् करतां आले. मिशनऱ्यांनीं प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांतील भाषा अशुद्ध असली तरी ती सोपी असल्यानें सोप्या भाषेचें वळण मराठीला लागलें. हेंच सोप्या भाषेचें वळण पुढें बापू छत्रे; हरिकेशवजी यांच्या ग्रंथांत पुढें चालू राहिलें. मराठी साहित्याचें पाऊल पुढें पडण्याच्या कामीं सुरुवातीच्या या ख्रिस्ती वाङ्मयानें मदतच झाली यांत शंका नाहीं.

सरकारी प्रयत्न

इ. स. १८१८ मध्यें पेशवाई नष्ट होऊन महाराष्ट्रांत इंग्रजांची सत्ता प्रस्थापित होतांच, एलफिन्स्टन-माल्कम सारख्या तत्कालीन उदार व समंजस प्रांताधिकाऱ्यांनीं महाराष्ट्रीयांच्या शिक्षणाकडे लक्ष पुरविलें. येथील लोकांबरोबर लवकर किंवा उशीरां इंग्रजांची फारकत झालीच पाहिजे, आणि अशा फारकतीच्या प्रसंगीं ती अडाणी व जंगली लोकांबरोबर न होतां सुविद्य व सुसंस्कृत लोकांबरोबर व्हावी हें बरें, अशा उदार विचाराचे एलफिन्स्टनसाहेब होते. अशाच प्रकारचे विचार इंग्लंडमध्येंहि पार्लमेंटच्या सभासदांचे होते. इ. स. १८१३ मध्यें ईस्ट इंडिया कंपनीला व्यापाराची सनद देतांना, हिंदी लोकांच्या शिक्षणाकरितां तिनें एक लक्ष रुपये खर्च केले पाहिजेत अशी अट पार्लमेंटनें घातली होती. इ. स. १८१५ मध्यें मुंबईसरकारच्या ताब्यांत असलेल्या प्रदेशांत गरीबांना शिक्षण देण्याकरितां एक सोसायटी किंवा सभा स्थापन करण्यांत आली होती. कंपनीच्या हातीं संपूर्ण सत्ता येतांच, हेच प्रयत्न मोठ्या प्रमाणावर करण्यांत आले. मुंबई,

पुणें नाशिक इत्यादि ठिकाणीं प्राथमिक व दुय्यम शिक्षण देणाऱ्या पाठशाळा कंपनी सरकारनें स्थापन केल्या. इ. स. १८२० मध्यें नेटिव्ह स्कूल बुक अँड स्कूल सोसायटीची स्थापना होऊन तिला पांच हजार पौंडांचें सरकारी साहाय्य मिळूं लागलें. याच सोसायटीला इ. स. १८२७ मध्यें बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी असें नांव मिळालें. ही संस्था इ. स. १८४० पर्यंत चालली. पुढें हिच्या शाळा एलफिन्स्टन शिक्षणसंस्थेला जोडून देण्यांत आल्या व त्यांच्यावर देखरेख ठेवण्याचें काम नवीन निघालेल्या बोर्ड ऑफ एज्युकेशनला सोंपविण्यांत आलें. बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीनें पाश्चिमात्य व एतद्देशीय विद्वानांना उत्तेजन देऊन त्यांच्याकडून शालोपयोगी–बालोपयोगी अशीं शेंकडों पुस्तकें तयार करविलीं. असल्या पुस्तकांच्या एका ढिगाकडे पाहून ले. ब्रिग्ज यानें "हें कशाला?" अशी चौकशी माउंट स्टुअर्ट एलफिन्स्टन जवळ करतांच त्या द्रष्ट्यानें उत्तर दिलें, "एतद्देशीयांच्या शिक्षणाची ही सोय आहे. परंतु युरोपकडे परत जाण्याचा आपला हा राजमार्ग होय." ज्या शिस्तीनें व शांततेनें इंग्रजांनीं हिंदुस्थानचा राज्यकारभार इ. स. १९४७ मध्यें हिंदी लोकांना सोंपून स्वदेशीं प्रयाण केलें, त्याच्याकडे पाहिलें असतांना एलफिन्स्टन साहेबांचें भविष्य खरेंच ठरलें असें म्हटलें पाहिजे. सोसायटीनें बालगोष्टीं (टौनशेंड), बालमित्र–बोधवचन (बापू छत्रे), गणित भाग १-२ (जॉर्ज जर्व्हिस), लिपीधारा (सोसायटीचें पंडित मंडळ), पदार्थविज्ञान (हरि केशवजी), इत्यादि पुस्तकें प्रसिद्ध करून शाळकरी विद्यार्थ्यांची उत्तम सोय केली. या सर्वांत सोसायटीनें परशुरामपंत तात्या गोडबोले, बाळशास्त्री घगवे, गंगाधरशास्त्री फडके, सखाराम जोशी व दाजीशास्त्री शुक्ल अशा पांच पंडितांकडून जो "महाराष्ट्र भाषेचा कोश" (१८२९ इ. स.) करविला. तें तिचें सर्वोत्तम कार्य होय. यानंतर १८३१ सालीं जे. टी. मोल्सवर्थ यांनीं मराठी इंग्रजी कोश तयार केला. यांनींच सुरू केलेला इंग्रजी मराठी कोश इ. स. १८४७ मध्यें मेजर कँडी यांनीं

पूर्ण केला. सोसायटीचे सेक्रेटरी जॉर्ज जर्व्हिस यांनीं जगन्नाथशास्त्री क्रमवंत, गंगाधरशास्त्री फडके आणि बाळशास्त्री घगवे यांना मराठी भाषेचें व्याकरण तयार करण्यास सांगितलें. या पंडितांनीं आपापलीं व्याकरणें तयारहि केलीं. परंतु शेवटीं दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनीं तयार केलेलें व्याकरण (इ. स. १८३६) हें उत्कृष्ट ठरून त्यालाच राजमान्यता व लोकमान्यता लाभली. वर उल्लेखिलेल्या पुस्तकांखेरीज मुंबईचे गव्हर्नर एलफिन्स्टन यांनीं सुरू केलेल्या इंजिनियरिंग व मेडिकल स्कूलच्या मराठींतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, कर्तव्य भूमिति, यंत्रशास्त्र, वैद्यक, इत्यादि शास्त्रांची माहिती करून देणारीं तसेंच भूगोल, ज्योतिष, शिक्षणशास्त्र इत्यादि विषयांवर शेंकडों पुस्तकें बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या आर्थिक उत्तेजनामुळेंच केवळ तयार झाली. लहान पुस्तकांना चारशे रुपायांपर्यंत व मोठ्या पुस्तकांना दोन हजार रुपायांपर्यंत बक्षीस देण्यांत येत असल्यानें, अनेक लेखक पुढें सरसावले. सोसायटीचे पहिले सेक्रेटरी जॉर्ज जर्व्हिस यांनीं इ. स. १८२५ मध्यें या बाबतींत एक जाहीरपत्रक प्रसिद्ध करून त्यांत हा सर्व खुलासा केला होता. भाषांतराकरितां जी भाषा योजावयाची तिच्यासंबंधानें सदरहू पत्रकांत म्हटलें आहे तें असें :—" जी देशभाषा सर्व लोक समजतात ती ग्रंथास घ्यावी. प्रौढ भाषेचे शब्द घालून दाटून अवघड करूं नये." या सुचनेचा मोठा फायदा हा झाला कीं, संस्कृतप्रचुर अशा प्रौढ मराठींत ग्रंथरचना न होतां, ती प्रसादपूर्ण व सोप्या मराठींत होऊ लागली. जर्व्हिस साहेबांच्या इच्छेप्रमाणें हरि केशवजी पाठारे यांचीं शास्त्रीय पुस्तकें सुबोध व घरगुती मराठींत तयार झालीं. ग्रंथप्रकाशनाला दुसरी मदत दक्षिणा प्राईझ कमिटी (इ. स. १८९४ पासून डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी) कडून झाली. पेशवाईंत श्रावण महिन्यांत ब्राह्मणांना जी दक्षिणा वाटत तिच्यापैकीं कांहीं रकम एलफिन्स्टननें पुण्याची संस्कृत पाठशाळा व ग्रंथांना उत्तेजन म्हणून वापरण्याचें ठरविलें. या कामीं सुमारे तीस हजार रुपये खर्च होते. अशा रीतीनें विविध प्रकारचें

साहित्य सोसायटीच्या प्रोत्साहनानें व दक्षिणा प्राइझ कमिटिकडून होत असतांना, त्यांत इ. स. १८४० पासून सोसायटीच बंद करण्यांत आल्यानें खंड पडला. लॉर्ड बेंटिकच्या कारकीर्दीत कंपनी सरकारनें देशी भाषां-प्रीत्यर्थ होणारा खर्च अनाठायीं व अधिक ठरवून तो बंद करण्याचा निर्णय घेतला. पुढें बोर्ड ऑफ एज्युकेशनची स्थापना झाली. त्याचें मुख्य सर अर्स्किन् पेरी हे गृहस्थ होते. यांना मराठीविषयीं मुळींच प्रेम नव्हतें. याच सुमारास देशी साहित्याला कमी लेखणाऱ्या मेकॉलेसाहेबांच्या खटपटीनें एतद्देशीयांना इंग्रजींतून शिक्षण देण्याचें धोरण सरकारनें ठरविलें. इ. स. १८५७ सालीं मुंबई विद्यापीठाची स्थापना होऊन पहिलीं कांहीं वर्षें बी. ए. च्या वर्गांत मराठी शिक्षणाची सोय होती. पण पुढें तीहि बंद करण्यांत आली. उदार व थोर अन्तःकरणाच्या राज्यकर्त्यांनीं देशी भाषांची प्रगति करण्याचें जें धोरण सुरुवातीला ठेविलें होतें, त्यांत पंचवीस वर्षांतच बदल होऊन जिकडेतिकडे इंग्रजीचा बडेजाव सुरू झाला. हॅलिफॅक्स खलित्यानें (इ. स. १८५४) सर्व हिंदुस्थानांत प्राथमिक शिक्षणाखेरीज सर्व शिक्षण इंग्रजी भाषेच्या माध्यमांतून देण्याचें नक्की केलें. यानें देशीभाषांचें सरकारी मीठ अजिबात तुटलें. असें झालें तरी जो फायदा झाला तोहि कांहीं थोडा नव्हता. इतकेंच नाहीं तर सरकारी साहाय्यावांचून ग्रंथकारांनीं स्वयंप्रेरणेनें ग्रंथरचना चालू ठेविली.

स्वतंत्र विचाराचें साहित्य

ही ग्रंथरचना केवळ भाषांतरात्मक, केवळ इंग्रजी वळणाची, केवळ बालोपयोगी शालोपयोगी, न्यूनगंडानें प्रेरित झालेली, अशी न होतां तिच्यांत थोडें फार स्वतंत्र तेज चमकूं लागलें. बापू छत्रे, हरि केशवजी, बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, परशुरामपंततात्या गोडबोले, भाऊ महाजन, कृष्णशास्त्री चिपळूणकर इत्यादि मंडळींनीं इंग्रजी विद्येबरोबरच इंग्रजी साहित्यांत असलेल्या चांगल्या गोष्टी आत्मसात करून, नवीन

पद्धतीचें साहित्य निर्माण करण्याचें सुरू केलें. वर्तमानपत्रांनीं व मासिकांनीं लोकजागृति लवकर होते ही खूणगांठ मनांत बांधून बाळशास्त्री जांभेकरांनीं दर्पण नांवाचें वृत्तपत्र (१८३२) व दिग्दर्शन नांवाचें मासिक सुरू केलें. भाऊ महाजन यांनीं रंगतेच्या 'अडचणी' व 'गाऱ्हाणी' स्पष्टपणें सरकारच्या नजरेस आणण्याच्या हेतूनें "प्रभाकर" (१८४०) साप्ताहिक सुरू केलें. बॉंबे नेंटिव्ह एज्युकेशन सोसायटी प्रसिद्ध करीत असलेलें भाषांतरात्मक वाङ्मय म्हणणेच सारसर्वस्व असें नसून आपलेंहि जुनें वाङ्मय पुनर्मुद्रण करण्याच्या व अभ्यासाच्या योग्यतेचें कसें आहे तें पांडुरंग बापू जोशी पावसकर यांनीं ज्ञानचंद्रोदय मासिकाच्या (१८४०) द्वारें सिद्ध केलें. यांत जुन्या कवींची कविता क्रमशः येत असे. माधव चंद्रोबा डुकले यांनीं 'सर्व-संग्रह' (१८६०) मासिक सुरू करून असाच प्रयत्न मोठ्या प्रमाणावर केला. वामन पंडित, मोरोपंत, विठ्ठल, आनंदतनय, रामजोशी, रामदास, नामदेव इत्यादि कवींच्या कविता 'लोककल्याणार्थ' शुद्ध करून माधव चंद्रोबांनीं छापिल्या. जुन्या कवींच्या साहित्याचें मंथन करून त्यावरील "नवनीत" (१८५४) ग्रंथरूपानें परशुरामपंत तात्या गोडबोले यांनीं लोकांसमोर ठेविलें. खिस्ती मिशनऱ्यांनीं स्वधर्मप्रसारार्थ "ज्ञानोदय" (१८४२) पत्र सुरू करतांच मोरभट दांडेकर या पंडितानें उपदेशचंद्रिका (१८४४) नांवाचें मासिक सुरू करून मिशनऱ्यांच्या अपप्रचाराचा चांगला समाचार घेतला. डॉ. जॉन विल्सन या पाद्री गृहस्थानें "हिंदुधर्म प्रसिद्धीकरण" नांवाचीं दोन पुस्तकें (१८३२ व १८३५) प्रसिद्ध करून हिंदुधर्माची त्यांत यथेच्छ निंदा केली होती. मोरभट दांडेकरांनीं आपल्या मासिकांत या पुस्तकांचीहि चांगली हजेरी घेतली. याच कारणाकरितां १८५२ सालीं कृष्णशास्त्री चिपळूणकरांनीं 'विचार लहरी' नांवाचें वर्तमानपत्र सुरू करून खिस्त्यांची दुरडूर बंद करण्याचा प्रयत्न केला. खिस्ती धर्मोपदेश-कांच्या कारवायांना भुलून बाटणाऱ्या हिंदु लोकांना आपल्या धर्मची व संस्कृतीची थोरवी कळावी या हेतूनें विष्णु भिकाजी गोखले ऊर्फ विष्णुबुवा

ब्रह्मचारी (इ. स. १८२५–१८७१) यांनीं वेदोक्त धर्मप्रकाश (१८६९) नांवाचा सात आठशे पानांचा ग्रंथ लिहून जी कामगिरी केली ती अवश्य उल्लेखनीय आहे. यांत पंचवीस प्रकरणें असून त्यांत वेदोक्त धर्म, न्याय, निराकार देव, अवतार कल्पना, आत्मज्ञान, हठयोग–राजयोग, राजनीति, मंत्रशास्त्र इत्यादि हिंदुधर्मदृष्ट्या महत्त्वाच्या गोष्टींचें विवेचन केलें आहे. प्रथम हिंदु असून मागाहून खिस्ती बनलेल्या बाबा पदमनजी यांनीं आपल्या ग्रंथांत खिस्ती धर्माचा सर्वत्र जो उदोउदो केला होता त्याला तसेंच डॉ. विल्सन यांच्या ग्रंथाला या ग्रंथानें चांगलेंच प्रत्युत्तर त्याकाळीं दिलें यांत शंका नाहीं. विष्णुबुवांच्या ग्रंथाची भाषा चांगली प्रौढ; तर्कयुक्त व सावेश आहे.

ललित साहित्य–संस्कृत नाटकांचीं रूपांतरें

आपल्या धर्मांतील अभिमानास्पद गोष्टींकडे स्वबांधवांचें लक्ष ज्याप्रमाणें विष्णुबुवा ब्रह्मचारी, मोरभट दांडेकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं वेधिलें त्याचप्रमाणें आपल्या मराठी व संस्कृत साहित्यांतील गौरवास्पद भागांकडे रसिकांचें लक्ष परशुरामपंत तात्या गोडबोले (इ.स. १७९९-१८७४), कृष्णशास्त्री राजवाडे (इ. स. १८२०-१९००) गणेशशास्त्री लेले (इ. स. १८२५–१८९८) व दादोबा पांडुरंग (इ. स. १८१४–१८८२) यांनीं वेधिलें. सदाशिव काशिनाथ ऊर्फ बापू छत्रे, बाळशास्त्री जांभेकर, हरि केशवजी पाठारे ही मंडळी ग्रंथकार या नात्यानें कितीहि थोर असलीं, बापू छत्रे व हरि केशवजी हे कितीहि रसाळ भाषांतरकर्ते असले, तरी त्यांना प्रेरणा सरकारी अधिकारी व मिशनरी यांच्याकडून झाल्यानें, त्यांच्या ग्रंथांत आत्मविश्वास किंवा आत्मतेज फारसें कोठें दिसत नाहीं. बाळमित्र (चिल्ड्रेन्स फ्रेंडसचें भाषांतर) व इसापनीति (ईसॉप्स फेबल्सचें भाषांतर) या दोन सुंदर व सरस भाषांतरांनीं बापू छत्रे यांनीं आंग्लकालीन गद्यसाहित्याचा पाया रचला यांत शंका नाहीं. तरीपण ह्या ग्रंथांना स्वयंप्रेरणेचें

ग्रंथ म्हणतां येणार नाहींत. साहेबाच्या प्रेरणेनें तयार झालेले ते उघडउघड दिसतात. परशुरामपंततात्यांनीं मात्र इंग्रजी विद्यारूपी वाघिणीचें दूध पिणाऱ्यांना संस्कृत साहित्यांतील व मराठी साहित्यांतील गोरसाची लज्जत दाखविली. वेणीसंहार (१८५७), उत्तररामचरित (१८५९), शाकुंतल (१८६१), मृच्छकटिक, (१८६२), नागानंद (१८६५), पार्वतीपरिणय (१८७२) अशा एकाहून एक सरस संस्कृत नाटकांना त्यांनीं बेमालूम मराठी वेष दिला. संस्कृत साहित्याप्रमाणें मराठी साहित्याचा रसिकतेनें रसास्वाद घ्यावा म्हणून त्यांनीं मोरोपंतांच्या केकावलीवर केकादर्श (१८६७) नांवाची सुंदर टीका लिहिली. काव्य करणाऱ्यांना मार्गदर्शक होणारें त्यांचें वृत्तदर्पण (१८६०) हि लहान असलें तरी उल्लेखनीय आहे. तात्यांचें ग्रंथ भाषांतरात्मक असलें तरी त्यांत हिंदुसंस्कृतीचा व आत्म-तेजाचा ठसा स्पष्ट दिसतो. एतद्देशीयांना साहित्य व संस्कृति हीं दोन्ही नाहींत, असें म्हणणाऱ्या मेकॉलेसाहेबांसारख्यांना तात्यांनीं आपल्या साहित्यानें रोखठोक उत्तर दिलें. कृष्णशास्त्री राजवाडे यांनीं मालतीमाधव (१८६१), मुद्राराक्षस (१८६७), अभिज्ञानशाकुंतल (१८६९), विक्रमो-र्वशीय (१८७४) अशीं चार संस्कृत नाटकांचीं भाषांतरें केलीं व उत्सव-प्रकाश व ऋतुवर्णन हीं दोन स्वतंत्र काव्यें रचिलीं. याशिवाय अलंकार-विवेक (१८५३) नांवाचा ग्रंथहि त्यांनीं तयार केला. गणेशशास्त्री लेले यांनीं जानकीपरिणय (१८६५), मालविकाग्निमित्र (१८६७), विद्धशाल-भंजिका (१८८९), अशीं तीन संस्कृत नाटकांचीं भाषांतरें केलीं. ह्यांनीं केलेलें रघुवंशाचें पद्यात्मक भाषांतर एकेकाळीं फार लोकप्रिय व प्रसिद्ध होतें. या खेरीज यांनीं शिवाजीचरित्र, गंगाचरित्र, सीमंतिनीचें आख्यान इत्यादि काव्यें तयार केलीं. यांची भाषाशैली सर्वत्र प्रसादपूर्ण व ओघवती आहे. दादोबा पांडुरंग हे त्यांच्या व्याकरणाबद्दल प्रसिद्ध असले, तरी चांगले रसिक टीकाकार व काव्याचे भोक्ते होते. त्यांनीं मोरोपंतांच्या केकावलीवर विस्तृत व मार्मिक टीका लिहून तिला आपल्या मातापितरांचें

'यशोदा पांडुरंगी' (१८६५) असें नांव दिलें. दादोबांनीं इ. स. १८७० मध्यें जें आत्मचरित्र लिहिलें तें तर केवळ बहारीचें आहे. या काळांत जीं अत्यंत वाचनीय अशीं दोन आत्मचरित्रें लिहिलीं गेलीं त्यांत याचा अंतर्भाव होत असून, दुसरें बाबा पदमनजी याचें 'अरुणोदय' नांवाचें आत्मचरित्र होय. या दोन आत्मचरित्रांवरून तत्कालीन देश-धर्म समाज-स्थितीचें उत्तम ज्ञान होतें.

स्वतंत्र नाटकें

याच काळांत जींत परधार्जिणेपणा किंवा परभृतपणा मुळींच नव्हता अशी एक साहित्याची शाखा नवीनच तयार होऊन पुढे तिचा घेरेदार व मनोहर वृक्ष तयार झाला. ही शाखा नाट्यसाहित्याची होय. सांगलीचे राजे चिंतामणराव अप्पासाहेब यांनीं इ. स. १८४२ मध्यें सांगलीस आलेल्या भागवत या नांवाच्या एका कर्नाटकी कंपनीचीं कांहीं नाटकें पाहिलीं. तीं त्यांना ओबडधोबड व वीभत्स वाटलीं. तेव्हां त्यांनीं आपल्या पदरीं असलेल्या विष्णुदास भावे यांना मराठींत सभ्य व चांगलीं नाटकें तयार करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें विष्णुदासांनीं 'बरेच महाराष्ट्रग्रंथ' वाचले व 'पौराणिक इतिहास समजून घेतला.' इतकी पूर्वतयारी झाल्यावर त्यांनीं सीतास्वयंवर नाटक तयार करून त्याचा प्रयोग इ. स. १८४३ मध्यें श्रीमंतांना करून दाखविला. तो प्रयोग उत्तम झाल्यानें त्याच्या कर्त्यास उत्तेजन मिळून त्यानें पुढें रामजन्म, सीताहरण, रावणवध, द्रौपदीस्वयंवर इत्यादि सुमारे तीस पौराणिक नाटकें तयार केलीं. या नाटकांत पद्यभाग तेवढा लिहिलेला असे व गद्यभाग नटांना तोंडीं सांगण्यांत येई. विष्णुदास भावे यांनीं नाट्यवाङ्मयाचा पाया रचतांच, त्याच्यावर इमारत तयार करण्याचें काम इतरांनीं सुरू केलें. यांत विनायकशास्त्री नातु (नलनाटक—श्री भिल्लणी नाटक), लक्ष्मण गोपाळ दीक्षित (मेधावती परिणय, रुक्मिणीहरण), रावजी बाळकृष्ण लेले (गोपीचंद, श्रियाळचांगुणासत्वदर्शन, सुलोचना, रावणवध), रघुनाथ शंकरशास्त्री अभ्यंकर (विराटपर्व, हरिश्चंद्रसत्वदर्शन), दत्तात्रय

वासुदेव जोगळेकर (चित्रसेन), बजाबा बाळाजी नेने (सैरंध्री), विनायक जनार्दन कीर्तने (जयपाळ) हे मुख्य असून यांनीं पौराणिक नाटकें तयार केलीं. यांत सूत्रधार, विदूषक, गणपति, सरस्वति यांचे प्रवेश झाल्यावर मुख्य नाटकाला सुरुवात झाल्याचें बहुतेक नाटकांत दाखविलें आहे. पद्यें रागदारीचीं व मधून मधून आर्या, साकी, श्लोक, दिंडी अशाहि प्रकारचीं आहेत. संवाद बरे आहेत परंतु विनोद शब्दनिष्ठ, ओबडधोबड व बाष्कळ स्वरूपाचा आहे. पौराणिक नाटकांप्रमाणेंच कांहीं ऐतिहासिक स्वतंत्र अशीं नाटकेंहि रचिलीं गेलीं. विनायक जनार्दन कीर्तनेकृत थोरले माधवराव पेशवे, वीरेश्वर सदाशिव छत्रेकृत नारायणराव पेशवे, कोंडो सखाराम घाटेकृत अफझलखानाचा मृत्यु व व्यंकट रंगो कट्टीकृत सवाई माधवराव हीं अशा पैकीं नाटकें होत. कीर्तन्यांचें "थोरले माधवराव पेशवे" नाटक एकेकाळीं रंगभूमीवर चांगलेंच लोकप्रिय होतें. सामाजिक नाटकांत महादेव बाळकृष्ण चितळेकृत मनोरमा (१८७१) व रघुनाथ शंकरशास्त्री अभ्यंकरकृत प्रबोध विद्युत् अथवा स्वैरसकेशा (१८७१) हीं नाटकें खूपच गाजलीं. याचं काळांत कांहीं कल्पनिक नाटकेंहि वा. रा. मोहोनी, धोंडो भिकाजी मराठे, रावजी मनोहर ताकभाते यांनीं तयार केलीं. हीं नाटकें कलादृष्ट्या उच्च प्रतीचीं नसलीं तरी तीं स्वतंत्र असल्यानें त्यांची मातब्बरी भाषांतरित–रूपांतरित वाङ्मयापेक्षां केव्हांहि विशेष समजली पाहिजे. बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचा आश्रय बंद झाल्यावर हीं नाटकें तयार झालीं हीहि गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे. साहित्याची आवड लोकांच्या ठिकाणीं चांगलीच निर्माण झाली होती त्याचें हें द्योतक आहे. या सुमारे शंभर नाटकांकडे पाहिलें असतांना आपलें नाट्यवाङ्मय तरी परोपजीवी नव्हतें हें पाहून समाधान वाटतें.

कथात्मक वाङ्मय

कथात्मक वाङ्मयांत सिंहासनबत्तीशी (वैजनाथ शर्मा), हितोपदेश, वेताळ-पंचविशी (सदाशिव काशिनाथ छत्रे), इसापनीति–बालमित्र

(सदाशिव काशिनाथ छत्रे), आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी, (कृष्णशास्त्री चिपळूणकर) बादशहा आणि बिरबल यांच्या गोष्टी, रॉबिनसन क्रूझो (रावजीशास्त्री गोडबोले), रासेलस (कृष्णशास्त्री चिपळूणकर), कादंबरी-सार (परशुरामपंत गोडबोले) इत्यादि सरस भाषांतरांनीं कांहीं वर्षें लोकांची करमणूक केली असली, तरी त्यांचें पूर्ण समाधान त्यांनीं होऊं शकलें नाहीं. स्वतंत्र काल्पनिक कादंबऱ्या याच काळांत तयार व्हायला सुरुवात झाली. बाबा पदमनजींच्या "यमुना पर्यटन" [१८५७] या सामाजिक कादंबरीनें मराठी कादंबरी वाङ्मयाचा पायाच घातला असें म्हणावयास हरकत नाहीं. ख्रिस्ती धर्माच्या पिवळ्या चष्म्यांतून बाबांची यमुना हिंदुधर्माकडे बघत असल्यानें तिला हिंदूंच्या संसारांत जिकडेतिकडे अज्ञान, जाच, दांभिकपणा भरलेला दिसतो. हिंदु विधवांची दुःस्थिति या कादंबरींत भडक रंगानें रंगविली आहे. अद्‌भुतरसात्मक कादंबऱ्यांत लक्ष्मण मोरेश्वरशास्त्री हळबेकृत मुक्तामाला [१८६१], रत्नप्रभा [१८६६]; नारो सदाशिव रिसबूडकृत मंजुघोषा [१८६८], विश्वासराव [१८७०]; केशव लक्ष्मण जोरवेकरकृत विचित्रपुरी [१८७०] यांचा मुख्यतः उल्लेख केला पाहिजे. गुहा–तळघर–किल्ले–अरण्यें–विमानांचे अपघात–संकटपरंपरा इत्यादि मालमसाला वापरून या कादंबऱ्यांना जितक्या अतिरंजित करतां येतील तितक्या करण्याचा प्रयत्न त्यांच्या लेखकांनीं केला आहे. स्वातंत्र्य नुकतेंच गेलें होतें, स्वत्व-जागृति अजून झाली नव्हती, अशा त्या अर्धवट गुंगीच्या अवस्थेंत असलेल्या समाजाला अद्‌भुतरसात्मक कादंबऱ्या आवडणें अगदीं स्वाभाविक होते. याच काळांत दोन ऐतिहासिक कथाग्रंथ तयार झाले. मोरोबा कान्होबा यांनीं घाशीराम कोतवाल [१८६३] लिहून त्यांत पेशवाई अखेरच्या स्थितीचें अर्धवट ऐतिहासिक असें चित्र रेखाटलें आहे. यांत इतरहि अनेक गोष्टी आल्यानें जरी मनोरंजन साधलें तरी सुसूत्रतता राहिलेली नाहीं. त्यामानानें रा. भि. गुंजीकर यांची मोचनगड [१८७१] ही ऐतिहासिक कादंबरी बरी आहे.

इतिहास

इतिहासाच्या क्षेत्रांत कांहीं स्वतंत्र पुस्तकें या काळांत तयार झालीं. पूर्वीच्या काळचे शास्त्रीय दृष्टीनें लिहिलेले इतिहास मराठींत जवळ जवळ नाहींतच. महाराष्ट्राचा सुसंगत इतिहास प्रथम एलफिन्स्टनादि युरोपियन लोकांनीं लिहिला. त्यांच्याच पुस्तकांचीं भाषांतरें आपल्या लोकांनीं व कांहीं अंशीं त्यांनींहि मराठींत केलीं. ग्रांट डफच्या मराठ्यांच्या इंग्रजी इतिहासाचें भाषांतर कॅप्टन डेव्हिड केपन व बाबा साने यांनीं मिळून इ. स. १८२९ मध्यें 'मराठ्यांची बखर' या नांवानें प्रसिद्ध केलें. हा इतिहास विकृत मनोवृत्तीनें ग्रांट डफनें लिहिला होता. त्यांत अनेक घटितांच्या व सिद्धांताच्या चुका होत्या. नीळकंठ जनार्दन कीर्तनें यांनीं प्रथम ग्राट डफच्या इतिहासावर टीकास्त्र सोडलें. "ग्राट डफकृत मराठ्यांच्या बखरीवर टीका" [१८६७] या त्यांच्या निबंधानें एतद्देशीयांना ऐतिहासिक दृष्टि दिली. इ. स. १८६२ च्या सुमारास लोकहितवादी (गोपाळराव हरि देशमुख) 'यांनीं भोसले, शिंदे, होळकर, गायकवाड इत्यादि घराण्यांची माहिती प्रसिद्ध केली. विष्णु गोपाळ भिडे यांनीं इ. स. १८६६ मध्यें अस्सल ऐतिहासिक कागदपत्रांचा उपयोग करून सातारच्या भोसले राजवंशाचा इतिहास लिहिला. खंडेराव बाळाजी फडके यांनीं १८५७ सालच्या बंडाचा इतिहास [१८६०] प्रसिद्ध केला. यांत इंग्रजांना जय मिळाल्याबद्दल ईश्वराचे आभार मानले आहेत. याच विषयावर १८७४ मध्यें विनायक कोंडदेव ओक यांनीं 'शिपायाच्या बंडाचा इतिहास' नांवाचें पुस्तक लिहिलें. यांत बंडवाल्यांच्या शौर्याची प्रशंसा केली आहे. कांहीं स्वतंत्र चरित्र ग्रंथहि याच सुमारास प्रसिद्ध झाले. कॅप्टन मॅकडोनाल्डकृत 'नाना फडणवीस यांची बखर' [१८५२], भास्कर हरि भागवतकृत राजा राममोहनराय [१८५८], रामचंद्र पांडुरंग आजरेकरकृत श्रीविष्णुबोवा ब्रह्मचारी हीं अशांपैकीं चरित्रें होत. मराठी ज्ञानप्रसारक मासिकाच्या द्वारेंहि शिवाजी महाराज, अहल्याबाई, बुद्ध, महंमद इत्यादींचीं चरित्रें प्रसिद्ध करण्यांत आलीं आहेत.

निबंध

स्वतंत्र विचारांनीं सजविलेल्या साहित्यशाखेंत निबंध प्रबंधांचाहि उल्लेख करतां येण्याजोगा आहे. बाळशास्त्री जांभेकरांनीं आपल्या 'दर्पण' व दिग्दर्शन ह्या नियतकालिकांच्या द्वारें तसेंच भाऊ महाजन यांनीं आपल्या प्रभाकर साप्ताहिकांतून समाजाच्या प्रगतीला पोषक असे अनेक निबंध लिहिले. ज्ञानप्रसारक [१८५०], पुणें पाठशाला पत्रक [१८६१], विविध ज्ञान-विस्तार, चंद्रिका [१८५४], दंभहारक [१८७१], ज्ञानसंग्रह [१८७२] याहि मासिकांतून वाङ्मयविषयक व सामाजिक निबंध अनेक प्रसिद्ध झाले. यांपैकीं बरेच भारदस्त व माहितीपूर्ण आहेत. इ. स. १८३४ मध्यें स्थापन झालेल्या मुंबई टेंपरन्स सोसायटीच्या विद्यमानें मद्यपानाचा निषेध करणारे पुष्कळ निबंध प्रसिद्ध करण्यांत आले. आळस व कर्जबाजारीपणा यावरहि कांहीं निबंध प्रसिद्ध झाले. १८५० सालीं डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटीनें गोविंद नारायण यांचा 'ऋणनिषेधक बोध' नांवाचा निबंध प्रसिद्ध केला. "हिंदुस्थानची प्राचीन व सांप्रतची स्थिति" या विषयावर रामकृष्ण विश्वनाथ यांनीं विचारपरिप्लुत असा निबंध १८४३ त तयार केला. हा निबंध सडेतोड विचारांनीं व उपरोधपूर्ण शैलीनें नटलेला आहे. न्यायाच्या बाबतींत 'हा काळा, हा गोरा' असा जो भेद करण्यांत येई त्यावर यांत टीका आली असून शेवटीं म्हटलें आहे, "वाः काय ही न्याय करण्याची उत्कृष्ट चाल! मग बर्कसाहेबानें जो दोष ठेविला आहे, त्याचें आपण कां बरें आश्चर्य मानावें! कीं 'हिंदुस्थानांत राज्य नव्हे, लष्करी अंमल व दिवाणी जुलूम आहे." भवानी विश्वनाथ कानविंदे यांच्या "मुंबईंतील सुशिक्षित तरुण हिंदुलोक" या निबंधांत मातृभाषेकडे होत असलेल्या दुर्लक्षाबद्दल खेद प्रदर्शित केला आहे. काशिनाथ बाळकृष्ण मराठे यांच्या 'नावल व नाटक याविषयीं निबंध' [१८७२] यांत तत्कालीन कादंबऱ्या व नाटकें यांतील ठळक दोष दाखवून, लेखकानें या दोन वाङ्मयप्रकारांच्या बाबतींत कोणत्या गोष्टी लक्षांत ठेवल्या पाहिजेत त्या सांगितल्या आहेत.

ज्यांनीं विविध विषयावर बरेच्च व सरस निबंध लिहिले अशा लेखकांत रा. ब. गोपाळ हरि देशमुख ऊर्फ लोकहितवादी [इ. स. १८२३–१८९२], गोविंद नारायण माडगांवकर [इ. स. १८१५–१८६५], कृष्णशास्त्री चिपळूणकर [इ. स. १८२४–१८७८], विष्णुबुवा ब्रह्मचारी [१८२५–१८७१], विष्णुशास्त्री पंडित [१८२७–१८७६], आणि ज्योतिबा फूले [१८२७–१८९०] यांचा सहज अंतर्भाव करतां येतो. या सर्वांच्या निबंधांत समाजाविषयींची तीव्र तळमळ व विविध सुधारणा व्हाव्यात अशी इच्छा हीं स्पष्ट दिसतात. आपल्या समाजांतील दोष दाखवून स्वजनांचा तेभोभंग केल्याबद्दल लोकहितवादींवर विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं कडक प्रहार आपल्या निबंधमालेच्या द्वारें केले असले, तरी लोकहितवादींच्या कार्याचें महत्त्व रतिभरहि कमी होऊं शकत नाहीं. प्रभाकर, ज्ञानप्रकाश, इंदुप्रकाश, वृत्तवैभव इत्यादि नियतकालिकांतून त्यांनीं शेंकडो पत्रें लिहून आपल्या समाजाच्या डोळ्यांत अंजन घातिलें. "देश अज्ञानानें बुडाला तेव्हां ज्ञान सर्वत्र शतमुखांनीं वाढविलें पाहिजे," "लोकांस त्यांची वास्तविक स्थिति कशी आहे ती कळून त्यांनीं सुधारलें पाहिजे," त्यांनीं विचार केला पाहिजे– इत्यादि विचार त्यांच्या निबंधांतून अनुस्युत झाले आहेत. त्यांच्या व्यासंगाबद्दल व विद्वत्तेबद्दल मालकारांनाहि आदर होता. आपले पुरोगामी विचार कोणाच्याहि रागलोभाची पर्वा न करतां त्यांनीं निस्पृहपणें समाजासमोर मांडिले. स्वदेशीचा प्रसार करण्याच्या हेतूनें "...यांजकरितां सर्वांहीं असा कट करावा कीं जे आपले देशांत पिकेल तेंच नेसूं. तेंच वापरूं कसेंही असो आणि तितक्यांत चांगल्या विद्या व जिन्नस उत्कृष्ट करावयाच्या विद्या शिकूं...(हरदासांनीं) लोकांस समजवावें कीं, तुम्ही मूर्ख आहां. विचार करीत नाहीं. यास्तव विचार करा व विद्या करा. विलायतेंतील लोकांप्रमाणें अक्कलवान व्हा. म्हणजे तुम्हांस लक्ष्मी अनुकूल होईल." असें त्यांनीं लिहिलें आहे. पुनर्विवाहाच्या बाबतींत ते सर्वस्वी अनुकूल

होते. "ईश्वरानें स्त्री व पुरुष सारखे उत्पन्न केलें व उभयतांचे अधिकार समसमान आहेत असें असतां पुरुषांस पुन्हां विवाहाची आज्ञा आणि स्त्रियांस मात्र मनाई हा केवढा जुलूम आहे." असें ते म्हणतात. "शास्त्र हे कायदे आहेत व जे अनहितकारक कायदे असतील ते सोडून दुसरे करण्यास कांहीं चिंता नाहीं," या त्यांच्या स्पष्टोक्तींत आगरकरांच्या विचारांचीं पूर्वचिन्हें स्पष्ट दिसतात. बालविवाह, जरठकुमारीविवाह यांच्या विरुद्ध ते असून, याहि बाबतींत त्यांनीं इ. स. १८४८ मध्यें कांहीं पत्रें प्रसिद्ध केलीं. हरिजन ऊर्फ अस्पृश्य (अष्पृष्ठ) यांच्याहि संबंधीं रावबहादुरांचे विचार त्यांच्या थोर अन्तःकरणाची साक्ष पटवितात. एका पत्रांत हे थोर ब्राह्मण म्हणतात, "ब्राह्मण महाराची निंदा करितात. त्यांस शिवत नाहींत व इंग्रजाजवळ प्रीतीनें बसतात. हें पाहून मला आश्चर्य वाटतें. शास्त्राप्रमाणें पाहिलें असतां महार बरे परंतु इंग्रजांचे मंडळींत ब्राह्मण असूं नयेत" (लोकहितवादी-निबंधसंग्रह पृ. ३०१). जातिभेद व वर्णव्यवस्था याहि संबंधींचे त्यांचे निबंध स्वतंत्र व विचारप्रवर्तक आहेत. त्यांच्या सर्व निबंधांचा साकल्यानें विचार केला असतां, सामाजिक विचारांच्या क्षेत्रांत ते आगरकरांच्या तोडीचे निबंधकार होते असें निःशंकपणें म्हणतां येईल.

गोविंद नारायण माडगांवकर यांचे शुचिर्भूतपणा [१८४९], ऋण-निषेधकबोध [१८५०], सत्यनिरूपण [१८५२], दारुपासून अनर्थ [१८५५] इत्यादि निबंध पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाले. या शिवाय ज्ञान-प्रसारक मासिकांत त्यांनीं कांहीं सामाजिक व आर्थिक निबंध लिहिले. यांची भाषा शुद्ध, सरळ आणि गोड आहे. कृष्णशास्त्री चिपळूणकरांनीं मराठी शाळापत्रक, ज्ञानप्रकाश व विचारलहरी या नियतकालिकांच्या द्वारें अनेक विषयांचें विवेचन केलें. त्यांचे मराठी व्याकरणावरील निबंध व ग्रंथ-परीक्षणें हीं मार्मिक व मुद्देसूद आहेत. त्यांची भाषाशैली सौम्य व प्रसन्न आहे. कृष्णशास्त्री चिपळूणकरासारख्या रसिक व विद्वान पित्याच्या हाता-

खालीं शाळापत्रकांत उमेदवारी केल्यानेंच विष्णुशास्त्री पुढें ओजस्वी लिखाण करूं शकलें. कृष्णशास्त्र्यांच्या "अनेकविद्या मूलतत्त्वसंग्रह" [१८६१] या ग्रंथांतहि अनेक विषयावर सुबोध शैलीनें लिहिलेले लेख आहेत. विष्णु बावा ब्रह्मचारी यांच्या वेदोक्तधर्मप्रकाश या ग्रंथाचा उल्लेख पूर्वी आलाच आहे. त्याशिवाय 'सुखदायक राज्यप्रकरणीं निबंध [१८६७] व 'सहजस्थितीचा निबंध [१८६१]' हेहि त्यांचे निबंध पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाले असून विचारप्रवर्तक आहेत. त्यांची विचारसरणी स्वतंत्र, उदार व जोरदार होती. विश्वकुटुंबवादाविषयीं १८६७ सालीं प्रसिद्ध केलेले त्यांचे विचार आजहि ताजे वाटतात. सुखदायक राज्यप्रकरणांत एके ठिकाणीं ते म्हणतात, "...या प्रमाणें सर्व प्रजा एक कुटुंब व सर्व जमीन हाच एक बाग व त्यांतून जे जे निघेल तें तें सर्वांचे एक या प्रमाणें राज्यव्यवस्था असली म्हणजे सर्वांना सर्व उपभोग मिळतात. व सर्वांना उत्तम खावयास मिळतें व सर्वांना उत्तम विपुल वस्त्रें व अलंकारभूषणें मिळतात व सर्वांना नाच, तमाशे, बैठकी पहावयास सांपडतात...कोणाला कांहीं प्राप्त होत नाहीं असें होतच नाहीं. म्हणून सर्व लोक पूर्णकाम होतात यामुळें कामाच्या अपूर्णतेनें क्रोध येणें हें शिल्लक रहात नाहीं. आणि क्रोध नसल्यामुळें गुन्हा करणें किंवा गुन्हा करण्यास्तव मत्सर धरून बसणें यांचा लवलेशहि शिल्लक राहत नाहीं. यामुळें हाच प्रजेचा व राजाचा खरोखर असावा तसा संबंध आहे." समाजसत्तावाद किंवा कम्युनिझम मध्यें जशा प्रकारची राज्यव्यवस्था असते, तशाच प्रकारची व्यवस्था आपल्या निबंधांत इतक्या पूर्वकालीं लिहिल्याबद्दल त्यांच्याविषयीं सादर कौतुक वाटू लागते.

स्त्रीशिक्षणाचा उपक्रम प्रथम मुंबईत इ. स. १८२४ त अमेरिकन मिशननें केला. मिशनऱ्यांच्या शाळेंत मुलींना पाठवायला लोक सुरुवातीला तयार नव्हते. पुढें या विषयावर ज्ञानप्रसारक मासिकांत व इतरत्रहि अनेक लेख प्रसिद्ध झाल्यावर पालक मुलींना शाळांत पाठवू लागले. इ. स. १८४१ मध्यें जोतिराव फुल्यांनीं पुण्यांत एक मुलींची शाळा काढिली. अशा तऱ्हेनें

स्त्रीशिक्षणाला सुरुवात होतांच स्त्रियांच्या पुनर्विवाहाचा प्रश्न आपोआपच पुढें आला. इ. स. १८४२ त प्रभाकर साप्ताहिकांत बेळगांव येथें दोन ब्राह्मण बालविधवांचे पुनर्विवाह झाल्याचें वृत्त आधीं प्रसिद्ध झालें व नंतर लोकहितवादींचे पुनर्विवाहाचा पुरस्कार करणारे लेख प्रसिद्ध झाले. या प्रश्नाच्या बाबतींत विष्णुशास्त्री पंडितांनीं जी कामगिरी केली, त्यानें ते कर्ते सुधारक व चांगले निबंधकार म्हणून ओळखले जाऊ लागले. प्रथम त्यांनीं पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या 'विधवाविवाह' या ग्रंथाचें मराठींत भाषांतर प्रसिद्ध केलें व नंतर या विषयावर अनेक स्वतंत्र लेख लिहिले. लोकहितवादी, न्यायमूर्ति रानडे, रा. ब. मोरोबा कान्होबा विजयकर यांच्या साहाय्यानें त्यांनीं इ. स. १८६५ मध्यें पुनर्विवाहोत्तेजक मंडळीची स्थापना केली. १८७४ मध्यें त्यांनीं स्वतः पुनर्विवाह केला व आपला खरा सुधारकी बाणा व्यक्त केला. लोकहितवादी, विष्णुशास्त्री पंडित व मोरोबा कान्होबा यांनीं पुनर्विवाहाचा पुरस्कार करणारे लेख व पुस्तकें प्रसिद्ध करतांच विधवाविवाहखंडन [१८६५] व पुनर्विवाहनिषेध [१८६५] हीं पुस्तकें अनुक्रमें बाळकृष्ण लक्ष्मण बापट व कृष्ण प्रभाकर-शास्त्री पाठक यांनीं लिहिलीं इ. स. १८७० सालीं पुण्यांत पुनर्विवाहाचा पुरस्कार करणारे व विरोधी यांच्यांत मोठा कडाक्याचा वाद दीक्षितांच्या वाड्यांत झाला. हा वाद पुढें मोरोबा कान्होबा विजयकर यांनीं पुस्तकरूपानें प्रसिद्ध केला.

ज्योतिबा फुले यांनीं ब्राह्मणेतर समाजांच्या प्रगतिकरितां खूपच परिश्रम केले व पुस्तकें लिहिलीं. इ. स., १८४१ मध्यें त्यांनीं मराठे लोकांकरितां स्वतंत्र शाळा स्थापन केली. इ. स. १८५१ मध्यें त्यांनीं अस्पृश्यांकरितां शाळा काढिली. इ. स. १८६३ मध्यें त्यांनीं बालहत्याप्रतिबंधकगृहाची स्थापना केली. यानंतर आपल्या चळवळीला संघटित रूप देण्याच्या उद्देशानें त्यांनीं इ. स. १८७३ मध्यें सत्यशोधक समाजाची स्थापना केली. ब्राह्मणेतरांना आपल्या हक्कांची जाणीव व्हावी व ब्राह्मणांच्या कचाट्यांतून

त्यांची मुक्तता व्हावी म्हणून त्यांनीं "ब्राह्मणांचे कसब" [१८६९] व 'गुलामगिरी' [१८७३] अशीं दोन पुस्तकें लिहिलीं. त्यांच्या पुस्तकांत ब्राह्मणेतरांविषयीं कळकळ-तळमळ हीं स्पष्ट दिसतात. त्यांतील विधायक स्वरूपाचा भाग चांगला आहे. परंतु ब्राह्मणजातिविषयीं त्यांच्या विचार-सरणींत जो जळजळीत द्वेष आढळतो, त्याला वस्तुस्थितीचा आधार फारच अल्प आहे. ज्या काळांत ते वावरत होते, त्यांत ब्राह्मणांप्रमाणें मराठे व प्रभू हेहि अस्पृश्यांना दूरच ठेवीत असत. ब्राह्मणशिक्षक जसे अस्पृश्यांना शिकवायला तयार नसत, तसेंच प्रभू शिक्षकहि तयार नसत. दादोबा पांडुरंगांनीं आपल्या आत्मचरित्रांत याचा उल्लेख केला आहे. धाकजी परभू नांवाचे शिक्षकांनीं बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शाळांतून कुळवाड्यांचा मुलांना जगन्नाथ शंकरशेट व इतर पारशी व युरोपियन सभासदांच्या मदतीनें काढून टाकिलीं व असा धाक घातला कीं, कुळवाड्यांचीं मुलें शाळेंत आल्यास परभू लोकांच्या मुलांस येण्यास आपण मनाई करूं ! त्या काळची परिस्थिति तशी होती. तिच्याकडे आजच्या दृष्टीनें पाहून चालणार नाहीं. दादोबा पांडुरंग म्हणतात, "त्यांच्या त्या काळच्या आंखूड समजुतीप्रमाणें ह्यांना मोठा दोष द्यावा असें मला वाटत नाहीं. अद्यापि आतां इतके शिक्षित लोक झाले आहेत व सुधारलेपणाचा मोठा अभिमान बाळगतात त्यांच्याहि मनांतून ही ग्रंथि सुटत नाहीं. किंबहुना तेव्हांपेक्षां आतां जातिद्वेष आंतून अधिक वाढल्यासारखा दिसतो." इंग्रजांचें राज्य महाराष्ट्रावर दीडशें वर्षें होतें, अनेक मराठा संस्थानें महाराष्ट्रांत तसेंच महाष्ट्राबाहेर होतीं, असें असून मराठ्यांच्या शिक्षणाची प्रगति मंद-गतीनें झालेली आपण पाहतों. ब्राह्मणांच्यामुळें मराठ्यांचें शिक्षण झालें नाहीं हें म्हणणें वस्तुस्थितीला धरून नाहीं. एकेकाळीं खुद्द ब्राह्मणांचें शिक्षणहि हल्लींच्या मानानें बेतास बेत होतें. धार्मिक गुलामगिरी ही ऐच्छिक गोष्ट आहे. ज्या ब्राह्मणेतरांना आपल्या घरीं भटांना बोलावायचें नसेल त्यांनीं बोलवूं नये. आम्हांला बोलवाच, असा हट्ट ब्राह्मण कधींहि धरणार

नाहीं व पूर्वीहि त्यांनीं कधीं धरला नव्हता. ज्या काळांत लोकहितवादी, विष्णुबुवा ब्रह्मचारी, विष्णुशास्त्री पंडितांसारखे उदार मनाचे ब्राह्मण सर्व हिंदूंच्या उद्धाराकरितां झटत होते, त्या काळांत "ब्राह्मणांचे कसब" या सारखे पुस्तक ज्योतिबांनीं लिहिल्यामुळें, त्यांच्या लेखनाला शास्त्रशुद्धतेच्या अभावाचा मोठाच दोष लागला आहे.

ब्राह्मणद्वेषापायीं ब्रह्मदेव, मत्स्य, कच्छ, वराह, नृसिंह इत्यादि अवतारांच्या संबंधीं 'गुलामगिरी' या पुस्तकांत त्यांनीं जें विवेचन केलें आहे तें नावीन्य-पूर्ण असलें तरी केवळ काल्पनिक व बीभत्स आहे. "जोतिराव आणि धोंडिबा यांचा संवाद"– अशा रूपानें असलेल्या गुलामगिरी या पुस्तकांत तर्कशास्त्राला धरून असें फारच थोडें विवेचन आहे. दूषित पूर्वग्रहाच्या चष्म्यांतून लेखकानें ब्राह्मणांकडे बघावयाचें ठरविल्यानें त्याला कोणताच सद्गुण ब्राह्मणांत आढळलेला नाहीं. ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य असे त्रैवर्णीक आर्य समजले जात असून, ज्योतिबांनीं फक्त ब्राह्मणांनाच आर्य कल्पून, त्यांच्याकडून शूद्रातिशूद्रांना अनन्वित त्रास झाला असें म्हटलें आहे. विप्रिय म्हणजे विप्र, नारसिंह म्हणजे सिंहाची बायको, मार्तंड म्हणजे मारतोंड, मियामल्हार म्हणजे मिया नांवाच्या मुसलमानानें मल्हार नांवाच्या ब्राह्मणेतराच्या आश्रयानें केलेला राग, म्हसोबा म्हणजे महासुभा, उपाध्ये म्हणजे उपाधि देणारे, रक्षक म्हणजे राक्षस; भ्रष्ट म्हणजे भट्ट इत्यादि ज्योतिरावांनीं सुचविलेल्या व्युत्पत्तींत विनोद भरपूर असला तरी सत्य नांवाला सुद्धां नाहीं. त्यावेळचे समंजस देशाभिमानी लोक इंग्रज लोकांस व मिशनरीस हाकून लावल्याशिवाय देशाची उर्जित स्थिति यावयाची नाहीं असें म्हणत. इ. स. १९४२ सालीं कॉंग्रेसनें महात्मा गांधींच्या प्रेरणेनें इंग्रजांना 'भारत छोडो' असें निक्षून ठरावाच्या रूपानें सांगितलें. असें असून ज्योतिबांना मात्र यांत भटांचा कावा वाटला, यावरून त्यांचा दृष्टिकोण कसा सदोष होता तें कळतें. असें असलें तरी त्याकाळीं भूत-दयेचा व समानतेचा संदेश त्यांनीं जो दिला व त्याप्रमाणें स्वतः झीज

सोसून त्यांनीं जें शिक्षणप्रसाराचें व अस्पृश्योद्धाराचें कार्य केलें तें निःसंशय अविस्मरणीय असेंच आहे. त्यांना महात्मा ज्योतिराव फुले म्हणावयाचें तें याचकरितां.

काव्य

काव्याच्या प्रांतांत बराच स्वतंत्रपणा आढळतो. पेशवाई नष्ट झाल्यावर पोवाडे व लावण्या रचणाऱ्या शाहिरांचा मोठाच आश्रय नाहींसा झाला. दुसरे बाजीराव पेशवे यांच्यावर प्रभाकरानें जो पोवाडा रचला आहे त्यांत तसेंच साताऱ्याच्या प्रतापसिंह महाराज यांच्यावर सगनभाऊनें जो पोवाडा रचला आहे त्यांत, स्वातंत्र्यलक्ष्मी नष्ट झाल्याचें दुःख शाहीरांना किती झालें होतें तें स्पष्ट होतें. "कांहीं तरी तोड पुढे दिसेना जीव जगायाला। कोणास जावें शरण कोण हरि देईल खायाला," असें मोठ्या कळवळ्यानें या स्थितीचें वर्णन प्रभाकरानें केलें आहे. पेशवाई बुडाल्यावर शाहीरांना बडोद्यांत दुसऱ्या सयाजीराव महाराजांकडून [इ.स. १८१९ ते १८४७] चांगला आश्रय मिळाला. त्यावेळीं बडोद्यांत चालू असलेल्या फुकट खिचडी वाटण्याच्या पद्धतीनें अनेक कुटुंबांचें आपत्काळीं रक्षण झालें. या बाबतींत प्रभाकर म्हणतो, "भक्तजनाचे माहेर देशावर श्री पंढरपूर। याचकांस हें योग्य बडोदें सर्व क्लेश करी दुर॥ नित्य उठून वांटितात खिचडी॥ ब्राह्मणही महामुर। स्त्रिया पुरुष मुलीमुलांसकट शेर होतो भरपुर॥ पुण्यवान गायकवाड जगतीतळांत तें महशुर। सर्व कनकमय लोक घरोघर निघे सोन्याचा धुर॥...विश्वकुटुंबी श्रीमंत ते तर तूर्त प्रजेला अंतरले। गायकवाड आहेत म्हणुन हे समस्त ब्राह्मण सावरले। तानसेन पंथाचे गवय्ये तेहि प्रभूंनीं आंवरले। कडीं तोडे हातांत दुपेटे लाल जरीचे पांघरिले।" आपल्याला झालेल्या कर्जाचाहि उल्लेख प्रभाकरानें दुसरें सयाजीराव यांजवर रचलेल्या पोवाड्यांत केला आहे. तो म्हणतो, "प्रभाकर कवीभ्रमर गुंतला पहा कर्जाच्या कमळांत। द्रव्य कृपेचा प्रकाश पडल्या सुटून जाईल स्वकुळांत". प्रभाकरानें द्रव्य मिळविण्याच्या आशेनें नाना

शंकरशेट, विकाजी व पेस्तंजी शेट, साष्टी–कलेक्टर ऑफिसांतील मंडळी यांच्यावरहि पोवाडे केले यावरून त्याची परिस्थिति किती हलाखीची झाली असली पाहिजे हें दिसतें. या त्याच्या काव्यांत स्वतंत्रपणा असला; त्याची भाषा प्रासादिक असली, तरी पूर्वीच्या त्याच्या लावण्यांतील तेज यांत नाहीं. सगनभाऊच्या काव्याची हीच तऱ्हा आहे. स्वातंत्र्याचें वैभव पाहिलेल्या शाहिरांकडून नव्या आंग्लशाहीवर सरस काव्य होणार कसे?

याहि काळांत जुन्या प्रकारची काव्यरचना अधून मधून होत होती, हें अनंतसुत विठ्ठलबोवा ऊर्फ कावडीबोवा यांच्या "दत्तप्रबोध" [शके १७८२] ग्रंथावरून समजतें. या ग्रंथाच्या सुमारे चौदा हजार ओंव्या असून, त्यांत नारद, पद्म व शिव इत्यादि पुराणांच्या आधारें मुख्यतः दत्ताच्या कथा व तदनुषंगानें जनार्दनस्वामी, एकनाथ, निंबराज, दासोपंतादि दत्तभक्तांच्या कथा आल्या आहेत. गुरुचरित्रापेक्षां या ग्रंथांत अनुसूया व दत्त यांचा तत्त्वज्ञानपर संवाद विस्तारानें आला आहे. तसेंच जनार्दन–एकनाथांच्या ज्या कथा आहेत त्याहि स्वतंत्र व गुरुचरित्रांत नसलेल्या अशा आहेत. ग्रंथाची भाषा सुबोध व रसाळ आहे. श्रोत्यांना विनवणी प्रेमळपणानें करण्यांत आली आहे. विठ्ठलबोवा म्हणतात, "ग्रंथरूपी हें मानससरोवर। येथें हंसरूपी तुम्ही श्रोते सुंदर। अर्थमुक्तफळें सेवणार। आणि निवडणार दुग्धपाणी॥" ग्रंथाची सुरुवात व समाप्ति कोठें व कैव्हां झाली त्याविषयीं कवि सांगतात, "हृदयभुवनीं श्रीदत्त। प्रगटोनि वदविला ग्रंथ। आरंभ जाला माळव्यांत। स्थळविख्यात परियसा॥ ॐकार अवंतिकामध्यस्थान। इंद्रपुरनामाभिधान। तेथें चाळीस अध्याय संपवोन। साधिले प्रयाण तेथोनी॥ पाहावें द्वारकाधीशासी। म्हणोनि निघालों वेगेंसी। पावलों येवोनि गुर्जरदेशीं। देवतीर्थ क्षेत्रांसी पाहिले॥ रेवाडाकुरमध्यस्थ। क्षेत्र बडोदें विख्यात। वसती साधुसंत योगी महंत। दैवतें अद्भुत महास्थानें॥...या क्षेत्रीं सुरस। अध्याय जाले एकवीस। पूर्वीचे असती

सोसून त्यांनीं जें शिक्षणप्रसाराचें व अस्पृश्योद्धाराचें कार्य केलें तें निःसंशय अविस्मरणीय असेंच आहे. त्यांना महात्मा ज्योतिराव फुले म्हणावयाचें तें याचकरितां.

काव्य

काव्याच्या प्रांतांत बराच स्वतंत्रपणा आढळतो. पेशवाई नष्ट झाल्यावर पोवाडे व लावण्या रचणाऱ्या शाहिरांचा मोठाच आश्रय नाहींसा झाला. दुसरे बाजीराव पेशवे यांच्यावर प्रभाकरानें जो पोवाडा रचला आहे त्यांत तसेंच साताऱ्याच्या प्रतापसिंह महाराज यांच्यावर सगनभाऊनें जो पोवाडा रचला आहे त्यांत, स्वातंत्र्यलक्ष्मी नष्ट झाल्याचें दुःख शाहीरांना किती झालें होतें तें स्पष्ट होतें. "कांहीं तरी तोड पुढे दिसेना जीव जगायाला। कोणास जावें शरण कोण हरि देईल खायाला," असें मोठ्या कळवळ्यानें या स्थितीचें वर्णन प्रभाकरानें केलें आहे. पेशवाई बुडाल्यावर शाहीरांना बडोद्यांत दुसऱ्या सयाजीराव महाराजांकडून [इ.स. १८१९ ते १८४७] चांगला आश्रय मिळाला. त्यावेळीं बडोद्यांत चालू असलेल्या फुकट खिचडी वाटण्याच्या पद्धतीनें अनेक कुटुंबांचें आपत्काळीं रक्षण झालें. या बाबतींत प्रभाकर म्हणतो, "भक्तजनाचे माहेर देशावर श्री पंढरपूर। याचकांस हें योग्य बडोदें सर्व क्लेश करी दुर॥ नित्य उठून वांटितात खिचडी॥ ब्राह्मणही महामुर। स्त्रिया पुरुष मुलीमुलांसकट शेर होतो भरपुर॥ पुण्यवान गायकवाड जगतीतळांत तें महशुर। सर्व कनकमय लोक घरोघर निघे सोन्याचा धुर॥...विश्वकुटुंबी श्रीमंत ते तर तूर्त प्रजेला अंतरले। गायकवाड आहेत म्हणुन हे समस्त ब्राह्मण सावरले। तानसेन पंथाचे गवय्ये तेहि प्रभूंनीं आंवरले। कडीं तोडे हातांत दुपेटे लाल जरीचे पांघरिले।" आपल्याला झालेल्या कर्जाचाहि उल्लेख प्रभाकरानें दुसरें सयाजीराव यांजवर रचलेल्या पोवाड्यांत केला आहे. तो म्हणतो, "प्रभाकर कवीभ्रमर गुंतला पहा कर्जाच्या कमळांत। द्रव्य कृपेचा प्रकाश पडल्या सुटून जाईल स्वकुळांत". प्रभाकरानें द्रव्य मिळविण्याच्या आशेनें नाना

शंकरशेट, विकाजी व पेस्तंजी शेट, साष्टी–कलेक्टर ऑफिसांतील मंडळी यांच्यावरहि पोवाडे केले यावरून त्याची परिस्थिति किती हलाखीची झाली असली पाहिजे हें दिसतें. या त्याच्या काव्यांत स्वतंत्रपणा असला; त्याची भाषा प्रासादिक असली, तरी पूर्वीच्या त्याच्या लावण्यांतील तेज यांत नाहीं. सगनभाऊच्या काव्याची हीच तऱ्हा आहे. स्वातंत्र्याचें वैभव पाहिलेल्या शाहिरांकडून नव्या आंग्लशाहीवर सरस काव्य होणार कसे?

याहि काळांत जुन्या प्रकारची काव्यरचना अधून मधून होत होती, हें अनंतसुत विठ्ठलबोवा ऊर्फ कावडीबोवा यांच्या "दत्तप्रबोध" [शके १७८२] ग्रंथावरून समजतें. या ग्रंथाच्या सुमारे चौदा हजार ओंव्या असून, त्यांत नारद, पद्म व शिव इत्यादि पुराणांच्या आधारें मुख्यतः दत्ताच्या कथा व तदनुषंगानें जनार्दनस्वामी, एकनाथ, निंबराज, दासोपंतादि दत्तभक्तांच्या कथा आल्या आहेत. गुरुचरित्रापेक्षां या ग्रंथांत अनुसूया व दत्त यांचा तत्त्वज्ञानपर संवाद विस्तारानें आला आहे. तसेंच जनार्दन–एकनाथांच्या ज्या कथा आहेत त्याहि स्वतंत्र व गुरुचरित्रांत नसलेल्या अशा आहेत. ग्रंथाची भाषा सुबोध व रसाळ आहे. श्रोत्यांना विनवणी प्रेमळपणानें करण्यांत आली आहे. विठ्ठलबोवा म्हणतात, "ग्रंथरूपी हें मानससरोवर। येथें हंसरूपी तुम्ही श्रोते सुंदर। अर्थमुक्तापळें सेवणार। आणि निवडणार दुग्धपाणी॥" ग्रंथाची सुरुवात व समाप्ति कोठें व केव्हां झाली त्याविषयी कवि सांगतात, "हृदयभुवनीं श्रीदत्त। प्रगटोनि वदविला ग्रंथ। आरंभ जाला माळव्यांत। स्थळविख्यात परियसा॥ ॐकार अवंतिकामध्यस्थान। इंद्रपुरनामाभिधान। तेथें चाळीस अध्याय संपवोन। साधिले प्रयाण तेथोनी॥ पाहावें द्वारकाधीशासी। म्हणोनि निघालों वेगेंसी। पावलों येवोनि गुर्जरदेशीं। देवतीर्थ क्षेत्रांसी पाहिले॥ रेवाडाकुरमध्यस्थ। क्षेत्र बडोदें विख्यात। वसती साधुसंत योगी महंत। दैवतें अद्भुत महास्थानें॥...या क्षेत्रीं सुरस। अध्याय जाले एकवीस। पूर्वीचे असती

चाळीस। एवं एकसष्टीस रचियलें। श्रीमद्दत्तकृपाप्रसादेंकरोन। बोबड्या शब्दें जालें निरोपण। तुम्ही संतसाधुदयाधन। गोड करून घेइजे॥ शालिवाहन शके सत्राशे ब्यांयशी। संवत एकुणिशे सोळासी। प्रजापति नाम संवत्सरासी। परिपूर्तीसी ग्रंथ आला॥...अनंतसुत विनवी संतांसी। अनन्य भावें शरण पदासी। सांभाळि जे दीनासी। अभयदानासी देइजे॥ इति श्री दत्तप्रबोध ग्रंथ। श्रवणेंचि पुरती मनोरथ। सदा परिसोत भाविकभक्त। एकसष्टितमोध्यायार्थगोड हा॥" जवळ जवळ श्रीधर कवीची आठवण करून देणारा विठ्ठलबोवांचा हा ग्रंथ बडोदें येथें शके १८२२ मध्यें दामोदर सांवळाराम आणि मंडळीनें पूर्णचंद्रोदय छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला. हंसराज [शके १७२० ते १७७७] यांची रामदासी पद्धतीची वेदांतविषयक कविता याच काळांतील होत. वेदांतासारखा विषयहि सुगम करून सांगण्याची यांची शैली वाखाणण्याजोगी होती. उदासवृत्तिचें वर्णन त्यांनीं असें केलें आहे, "स्तब्धता परी जड नव्हें। सावध परी न हेलावे। उगेपणही न स्मरावें। हे उदासवृत्ति."

विठोबा अण्णा दप्तरदार [इ. स. १८१३ ते इ. स. १८७३] यांनीं पदें, कटाव वगैरे बरीच स्फुट व स्वतंत्र कविता लिहिली आहे. यांची कविता चंद्रशेखर म्हणतात त्याप्रमाणें प्रासादिक व रसवती आहे. माग ती जुन्या वळणाची व उपदेशात्मक आहे. राजा सर टी. माधवराव [इ. स. १८२१ ते १८९१] यांची कविता स्वतंत्र पण उपदेशात्मकच मुख्यतः आहे. त्यांच्या आर्या मोरोपंती आर्यांची आठवण करून देतात. भास्कर दामोदर पाळंदे [इ. स. १८३२ ते इ. स. १८७४] यांची कविता स्वतंत्र असून विविध वृत्तात्मक व पद्यात्मक आहे. त्यांनीं रत्नमाला नांवाचा एक उत्कृष्ट ईश्वरभक्तिपर पद्यग्रंथ लिहिला आहे. त्यांची कविता भक्तिरसाने ओतप्रोत भरली आहे. त्यांच्या रत्नमाला काव्यावर मोरोपंतांच्या केकावलीची दाट छाया पडलेली स्पष्ट दिसते. महादेव मोरेश्वर कुंटे [इ. स. १८३५ ते इ. स. १८८८] यांचें काव्य अगदीं स्वतंत्र शैलीचें आहे. वर्डस्वर्थ कवि

प्रमाणें सामान्य लोकांच्या भाषेंत यांनीं आपल्या 'राजाराम महाराज' 'राजा शिवाजी' व 'मन' या काव्यांची रचना केली आहे. बालसंभाजीचें कुंट्यांनीं केलेलें वर्णन किती हृद्य आहे तें बघा:—"चिमुकली पगडी झळके शिरीं। चिमुकली तरवार धरी करीं ॥ चिमुकला चढवी वर चोळणा। चिमुकला सरदार निघे रणा ॥" शिवराम रामकृष्ण नित्सुरे [मृत्यु इ. स. १८७८] यांची कविता स्फुट व कथनपर अशी आहे. 'नगर दहन' हें यांचें काव्य ग्रन्थापैकीं असून, त्यांत करुणरसाचा परिपोष चांगला झाला आहे. परशुरामपंत तात्या गोडबोले, कृष्णशास्त्री चिपळूणकर, गणेशशास्त्री लेले ही या काळांतील विशेष प्रसिद्ध अशीं कविमंडळी होती. परंतु या तिघांच्या काव्यांत स्वतंत्रपणा असा फारच थोडा आहे. उत्तररामचरित व मृच्छकटिक यांतील परशुरामपंत तात्यांची रूपांतरित कविता प्रौढ, सुलभ व हृदयंगम आहे. कृष्णशास्त्र्यांचें मेघदूताचें भाषांतर अत्यंत रमणीय आहे. याशिवाय त्यांच्या अनेक अन्योक्ति मार्मिक व बहारीच्या आहेत. गणेशशास्त्री लेले यांनीं केलेलें रघुवंशाचें पद्यात्मक भाषांतर सरस आहे.

साहित्याचें मूल्यमापन

इ. स. १८१८ पासून ते इ. स. १८७४ पर्यंतच्या सुमारे साठसत्तर वर्षांच्या कालावधींत लहान मोठीं अशीं अदमासे एक हजार पुस्तकें तयार झालीं. न्यायमूर्ति रानडे यांनीं सरकारच्या हुकुमावरून इ. स. १८६४ मध्यें जो वृत्तांत तयार केला त्यांत ६६१ ग्रंथांचा निर्देश आहे. इतर देशी भाषांच्या मानानें ही संख्या निःसंशय अधिक असली, तरी जें साहित्य निर्माण झालें तें सामान्य प्रतीचेंच झाल्याचें न्यायमूर्तीनीं म्हटलें आहे. उत्तम साहित्याच्या सदरांत पडूं शकेल असा एकहि ग्रंथ एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या पाऊणशे वर्षांत मराठी वाङ्मयांत तयार झाला नाहीं. लोकहितवादी, विष्णुबुवा ब्रह्मचारी, नीळकंठराव कीर्तने, दादोबा पांडुरंग, महादेव मोरेश्वर कुंटे, बाळशास्त्री जांभेकर, ज्योतिबा फुले अशांसारखी पांच

दहा मंडळी स्वतंत्र प्रज्ञेची व प्रतिभेची या काळांत झालेलीं आढळतात. यांच्या वाङ्मयांत नावीन्य, ताजेपणा व तेज यांचा प्रत्यय बऱ्याच अंशांनीं येतो. लोकहितवादींच्या "शतपत्रां"त, विष्णुबुवांच्या "वेदोक्तधर्म प्रकाशां"त, कुंट्यांच्या "राजा शिवाजीं"त, जोतिबांच्या गुलामगिरी पुस्तकांतील कांहीं भागांत विचारांचा ताजेपणा व दमदारपणा निःसंशय आढळतो. समाजाला जागृत करण्याचें, डिवचिण्याचें सामर्थ्य यांच्या लिखाणांत आहे. बाकीचें सारें वाङ्मय परधार्जिणें, परभृत, पराश्रित असेंच आहे. एतद्देशियांना अजिबात ज्ञानाचा, वाङ्मयाचा गंध नाहीं, तेव्हां त्यांना धुळाक्षरें शिकविण्यापासूनची तयारी केली पाहिजे अशा भावनेनें, सरकारी प्रोत्साहनानें व मिशनऱ्यांच्या प्रयत्नानें तयार झालेलें हें वाङ्मय आहे. याचें स्वरूप मुख्यतः बालोपयोगी, शालोपयोगी असें आहे. सुरुवातीला याचें स्वरूप प्रायः गद्यप्रधान असल्यानें व याला इंग्रजांची स्फूर्ति लाभल्यानें, महामहोपाध्याय दत्तोपंत पोतदार यांनीं मराठी गद्याचा इंग्रजी अवतार असें म्हटलें आहे. खरोखर हा एक अवतारच होता, यांत स्वतंत्र तेज मुळींच नव्हतें. इ. स. १८१८ ते १८३९ या मुदतींत तयार झालेल्या माधवराव मुनशीकृत सभारंजनी बखरींतील जुन्या तेजस्वी गद्याशीं बापू छत्रे यांच्या बाळमित्र [इ. स. १८२८] या तत्कालीन गाजलेल्या पुस्तकांतील गद्याची तुलना केली असतां, दोहोंतील फरक स्पष्ट होतो. माधवराव मुनशी म्हणतात, "श्रीमत् जगदीश्वराप्रति नमन करून ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ करितों कीं, पूर्वी हा ग्रंथ साहेब आलिषान मिस्तर हरनगटनसाहेब बहादुर यांणीं शेरअल्ली मुनशी याजकडून उडदू भाषेंत करवून याचें नांव आरायेष महफील असें ठेवून सन १८०४ या सालांत छापखान्यांत देऊन छापविला. परंतु जे लोक पारसी विद्येंत प्रवीण नाहींत त्यांचें समजुतींत येत नाही. याजकरितां प्रवृत्तीचे मराठी भाषेंत तरजुमा केला असतां इकडील सर्व लोकांचे समजुतींत चांगला येईल म्हणोन श्रीमन्महाराज क्षत्रियकुलावतंस राजश्री छत्रपति स्वामी यांणीं आज्ञा केल्यावरून माधवराव मुनषी याणें त्यांतील सार अर्थ

काढून या पोथीची योजना करून इचें नांव सभारंजनी असें ठेविलें. ऐसियास हा ग्रंथ साद्यंत जो कोणी मनन करील त्यास सर्व हिंदुस्थानचें वर्तमान येथपर्यंत समजेल कीं, कोणी सामान्य लोक त्याजपुढें येविषयींची कल्पना बोलूं शकणार नाहीं." बाळमित्रकार म्हणतात, "असें बोलणें होऊन तीं मुलें (जाई व कामू) निजायांस गेली. दुसरा दिवस उगवला तों तीं उजाडतां उठावीं तीं प्रहर दिवस येईपर्यंत अंथरुणावरच होतीं. अधिक वेळ निजतात त्यांचें आंग जड होतें, कांहीं सुचत नाहीं, तसें कामूस आणि जाईस झालें. शेवटीं कोणीं हांक न मारितां, तीं आपले आपण कावरीबावरी झालेलीं उठलीं. मग त्यांचें मनांत आलें कीं, आपण सगळा दिवस हवें तें करूं. तेणेंकरून त्यांचे जिवास अंमळ संतोष वाटला." बापू छत्रे यांच्या भाषेंत साधेपणा निःसंशय आहे. परंतु सभारंजनींतील उताऱ्यांत जें तेज आहे तें त्यांच्या किंवा तत्कालीन कोणत्याच गद्यांत सामान्यतः आढळत नाहीं. ओजस्वी आणि आत्मप्रत्ययी वाङ्मय या काळांत तयार झालेंच नाहीं. स्वातंत्र्य गेल्यानें लोकांच्या ठिकाणचें तेज व आत्मप्रत्यय हीं गेलीं होतीं. भांबावल्यासारखे, खुरटलेल्या विचारांचे, इंग्रजांच्या आचारविचारांनीं आणि साहित्यानें दीपल्यासारखे सारे लोक झाले होते. जसे लोक तसें त्यांचें वाङ्मय. ज्योतिबा फुल्यांसारख्या स्वतंत्र विचार करणाऱ्या गृहस्थांनाहि मिशनरी व इतर इंग्रज यांचें सर्व कांहीं आवडे. स्वदेशाभिमान—स्वधर्माभिमान—स्वेतिहासाभिमान याची दाद त्यांना देखील नव्हती. मग इतरांची काय कथा ! विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालारूपी तुतारीनें सर्वांना खडबडून जागे केलें व स्वत्वाची जाणीव करून दिली. पण हा पुढील भाग आहे. साकल्यानें पाहिलें असतां हें वाङ्मय अगदीं सामान्य प्रतीचें आहे. पेशवाई नष्ट होण्यापूर्वीचें वाङ्मय एक प्रकारचें झालें. निबंधमालेपासूनचे वाङ्मय दुसऱ्या प्रकारचें आहे. पेशवाई नंतरच्या व निबंधमालेपूर्वीच्या वाङ्मयाला मधल्या स्थितींतील मध्यम प्रतीचें वाङ्मय म्हणतां येईल. या वाङ्मयासंबंधीं

महामहोपाध्याय पोतदार म्हणतात,[१] "या पाऊणशें वर्षांत एकहि अलौकिक किंवा अजरामर ग्रंथ मराठींत झाला नाहीं. लहान सहान सटरफटर ग्रंथ भाराभर झाले. 'तारागण' पुष्कळ उगवला पण तमोनाशक चंद्र मात्र कोठेंच आढळला नाहीं...स्वराज्य गेलें आणि पाठोपाठ सरस्वतीहि आम्हांस विन्मुख झाली!...कल्पना करा कीं, झाला प्रकार असा न होता आणि क्षुद्र स्कूलबुकांचीं भिकार भाषांतरें निपजविण्याचा साभिमान हव्यास न धरितां ज्ञानेश्वर मुक्तेश्वर प्रभृति थोर वागीश्वरांचा 'मागोवा' घेत आणि कृष्णाजी सभासद किंवा कृष्णाजी शामराव यांसारख्या खंद्या बखरनवीसांना 'वाट पुसत' जर आमची मंडळी निघाली असती तर विशाल व अभंग अशा प्राचीन अधिष्ठानावर आरूढ होऊन ते न जाणो ततोप्यधिक यशाचे वांटेकरी झाले असते!...जुन्या महनीय अधिष्ठानाचा विसराळूपणानें किंवा अज्ञानानें त्याग न करितां त्याचेंच संपूर्ण बल घेऊन जर नवीन अवतार आमच्या मराठी गद्यानें घेतला असतां तर विद्रूप इंग्रजी अंगडीं टोंपडीं आणि कुंचडीं घालीत बसण्यांत पाऊणशें वर्षें आम्ही खास फुकट दवडलीं नसतीं!...जुन्याच रस्यावर नवी खडी पसरून व प्रसंग पडल्यास लोखंडी रूळ टाकून आपण झटकन् येरझारा सुरू केल्या असत्या! जुनी राजकारणी भाषा कमावलेली तयार होती तेव्हां हां हां म्हणतां त्याच सांच्यांत गिबनग्रोट आपण सहज ओतून दिले असते! तवा तापलाच होता, तेव्हां त्या सिद्धाग्नीवर जुन्या पुरणपोळ्यांबरोबरच नवे रोट भाजून घेणें काय अवघड पडलें असतें? पण त्या सिद्धाग्नीवर आपण राख साचू दिली, क्वचित् पाणीहि ओतले व नवीन भट्ट्या बांधण्यासाठीं चिखलमाती तुडवूं लागलों! याला काय म्हणावें? पाऊणशें वर्षें गेल्यावर विष्णुशास्त्र्यांनीं भाता फुंकून जेव्हां ही राख फुंकून उडविली तेव्हांच मग आपली चूक आपल्या ध्यानांत आली!"

---

१ मराठी गद्याचा इंग्रजी अवतार, आवृत्ति पहिली, उपोद्घात.

REFBK-0007765